

रणजितसिंगकालीन

काश्मीर व पंजाब

बारोन ह्यूगेलचें प्रवासवृत्त

(१८३५-३६)

दि. के. देशपांडे.

ऐतिहासिक प्रवासवृत्त माला : पुष्प पहिलें

रणजितसिंगकालीन

काश्मीर व पंजाब

[बारोन ह्यूगेलचें प्रवासवृत्त : १८३५–३६]

: लेखक :

दि. के. देशपांडे एम. ए.

प्रताप कॉलेज, अमळनेर

विक्रेते : कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणें २.

प्रकाशक :
वि. के. देशपांडे
४२५/ब/५ सदाशिव, पुणें २

प्रथमावृत्ति : जून १९५७
किंमत तीन रुपये

मुद्रक : शं. रा. दाते
यशवंत छापखाना
६२३/४ सदाशिव, पुणें २

कै. तीर्थरूपांचे चरणीं

सादर समर्पण

पुरस्कार

(लेखक – महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार)

आज ज्या पुस्तकाचा पुरस्कार लिहिण्यास बसलों आहें त्या प्रकारचीं पुस्तकें आपल्या भाषेंत क्वचितच लिहिलीं जातात. मग प्रसिद्ध होत नाहींत हें उघड आहे. प्रस्तुतचें पुस्तक एक प्रवासवृत्त आहे. पण या पुस्तकांत केवळ वृत्तच नाहीं तर विचारसुद्धां आहेत. ‘ प्रवासवृत्तविचार ’ असें नांव किंवा वर्णन याचें केलें तर तें अधिक यथार्थ ठरेल. यापेक्षांही या पुस्तकाचा आणखीही एक विशेष असा आहे कीं हें पुस्तक एकाद्या विद्यमान प्रवाशाच्या प्रवासवृत्ताचें नाहीं. तर या पुस्तकांतील माहिती व विचार लिहिणारा ग्रंथकार होऊन गेल्याला आतां शंभरावर वर्षें झालीं. शिवाय हा प्रवासी भारतीय प्रवासी नाहीं ; भारताचा प्रवास करण्यासाठीं परदेशांतून आलेला आहे.

मग कोणी सहज प्रश्न करील कीं या पुस्तकाचें भाषांतर, रूपांतर किंवा सार मराठी भाषेंत आणण्याचें प्रयोजन काय ? या प्रश्नाचें उत्तर एकच नाहीं. अनेक परींनीं तें द्यावें लागेल. भारतीयांनीं लिहिलेलीं प्रवासवर्णनें आहेत काय ? असल्यास किती ? त्या प्रवासवर्णनांची योग्यता वा उपयुक्तता किती ? या प्रश्नांचा मागोवा घेत गेलों तर लक्षांत येईल कीं भारतीयांनीं लिहिलेलीं प्रवासवर्णनें जवळजवळ नाहींतच असें म्हटलें तर तें खरेंच आहे. अहो ! या आपल्या देशांत समुद्रयानाला प्रतिबंध होता; प्रायश्चित्त होतें. तेव्हां जलमार्गानें निदान ब्राह्मणादि साक्षरवर्ग समुद्रप्रवास करून द्वीपांतरास जाऊंच शकत नसत. आमच्या क्षत्रिय राजांनीं कांहीं कधीं भारतबाह्च प्रदेशावर लोभी नजर ठेवली नाहीं. म्हणून समुद्र ओलांडून पराक्रमानें नवें राज्य जोडण्याची ओढही कमीच दिसून आली असेल तर तें साहजिकच ठरेल. राहतां राहिले वैश्य. या वैश्य वर्गांतील लोक द्वीपांतराला जात असल्याबद्दलच्या कथा जातकांतून वगैरे अनेक येतात. चीन देशाला आपले व्यापारी गेल्याचे उल्लेखही सांपडतात. शूद्रांना एकट्यांना कोठून जाणें घडणार ? ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य गेले तरच त्यांच्या गाड्याबरोबर यांच्या नळ्याला यात्रा घडावयाची !

भारतांतून अनेक शास्त्रें, कला परदेशांत गेल्या. भारतीयांच्यापासून अरबांनीं ज्ञान घेतलें, अरबींतून आणखी पलीकडील देशांत तें पसरलें. अनेक परकीय प्रवासी – विशेषतः बौद्ध भिक्षु – हे परदेशांतून भारतांत येऊन राहून गेले. त्यांनीं केलेलीं यात्रावर्णनें आजही वाचावयास मिळतात. पुढें इस्लामी विद्वान् व प्रवासी यांनींही वर्णनें लिहिलीं. इब्न बतूता किंवा अलबेरुणी हीं नांवें सर्वश्रुत आहेत. तथापि कोणी बाहेरदेशीं गेलेल्या भारतीयानें लिहून ठेवलेली माहिती आजला कांहीं आपणांस उपलब्ध झालेली नाहीं ही मोठी दुःखद घटना समजली पाहिजे. कोणाशीं ओळख झाली, संगत वाढली कीं त्याचे आचारविचार हे निदान आपल्या सहानुभूतीचे विषय तरी बनतात. त्यांजविषयीं तितकी कडवी भावना मनांत टिकत नाहीं. याच परिणामाला भिऊन असेल कीं परदेशगमनावर धार्मिक प्रतिबंधच घाला म्हणजे, राजवाडयांचा शब्द वापरावयाचा तर आपोआपच 'संबंधट्वालन' घडेल, असा विचार बळावला असेल. मग आपली संस्कृति भ्रष्ट कशी होईल ? तिची शुद्धता कायम राहील. परधन परदारा यांच्या जोडीला याप्रमाणें परदेश सहज बसवितां आला. पण यांत लाभालाभाचा, दूरवर दृष्टि ठेवून विचार साधला नव्हता. परदेशांशीं संबंध अनिर्बंध वाढू द्यावा हें एकंदरींत हितकारक ठरत नाहीं. नवीन तऱ्हेच्या प्रजेचा प्रश्न हा याच प्रक्रियेंतून निष्पन्न होतो. म्हणून हा प्रश्न नीटपणें सोडविणें वाटतें तितकें सोपें नाहीं. आजही पोलादी पडदे किंवा जाळयांचे पडदे तरी अनेक राष्ट्रें ठेवीतच आहेत ना ?

प्रश्न कठिण असला म्हणून परस्परसंपर्कावर पूर्ण बंदी घातल्यासारखी उपाययोजना घातकच म्हणावी लागेल. कारण या जगांत आपल्यापलीकडील जगाविषयींचें अज्ञान बाधल्याशिवाय राहात नाहीं; आणि आपल्यापलीकडे असलेल्या जगाची ओळख आपल्याला अधिक चांगलें माणूस बनविण्यास हटकून मदत करील. भारतांत समुद्रयानावर बंदी अगदीं प्रारंभींच्या काळापासून नव्हती; तरीही तिचा अंमल एक सहस्र वर्षें तरी चांगलाच कडक राहिला असावा असें वाटतें.

प्रवास हा ज्ञानाला पोषक आहे किंबहुना आवश्यक आहे हें एकदां ग्राह्य झालें म्हणजे भारतांत आम्ही प्रवासबंदीचा पुरस्कार केल्यानें तें अज्ञानालाच

आमंत्रण दिल्या सारखें झालें. यामुळें इकडे प्रवासवर्णनांची पैदासच झाली नाहीं. या कारणामुळें भारतीयेतर प्रवाशांनीं लिहिलेल्या ग्रंथांतील ज्ञान आमच्या भाषांतून ग्रथित करून सर्वसुलभ केलें पाहिजे. प्रवासवर्णनें वाचून दृष्टीला एक प्रकारची विशालता येतेच येते. जशी डोळ्यांची शारीरिक दुर्बलता वा लघुदृष्टि उपनेत्रांच्या साहाय्यानें कमी होते, तद्वतच आपल्या ज्ञानचक्षूंची दुर्बलता म्हणजे आपला ज्ञानविषयक लघुदृष्टिदोष दूर करण्यास प्रवासी जनांच्या ज्ञानसंग्रहाचा उपयोग होतो.

अन्य भाषांतील प्रवासवाङमय फार प्रचंड आहे. हाक्लुयत् सोसायटीच्या मुद्रित ग्रंथांची उतरंड नुसती डोळ्यांसमोर उभी राहिली तरीही आश्चर्याला सीमा राहत नाहीं! भारताविषयीं माहिती ज्यांत ग्रथित झाली आहे त्याच ग्रंथांतील माहितीचें चयन करावयाचें ठरविलें तरीही तें कार्य एकाद्या प्रादेशिक विद्यापीठानें स्वतंत्रपणें हातीं घेण्याइतकें महत्त्वाचें कार्य आहे. भारतसरकारनें एकाद्या विद्यापीठाकडे हें कार्य सोपविलें आणि आवश्यक द्रव्यसाहाय्य देण्याचें ठरविलें तर प्रथम हे ग्रंथ हिंदीमध्यें प्रसिद्ध करणें युक्त होईल. कारण हिंदींतून भिन्नभिन्न देशी भाषांत त्यांचें अवतरण सुलभतेनें होऊं शकेल. शिवाय हिंदी समजणारांची संख्या भारतांत सर्वत्र प्रतिवर्षी वाढत जाणार असल्यामुळें या ग्रंथांचा उपयोग करणारांची संख्याही भारताच्या भिन्नभिन्न विभागांत पुष्कळ आढळून येईल. वर दिल्या योजनेसारखी योजना प्रत्यक्ष सिद्ध होईपावेतों शक्य ते प्रयत्न स्वबळावर करण्यास प्रारंभ करणें हेंच इष्ट होय. प्रा. दि. के. देशपांडे यांचा प्रस्तुतचा प्रयत्न त्या दृष्टीनें अभिनंदनीयच म्हणावा लागेल.

पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष ज्ञानाची जोड दिल्याशिवाय ज्ञानाची पूर्ति होत नाहीं या समजुतीनें कित्येक विद्वानांनीं अशा सूचना केल्या आहेत कीं विद्यापीठांतर्फे विद्यार्थ्यांस उत्तीर्णपत्रक देण्यापूर्वी त्यानें कांहीं महिने प्रवास करून आलें पाहिजे. जर्मन देशांतील दोन विद्यार्थी पुण्यांत याप्रमाणें प्रवास करीत आले होते. त्यांच्या तोंडून त्यांचा उद्देश कळला तो असा :– " स्वतःच्या बळावर जमेल तो उद्योग करून आपलें पोट आपण भरावें आणि याप्रमाणें निदान दीडदोन वर्षें जर्मनीबाहेर प्रवास करून जग पाहून यावें म्हणजे पदवी घेण्यास आपण पात्र होऊं. या

नियमाप्रमाणें आपण हिंदुस्थानास आलों. आपण देशोदेशीं फिरलों आणि वाद्यें वाजवून निरनिराळ्या देशांचीं राष्ट्रगीतें शेतकऱ्यांस म्हणून दाखविलीं. कांपणीच्या कामीं शेतकऱ्यांस मदत केली. त्यामुळें सर्वत्र आपलें स्वागत मनोभावानें झालें आणि पोटाची व्यवस्था तर लागलीच, पण पुढील वाटखर्चाचीही सोय होत गेली." असो. आणखी असें पाहा कीं आपण नेहमी म्हणतों ना कीं 'तो काय ? असा फसणार नाहीं किंवा घाबरणार नाहीं. तो बारा गांवचें पाणी प्याला आहे.' याचाच अर्थ त्यानें देश विदेश पाहिले आहेत. आणि म्हणून नाना प्रकारच्या चाली आणि चमत्कारिक दिसणारे आचार त्यानें पाहिलेले आहेत. प्रवासांत अनेक गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून खात्री करून घेतां येते. मग दुसऱ्याच्या गप्पांवर फाजील विश्वास ठेवण्याचें कारणच पडत नाहीं मुळीं ! जावें तेथें त्या गांवाचें नांव, तेथील धर्म, राजवट, बाजारहाट, उद्योगधंदे यांची माहिती होते. नाना भाषा कानीं पडतात. त्यांत कधींकधीं विलक्षण शब्दसाम्य किंवा प्रयोगसाम्य आढळून येतें आणि कितीतरी आनंद होतो. आसाममध्यें असतांना तेथें नटुवा – नटुआ – नटवा शब्द कानीं आला ! तो देश नृत्यकलेसाठीं प्रसिद्ध आहे. आम्हां पाहुण्यांसाठीं तावडतोब एक नृत्य-प्रयोग करून दाखविण्यांत आला. त्यांत मोठमोठ्या पगारावरच्या अधिकाऱ्यांच्या घरची तरुणमंडळी होती. चर्चेंत नटुआ- नट हा शब्द कानीं आला. तेव्हां आपल्या इकडील ज्या मोडी कागदांत गुणिजनांच्या यादींत नटव्यांच्या नोंदी पहावयास मिळालेल्या होत्या त्याची आठवण झाली; आणि हा नटुआ – नटवा शब्द पुण्यापासून गौहत्तीपर्यंत चालत असलेला पाहून भारतीय संस्कृतीच्या मूलभूत ऐक्याचा एक बारिकसा पैलू लक्षांत आल्यामुळें मोठाच हर्ष वाटला. मग आणखी असले पैलू ध्यानांत येऊं लागले. प्रवासांत असे शब्द भेटतात, स्थळें भेटतात, आचार भेटतात. पाहून विलक्षण आश्चर्य वाटतें. आसाममध्येंच गाडींत बसून गाडीचे बैल हाकीत चाललेला खेडूत पाहून मला वाटलें याचो ही अर्धी बंडी आणि नेसलेलें धोतर, डोक्यावर ठेवलेली शेंडी अशा अवतारांत जर याला उचलून साताऱ्याच्या किंवा नगरच्या बाजारपेठेंत उभा केला तर तिकडील शेतकरी खेडुतांत रंगरूप पोशाखानें हा सहज खपून जाईल ! हा आणखी

एक पैलू मिळाला. पण हें प्रवासामुळें घडलें, कळलें! एकदा कांची-कामकोटि शंकराचार्यांच्या भेटीला जाण्याचा योग आला. भेटीचें स्थळ कुंभकोणम्‌पासून नऊ दहा मैलांवर होतें. पुडी होती. प्रसादाला बसलों. अगदीं कडक ब्राह्मणी थाट होता. तामीळ भाषा मला येत नव्हती. गप्प बसून होतों. मला घेऊन येणारे अध्यापक मित्र जरा दूर बसले होते. वाट पाहत होतों कीं पाणी पिण्यास भांडीं मिळतील. पण छे! तसाच प्रारंभ झाला. मला प्रारंभींच पाणी प्यावें लागतें. पण भांडें कोणाजवळ नाहीं, पाणी कसें अन्‌ केव्हां मिळणार ? कांहीं वेळानें पाण्याची घागर एका खांद्यावर आणि हातांत चांदीचें भांडें घेऊन एक गृहस्थ पंक्तींत आले. त्यांचेपासून भांडें घेऊन पाणी घ्यावयाचें पण भांडें उष्टें न करतां, तोंडाला न लावतां घटाघटा वरूनच हवें तितकें प्यावयाचें ! इतरांचें पाहून मी तसेंच केलें ! तहान भागली ! मागाहून कळलें कीं भांडें तोंडाला लावलें असतें तर मोठाच दोष पदरीं आला असता ! गोष्ट बारीक आहे, पण ठिकठिकाणचे रीतिरिवाज ठाऊक नसले तर बारीक गोष्टीवरून देखील एकादा बांका प्रसंग पुढें उभा राहतो. हें असलें शहाणपण आणि या कामीं लागणारा धीटपणा प्रवासाशिवाय अंगीं कोठून येणार ? म्हणून प्रवास हा जीवनांतला एक मोठा मार्गदर्शक गुरु आहे असें म्हटलें असतां शोभेल.

धाडसी प्रवासी हे समाज आणि राष्ट्रें यांना एक प्रकारें वाटाड्यासारखें होतात असेंही म्हणतां येईल. हिंदुस्थानचें नांव आणि कीर्ति जग कानांनीं ऐकून होतें; पण कोलंबसासारखे धाडसी नाविक त्या वासावर जीव धोक्यांत घालून निघाले. पण झालें असें, निघाले रामेश्वरला अन्‌ पोंचले सोमेश्वरला ! प्रख्यात सुवर्णभूमि भारत राहिली एका बाजूला पण या बहादुराला दुसरें मोठें घबाड मिळालें ! आज तीच अमेरिका साऱ्या दुनियेंत गाजते आहे. कोलंबसानें तिची ओळख करून देईपावेतों तिचा ठावठिकाणाही नव्हता आपल्याला ! एकदां समुद्राला पालाण घातलें मग आमची सुवर्णभूमि निसटणार कशी ? आले, पाहिली आणि जिंकलीही ! आम्हांला तर कोण आले, कोठून आले कांहीं पत्ता नाहीं ! असणार कोठून ? आलेले जुने झाले ! वरचढ ठरले ! मग सवाई

माधवरावासाठीं भूवर्णनाचा पाठ तयार झाला त्यांत 'लंडन नामें देश आहे' असली माहिती ग्रथित झाली होती. बाकीच्यांना दधिसमुद्र आणि मेरुपर्वत यांच्यांतच घिरट्या मारीत रहावें लागलें ! देश ठाऊक नाहीं, वाटा ठाऊक नाहींत, मग अशा कूपमंडुकांना कोठलें धाडस, कसलें स्वराज्य आणि कशाचें स्वातंत्र्य ? आजही असेंच होत आहे. जगांत कोठें कसलें तरी नवें वारें वाहूं लागतें आणि मग कधीं वादळाच्या वेगानें तर कधीं न कळत त्याचा संचार आमच्या जीवनांत होऊन तें बदलतें तरी त्यालाही राजी ! ! समुद्रांत दूरवर जाऊन केलेल्या प्रवाशांनीं जगांतील भेटलेल्या भागांचे नकाशे काढून दिले. त्यामुळें आणि मोठाले मोकळे आणि सुपीक प्रदेश आपल्याला मिळतील, आपल्या राज्याची वाढ होईल, आपल्या समाजाच्या वैभवांत मोठी भर पडेल, नवे नवे पदार्थ आपल्याला मिळतील, अशीं आमिषें प्रवाशांच्या वर्णनांत सांपडत, त्यामुळेंच सोनें लुटण्याची आशा उद्‌भवून ब्राझील वगैरे देशांत स्पॅनिश साम्राज्याची स्थापना झाली आणि हिंदुस्थानचा शोध याच लोभानें लावण्यांत आला.

संस्कृत भाषेचा परिचय युरोपाला भारताची ओळख झाल्यामुळेंच झाला. मग संस्कृत आणि ल्याटिन प्रभृति पाश्चात्य भाषांतील शब्दांचें वगैरे विलक्षण साम्य लक्ष्यांत येऊन मानवाची एक कुळी हें व्यापक नातें प्रस्थापित झालें. एकमेकांमध्यें एक नवी जवळीक निर्माण झाली. या जवळिकेच्या जाणिवेचा अपरिहार्य परिणाम असा होतो कीं दुसऱ्या तिसऱ्याशीं दुरीक निर्माण होते किंवा वाढीस लागते. पण जसजसा अधिकाधिक प्रवास होतो व निरनिराळे विविध मानवगट व त्यांचे व्यापार, व्यवहार अवलोकनांत येतात तसतशी मानवांची व्यापक एकताही मनावर ठसत जाते.

प्रवास घडले म्हणूनच तर बटाटे हिंदुस्थानांत आले, गुलाब येथील बागांत फुलले, स्वयंपाकांत मिरची झणझणूं लागली, सोयाबीन इकडे स्थिर होऊं पहात आहे, चहाची पुष्कळ सोय लागली आहे, चिक्कू लोकप्रिय झाला आहे; हापूसची आगळी लज्जत आणि मिठ्ठास पक्की झाली आहे. असे एक ना दोन, शेंकडों प्रकार आपल्या खाद्यपेयांत घुसून सुखानें संसार करीत आहेत. उलट हिंदुस्थानांतून आणि अतिपौर्वात्य देशांतून नाना प्रकारचे सुगंधी पदार्थ आणि मसाले पश्चिमेकडे वारंवार भेटीस जात आहेत.

सुगंधि पुष्पें पाश्चिमात्यांच्या सुरंगाला जोड देतील तर किती बहार होईल या नुसत्या कल्पनेनेंच सुवास दरवळल्यासारखा भास उत्पन्न होत आहे.

प्रवासामुळेंच हें कळून आलें कीं पक्षिमंडळांतील एक जात एका वर्षांत एका ऋतूंत भारतांत आढळते तर त्याच जातीचे तेच पक्षी त्याच वर्षांत दुसऱ्या ऋतूंत हजारों कोस दूर जाऊन पृथ्वीच्या निराळ्या गोलार्धांत वस्तीला गेलेले आढळतात. टोळधाडीची चाल, पक्षी, प्राणी यांच्या जीवनाविषयीं लक्षावधि गोष्टी विचक्षण आणि विवेचक प्रवाशांच्या लेखांवरूनच कळून आल्या आहेत. प्रवाशांनीं मनुष्याच्या ज्ञानांत केवढी अचाट भर टाकली आहे, विचार करा. ज्ञानाचें साधन म्हणून प्रवास किती श्रेष्ठ मात्तबरीचें साधन होऊं शकतो हेंही आतां वाचकांच्या ध्यानांत आलें असेल. अशा श्रेष्ठ ज्ञानसाधनाचा जे उपयोग करीत नाहींत ते डोळे असून आंधळे, पाय असून पांगळे, डोकें असून खुळे होत असें म्हणण्यास कसलाही संकोच करण्याचें कारण नाहीं.

बाहेर देशांत बंदुकीच्या दारूची युक्ति निघाली, वाफेनें यंत्रें चालूं लागलीं समुद्रावर प्रवास फार त्वरेनें होऊं लागला, विजेची शक्ति ताब्यांत येऊन घरोघर विजेचे दिवे नुसते खटके दाबतांच उघडूं मिटूं लागले. पण हें सारें दूर देशांत घडून येत असतांना आणि प्रत्यक्ष घडून आल्यानंतरही जर आपण आपल्या घराच्या खुराड्यांतून बाहेर पाऊलच टाकलें नाहीं, म्हणजेच प्रवास करून देशोदेशींचे चमत्कार ध्यानांत घेतले नाहींत तर कांहीं तरी नवें करावें, बाहेरून संकटें येण्यासारखीं असलीं तर त्यांचा बंदोबस्त आगाऊ करण्याच्या युक्त्या व उद्योग करावे, नवे शोध असे लावावे कीं जेणेंकरून सर्व मानवांमध्यें बंधुभाव वाढेल, शांतिसुख नांदेल, अहंता उणावेल, जवळीक दुणावेल, हें कसें घडून येणार ?

प्रवासाचें एवढे लाभ विस्तारानें सांगण्याचें कारण प्रवासप्रथा आणि प्रवासी वाङ्मयाची आमच्या इकडे दिसून येणारी कोताई हेंच होय. प्रा. दि. के. देशपांडे यांनीं या उपेक्षित शाखेकडे लक्ष्य पुरविलें आणि प्रथमच ज्या प्रवासवृत्ताची निवड परिचयासाठीं केली त्यावरून त्यांची मार्मिकता आणि ज्ञानप्रसाराची आकांक्षा दिसून येते. मराठी साहित्यांतील एक उणीव

भरून काढण्याची त्यांची आकांक्षाही स्पष्ट प्रत्ययास येते. अलीकडे 'सकाळ' पत्रांत इब्न बतूता या प्रख्यात अरबी प्रवाशाचें मनोरंजक वृत्त मराठींत आणण्याचा प्रयत्न होत आहे. सकाळकारांचा हा दृष्टिकोन आजचा नाहीं; आपल्या पत्रांतून ते प्रवासवृत्तें वगैरेंचा समावेश करीत असतात. पण अद्यापि तीच सामग्री ग्रंथरूपानें उपलब्ध करून देण्याचें श्रेय त्यांनीं साधलें नाहीं. प्रा. देशपांडे यांनीं जो उपक्रम केला आहे त्याला जर एकाद्या कायम मालेचें स्वरूप येईल तर तें अत्यंत इष्ट होईल. शिक्षणसंस्था, सरकारें आणि साहित्योत्तेजक संस्था यांनीं भरपूर साहाय्य दिल्यास प्रवासी वाङ्मयाची शाखा मराठींत बद्धमूल झाल्याशिवाय राहणार नाहीं.

प्रवासी सत्यकथा प्रसंगीं कल्पित कांदबरीपेक्षांही मनोवेधक किंवा चित्त थरारून टाकणाऱ्या असतात. यामुळें हें प्रवासी वाङ्मय योग्य निवड करून मराठींत उतरल्यास लोकप्रिय होईल अशी सबळ आशा वाटते. बारोन ह्यूगेल यांच्या प्रवासवृत्तांतील जें प्रकरण साररूपानें प्रा. देशपांडे यांनीं मराठींत मांडलें आहे तें आम्हीं समग्र वाचलें. आम्हांला तें फार रोचक वाटलें. बारोन ह्यूगेल हा फारच मार्मिक, सखोल बुद्धीचा आणि चौरस दृष्टीचा गृहस्थ आहे हें त्याच्या लिहिण्यावरून चटकन मनांत आल्याशिवाय रहात नाहीं. अनेक स्थळींचे ह्यूगेल याचे विचार पाहिले तर अत्यंत मननीय वाटतात. यांतील आपल्या दृष्टीनें विशेष लक्षांत ठेवण्याजोगे विचार प्रा. देशपांडे यांनीं जर जाड ठशांत छापले असते तर तिकडे अधिक लौकर लक्ष्य वेधलें असतें आणि ते अधिक लक्षांतही राहिले असते.

उदाहरणार्थ, पृ. ३४ वरील ब्राह्मणाचे मार्मिक उद्‌गार पहा. थोडी रामचंद्र-पंत अमात्यांची आठवण होते. पृ. ५२ वरील बौद्ध विहाराचे किंवा देवळाचे खंडहर किंवा पृ. ५३ वरील विणकरांचें दारिद्र्य आणि कोंड्याचा मांडा करून दाखविण्यासारखी कुशलता अथवा पृ. ६१ वरील युरोपियनांवरील देशी लोकांच्या विश्वासाविषयींचा शेरा – अशीं विधानें विशेष लक्षांत घेण्यासारखीं आहेत. पृ. ६६ वर मिर्झा अहमद हा भला प्रवासी सहकारी परत जाऊं लागला त्या वियोगप्रसंगाचें जें वर्णन ह्यूगेलनें केलें आहे तें मनाला चटका लावणारें आहे. मी नुकतांच दूरदेशीं जाऊन आलों. तेथें माझ्याबरोबर अगदीं अनपेक्षितपणें सहप्रवासी झालेले सज्जन मला भेटले.

आमची चांगली गट्टीही जमली. पण दों दिवसांच्या प्रवासी ताटातुटीची वेळ आल्यावर चित्त विरघळल्याशिवाय कसें राहील? या भल्या लोकांची व आपली या पृथ्वीवर पुनः कधीं भेट होईल काय? या विचारानें क्षणभर तरी अस्वस्थ न होईल तो मनुष्य कसला? पृ. ७२ वरील मुसलमानांची भेट आणि इंग्रजांविषयींची छाप, ह्यूगेलचा धोरणी सल्ला, सर्वच उद्बोधक वाटेल. पुढें खरी झालेली भविष्यवाणी ह्यूगेलनें आधींच लिहून ठेवलेली पृ. ८२ वर सांपडेल. जुने लेख (पृ. ८७) जुनीं देवळें, अवशेष वगैरेंची नोंद ह्यूगेलनें केलेली आहे. तीं स्थळें आज आहेत काय, तेथील जुने अवशेष सांप्रत संरक्षिलेले आहेत काय, ही माहिती शोधपूर्वक त्या त्या सरकारांकडे लिहून मिळविली पाहिजे आणि अवशेषांचें रक्षण करविलें पाहिजे. दोनशें वर्षांचें म्हाताऱ्याचें वय जर ह्यूगेलनें खरें मानलें असेल तर (पृ. ८९) आज आझरबैजान वगैरे सोवियट भागांत १६०।१७० वर्षांवरचे वृद्ध शेतकरी डोक्यावर ओझीं घेऊन जातांना प्रत्यक्ष दाखविलेले असतात त्यांच्या वर्गांतलेच ते समजावे लागतील. एरवीं सत्य असणें कठीणच! मुसलमान हिंदू नोकरामधील स्वभावांची तफावत ह्यूगेलनें नमूद केलेली पृ. ८९ वर अवश्य वाचावी. प्रख्यात शीख सरदार हरिसिंग नलवा याचें जें वर्णन पृ. ९१ वर आलें आहे त्यामुळें युरोपियनांची माहिती आमचे लोक घेऊं लागले होते आणि त्यांच्यावर युरोपियन छाप पडूं लागली होती याचें गमक आपणांस आढळून येतें. हरिसिंग माहिती जमविण्यांत किती जागरूक होता हेंही तेथें नमूद आहे. मुसलमानी धर्मवेडेपणा (पृ. ९३) वर्णिलेला पहावा. पृ. १०४ वर पौर्वात्यांहून पाश्चिमात्यांत निराळा विशेष काय समजावा तें ह्यूगेलनें विशद केलें आहे. आणखी पुष्कळच उल्लेखांकडे लक्ष्य वेधण्यासारखें आहे. परंतु पृ. ११८ वर संस्कृत ज्योतिष पंडिताची जी तिरपीट उडाल्याचें वर्णन आहे तें वाचीत असतां या पंडिताजवळ परंपरेनें आलेला ग्रंथ-कोष्टक यांचा जो संग्रह दिसून आला त्याचे उपासक नष्ट होत चालले होते हें काश्मीरच्या अवनतीचें प्रमाण वाचून दुःख होतें. देशी कवायती सैन्य आणि इंग्रज कंपनीचें सैन्य यांच्या बाबतींत जीं प्रश्नोत्तरें नमूद आहेत (पृ. ९९ आणि पृ. १२४) त्यांत जरा विरोध आढळतो. परंतु एकंदरींत इंग्रजी सैन्य अधिक उजवें ठरेल हाच

ह्यूगेलचा अभिप्राय दिसतो. 'मी साधु परमेश्वराचा नागरिक आहे रणजितसिगाचा नाहीं' हें निर्भीड उत्तर भारतीय परंपरेला शोभा देणारें आहे. पृ. १२६ 'अर्थनामीशिषे त्वमहमपि च गिरः।' इत्यादि भर्तृहरीचा श्लोक प्रसिद्धच आहे. 'एष राजन्गतोऽस्मि।' म्हणून तडक आपला रस्ता धरणारे निर्भीड साधु भारतांत सतत नांदत आलेले आहेत.

एकंदरींत ह्यूगेल याच्या प्रवासवृत्ताचा परिचय करून देऊन प्रा. दि. के. देशपांडे यांनीं एक अत्यंत उत्तेजनीय असा नवीन उपक्रम केला आहे. त्यांचा हा ग्रंथ सर्वांस आवडेल आणि अशा प्रकारचे नवीन नवीन ग्रंथ मराठींत आणण्याचें कार्य पुढें चालविण्याची त्यांची उमेद लोकांचें व सरकारचें उत्तेजन मिळून वाढेल अशी मला आशा आहे. व्हान् संग किंवा इत्सिग या चिनी प्रवाशांचीं वृत्तें हिंदींत आलीं आहेत. मराठींत यावयाचीं आहेत. सर्वच मैदान मोकळें आहे. देशपांडे यांचा शुभारंभ पुढें अधिकाधिक समृद्ध होत जावो !

सौर वैशाख ६
शके १८७९
'लोककल्याण'
पुणें.

दत्तो वामन पोतदार

निवेदन

बारोन ह्यूगेलनें १८३५–३६ सालीं काश्मीर व पंजाबचा प्रवास करून जें प्रवासवृत्त लिहिलें, त्याची मराठी आवृत्ति प्रसिद्ध होत असतांना माझ्या मनाला एक समाधान मिळत आहे. युरोपीय व भारतीयेतर प्रवाशांच्या प्रवासवृत्तांना इतिहाससाधनांच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे. परंतु दुर्दैवानें आजपर्यंत त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केलें गेलें आहे. बर्निअरच्या प्रवासवृत्ताचें एक त्रुटित व विस्कळीत भाषांतराचें, एकोणिसाव्या शतकांतील मराठी पुस्तक सोडल्यास, ऐतिहासिक प्रवासवृत्तांवर मराठींत एकही पुस्तक आजवर प्रसिद्ध झालेलें नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व भाषांत, इतिहास-साधनें प्रसिद्ध करण्याच्या दृष्टीनें मराठी भाषा आघाडीवर आहे. सर्व तऱ्हेचीं ऐतिहासिक कागदपत्रें व घराण्यांचे इतिहास जमेस धरतां, मराठी भाषेंतील इतिहास–साधनांच्या ग्रंथांची संख्या चारशेंहून अधिक भरेल. परंतु असें असूनदेखील इतिहास–साधनांच्या दृष्टीनें उपयुक्त अशा युरोपीय किंवा भारतीयेतर प्रवाशांच्या ऐतिहासिक प्रवासवृत्तांवर, एकही मराठी ग्रंथ उपलब्ध असूं नये हें आश्चर्यच म्हणावयाचें! ऐतिहासिक प्रवासवृत्तांच्या प्रसिद्धीसंबंधीं सरकार, विद्यापीठें, शिक्षणसंस्था इत्यादींचें काय कर्तव्य आहे याकडे महामहोपाध्याय पोतदार यांनीं आपल्या पुरस्कारांत संबंधित मंडळींचें जें लक्ष वेधलें आहे, त्याचा विचार मराठी भाषेचे प्रेमी करतील असा विश्वास आहे. या प्रवासवृत्तांचा इतिहासांत किती उपयोग आहे व त्यांचें इतिहासांतील स्थान कोणतें याचा ऊहापोह मी प्रास्ताविक या प्रकरणांत केला आहे. त्याकडे मी वाचकांचें लक्ष वेधून घेऊं इच्छितों.

गेल्या हजार दीड हजार वर्षांच्या काळांत लाखो हौसी प्रवासी हिंदुस्थानांत येऊन गेले. त्यांच्यापैकीं ज्यांची चिकित्सावृत्ति होती, त्यांनीं

या प्रवासासंबंधीं ग्रंथ लिहून, हिंदुस्थानच्या सर्व अंगोपांगांचें दर्शन आपल्या देशबांधवांना घडविलें. हिंदुस्थानविषयीचीं अशी माहिती पुरवणारीं शेकडों प्रवासवृत्तें युरोपीय भाषांत आज उपलब्ध आहेत. आपल्या कागदपत्रांतून ज्या गोष्टींबद्दल आपणाला कांहींही माहिती मिळूं शकत नाहीं, त्या बाबींवर, या प्रवासवृत्तांमुळें बराच प्रकाश पडूं शकेल व म्हणून ही ऐतिहासिक काळांतील प्रवासवृत्तें आपल्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहेत. हिंदुस्थान-विषयक या महत्त्वाच्या प्रवासवृत्तांचीं, युरोपांतील कित्येक भाषांत भाषांतरें होऊन त्यांच्या अनेक आवृत्याही निघतांना आढळतात; परंतु हिंदुस्थान-विषयींच्या या महत्त्वाच्या प्रवासवृत्तांच्या हिंदुस्थानांतील विविध भाषांत, अनेक आवृत्याच काय, परंतु एखादीही आवृत्ति निघतांना दिसत नाहीं, ही मोठी खेदाची घटना समजली पाहिजे. आपला समाज, आपला इतिहास व आपला देश यांविषयीं, आपणापेक्षां इतरांनाच जास्त जिज्ञासा व कुतूहल आहे, असेंच गेल्या शंभर वर्षांतील एतद्विषयक घडामोडी दर्शवितात, व यांत बदल होण्याजोगी परिस्थिति किंवा उत्तेजकवृत्ति स्वातंत्र्योत्तरकालांत देखील आपल्याकडे आलेली नाहीं ही दुःखाची व आश्चर्याची गोष्ट सर्वांपुढें स्पष्टपणें मांडली गेली पाहिजे असें वाटतें.

मराठींतील ऐतिहासिक प्रवासवृत्तविषयक वाङ्मयाची उणीव दूर होण्याचे दृष्टीनें मनांत एक योजना आंखून या कार्यास मी सुरुवात केली आहे. इतिहास–साधनांच्या दृष्टीनें ज्या बाबींचा अंतर्भाव करणें जरूर असतें, त्या समाविष्ट करून, प्रवासवृत्ताची ही संपादित अशी मराठी आवृत्ति तयार केली आहे. युरोपीय प्रवाशाच्या, ऐतिहासिक प्रवासवृत्त-विषयक ग्रंथाची, इतिहाससाधनाच्या दृष्टीनें सटीप व सटीक अशी आवृत्ति काढण्याचा मराठी भाषेंतील हा पहिलाच प्रयत्न आहे याकडे मी सर्वांचें लक्ष वेधूं इच्छितों. या प्रयत्नास जर यथायोग्य साहाय्य मिळालें, व तें मिळेल अशी उमेद मी बाळगून आहे, तर इतिहास व मराठी भाषेची अधिक सेवा करण्याची संधि मला दिल्यासारखी होईल.

४२५ ब/५ सदाशिव पेठ,
पुणें २
दि. १५ जून १९५७

दि. के. देशपांडे

आभार

'रणजितसिंगकालीन काश्मीर व पंजाब' हें पुस्तक लिहिण्यास व प्रसिद्ध करण्यास मला अनेकांचें साहाय्य झालें आहे.

महामहोपाध्याय प्रा. द. वा. पोतदार यांचें इतिहासप्रेम सुप्रसिद्धच आहे. मराठी भाषा व मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन याविषयीं त्यांच्या मनांत एवढें प्रेम आहे कीं कोठेंही याविषयीं कार्य चाललें कीं महामहोपाध्याय पोतदार यांचा हात त्या कार्यापर्यंत येऊन पोहोंचतो. माझी ऐतिहासिक प्रवासवृत्तमालेची योजना ऐकून त्यांनीं मला प्रोत्साहन दिलें व बहुमोल अशा सूचनाही केल्या. महामहोपाध्याय पोतदार यांनीं ज्या प्रेमानें व आपुलकीनें या पुस्तकाबद्दल आस्था दाखविली त्याच्या अभावीं हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें धाडस मी बहुधा केलें नसतें.

डेक्कन कॉलेजमधील इतिहासाचे प्राध्यापक व महाराष्ट्रांतील एक थोर विचारवंत गुरुवर्य प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांनीं माझ्या शंकांचें निरसन करून मला मार्गदर्शन केलें.

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कोशकार श्री. चिं. ग. कर्वे यांनींही या योजनेंत लक्ष घालून बहुमोल अशा सूचना केल्या. क्रियाशीलत्व, पांडित्य व सज्जनपणा या तीन दुर्मिळ गुणांचा संयोग श्री. चिं. ग. कर्वे यांच्यांत असल्यामुळें त्यांचें साहाय्य नेहमीच भरीव असतें.

प्रताप कॉलेजमधील प्राचार्य डॉ. वा. पु. दामले, अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. गं. ना. क्षीरसागर, व उपप्राचार्य डॉ. दा. वि. गर्गे यांनीं या पुस्तकाच्या प्रकाशनाबाबत उत्सुकता दाखवून मला प्रोत्साहन दिलें.

'प्रसाद' चे संपादक व सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. य. गो. जोशी, भा.-इ. सं. मंडळांतील संशोधक श्री. ग. ह. खरे, स. प. कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, 'सकाळ' चे सह-संपादक श्री. स. मा. गर्गे, गोखले अर्थशास्त्रसंस्थेंतील डॉ. मधुकर नामजोशी, सेलसटॅक्स कलेक्टर श्री. श्री. द. कुलकर्णी, सूचीकार श्री. शं. ग. दाते व माझे मित्र चिंतामणि भिडे, या मंडळींनीं आपुलकीनें अनेक सूचना देऊन कार्यास मदत केली. प्रा. दि. मु. वाघ यांनीं नकाशा तयार करून दिला.

श्री. म. वा. साळवेकर यांनीं सुरुवातीपासून अनेक तऱ्हेनें साहाय्य केलें. माझे दुसरे विद्यार्थी मित्र श्री. अरुण आपटे यांनीं या पुस्तकाच्या लिखाणाचें काम केलें. माझ्या सोयीप्रमाणें नियमितपणें येऊन त्यांनीं हें काम लौकर संपविण्यास मदत केली. माझे भाचे चि. प्रभाकर पानसरे व चि. सुरेश पानसरे या दोघांनीं पुस्तकाची छापखान्यासाठीं प्रत तयार करणें, सूची करणें इत्यादि कामें केलीं.

माझे थोरले बंधु ती. तात्यासाहेब (म. के. देशपांडे) यांच्या साहाय्याचाही उल्लेख केला पाहिजे. मला इतिहासाची गोडी लावण्यांत ज्या व्यक्ती कारणीभूत आहेत त्यांत क्रमानें व मानानें तात्यासाहेबांचा क्रमांक पहिला आहे. पुस्तक छपाई पुण्याला व माझें वास्तव्य अंमळनेरला यामुळें ज्या व्यावहारिक अडचणी यावयाच्या त्यांचें निराकरण दुसरे थोरले बंधु ती. दत्तोपंत व धाकटे बंधु चि. रामभाऊ यांनीं केलें.

डेक्कन कॉलेजमधील ग्रंथपाल श्री. बेलसरे व भा. इ. सं. मंडळांतील ग्रंथपाल श्री. आगाशे या दोघांनीं संदर्भग्रंथांच्या बाबतींत तत्परतेनें साहाय्य केलें.

'काळ' चे श्री. मामासाहेब दाते यांनीं पुस्तकाची छपाई शुद्ध व सुबक करून दिली. श्री. दाते हे स्वतः कुशल संपादक व इतिहासप्रेमी असल्यानें मुद्रकाच्या व्यावहारिक मर्यादेबाहेरसुद्धां अनेक गोष्टींत त्यांचें साहाय्य मला झालें आहे. कॉण्टिनेण्टलचे चालक श्री. अनंतराव कुलकर्णी यांनीं या पुस्तकाच्या वाटपाची व विक्रीची जबाबदारी स्वीकारून माझें ओझें कमी केलें.

वर उल्लेख केलेल्या व उल्लेख न केलेल्या अनेक सद्गृहस्थांचें साहाय्य मला लाभलें आहे. या सर्व सद्गृहस्थांनीं आपापल्यापरी जें साहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

श्रीप्रसाद
४२५ ब/५ सदाशिव पेठ,
पुणें २.
दि. १० मे १९५७

दि. के. देशपांडे

इंग्रजी आवृत्तीच्या संपादकाची प्रस्तावना

(मेजर टी. बी. जेरव्हिस यांच्या प्रस्तावनेचा सारांश)

लेखकाच्या उत्तम वर्णनशैलीमुळें व निसर्गाचें हुबेहुब वर्णन करण्याची कला अंगीं असल्यामुळें बारोन ह्यूगेलचें हें पुस्तक जर्मनींत फार लोकप्रिय झालें. रसिकता आणि तात्त्विक विचार यांचें सुंदर मिश्रण या पुस्तकाच्या मूळ प्रवासवृत्तांत झालें आहे. सर्व वयांच्या वाचकांना हें पुस्तक अत्यंत मनोरंजक वाटेल. परदेशांतील अज्ञात प्रदेश व लेखकांनीं पायीं केलेला प्रवास या दोन गुणांमुळें पुस्तकांतील माहितीविषयीं उत्सुकता वाढते. ज्यांच्याविषयीं या पुस्तकांत बरेंच लिहिलें आहे ती पंजाबमधील लढवय्ये मंडळी, वाताहत होऊन आतां बहुतेक नामशेष झाली आहेत. ब्रिटिशांचें हिंदुस्थानांतील धोरण योग्य कीं अयोग्य यावर हें पुस्तक बराच प्रकाश टाकतें. शिखांच्या अंमलाखालीं असलेल्या जमाती, त्यांचे रीतीरिवाज, त्यांच्या सवयी, त्यांची परिस्थिति इत्यादि पाहून त्यांच्यासंबंधीं रणजितसिंगाच्या मरणानंतर कोणतें धोरण स्वीकारावें, याबद्दल थोडेसे विचार या ग्रंथांत आढळतील.

एतद्देशीयांच्या भानगडींत आपण पडूं नये, मानवता आणि न्याय राखण्यासाठीं त्यांच्या राज्यकारभारांत हात घालूं नये या विचारसरणीचा फोलपणा आतां दिसून आला आहे. आपापसांत झगडा केल्यामुळें व इतरही अनेक कारणांनीं हिंदुस्थानांतील बहुतेक राजसत्ता ब्रिटिशांचे हाताखालीं आल्या असून त्यांच्यावर उपकारक राज्य कसें करावें हा आजचा प्रश्न आहे. ब्रिटिशांची उत्तम राज्यव्यवस्था, परदेशांशीं व्यापार, नैसर्गिक संपत्तीचा शोध व त्यांचा वापर या गोष्टींचा विचार करण्याची वेळ आतां आली आहे.

प्रवास करण्याचा आपला उद्देश लेखकानें उपोद्घातांत सांगितला आहे. प्रस्तावनेच्या प्रकरणांत काश्मीरचा इतिहास आणि काश्मीरविषयींची माहिती कोठें सांपडेल या विषयींची व संदर्भ-ग्रंथांची जंत्री लेखकानें दिली आहे. लेखकाच्या अगोदर कोणकोणत्या युरोपीयांनीं काश्मीरमध्यें प्रवेश केला

आहे, त्यांचीहि माहिती व त्यांच्या प्रवासवृत्तांचें महत्त्व ह्यूगेलनें प्रतिपादन केलें आहे. परकी भाषा आणि अतिशय महाग अशी मूळ पुस्तकाची किंमत यांमुळें हें पुस्तक फार लोकांच्या वाचण्यांत येणार नाहीं हें जाणून व आशियांतील प्रश्नांविषयीं लोकांची जिज्ञासा ओळखून हें इंग्रजी भाषांतर तयार केलें आहे.

ईस्ट इंडिया कंपनी आणि इंग्रजी राजवट यांविषयीं निःपक्षपाती त्रयस्थानें दिलेलें मत सध्यांच्या परिस्थितीवर अधिक प्रकाश टाकील. हिंदुस्थानांतील प्रांतांची, नद्यांची, गांवांची व लोकांचीं नांवें मूळ उच्चाराप्रमाणें लिहितांना अतिशय त्रास पडला आहे, देवनागरी लिपींतील कठीण शब्दांचे उच्चार इंग्रजींत करणें कठीण असल्यानें, उच्चारांत चूक आढळल्यास वाचकांनीं आम्हांस क्षमा करावी. शब्दांचे उच्चार सर विल्यम जोन्सच्या पद्धतीनें दिलेले आहेत. मार्संडेननें संपादन केलेलें मार्को पोलोचें प्रवासवृत्त जिज्ञासा जागृत करून तौलनिक अभ्यास करावयास लावतें. आणि हाच अभ्यास खऱ्या अर्थानें ज्ञानाचा पाया आहे. विचाराचें नावीन्य आणि साधेपणा हीं दोन वैशिष्टचें बारोन ह्यूगेलचे गुण म्हणून सांगतां येतील. मनाचा मोकळेपणा, मोठेपणा, तळमळीची वृत्ति, व उदार वृत्ति या गुण-समुच्चयामुळें लेखक कोणत्याही गोष्टीवर आपलें मनोगत स्पष्टपणें व्यक्त करून एक उत्तम चित्र आपल्यापुढें उभें करतो. ज्यांना या प्रवासवृत्ताचा खरा अभ्यास करावयाचा आहे, त्यांनीं हा ग्रंथ मुळांतच वाचावा.

टी. बी. जेर्व्हिस
१ नोव्हेंबर १८४४, लंडन.

प्रस्तावना

बारोन ह्यूगेलनें लिहिलेल्या

जर्मन आवृत्तींतील प्रस्तावनेचा सारांश

काश्मीरचें नांव उच्चारल्याबरोबर कांहीं विशेष गोष्टी आपल्या नजरे-समोर उभ्या राहतात. सुंदर मनोवेधक सरोवरें, उंचच उंच पर्वतांच्या रांगा त्यामधून वाहणाऱ्या सुंदर व स्वच्छ पाण्याच्या नद्या, शिखरापासून दऱ्या पर्यंत सगळीकडे पसरलेली वृक्षराजी या व इतर गोष्टी आपल्या डोळ्यां-समोर उभ्या राहतात. सुरेख दिस-णारीं माणसें, मोंगल बादशहांनीं बांध-लेले राजवाडे आणि बागा, जादूनीं भारल्यासारखीं सुंदर दिसणारीं सरो-वरें आणि बेटें हीं पाहिलीं असतां पऱ्यांच्या गोष्टींची आठवण होते. मुसलमान लोक या प्रांताला पृथ्वी-वरील नंदनवन मानतात. हिंदुलोक मानवाची उत्पत्ति प्रथम येथेंच झाली असें मानतात. काश्मीरचा इतिहास आजपर्यंत अनेक लेखकांकडून लिहिला गेला आहे.



बारोन ह्यूगेल

कल्हणपंडितांनीं लिहिलेल्या ‘ राजतरंगिणींत ’ इ. स. १७२७ पर्यंतचा इतिहास आहे. ‘ राजावलि ’ नांवाच्या दुसऱ्या ग्रंथांत इ. स. १४१२ पर्यंतचा इतिहास वर्णन केला आहे. श्री वर्मानामक पंडितानें लिहिलेल्या ‘ श्री जैन राजतरंगिणी ’ या ग्रंथांत १४७७ पर्यंतचा इतिहास दिलेला आहे. पुण्य भट्टानें लिहिलेल्या ‘ राजावलि पताका ’ या ग्रंथांत अकबरानें काश्मीर जिंकला त्या सालापर्यंतचा म्हणजे इ. स. १५८६ पर्यंतचा इतिहास दिला आहे. अबुल फाजलनें लिहिलेला ‘ ऐने अकबरी ’ हा ग्रंथ व इतरहि १५–१६

च्यावर ग्रंथ फारशी, इंग्रजी व फ्रेंच भाषेंत या भागाच्या इतिहासासंबंधीं प्रसिद्ध झालेले आहेत.

पोर्तुगीजांनीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं ज्या अनेक गोष्टी केल्या, त्या करीत असतांनाच त्यांना काश्मीरची माहिती लागली. प्रसिद्ध ख्रिस्ती साधु 'सेंट फ्रॅन्सिस झेवियर' याचा भाऊ इ. स. १५७२ च्या सुमारास काश्मीरमध्यें गेला होता. काश्मीरमध्यें प्रवेश करणारा बहुधा हा पहिलाच युरोपीय प्रवासी असावा. झेवियरनें काश्मीरप्रवासाचें वृत्त १६०५ मध्यें एका ग्रंथांत प्रसिद्ध केलें आहे. काश्मीरविषयीं भरपूर माहिती लिहिणारा दुसरा युरोपीय म्हणजे बर्निअर हा होय. हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं प्रवास करून इ. स. १६६५ त तो दिल्लीच्या बादशहाबरोबर काश्मीरला गेला होता. इ. स. १६७० सालीं त्यानें आपलें प्रवासवृत्त प्रसिद्ध केलें. बारा वर्षें हिंदुस्थानांत राहिल्यामुळें व वैद्य म्हणून सर्व ठिकाणीं त्याला प्रवेश मिळाल्यामुळें बर्निअरचा वृत्तान्त बराच विश्वासार्ह आहे.

फादर डेसिडेरी या नांवाचा एक ख्रिस्ती पाद्री, १७१४ सालीं तिबेटला जात असतांना हिवाळ्यांत येथें अडकून पडला. त्यानेंही काश्मीरसंबंधीं कांहीं माहिती दिली आहे. परंतु ती साधारण स्वरूपाची आहे. जॉर्ज फॉरस्टर नांवाचा कंपनी सरकारचा एक सनदी नोकर १७८३ त काश्मीरला व नंतर अफगाणिस्थान, रशिया इत्यादि ठिकाणचा प्रवास करून आला. इ. स. १७५४ सालीं अहमदशहा अबदालीनें काश्मीर जिंकून अफगाणिस्थानला जोडलें. अहमदशहानंतर तैमुरशहानें या प्रांतावर राज्य केलें. त्याच्याच कारकिर्दींत हा फॉरस्टर काश्मीरला गेला होता. त्याच्यानंतर चाळीस वर्षांनीं मि. मूरक्रॉफ्ट याला हिमालय आणि तिबेट यांची माहिती काढण्यासाठीं ई. इं. कंपनीनें पाठविलें होतें. मि. ट्रिबेक आणि मि. गुथ्री या दोघा युरोपीयांसह मूरक्रॉफ्टनें प्रवास केला. वाटेंत ताप येऊन हे तिघेही गृहस्थ मरण पावले. त्यांची रोजनिशी नंतर कंपनी सरकारला मिळाली व ती पुढें प्रसिद्धही झाली. यानंतर पुढें मि. व्हिक्टर जॅक्वीमाँट हा फ्रेंच प्रवासी काश्मीरला गेला. यानंतर मि. वुल्फ नांवाचा एक मिशनरीही काश्मीरप्रवासाला गेला होता. परंतु या गृहस्थांच्या प्रवासांत कांहीं विशेष न घडल्यानें मी त्यांच्या प्रवासाला फारसें महत्त्व देत नाहीं. स्वतःच्या प्रवासवर्णनांत त्याचा अहंकार फारच दिसून येतो. काश्मीरसंबंधीं लिहिलेल्या इतिहासग्रंथांत नुकताच प्रसिद्ध झालेला व हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी मि. प्रिन्सेप यांनीं लिहिलेला "रणजितसिंगाचा इतिहास" फार महत्त्वाचा आहे.

बारोन ह्यूगेलकृत उपोद्घात

(सारांश)

काश्मीरविषयीं अनेक दंतकथा प्रचलित असूनही त्या काश्मीरची पूर्ण माहिती देऊं शकत नाहींत. या दंतकथांचा पडदा दूर सारून कांहीं नवीन सत्य गोष्टी उजेडांत आणल्या तरी श्रद्धाळू माणसांना याचा फारसा उपयोग नाहीं. काश्मीर हें पृथ्वीवरील नंदनवन आहे या सतत चालत आलेल्या वर्णनामुळें प्रवासी काश्मीरच्या दऱ्यांतून उघड्या डोळ्यांनीं प्रवास करतो. हा प्रदेश पाहण्यापूर्वीं या भागाविषयीं मी कोणकोणत्या अपेक्षा मनांत धरल्या होत्या याविषयींची वाच्यता या पुस्तकांत आढळेल. काश्मीरची दरी व या दऱ्याखोऱ्यांत राहणारीं माणसें यांचें वर्णन मी जितकें वास्तववादी आणि उत्तम तऱ्हेनें देतां येईल तितकें दिलेलें आहे. सौन्दर्याविषयीं भलतीच आसक्ति किंवा नावीन्याविषयीं फाजील प्रेम हे दोष मी या प्रवासवृत्तांत शक्य तों टाळले आहेत. सभोंवतालच्या परिस्थितीची बारकाव्यानें पाहणी केल्यानंतर प्रवाशाला असें आढळून येतें कीं निरनिराळ्या राष्ट्रांचीं भिन्न वैशिष्टयें असून देखील पृथ्वीमध्यें कांहीं एक चिरंतन तत्त्व सर्व भागांत सारख्याच प्रमाणांत आहे. हें तत्त्व निरनिराळ्या देशांतील लोकांच्या वागण्यांत व्यक्त होतें. नवीन गोष्ट पाहिल्यानंतर त्याविषयींचें नावीन्य मनावर प्रथम जो फाजील पगडा बसवितें तो पगडा उत्तरोत्तर कमी होत जाऊन नंतर त्याला असें आढळून येतें कीं त्याच्या जवळपासच्या वस्तूंत व गोष्टींत आणि नवीन गोष्टींत फारसा फरक नाहीं. मुलांचा खेळकरपणा, पुरुषांचा उद्योगीपणा, स्त्रियांचा नाजूकपणा आणि म्हातारपणांतील सर्व गोष्टींकडे विचार करून पाहण्याची दृष्टि या गोष्टी त्यांच्या प्रदेशांत आणि नवीन प्रदेशांत सारख्याच असतात. धर्म व जाती वेगवेगळ्या असल्या तरी आचारविचारामागील हेतु व कृति एकच असते. वरवर पहाण्याची सवय असणाऱ्यांना एखाद्या गोष्टींत नावीन्य आढळतें आणि तेवढ्याच बाबतींत त्याला नवल वाटतें.

काश्मीरमधील राज्यव्यवस्था बदलल्यामुळें या लोकांच्या राहणींत व रीतिरिवाजांत कांहीं फरक पडला असेल हें संभवनीय वाटत नाहीं. काश्मीरमधील या लोकांवर मध्यआशियांतील मुसलमानांनीं पगडा बसवून त्यांची प्राचीन राजसत्ता व समाजव्यवस्था संपूर्ण बदलून टाकली. दिल्लीच्या मोंगल बादशहांनीं सुख आणि वैभव भोगण्याकरितां या प्रांतांत येऊन वैषयिक आणि चैनीच्या गोष्टींचा येथें प्रादुर्भाव केला. भयानक आणि क्रूर अफगाणांच्या ताब्यांत जाऊन आणि नंतर अर्धवट रानटी असलेल्या शिखांच्या ताब्यांत जाऊन या लोकांच्या स्वत्वाची इतकी वाताहत झाली आहे कीं आतां तें त्यांच्यांत कोठेंच आढळणें शक्य नाहीं. प्रत्येक नवीन आलेल्या राजसत्तेनें पूर्वींची सर्व व्यवस्था बदलून टाकून यांच्या मूळ व्यवस्थेची पार वाताहत केली आहे. एकच गोष्ट येथें दिसतें; ती ही कीं जरी हे लोक धर्मांतरित होऊन मुसलमान झालेले असले तरी त्यांच्या मनावर मूळचा असलेला हिंदुत्वाचा पगडा अजून पुरता नाहींसा झालेला नाहीं.

प्रवासवृत्ताचीं पुढील पानें वरील सर्व गोष्टींविषयीं थोडीफार माहिती देतील. युरोपखंडापासून दूर गेलों असतांना हें प्रवासवृत्त मी प्रवासांत असतांनाच लिहिलेलें आहे. हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजसत्तेशेजारीं शिखांचें राष्ट्र एकुलतें एक आणि महत्त्वाचें असल्यामुळें त्यांच्या ताब्यांतील या प्रदेशाची माहिती मी यांत दिलेली आहे. युरोपांतील वाचकवर्गाला यांत गोडी वाटेल असा विश्वास वाटतो.

अ नु क्र म णि का

चित्रांची अनुक्रमणिका

परिभ्रमणाचें महत्त्व

सृष्टिमध्यें बहु लोक । परिभ्रमणे कळे कौतुक ।
नाना प्रकारीचे विवेक । आडळो लागती ।।
येंकादा आडळे गाजी । सकल लोक अखंड राजी ।
सदा सर्वदा आवडी ताजी । प्राणिमात्रांची ।।
चुकोन उदंड आडळते । भारी मनुष्य दृष्टीस पडते ।
महंताचे लक्षणसे वाटते । अकस्मात ।।

—दासबोध दशक १९ समास ८

प्रास्ताविक

हिंदुस्थानचा इतिहास लिहितांना जीं अनेक साधनें उपयोगी पडतात, त्यांमध्यें परकीय प्रवाशांनीं लिहिलेलीं प्रवासवृत्तें हें एक महत्त्वाचें साधन आहे. हे प्रवासी व यांनीं लिहिलेलीं प्रवासवृत्तें यांचे हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या कालखंडांत वेगवेगळें महत्त्व आहे. मात्र एक गोष्ट सर्व कालखंडांविषयीं निश्चित आहे, ती म्हणजे या सर्वहि कालखंडांतून जर प्रवासवृत्तांचीं साधनें वापरावयाचीं नाहींत असें ठरविलें तर त्या वेळचा इतिहास हा अपुरा, खंडित व तर्कावर आधारलेला असा ठरेल. या प्रवासवृत्तांमुळें कित्येक स्थळीं माहीत नसणाऱ्या गोष्टी साधार पुढें आलेल्या आहेत. कांहीं ठिकाणीं इतरत्र आढळलेल्या दुव्यांना या प्रवासवृत्तांतून दुजोरा मिळाल्यामुळें त्यांची निश्चितता करणें शक्य झालें आहे, व कांहीं ठिकाणीं पूर्वीं काढलेले सिद्धान्त नवीन पुराव्यांमुळें बदलावे लागले आहेत आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदुस्थानच्या प्राचीनकालापासून ते तहत, अव्वल इंग्रजीपर्यंतची या देशांतील अनेक भागांतील लोकांची सामाजिक परिस्थिति या प्रवासवृत्तांवरूनच आपणांला माहीत होते. दुर्दैवानें सामाजिक इतिहासाचीं साधनें आपल्या देशांत फार दुर्मिळ आहेत, व आज अस्तित्वांत असणाऱ्या साधनांत या प्रवासवृत्तांना असाधारण महत्त्व आहे.

इसवी सनाच्या सातव्या शतकापासून ते नवव्या शतकापर्यंत बौद्ध भिक्षूंनीं केलेल्या प्रवासांची माहिती या दृष्टीनें फार उपयुक्त आहे. हे बौद्ध भिक्षू आशियाच्या अनेक देशांतून हिंदुस्थानांत येत असत. विशेषतः चिनी बौद्ध भिक्षूंनीं अनेक हालअपेष्टा सोसून केलेले प्रवास व त्यावेळीं लिहिलेलीं प्रवासवृत्तें फार महत्त्वाचीं आहेत. दुर्दैवानें अशीं लिहिलीं गेलेलीं फार थोडीं प्रवासवृत्तें आज उपलब्ध आहेत. हस्तलिखित स्वरूपांत बौद्ध मठींतून आजहि पूर्वीं लिहिलेलीं अशीं प्रवासवृत्तें मिळतील; परंतु त्यांच्या प्रसिद्धीसाठीं विशेष प्रयत्न करावे लागतील. ह्यूएन त्सँग, फा हैन इत्यादि चिनी प्रवाशांच्या प्रवासवृत्तांवरून आपणांस हिंदुस्थानांतील बौद्ध कालांतील अनेक

गोष्टींवर प्रकाश पडलेला दिसतो. हिंदुस्थानांतील लोकांची राहणी स्वभाव-धर्म, पंथ व त्यांचे परस्परसंबंध, राजे आणि प्रजाजन यांचे अन्योन्यसंबंध धार्मिक शिक्षणाच्या हिंदुस्थानांतील सोयी, परकी प्रवाशांना येथें उपलब्ध असणाऱ्या सवलती व येणाऱ्या अडचणी, बौद्धांचे विहार व बुद्धधर्मपरिषदा इत्यादि अनेक गोष्टींवर या उपलब्ध प्रवासवृत्तांतावरून प्रकाश पडतो. या कालांत इतर उपलब्ध असणाऱ्या त्रोटक साधनांचें स्वरूप लक्षांत घेतां या प्रवासवृत्तांचें विशेष महत्त्व लक्षांत येतें.

बौद्धकालानंतर या देशांत प्रवास करणाऱ्या लोकांत अरबी पंडित व व्यापारी, आणि इतर मुसलमान प्रवासी यांना महत्त्व आहे. मुसलमान लोक इतिहास लिहिण्याच्या बाबतींत हिंदूंपेक्षां बांके आहेत. हिंदूचे पुराण-ग्रंथ व इतर महाकाव्यें यांतून इतिहास निर्माण करावयाचा म्हणजे एक अतिशयच अवघड असें दिव्य आहे. याउलट मुसलमानांत इतिहास लिहिण्याची पद्धत रूढ असल्यानें, इतिहासास जरूर असणाऱ्या सनावळ्या, राजे लोकांची माहिती व इतिहासांतील घटनांचे पूर्वसंबंध या गोष्टी हे मुसलमान लोक आपल्या ग्रंथांत व्यवस्थित मांडतात. इब्न बतुताचे प्रवास-वृत्त, बाबरचें आत्मचरित्र, अबुल फाजलची 'ऐने अकबरी' फेरिस्ताचा दक्षिणी पादशाहयांचा इतिहास हे व अशा प्रकारचे इतर ग्रंथ इतिहास-साधनांच्या दृष्टीनें बहुमोल आहेत.

१४९८ सालीं वास्को-डी-गामानें कालिकतला पाऊल ठेवल्यापासून एक नवीन कालखंड हिंदुस्थानच्या इतिहासांत सुरू झाला. युरोपीय प्रवासी या वेळेपासून हिंदुस्थानांत येऊं लागले. युरोपीय लोकांच्या स्वभावधर्मानुसार त्यांनीं आल्याबरोबर येथील जमेल तेवढी माहिती गोळा करून परत गेल्या-नंतर त्यांचीं प्रवासवृत्तें लिहून प्रसिद्ध करावयास सुरुवात केली. त्यामुळें सर्व युरोपीयांचें लक्ष हिंदुस्थानाकडे वळलें. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ते एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत २५० वर्षांत पोर्तुगीज, स्पॅनिश, डच, बेल्जियन, जर्मन, फ्रेंच व इंग्रज प्रवासी मोठ्या संख्येनें या देशांत येऊन गेले. व त्यांच्यापैकीं कांहींनीं आपल्या प्रवासाचीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं.

सोळाव्या व सतराव्या शतकांत युरोपांत झालेल्या व्यापारी क्रांतीनें व अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत झालेल्या औद्योगिक क्रांतीनें या युरोपीय लोकांच्या जीवनांत फार महत्त्वाचा बदल झाला. नवीन यांत्रिक साधनांचें महत्त्व व त्यांची सुलभ उपलब्धता, शास्त्रीय दृष्टीनें सर्व गोष्टींकडे पाहण्याची नवीन दृष्टि, छापखान्यामुळें व विशिष्ट तऱ्हेचें शिक्षण मिळाल्यामुळें प्रवासवृत्तें लिहिण्याच्या व प्रसिद्ध करण्याच्या सोयी व सवलती, नवीन शास्त्रीय ज्ञानाच्या व शक्तीच्या साहाय्यानें स्वत:ला विशेष समजून इतर मागासलेल्या देशांतील लोकांना आपल्या पातळीवर आणण्याची महत्त्वाची कामगिरी आपणांवर पडली आहे हा अहंकार व त्यांतून इतरांविषयीं निर्माण झालेला आपलेपणा; या सर्व गोष्टींच्या अंतर्भावानें त्यांच्या प्रवासवृत्तांत काटेकोरपणा आलेला आहे व त्यांची उपयुक्तताहि वाढलेली आहे.

युरोपीय लोकांच्या प्रवासाचें व प्रवासवृत्त लिहिण्याचें एक तंत्र ठरलें असल्यासारखें दिसतें. ज्या प्रदेशांत जावयाचें त्या ठिकाणची संपूर्ण भौगोलिक पहाणी व जमल्यास नकाशे तयार करणें; पशुपक्षी इतर प्राणी व कीटक यांचें सूक्ष्म निरीक्षण करणें, वनस्पतींची माहिती काढून इतर ठिकाणच्या वनस्पतींशीं त्यांची तुलना करणें; पाऊस, थंडी, उष्णतामान यांचीं मोजमापें घेऊन तक्ते तयार करणें; प्रवास करतांना अंतर काटेकोरपणें मोजणें; डोंगरांची, किल्ल्यांची उंची यंत्रांच्या व गणिताच्या साहाय्यानें मोजणें; चांगल्या स्थितींतील व पडक्या स्थितींत असलेल्या जुन्या इमारती, देवळें, गढ्या, किल्ले यांची नीट माहिती देणें; ही माहिती देत असतांना बुरूज, त्यांवर असणाऱ्या तोफा यांची माहिती देऊन इमारतींचें लष्करी दृष्टीनें महत्त्व समजावून सांगणें; निरनिराळ्या जातींची, धर्मांची माहिती गोळा करून त्यांचे परस्परसंबंध बारकाव्यानें पाहणें व वर्णन करणें; ज्या देशांतून प्रवास होत असेल तेथील राज्यव्यवस्था, त्यांतील गुणदोषांची चर्चा व दुर्बल ठिकाणांची अचूक माहिती देणें, तेथील प्राचीन इतिहासाची माहिती गोळा करून तो इतिहास जुळविणें व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीनें जरूर असणाऱ्या सर्व सूचना आपल्या माहितीच्या व अनुभवाच्या जोरावर देणें हें तें तंत्र होय. यामुळें त्यांच्या प्रवासवृत्तांतून बारकावा, उपयुक्त माहितीचा संग्रह, मनो-

रंजकता व इतिहास तयार करण्यास जरूर असणाऱ्या साधनभूत घटनांची जंत्री यांचें सुंदर मिश्रण आढळतें. ज्या काळांत हे प्रवासवृत्तपर ग्रंथ प्रसिद्ध झाले त्या काळीं युरोपांतील सर्व देशांत, " प्राचीन परंतु अज्ञात व नवीन सांपडलेल्या परंतु परंपरा असलेल्या समृद्ध देशाची माहिती " म्हणून या ग्रंथांवर वाचकांच्या उड्या पडत. इंग्रजांचें राज्य या देशांत प्रस्थापित झाल्यानंतर अधिक संबंध आल्यानें व बरीच माहिती इतर मार्गानें कळत असल्यानें हीं प्रवासवृत्तें त्या देशांत नंतर मागें पडलीं. परंतु आपल्या दृष्टीनें मात्र या प्रवासवृत्तांचें महत्त्व कधींहि कमी न होणारें असें आहे.

प्रवासाच्या भरपूर सोयी उपलब्ध झाल्यामुळें व धकधकीच्या जीवन-कलहामुळें आज प्रवास म्हणजे 'धांवत जाणें व पळत येणें' अशा स्वरूपाचा झाला आहे.

केल्यानें देशाटन, पंडित मैत्री, सभेंत संचार।
शास्त्रग्रंथविलोकन मनुजा चातुर्य येतसे फार॥

अशा स्वरूपाचा प्रवास व त्यापासून होणारा फायदा मिळणें आतां जवळ जवळ अशक्य झालें आहे. परंतु वर वर्णन केलेल्या युरोपीय लोकांचे प्रवास मात्र वरच्या श्लोकांत सांगितलेल्या पद्धतीचे असल्यानें हे प्रवासी निश्चित 'चतुर' झाले असले पाहिजेत. त्यांच्या प्रवासवृत्तांतील मनोरंजकता आजहि आपली करमणूक करील व उपयुक्त माहिती व ज्ञानप्राप्ति करून देईल इतिहासाचे साधनग्रंथ म्हणून तर या प्रवासवृत्ताचें महत्त्व आपल्या देशांत फार व कायम स्वरूपाचें आहे. या लोकांनीं आपल्या समाजांतील लोकांच्या गुणदोषांची जी चर्चा केली असेल ती तर स्वातंत्र्योत्तर कालांत फार महत्त्वाची आहे. ज्या दोषांनीं किंवा उणीवांनी आपलें स्वातंत्र्य गेलें ते दोष आपणाला चांगले माहीत झाले पाहिजेत म्हणजे त्यांचें निर्मूलन करतां येईल. ज्या गुणांच्या जोरावर परकीयांनीं येथें आपली सत्ता स्थापन केली त्या गुणांचें महत्त्व आपणाला पटलें पाहिजे म्हणजे आपला समाज मानानें स्वतंत्र राहूं शकेल. या गोष्टींची चर्चा या परकी लोकांच्या प्रवासवृत्तांतून आढळत असल्यानें याही दृष्टीनें या प्रवासवृत्तांचा अगदीं बारकाव्यानें आपल्या समाजांत अभ्यास झाला पाहिजे.

प्रवासवृत्ताचें वर सांगितलेलें महत्त्व ध्यानांत घेऊन बारोन चार्लस ह्यूगेल

या जर्मन गृहस्थानें काश्मीर व पंजाब प्रांतांत १८३५ व १८३६ मध्यें केलेल्या प्रवासाचें वर्णन या पुस्तकांत देण्याचें योजिलें आहे. त्यांनीं आपला प्रवासवृत्तान्त जर्मनींत परत गेल्यानंतर जर्मन भाषेंत प्रसिद्ध केला. त्याचें इंग्रजी भाषांतर १८४४ मध्यें मेजर जेरव्हिस या इंग्रज गृहस्थानें करून या प्रवासवृत्ताची संपादित आवृत्ति १८४५ मध्यें लंडन येथें प्रसिद्ध केली. या इंग्रजी आवृत्तीवरून या प्रवासवृत्ताचें थोडक्यांत मराठीं भाषेंत कथन करण्याचा हा प्रयत्न आहे.

रणजितसिंगाच्या काळची परिस्थिति

हें प्रवासवृत्त वाचतांना वाचकांनीं त्या वेळची हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति आपल्या डोळ्यांपुढें ठेवणें जरूर आहे. त्या वेळीं अयोध्येच्या नबाबापासून दिल्लीच्या बादशहापर्यंत सर्व मुसलमान नबाब इंग्रजांचे मांडलिक व आश्रित झाले होते. मराठ्यांचें साम्राज्य तर १८१८ सालींच इंग्रजांनीं जिंकून टाकलें होतें. हिमालयाच्या वरच्या टोंकापासून ते केप कामोरीनपर्यंत व सतलज नदीपासून ते इरावतीच्या काठापर्यंत इंग्रजांना शत्रु व प्रतिस्पर्धी असा कोणी राहिला नव्हता. सबंध हिंदुस्थानांत पंजाब व काश्मीरवर सत्ता असलेलें रणजितसिंगाचें राज्यच काय तें इंग्रजाविरुद्ध अद्याप ताठ उभें होतें. कवायती फौजेचें महत्त्व ध्यानांत घेऊन त्यानें नेपोलियनच्या पाडावानंतर देशोधडीस लागलेल्या फ्रेंच सेनानींना आपल्या नोकरींत घेऊन त्यांच्याकडून उत्कृष्ट कवायती फौजा तयार केल्या. इंग्रजांच्या लष्करांतून बडतर्फ केलेले व साहसी असे इतर युरोपीय सैनिक त्याच्या आश्रयाला जात व तो त्या सर्वांचा उपयोग करून घेई. कवायती शिक्षण घेतलेलें व कसलेलें असें सुमारे ८२००० सैन्य व ३७५ तोफा त्याच्याजवळ होत्या. हें सर्व सैन्य अनेक लढायांत कसास उतरलेलें असें अनुभवी व कडवें असल्यामुळें रणजितसिंगाच्या वाटेला आपण होऊन जावयाचें नाहीं असें इंग्रजांचें धोरण होतें. त्याच्या शक्तीचा हेवा वाटूनहि तो जिवंत असेतोंपर्यंत इंग्रजांनीं शीखांविरुद्ध कांहीं हालचाल केली नाहीं. याउलट हिंदुस्थानचा इतर सर्व भूभाग इंग्रजांनीं आपल्या घशाखालीं कसा घातला याची रणजितसिंगाला पूर्ण कल्पना होती. आपण होऊन इंग्रजांच्याविरुद्ध हालचाल

करावयाची नाहीं असेंच त्याचेंहि धोरण होतें. त्याचे सरदार व मुत्सद्दी जेव्हां त्याला सतलज ओलांडून इंग्रजी मुलखावर स्वारी करण्याचा आग्रह करीत तेव्हां तो त्यांना विचारी, "मराठ्यांचा तो दोन लाख भाला आज कोठें गेला?" अशा रीतीनें दोघेहि प्रतिस्पर्धी एकमेकांची शक्ति ओळखून प्रथम आगळीक करण्याच्या मन:स्थितींत नव्हते.

मराठ्यांचें साम्राज्य नष्ट करून जेव्हां इंग्रज हिंदुस्थानांत आपलें बस्तान बसवीत होते त्या वेळीं रणजितसिगानें मुलतान, अटक घेऊन शेवटीं काश्मीर-वर स्वारी करून १८१९ सालीं तोहि प्रांत जिंकला. सतलजच्या पूर्वेस इंग्रजांची हद्द असल्यानें रणजितसिगानें आपला राज्यविस्तार पश्चिम पंजाब, मुलतान, अटक, जम्मू, काश्मीर इत्यादि प्रांतांत करून नंतर झेरावरसिगा-जवळ प्रचंड लष्कर देऊन त्याला लडाख व तिबेट जिंकण्यास पाठविलें. या राज्यविस्ताराकडे इंग्रजांचें पूर्ण लक्ष असूनहि त्यांनीं त्याकडे कानाडोळा केला. रणजितसिग व इंग्रज़ यांचे परस्परसंबंध समजण्यास बॅरन ह्यूगेलचें हें प्रस्तुत प्रवासवृत्त वाचकांना फार उपयोगी पडेल. रणजितसिगाचा गैर-समज होईल म्हणून कंपनीनें सर्व इंग्रज लोकांना सतलज नदी ओलांडण्याची बंदी केली होती. जर एखादा गेलाच तर तो चोरून जात असे व नंतर त्याला कंपनीकडून शिक्षाहि होत असे. अशा चोरून गेलेल्या एका इंग्रज प्रवाशाची–डॉ. जॉन हेंडरसनची–अतिशय साहसी व रोमांचकारी हकिकत या प्रवासवृत्तांत आढळेल. बारोन ह्यूगेल व डॉ. हेंडरसन हे श्रीनगरला एकमेकांना भेटले व नंतर बऱ्याच वेळां ते एकत्र आले.

काश्मीर व पंजाबच्या प्रवासाचें वर्णन लिहिणारे बारोन चार्लस ह्यूगेल हे जर्मन प्रवासी त्यांच्या पदव्यांवरून व इतमामावरून सरदार घराण्यांतील होते असें दिसतें. इ. स. १८३५ च्या शेवटीं व इ.स. १८३६ च्या सुरुवातीला त्यांनीं प्रथम काश्मीरचा व नंतर पंजाबचा प्रवास करून लाहोरला रणजितसिगाचा पाहुणचार घेतला. जर्मनींत परत गेल्यानंतर त्यांनीं या प्रवासाची माहिती जर्मन भाषेंत चार खंडांत प्रसिद्ध केली. हे खंड एकदम प्रसिद्ध न होतां अंतराअंतरानें प्रसिद्ध झाले. या चार खंडांपैकीं पहिल्या व तिसऱ्या खंडांत या काश्मीर व पंजाबच्या प्रवासाची माहिती आहे. दुसऱ्या खंडांत विल्सनच्या ग्रंथाधारें लिहिलेला काश्मीरचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास आहे.

त्याचप्रमाणें या दुसऱ्या खंडांत पहाडी लोकांची राहणी, तेथील उत्पादनाची साधनें यासंबंधीं व भौगोलिक व इतरहि माहिती दिली आहे. चौथ्या खंडांत हिंदुस्थानचा इतिहास, ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानांतील राजवटीची माहिती, व राजकीय, सामाजिक व लष्करी परिस्थिति वर्णन केलेली आहे. हिंदुस्थानचा भौगोलिक किंवा स्थलवर्णन कोश व कठीण शब्दांचा कोशहि चौथ्या खंडांत समाविष्ट आहे.

१८३७ च्या जून महिन्यांत रणजितसिंगाचा मृत्यु झाला व शीख सरदारांत दुफळी माजली. शीखांशीं दोन हात करण्याची वेळ जवळ आली हें इंग्रजांना कळून चुकलें. खुद्द इंग्लंडमध्येंहि पंजाबविषयीं व काश्मीरविषयीं मिळेल ती माहिती लोक मोठ्या हौसेनें वाचूं लागले. इंग्रज लोकांना शीखांच्या राज्यांत जाण्याची बंदी असल्यानें त्यांना फारशी माहिती काढतां आली नाहीं. अशा वेळीं बारोन ह्यूगेलनें लिहिलेल्या या ग्रंथाकडे लोकांची नजर वळली यांत कांहींच आश्चर्य नाहीं. लोकांची ही उत्सुकता ध्यानांत घेऊनच मेजर जेरव्हिस यांनीं ह्यूगेलच्या जर्मन ग्रंथाचें इंग्रजींत भाषांतर व संपादन केलें. संपादन करण्याच्यावेळीं मूळ जर्मन भाषेंतील प्रवासवृत्ताच्या प्रती दुर्मिळ झाल्या असून त्या २ पौंड १६ शिलिंग (सुमारे ४० रु.) देऊन देखील मिळत नाहींत असें त्यानें स्वतःच्या प्रस्तावनेंत नमूद केलें आहे. हें संपादन करतांना त्यांनीं फक्त पहिल्या व तिसऱ्या खंडाचेंच भाषांतर केलें. दुसऱ्या खंडांत ह्यूगेलनीं दिलेली माहिती मूळ इंग्रजी ग्रंथावरून घेतली असल्यानें त्या खंडाची इंग्रजी भाषेंत मुळींच जरूरी नव्हती. चौथ्या खंडांत हिंदुस्थानविषयीं व ईस्ट इंडिया कंपनीविषयींची दिलेली माहिती जर्मन लोकांना नवीन असली तरी इंग्रज वाचकांना ती पूर्ण अवगत होती म्हणून तोहि खंड गाळला. पहिल्या व तिसऱ्या खंडांत जी काश्मीर व पंजाबच्या प्रवासाची आणि रणजितसिंगाच्या दरबारची हकीकत आहे ती मात्र जशीच्या तशीच मेजर जेरव्हिस यांनीं इंग्रजी भाषेंत भाषांतरित केली. पंजाबच्या राजकारणाची लोकांना पार्श्वभूमि कळावी व कंपनीच्या धोरणाबद्दल लोकांना विचार करण्यास चालना द्यावी हा उद्देश या इंग्रजी संपादकाचा होता. ही इंग्रजी आवृत्ति प्रसिद्ध व्हावी म्हणून जे या पुस्तकाचे

आगाऊ ग्राहक झाले व ज्यांनीं संपादकाला आर्थिक साहाय्य दिलें त्यांची यादी संपादकांनीं दिली आहे. त्यांत प्रिन्स आल्बर्ट, ईस्ट इंडिया कंपनीच्या कोर्टाचे डायरेक्टर्स व त्या वेळची इतरहि बरीच बडी मंडळी आहेत.

* * *

बारोन ह्यूगेल यांच्या प्रवासवर्णनावरून त्यांच्या विविध गुणांचे पैलू स्पष्ट दिसतात. त्यांच्या पदव्यांवरून त्याचें सामाजिक स्थान उच्च आहे असें दिसतें. आणि त्यांच्या लिखाणावरून त्यांच्या सुसंस्कृत मनाची व चांगल्या वागणुकीची माहिती मिळते. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत जर्मनीचे अनेक तुकडे होते. ह्यूगेल हे त्यांपैकीं ऑस्ट्रियाच्या साम्राज्यांतील सरदार घराण्यांतील होते. त्यांना प्रवासाचा अतिशय नाद असून त्यांनीं जगाच्या बहुतेक भागांचा प्रवास केलेला होता. हिंदुस्थानांत येण्यापूर्वी फिलिपाईन्स, चीन, मलाया इत्यादि भागाचा प्रवास करून नंतर त्यांनीं हिंदुस्थानचे प्रमुख भाग पायाखालीं घातले. प्रवास करण्यापूर्वी प्रत्येक भागावर उपलब्ध असलेलें सर्व साहित्य वाचून, अभ्यास करून, नंतर प्रवास करावयाचा असें त्यांचें धोरण होतें. काश्मीरविषयीं किती बारीकसारीक माहिती त्यांनीं गोळा केली होती हें त्यांच्या प्रवासवर्णनावरून व आपल्या पुस्तकांच्या प्रस्तावनेंत त्यांनीं उपयुक्त पुस्तकांच्या दिलेल्या यादीवरून स्पष्ट होतें. त्यांच्याबरोबर कांहीं काळ प्रवास करीत असलेले मि. व्हाईन यांनीं आपल्या प्रवासवर्णनांत ह्यूगेलचा भूगर्भशास्त्रज्ञ, वनस्पतिज्ञ इत्यादि शब्दांनीं गौरव केला आहे.

बारोन ह्यूगेल यांचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांच्या मनाचा मोठेपणा. हिंदुस्थानांतील पद्धतीप्रमाणें ठिकठिकाणच्या ठाणेदारांनीं त्यांचें स्वागत नजराणे देऊन केले. परंतु ह्यूगेलनें सर्वांचे नजराणे परत केले. कोणी भेटी देण्याचा आग्रह केल्यास त्यांनीं त्या लोकांना भेटण्याचें देखील नाकारलें. ज्या ठिकाणीं दरबारी पद्धतीचा मान राखण्यासाठीं भेटी द्याव्या लागल्या त्या भेटींचा उपयोग तेथेंच व्हावा म्हणून मोठ्या रकमेच्या काश्मीरी शाली त्यांनीं मुद्दाम खरेदी केल्या. आपल्या बरोबरच्या नोकरांना माणुसकीनें वागवणें, त्यांच्यासाठीं स्वतःला जरूर असणारीं सर्व औषधें देऊन टाकणें, प्रवास त्यांच्या कलानें करणें, इत्यादि गोष्टींत या प्रवाशाचा स्वभाव ठळकपणें दिसतो.

बारोन ह्यूगेल हे सर्वसाधारण सुसंस्कृत जर्मन माणसाप्रमाणें तत्त्वज्ञ आहेत. त्यांचें प्रवासवर्णन वाचणाऱ्यांना त्यांच्या या तत्त्वज्ञ मनाची फार चांगली ओळख पटते. अतिशय सुंदर देखावा दिसला तरी त्यांत या गृहस्थाचे विचार थोडे निराळेच दिसतात. रणजितसिंगानें कोहिनूर हिरा पहावयास दिल्यानंतर या हिऱ्याच्या किंमतींत हजारो दरिद्री व उद्ध्वस्त कुटुंबें सुखी होतील हाच विचार त्यांच्या मनांत आला. निसर्गाचे देखावे, माणसांच्या चालीरिती इत्यादि गोष्टींवरून आपणाला जगाच्या एकात्मतेची ओळख पटली असें त्यांनीं आपल्या पुस्तकाच्या उपोद्घातांत म्हटलें आहे. अत्यंत संकटांत सांपडल्या वेळीं त्यांनीं दाखविलेलें धैर्य व आनंदाच्या वेळीं दाखविलेली उदासीन वृत्ति त्यांच्या 'तत्त्वज्ञ' मनाच्या 'स्थितप्रज्ञ' अवस्थेची जाणीव करून देते.

बारोन ह्यूगेल यांनीं हा प्रवास किती उघड्या डोळ्यांनीं केलेला आहे याचें प्रत्यंतर त्यांच्या प्रवासवृत्ताच्या प्रत्येक पानावर दिसेल. त्यांनीं 'स्वगत' केलेले बरेचसे विचार व इतरहि कित्येक गोष्टी व्यवहारी दृष्टीनें या लेखमालेला आटोपशीरपणा आणण्यासाठीं गाळाव्या लागल्या आहेत. या कथनावरून त्यांच्या इतरहि गुणांवर बराच प्रकाश पडतो. उत्तम व कसलेली भाषा, आटोपशीर मांडणी, मोकळ्या मनानें व्यक्त केलेले विचार, इतिहासाचे प्रश्न हाताळतांना त्यांनीं दाखविलेला बुद्धीचा सखोलपणा, निसर्गाचें किंवा व्यक्तीचें वर्णन करतांना प्रत्यक्ष चित्र डोळ्यापुढें उभे करण्याची त्यांची हातोटी, इत्यादि गोष्टी त्यांच्या अभ्यासूपणाची व उत्तम वर्णनशैलीची साक्ष देतात.

बारोन ह्यूगेल यांच्या या प्रवासवर्णनाचें इंग्रजी भाषांतर व संपादन करणारे मेजर जेरव्हिस यांचाहि येथें उल्लेख केला पाहिजे. मेजर जेरव्हिस यांना जर्मन व इंग्रजी भाषा किती उत्तम अवगत होत्या हें त्यांच्या इंग्रजी लिखाणाच्या शैलीवरून स्पष्ट होतें. जर्मन प्रवासवृत्ताचें त्यांनीं शब्दशः भाषांतर केलें असून तें फार उत्कृष्ट वठलेलें आहे, हें इंग्रजी आवृत्ति वाचणाऱ्या सर्वांच्या लक्षांत येईल. मेजर जेरव्हिस यांनीं ई. इं. कंपनीचे नोकर म्हणून, हिंदुस्थानांत लष्करी व मुलकी खात्यांत मोठमोठ्या हुद्द्यावर कामें केलेली असून हिंदुस्थानविषयींची त्यांची माहिती प्रत्यक्ष अनुभवावर

आधारलेली आहे. इंग्रजी वाचकांच्या सोयीसाठीं त्यांनीं या प्रवासवृत्ताच्या इंग्रजी आवृत्तींत ठिकठिकाणीं टीपा देऊन अधिक व तौलनिक माहिती दिलेली आहे. प्रवासवृत्ताचें मराठींत कथन करतांना लिखाणाचें स्वरूप बदलल्यामुळें व या माहितीची मराठी वाचकांना जरूर नसल्यानें या मराठी कथनांत मेजर जेरव्हिस यांच्या या सर्व टीपा व इतर माहिती गाळली आहे. मात्र आवश्यक त्या ठिकाणीं मराठी वाचकांच्या सोयीसाठीं उपयुक्त अशा नवीन टीपांचा समावेश केला आहे.

जर्मन पुस्तकाचें इंग्रजींत रूपांतर करतांना अर्धाभाग इंग्रज वाचकांना जरूर नसल्यानें इंग्रजी संपादकांनीं गाळला. त्याचप्रमाणें या इंग्रजी आवृत्तीचें मराठी रूपांतर करतांना कांहीं भाग गाळला आहे. काश्मीरचा कल्हननें दिलेला प्राचीन इतिहास, हिंदुस्थानचा इतिहास, रणजितसिंगाविषयीं कांहीं अनावश्यक माहिती या मराठी आवृतींत समाविष्ट केलेली नाहीं. हा भाग गाळतांना मराठी वाचकांपुढें उपलब्ध असणारें इतिहास-वाङमय लक्षांत घेतलें आहे. कांहीं गोष्टी मूळ पुस्तकांत अनेकदां सांगितल्या गेल्या आहेत. अशा वेळीं त्या गोष्टींची पुनरावृत्ति टाळली आहे. या प्रवासाचें वैशिष्टच ज्यांना अधिक जवळून पाहावयाचें आहे, त्यांनीं इंग्रजी आवृत्ति व शक्य असल्यास जर्मन भाषेंतील आवृत्ति पहावी. मात्र या दोन्हीही आवृत्या आतां अत्यंत दुर्मिळ आहेत.

मराठी आवृत्तीविषयीं आणखी एक विशेष सांगितला पाहिजे. ह्यूगेलच्या प्रवासवृत्ताचें हें कथन म्हणजे इंग्रजी आवृत्तीचा अनुवाद किंवा केवळ भाषांतर नाहीं. इंग्रजी आवृत्तींत प्रवास–वर्णन रोजनिशीच्या स्वरूपांत आहे. प्रवासांत असतांना ह्यूगेल रोजनिशी ठेवून ती लिहिण्याची काळजी घेत असत. हें स्वरूप मराठी आवृत्तींत बदललें आहे. या रोजनिशीच्या टिपणावरून हें मराठी कथन केलें आहे. प्रवासवर्णनाचा सर्व भाग मराठींत देखील ह्यूगेलच्याच शब्दांत व्यक्त केला आहे, परंतु या कथनाला दैनंदिनीचें बंधन मात्र ठेवलेलें नाहीं. मराठी कथन लिहितांना वर म्हटल्याप्रमाणें कांहीं भाग जरी गाळावा लागला असला तरी कथन केलेल्या भागांतील सर्व गोष्टी मूळच्या वर्णनावरून जशाच्या तशा घेतलेल्या आहेत. विचार व्यक्त करतांना भाषा मूळच्या पद्धतीला सुसंगत अशीच ठेवली आहे.

ह्यूगेलच्या व रणजितसिंगाच्या दरबारांतील मुलाखती इतिहाससाधनाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या असल्यानें त्या विस्तृत स्वरूपांत दिल्या आहेत. झाडें, पशुपक्षी यांचें वर्णन स्वगत विचार, पुनरुच्चारित विचार इत्यादि गोष्टी गाळून प्रवासवर्णन आटोपशीर केलें आहे. पुस्तकांतील व्यक्ति, स्थळें इत्यादींच्या नांवांत अगदीं जरूर वाटेल त्या ठिकाणीं बदल केला आहे. परंतु शक्य तों तीं मूळच्या स्वरूपांतच ठेवलीं आहेत.

बारोन ह्यूगेलनीं १६ आक्टोबर १८३५ ला सतलज ओलांडून रणजित सिंगाच्या राज्यांत प्रवेश केला. बिलासपूरहून ज्वालामुखी आणि जम्मू या मार्गानें पीरपंजाल घाटानें श्रीनगरमध्यें जाऊन शहर व जवळपासची बहुतेक सर्व ऐतिहासिक स्थळें त्यांनीं पाहिलीं. परततांना बारामुळा घाटानें रावळ-पिंडीवरून अटकेपर्यंत जाऊन व पिंडीला परत येऊन त्यांनीं लाहोरकडे प्रयाण केलें. लाहोरला एक पंधरवडा मुक्काम करून जानेवारी १८३६ अखेर रणजितसिंगाच्या राज्यांतून परत कंपनीच्या हद्दींत प्रवेश करून लुधियाना-वरून मुंबईकडे व नंतर मायदेशीं त्यांनीं प्रयाण केलें. प्रवासाचा हा तीन चार महिन्यांचा काळ जरी छोटा असला तरी प्रवासाला निघण्यापूर्वीं त्यांनीं या भागाचा पूर्ण अभ्यास केलेला असल्यामुळें त्यांना प्रत्यक्ष अवलोकनावरून व अनुभवावरून सिद्धांत मांडणें सोपें गेलें. सर्व प्रवास उघडया डोळयांनीं केलेला असल्यामुळें व सूक्ष्म निरीक्षणाची संवय असल्यानें त्यांनीं लिहिलेलीं व्यक्तिचित्रें किती मार्मिक व यथायोग्य आहेत हें इतिहासाच्या अभ्यासकाला तत्काळ पटेल. रणजितसिंगाची प्रभावळ व त्याच्या कर्तृत्वाचें व स्वभावाचें त्यांनीं केलेलें वर्णन, त्याचप्रमाणें रणजितसिंगाच्या राजवटीविषयीं त्यांनीं केलेलें भविष्य किती थोडक्या वेळांत व तंतोतंत खरें ठरलें हें या प्रवास-वृत्तावरून वाचकांना स्पष्ट होईल.

लुधियानाहून निघाल्यापासून ते तेथें परत येईपर्यंतचें बारोन ह्यूगेलचें प्रवासवृत्त यापुढें त्यांच्याच शब्दांत दिलें आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण पहिलें

बिलासपूरच्या दरबारांत

" काश्मीरला ? अहो, नाहीं कोण म्हणेल ? तें तर पृथ्वीवरचें नंदनवनच आहे. " माझ्या परिवारांतील मुनशी ठाकूरदास काश्मीरला येण्यासंबंधीं प्रश्न विचारल्यावर संमतिदर्शक उद्‌गारला. उत्तर हिंदुस्थानांत ज्या ज्या ठिकाणीं मी काश्मीरला जाण्याचा प्रश्न काढला, त्या त्या ठिकाणीं लोकांनीं माझ्याजवळ काश्मीरविषयीं वरीलप्रमाणेंच उद्‌गार काढले. काश्मीरसारख्या दूरच्या प्रदेशांत येण्यास लोक तयार होणार नाहींत असें युरोपांत मला सर्वजण सांगत होते, परंतु मला अनुभव मात्र निराळा आला. कलकत्त्यापासून माझ्या बरोबर असलेले माझे तीन नोकर म्हणजे एक हिंदु सरदार, एक मुसलमान खिदमतगार व मशालजी या तिघांनींहि कांहींहि आढेवेढे न घेतां माझ्याबरोबर काश्मीरला यावयाची तयारी दाखविली.

माझ्याबरोबरचा सरदार हा पाटण्याचा राहणारा व क्षत्रिय वर्गापैकीं होता. पालखी वाहण्याचें काम जरी तो करीत असला तरी आपण सरदार घराण्यांतील आहोंत असा त्याला भयंकर अभिमान वाटे. आपण राजपूत आहोंत म्हणून इतरांनीं आपणाला सरदार म्हणावें असा त्याचा आग्रह असे. पाठीवर ढाल, हातांत एक वाकडी तरवार, अक्राळविक्राळ स्वरूप आणि चालतांना आपण लढवय्ये आहोंत असें भासविण्यासाठीं होणारे त्याचे हावभाव या सर्व गोष्टी पाहून मला हंसें बळेंच दाबावें लागे. भांडण्याच्या वेळीं आपले डोळे गरगर फिरवून व अक्राळविक्राळ स्वरूपांत रागानें हावभाव करून तो आपल्या जातींतील भित्र्या लोकांवर दहशत बसवीत असे. हा बिचारा महिना तीन चार रुपयांवर माझी सेवा करीत होता. माझा मुसलमान नोकर हकीम, हा मला हिंदुस्थानांत लाभलेल्या सर्व नोकरांत उत्कृष्ट होता. हिंदुस्थानांतील हकीमसारखे खिदमतगार युरोपांतील बटलरप्रमाणें जेवण्याखाण्याची सर्व व्यवस्था पाहतात. केवळ चहाकॉफीच नव्हे तर

युरोपियनांच्या आवडीचे खाण्याचे पदार्थहि ते चांगले बनवितात. अंधारांत उजेड पाडण्यासाठीं तेलाच्या मशाली वापरतात, त्या धरून चालणाऱ्यांना मशालजी म्हणतात. रात्रीच्या वेळीं मालक घोड्यावरून वा पालखींतून जात असतां त्याच्यापुढें मशाल धरण्याचें काम हे मशालजी करतात. ठाकूरदास म्हणून एक ब्राह्मण मुनशी माझे चिटणिसाचें काम करी. याला इंग्रजीचा गंधहि नसला तरी हा जाडा संस्कृत पंडित असून, फारसी भाषाही उत्तम जाणत असे. मोहनवीर नांवाचा एक चौदा वर्षांचा मुलगा, इंग्रजी चांगलें जाणत असल्यामुळें, मी दुभाषा म्हणून बरोबर घेतला.

काश्मीरला पहिल्याप्रथम व शेवटचेंच जाण्याचें असल्यामुळें मला सर्व भाग निवांत व बारकाव्यानें पहावयाचा होता. प्रवासांत स्वजातीय सोबती असले म्हणजे बरें असतें. परंतु मला मात्र हा सर्व प्रवास एकट्यालाच करावयाचा होता. माझे इंग्रज मित्र माझ्याबरोबर येण्यास तयार होते; परंतु सतलज नदी ओलांडण्यास त्यांना ईस्ट इंडिया कंपनीची बंदी होती. सतलजच्या पलीकडे रणजितसिंगाची हद्द असून त्याच्या राज्यांत पाऊल-देखील टाकण्यास इंग्रज अधिकाऱ्यांना कंपनीसरकारची परवानगी नव्हती.[१]

---

१ सतलज नदीच्या पूर्वेकडील व दक्षिणेकडील शीख संस्थानांचा प्रदेश व त्यावरील स्वामित्व यासंबंधीं रणजितसिंग व इंग्रज यांच्यांत फार मोठी चुरस होती. मूळचा हा प्रदेश शिंदे होळकर इत्यादि मराठी सरदारांच्या प्रभुत्वाखालीं होता. १८०३ पासून पुढें झालेल्या इंग्रज–मराठे युद्धांत शिंदे व होळकर या दोघांचेहि या प्रदेशावरील स्वामित्व नष्ट होऊन हा प्रदेश ओघानेंच इंग्रजांच्या संरक्षणाखालीं आला. मराठ्यांच्या पराभवानंतर रणजितसिंगानें या प्रदेशावर आपला अम्मल बसविण्याचा प्रयत्न केला. सर्व शीख प्रदेश एका अमलाखालीं आणण्याचें रणजितसिंगाचें ध्येय व धोरण सुप्रसिद्ध होतें. इंग्रजांना हें धोरण सर्वस्वी नापसंत होतें. परंतु १८०६ पासून १८०८ पर्यन्त नेपोलिअनच्या स्वारीच्या भीतीनें ते रणजितसिंगाला दुखविण्यास नाखूष होते. ही भीति नष्ट झाल्यावर १८०९ सालीं त्यांनीं हा सर्व शीख प्रदेश इंग्रजी संरक्षणाखालीं

(टीप पुढील पानावर चालू)

प्रवासाची तयारी म्हणून तंबू व राहुट्या, मांसाचे सीलबंद डबे, हरतऱ्हेच्या मद्याच्या बाटल्या, टिकणारा मेवा आणि फळें, या सर्व वस्तू मी बरोबर घेतल्या. हिमालयाची कठीण शिखरें ओझ्यासह चढणारीं खेंचरें, बसण्यासाठीं एक डोली, हुक्का या गोष्टींची मला तरतूद करावी लागली. याशिवाय दोनतीन स्वैंपाकी, हुक्क्याची व्यवस्था पाहण्यासाठीं हुक्का भरदार, पाणी आणण्यासाठीं अबदार, नवेजुने कपडे शिवण्यासाठीं दरजी, इकडून तिकडे बातम्या पोहोंचविण्यासाठीं चोपदार, हिंदी आणि फारसी भाषेंत माझीं नांवें कोरलेले पट्टे गळ्यांत घालणारे दोन चपरासी, ताजी शिकार करून जेवणांत रोज ताज्या मांसाचा पुरवठा करण्यासाठीं दोन शिकारी, दऱ्याखोऱ्यांतून व घाटांतून वाट दाखविण्यासाठीं दोन पहाडी वाटाडे, हिमालयांतील हरतऱ्हेच्या वनस्पतींचे नमुने व झाडांचें बी गोळा करण्यासाठीं दोन माळी, तंबू उचलण्यासाठीं दोन नोकर, डोली वाहून नेण्यासाठीं बारा भोई, इत्यादि सर्व लवाजम्याची गणती केली असतांना एकूण सदतीस नोकर, आठ बिगारी आणि सात जनावरें यांची मेळवणी करून मी काश्मीरच्या प्रवासाची सिद्धता केली.

काश्मीरला जाण्याचे तीन रस्ते होते. त्यापैकीं एका रस्त्याची निवड मला करावयाची होती. एक रस्ता हिमालयाच्या अत्युच्च शिखरावरून जाणारा

(टीप मागीलपानावरून चालू)
आहे असें रणजितसिंगाला बजावून लुधियाना येथें लष्करी सामुग्री जमविली. काळ वेळ ओळखून रणजितसिंगानें ही गोष्ट मान्य केली व हा शीख प्रदेश इंग्रजांच्या अमलाखालीं आला.

१८०९ मध्यें रणजितसिंगाशीं केलेल्या तहान्वयें इंग्रजांनीं सतलज नदीच्या पश्चिमेकडील आणि दक्षिणेकडील प्रदेश रणजितसिंगाच्या सार्वभौमत्वाखालीं असल्याचें कबूल करून त्या ठिकाणीं इंग्रज कधींहि ढवळाढवळ करणार नाहींत असें आश्वासन दिलें. एवढेंच नव्हे तर ई. इं. कंपनीनें जाहिरनामा काढून कोणाहि इंग्रज इसमानें खाजगी किंवा इतर कारणासाठींदेखील सतलज ओलांडून रणजितसिंगाच्या राज्यांत जाऊं नये असें फर्माविलें. इंग्रजांच्या हेरगिरीविषयीं रणजितसिंग साशंक असल्यामुळें व रणजितसिंगाशीं दोस्ती कायम राखण्यासाठीं म्हणून या कलमाची इंग्रज लोक कांटेकोरपणें अम्मलबजावणी करीत.

— (संपादक)

होता. दुसरा दऱ्याखोऱ्यांतून जात होता व तिसरा पंजाबच्या पठारावरून जाणारा होता. यांपैकीं कोणत्याही रस्त्यानें जाण्यासाठीं मला लाहोरचे महाराज रणजितसिंग यांच्या परवान्याची जरूरी होती. त्यांच्या परवानगी-वांचून काश्मीरला मला जातांहि आलें नसतें व जगतांहि आलें नसतें. म्हणून मी परवान्यासाठीं रीतसर अर्ज केला.

रणजितसिंग हा सार्वभौम राजा असून इंग्रजांची हुकमत त्याच्यावर चालत नाहीं. कंपनीचा इंग्रज वकील लुधियानाला रहात असे. त्याच्यातर्फे मी परवाना मिळविण्याची खटपट केली. कंपनीकडून क्षुल्लक व कमी महत्त्वाच्या मागण्या आल्या तर रणजितसिंग त्या लगेच मान्य करीत असे. गव्हर्नर-जनरलच्या प्रशस्तिपत्रासह परवान्यासाठीं अर्ज केल्यानंतर मी सिमल्याला येऊन मुक्काम ठोकला. बिरिंदा घाटांतून लडाखमार्गे काश्मीरमध्यें प्रवास करावा असें माझ्या मनांत फार येत होतें. कारण यामार्गें अजून एकहि युरोपीय प्रवासी काश्मीरांत गेला नव्हता. या मार्गानें जवळजवळ अडीचशें मैलांचा प्रवास करून काश्मीरमध्यें जातां येतें. या भागांत बर्फ थोडें पडतें हाहि एक माझ्या दृष्टीनें फायद्याचा मुद्दा होता. उन्हाळा संपण्याच्या आंत मी जर हा प्रवास संपवला नाहीं तर तिबेटमधल्या एखाद्या प्रदेशांत पावसाळ्याचे चार महिने काढणें भागच होतें आणि ही गोष्ट त्रासाची होती. या भागांत कधींहि न गेलेल्या लोकांनीं यासंबंधीं भलभलत्या गोष्टी सांगून माझ्या मनांत गोंधळ उत्पन्न केला. ऐकीव माहितीवर ठासून गप्पा मारण्याची सवय हिंदुस्थानांतील लोकांत फार आहे व त्यांचें म्हणणें ऐकणें धोक्याचें ठरतें असें मला सर्व युरोपीय प्रवाशांना आवर्जून सांगावयाचें आहे. शेवटीं या मार्गानें जाण्याचा बेत मी रहीत केला. दुसरा मार्ग म्हणजे मंडी डंकरवरून लडाखला जाणारा. हा मार्ग डिसेंबरच्या सुमाराला बर्फामुळें बंद होत असल्यानें याचाहि विचार मी सोडला आणि अखेरीस बिलासपूर, ज्वालामुखी, नरपूर मार्गानें काश्मीरला जावयाचें असें ठरविलें.

६ ऑक्टोबर १८३५ला महाराजा रणजितसिगांनीं माझ्या प्रवासाचा परवाना मंजूर केल्यासंबंधीचें पत्र कॅप्टन वेड्कडून मला आलें. चौदा तारखेस परवान्यासह बिलासपूरला रणजितसिंगाचा अधिकारी मला भेटण्यास येणार असल्याचा उल्लेखहि त्यांत होता. युरोपांत परक्या प्रदेशांत प्रवासासाठीं

लागणाऱ्या पासपोर्टपेक्षां या 'परवान्यां 'चें स्वरूप वेगळें असतें. युरोपांतील पासपोर्टमध्यें फक्त संबंधित देशांतून जाण्याची परवानगी नमूद केलेली असते. परंतु हिंदुस्थानांतील परवान्यामध्यें सुभेदारांना व ठाणेदारांना संबंधित प्रवाशाला जरूर लागणारे बिगारी, खाण्यापिण्यासाठीं शिधा, मांसासाठीं व वहातुकीसाठीं जनावरें व इतरहि जरूर असणाऱ्या सर्व वस्तूंचा पुरवठा करण्याची आज्ञा असते.

सिमल्याहून निघून मी कुनियार, शाहीकोठी या मार्गानें बिलासपूरला जाण्यासाठीं निघालों. बरोबर पूर्वीं सांगितल्याप्रमाणें शें-दीडशें माणसांचा काफिला होता. ही मंडळी निरनिराळ्या जातीजमातींची, धर्मांची, प्रकृतींची व स्वभावाची असल्यामुळें त्यांच्या संगतींत मला करमणूक होऊन शिवाय हिंदुस्थानविषयींची बरीच माहिती मिळे.

बिलासपूरला पोहोंचल्यानंतर मला तेथील बरीच माहिती कळाली. बिलासपूरचा राजा हिंदु असून त्याचें नांव कालूर आहे. हा राजा बत्तीस वर्षांचा असून हिमालयांतील अनेक उमद्या राजांपैकीं एक आहे. इंग्रज रेसिडेंटाकडून पत्र गेलें असल्यामुळें, त्यांना खूष करण्यासाठीं म्हणून त्यांनीं माझें शाही स्वागत केलें. सतलज नदीच्या तीरावर एका सुंदर व प्रशस्त बागेंत दरबारी तंबू ठोकून माझ्या राहण्याची व्यवस्था केलेली होती. मी गेल्यानंतर माझा मान राखण्यासाठीं म्हणून आपल्या छोट्या दरबारासह व सर्व लवाजम्यासह तो माझ्या भेटीस आला. त्याच्या एकंदर वागण्यावरून मला तो आडदांड, रानटी व दरबारी रीतिरिवाजाची बिलकूल माहिती नसणारा असा वाटला. माझेबरोबर तो फारतर अर्धा तास बसला असेल परंतु त्याची ब्याद कधीं निघून जाते असें मला झालें होतें. आयुष्याच्या ऐन उमेदींत असूनसुद्धां अती दारू पिण्याच्या सवयीमुळें त्याची बुद्धि व शक्ति दोन्हीहि नष्ट झालेल्या होत्या. थोडेसें इंग्रजी येत असणारे दोन इंग्रज गृहस्थ त्याच्यावर हुकमत चालवतात. परंतु ते देखील राजाइतकेच नालायक दिसतात. येथील रीतिरिवाजाप्रमाणें मला राजाला परतभेट देणें भाग होतें. भेट म्हणून देण्यासाठीं त्यांनीं अनेक वस्तूंची जुळवाजुळव करून ठेवल्याचेंहि मला कळलें. परंतु अशा नालायक माणसाच्या सहवासांत पुन्हा वेळ काढण्याची माझी तयारी नसल्यानें मला येता येत नसल्यासंबंधीचें दरबारी

पद्धतीनें लिहिलेलें पत्र मी ठाकूरदासाकडून त्याला पोहोंचविलें. इतर वस्तूंच्याऐवजीं सात उत्तम घोडीं घेण्याचें मी कबूल केलें. हीं घोडीं मला बाजारांत कोणत्याहि किंमतीला विकत मिळालीं नसतीं. मध्यंतरीं रणजित-सिंगाकडून एक अधिकारी येऊन त्यानें परवाना माझ्या हवाली केला. मिर्झा अबदुल नांवाचा रणजितसिंगाचा अधिकारी नरपूरपर्यंत माझ्याबरोबर सोबत येणार होता. वाटेंतील अधिकाऱ्यांना माझी व्यवस्था करण्यासंबंधींची आज्ञा देणारीं पत्रें अगोदरच गेलीं होती. हा मिर्झा अबदूल रणजितसिंगाचा हेर असावा असें वाटलें.

बिलासपूर हें एका मोठ्या दरींत वसलेलें आहे. सभोंवतालीं सतलज नदीची लांबच लांब आणि सुपीक अशीं खोरीं पसरलेलीं आहेत. येथें वनस्पति फुलांनीं इतकी बहरलेली असते कीं निसर्गदेवतेनें या भागाला कांहीं वरदानच दिलें कीं काय असा भास होतो. सुवासिक फुलझाडें चोहींकडे सुवास दरवळवतात. फळझाडें उत्तम जातीच्या फळांनीं लकडलेलीं असतात. रात्रींच्या वेळीं मी माझ्या तंबूतून बाहेर येऊन निसर्गाकडे दृष्टि टाकली. चोहोंकडे शांतता पसरलेली होती. चंद्रप्रकाश सृष्टीला न्हाऊ घालीत होता. आकाशांत तारे लुकलुकत होते. शांत दिसणारीं झाडें मध्येंच हालून, पानें सळसळत असत. झाडावर काजवे चमचम करीत होते. काजव्यांचें कूंजन मध्येंच थांबे व झाडावरच्या घरट्यांमधून पक्षांचा किलकिलाट ऐकूं येई. मधेंच दूरवर दिसणारा एखादा दिवा, हिंदूंचें देऊळ तेथें असल्याची निशाणी दाखवी. पहांटेच्या वेळीं, इतक्या दूरवरच्या देवळांतून देखील चौघडा वाजल्याचा आवाज ऐकूं आला. हे हिंदु या देवांना रात्रींदेखील निवांत विश्रांती घेऊं देत नाहींत. सुवासानें दरवळणारा वारा, पहाटेची थंडी व झोपेची गुंगी असतांनादेखील, या गोष्टी पाहून माझ्या मनाला आल्हाद वाटला. इतर प्रवाशांना हिंदुस्थान पाहून काय वाटलें असेल तें वाटो; परंतु हिंदुस्थान पाहण्यापूर्वीं जीं स्वप्नें मला पडत होतीं तीं आतां प्रत्यक्षांत खरीं ठरत होतीं.

सकाळीं नोकरचाकरांच्या गडबडींत मी जागा झालों व ते सामानाची

बांधाबांध करीत असतांना निसर्गाची शोभा पहात राहिलों. मी बिलासपूर सोडण्यापूर्वी राजाचा वजीर व वकील मला निरोप देण्यासाठीं आले. येथील राजेलोक राज्यकारभाराची भिस्त आपल्या वजीरावर टाकतात. लिहिण्या-वाचण्यास शिकणें किंवा राज्यकारभाराची काळजी वाहणें येथील राजे लोकांना कमीपणाचें वाटतें. मदत (अफू) पीत, दारूच्या बाटल्या झोकीत, गुडगुडी ओढीत हे राजेलोक जनानखान्यांत पडून रहातात. यांचा बहुतेक वेळ स्त्रियांच्या सहवासांत व छंदीफंदीपणा करण्यांतच जातो. राहिलेल्या वेळांत व शुद्धीवर असल्यास हे दरबार भरवितात किंवा जंगलांत शिकार करण्यासाठीं म्हणून जातात. वयाची तिशी ओलांडलेला बिलासपूरचा राजा समजूत आणि ज्ञान या दृष्टीनें पाहतां अगदीं पोरकट आहे. नेहमीं अफूच्या तारेंत असल्यामुळें त्याचा सहवास तिरस्करणीय वाटतो. तारवटलेले डोळे व अर्धवट उघडलेलें तोंड अशा थाटांत तो नेहमी पडलेला असतो. कोणत्याहि पाहुण्याची गांठ पडल्यानंतर त्याला विचारायचे त्याचे प्रश्नहि ठरलेलेच असतात. एकादा नवीन पाहुणा भेटल्यानंतर 'काय ठीक चाललें आहे ना!' असा पहिला प्रश्न तो विचारतो. महाराजांच्या सहवासांत काय कमी पडणार आहे असें तोंडदेखलें उत्तर पुढचा मनुष्य देतो. 'तुमचें वय काय?' हा त्याचा दुसरा प्रश्न असतो. त्यानंतरचा प्रश्न म्हणजे 'तुम्हांला किती बायका आहेत?' हा असतो. माझ्यासारख्यानें मी अविवाहित आहे असें जर उत्तर दिलें तर सर्वजण आऽऽ करीत एकमेकांकडे पाहतात व संभाषणच बंद होतें. एकादे वेळेस पाहुण्यानें उत्तर न दिल्यास राजा आपल्या वजिराकडे पाहतो. अशा वेळीं वजीर व इतर मुत्सद्दी थोडे दूर जाऊन आपाआपसांत खलबतें करून पांच-दहा मिनिटांनीं परत येऊन त्या प्रश्नाचें उत्तर देतात. येथील राजे लोकांच्या गुणांवरूनच त्यांच्या वजिरांच्या ज्ञानाची परीक्षा करावी.[२]

---

२ मोडकें तोडकें इंग्रजी बोलावयास शिकलेले दोन बंगाली गृहस्थ या वेळीं बिलासपुरच्या राज्याचा कारभार हाकीत असत. इंग्रजांशीं संबंध आल्यामुळें, कसें तरी इंग्रजी बोलतां येणें हाच गुण गृहीत धरून त्यांची नेमणूक ई. इं. कंपनीकडून मान्य झाली असावी. —(संपादक)



नदी ओलांडून जाण्याची पंजाबातील जुनी पद्धत

वजीर आणि इतर मुत्सद्द्यांचा निरोप घेऊन आम्ही पुढच्या प्रवासाच्या मार्गाला लागलों. धो! धो! करीत धावणाऱ्या सतलज नदीच्या प्रवाहांतून आम्ही तिच्या दुसऱ्या तीराला पोहोंचलों. नदी ओलांडण्याची येथील रीत मोठी गमतीची असते, बैलाच्या कातडयाला, दोन्ही बाजूला दोन काठ्या बांधून त्यावर एखादा मनुष्य निजतो व हें कातडें पाण्यावर सोडतात. दोन बिगारी, एका हातानें काठी धरून दुसऱ्या हातानें पाणी वारीत, वरच्या माणसासह दुसऱ्या तीराला जातात. नदींतून शेंकडों माणसें अशा रीतीनें इकडून तिकडे जातांना दिसतात. ब्रिटिशांच्या संरक्षणाखालील प्रदेशाला रामराम ठोकून अशा रीतीनें मी धोक्याच्या व साहसाच्या प्रवासाला सुरुवात केली. सतलज नदी ओलांडल्यानंतर आम्ही महाराजा रणजितसिंगाच्या राज्यांत शिरलों होतों.

✦ ✦ ✦

प्रकरण दुसरें

प्राणांवर आलें, पण माफीवर निभावलें !

महाराजा रणजितसिंग याचें राज्य समृद्ध व बरेंच मोठें आहे. उत्तरेला हिमालय पर्वत आणि सिंधु व सतलज या नद्यांच्या मधील सुपीक व समृद्ध प्रदेश त्यांच्या ताब्यांत आहे. कधींहि न आटणाऱ्या हिमालयाच्या नद्या या राज्यांतून वाहतात त्यामुळें या भागांत दुष्काळाची फारशी जाणीव भासत नाहीं. १६ आक्टोबर १८३५ ला मी रणजितसिंगाच्या राज्यांत प्रवेश केला. अत्यंत कष्टदायक असा प्रवास कोणाच्याही सोबतीविना करण्याची पाळी मजवर आल्यानें माझें मन थोडेसें खिन्न झालें. माझ्या सभोंवतीं शेकडों लोक होते. परंतु शिक्षण, धर्म, पोषाख, चालीरीती, वर्ण, सभ्यता, विचार करण्याची बुद्धि, आणि हृदयांतील माणुसकी या सर्व गोष्टी विचारांत घेतां सर्व लोकांत असून देखील मी एकटाच होतों. व ही जाणीव माझ्या मनाला सारखी वेदना देई. सभोंवतीं पाहिलेल्या सृष्टिशोभेंत जो आनंद मिळतो तो कोणालाही वर्णन करून सांगण्याची सोय येथें नव्हती. खिन्नता आली तर कोणाशी मन मोकळें करून सांगण्याची सोय येथें नव्हती. परक्या देशांत साहसीपणानें जात असतां कदाचित् शेवट होण्याचा प्रसंग आल्यास माझ्या घरच्या नातेवाईकांना किंवा मित्रांना शेवटचा निरोप पाठवण्याची सोय देखील येथें नव्हती.

प्रवासवृत्त लिहितांना उपयोगी पडावें म्हणून मी सतलज ओलांडल्यापासून नकाशा तयार करूं लागलों. परंतु मिर्झाकडे पाहून मला असा संशय आला कीं रणजितसिंगानें हेर म्हणनच याला माझ्याकडे पाठविलें आहे. माझा नकाशे काढण्याचा उद्योग जर यानें आपल्या मालकाला कळविला तर काश्मीरला पोहोंचण्यापूर्वींच परत फिरण्याची पाळी मजवर येण्याची धास्ती होती. या भागांतून सतलज नदी खडकांतून व खिंडींतून वहात असतांना फार मनोवेधक दिसते. रस्ता अतिशय खडकाळ व त्रासाचा होता. मन्सालाजवळ आल्यावर रस्ता थोडा सुधारला. या गांवीं एका बैराग्याभोंवतीं अनेक लोक

गोळा झालेले मला दिसले. हातांत एक कटोरा व कमरेभोंवतीं लंगोटी एवढीच याची मालमत्ता होती. लोकांनीं दिलेले तांदूळ या कटोऱ्यांत शिजवून खावयाचे व देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत धार्मिक स्थळांना भेटी देत हिंडायचे हा या बैरागी लोकांचा धंदा आहे. मी पाहिलेला हा बैरागी वयाच्या ऐन तारुण्यांत आलेला होता. सर्व अंगाला त्यानें राख फासलेली होती. डोक्याच्या केसांत सुद्धां राख असून त्यावर रानांतल्या फुलांचा मुकुट आडवातिडवा घातलेला होता आणि फुलांची एक माळ त्यानें आपल्या गळ्यांत घातली होती. मला पाहतांच लोकांना दूर होण्यास सांगून तो माझ्याजवळ आला. माझे सर्व नोकरचाकर त्याला पाहतांच 'रामराम शहाजी' म्हणत आपला आदर व्यक्त करीत व ते माझ्याकडेही मी असाच आदर त्याला दाखवावा म्हणून पाहूं लागले. आपल्या डोक्यावरून फुलांचा मुकुट काढून त्यानें तो पुढें केला व जमावांतील कोणीतरी तो मला द्यावा म्हणून म्हणण्याची वाट बघूं लागला. पण जमावांतील कोणाच्याही हें लक्षांत आलें नाहीं. मी त्याला स्वतःच माझ्या डोक्यावर तो ठेवण्यास सांगितल्यावरून त्यानें कुरकुरत व पुटपुटत तो माझ्या डोक्यावर ठेवला. परंतु त्यांत त्याला अपमान झाल्यासारखा वाटला. हे हिंदुस्थानांतील बैरागी जीवनांतील सर्व-सुखांचा नीट त्यागही करीत नाहींत व धड त्यांचा उपभोगही घेत नाहींत त्यांच्याशीं दोस्ती करणें जरा कठीणच जातें. मात्र एकदां त्यांची जानपछान झाल्यानंतर त्यांच्याकडून जी माहिती मिळेल ती सर्व हिंदुस्थानांतील राजे-रजवाड्यांत हिंडून व दरबारांत प्रवेश करूनही मिळणार नाहीं हें निश्चित.

बरेंच पुढें गेल्यानंतर आम्ही कुमगहेटीला थांबलों. गहेटी म्हणजे सराई, किंवा धर्मशाळा. या सरायांमधून प्रवाशांना लागणाऱ्या तांदूळ, डाळी, लोणी फळें, भाज्या, जनावरांसाठीं वैरण, व माणसांना झोपण्यासाठीं चारपाया किंवा बाजा इत्यादि वस्तु मिळतात. या चारपाया चार बाजूला चार लाकड उभीं करून व आडव्या लाकडांनीं ते पाय एकत्र जोडून मधून काथ्यांनीं विणलेल्या असतात. या काथ्यावर अंग टाकलें असतांना सुख वाटण्याऐवजीं कातड्याची आग मात्र होऊं लागते. यावर झोंपण्यासाठीं घट्ट कातड्याचे हिंदी लोक किंवा त्यावर झोपण्याची अनेक दिवसांची संवयच हवी. बिलासपूरपासून हें ठिकाण आठ कोस किंवा पंधरा मैलांवर असून आम्ही हा सर्व प्रवास पांच तासांत आटोपला.

दुसऱ्या दिवशीं आम्ही अठरा मैल प्रवास केला. प्रवासांत चढउतार सारखा करावा लागतो. खडकांतून धों धों वाहणारें नद्यांचें पाणी वर तुषार व खालीं फेस निर्माण करून अशी कांहीं शोभा दाखवितात कीं ती पहात असतांना देहभान हरपून जाई. या दिवशीं रात्रीं ज्या गांवाजवळ थांबलों तेथें अन्नधान्यच काय, पण लाकूडफाटाही मिळण्याची सोय नव्हती. पांच वर्षें जगांतील निरनिराळ्या भागांत प्रवास करून देखील व प्रवासांत अटळ अशा सर्व प्रकारच्या गैरसोई सोसण्याची तयारी असून देखील शेवटीं असा त्रास असह्य होतो. जवळच एक थडगें होतें त्याकडे पाहून प्रवासांत थकून भागून असाच एखादा माझ्या पूर्वीचा प्रवासी या ठिकाणीं कायमची विश्रांति घेत आहे असें मला वाटलें. काश्मीरमध्यें बर्फ पडावयास सुरवात होण्याच्या पूर्वीं मला जावयाचें होतें. नाहीं तर कित्येक महिने धड पुढेंही जातां येत नाहीं व धड मागेंही येतां येत नाहीं अशा परिस्थितींत मला पडावें लागलें असतें. माझेबरोबर असलेल्या लोकांना या अडचणींची जाणीवहि नव्हती व कामचुकारपणाची त्यांना लाजही वाटत नसावी असें दिसलें. एकादा परदेशी प्रवासी त्यांच्या आळसामुळें मध्येंच महिनोंमहिने अडकून पडला तरीही त्याची त्यांना क्षिति नाहीं.

येथील लोक परक्या प्रवाशांना वाटेल तो भाव सांगून त्यांच्याकडून पैसा लुबाडण्याचा प्रयत्न करतात. मध्यें अडकून पडूं नये म्हणून पुढें जाण्याची माझी घाई असल्यामुळें मी पहांटे उठून सर्व सामान आलें कीं नाहीं हें पहात असतां मोठे तंबू मागेंच राहिल्याचें मला दिसून आलें. मुनशींनीं बिगाऱ्यांना पैसे दिले नसल्यामुळें ते तंबू उतरण्यास तयार नाहींत असें मला समजलें. बिलासपूरमधून आलेल्या या सर्व बिगाऱ्यांना निघतांना आगाऊ पैसा दिला असतांनासुद्धां अधिक पैसा मिळविण्यासाठीं ते माझी अडवणूक करूं पहात होते. खरें पाहिलें असतां परवाना असल्यानंतर या लोकांकडून छदामहि न देतां वेठीनें काम करून घेण्याची येथील पद्धत आहे. परंतु या गरीब लोकांची सोय पहावी म्हणून मी त्यांना पैसे देऊं पहात होतों. मी देत असलेल्या एका दिवसाच्या रोजगारांत तांदूळ स्वस्त असल्यामुळें यांच्या सर्व कुटुंबाची एक महिन्याची बेगमी होत होती. यांना पैसे द्यावेत कीं न द्यावेत या पंचायतींत मी नेहमी पडतों. यांना सर्व पैसे दिल्यास हे लोक काम

सोडून चैन करण्यासाठीं निघून जातील असें मुनशींनीं व अनेकांनीं ठासून सांगितलें असून देखील मी त्यांना पैसे दिले. पैसे हातांत पडतांच सर्व सामान जमिनीवर अस्ताव्यस्त तसेंच टाकून ते तडक आपल्या गांवीं निघून गेले. खरोखर या अडाणी लोकांशीं वागण्यापेक्षां जगांत अधिक कठीण गोष्ट कोणची असणार ? मी मुनशीकडून बिलासपूरच्या राजाला पत्र लिहिलें परंतु त्याचा फारसा उपयोग होण्याजोगा नव्हताच. राहिलेले सहा बिगारी व गांवांतून जमा केलेले दहा बिगारी यांच्यासह मी पुढें जाण्यास निघालों. राहिलेल्या सहा लोकांचा हेतु देखील ज्वालामुखीची यात्रा करण्याचा असल्यामुळें ते कसेबसे टिकून होते. घरांत अठरा विश्वें दारिद्रच असतांना व एक दिवसाच्या रोजगारांत महिन्याची चंदी मिळत असून देखील सबंध आशिया खंडांत हे बिगारी असा त्रास देतात याचें मोठें आश्चर्य वाटतें.[1] चाबकाच्या फटकाऱ्याशिवाय यांच्या हातून काम करून घेणें कठीणच आहे. आम्ही निघालों असतांना जनावरें हांकणारे पांच लोक जनावरांना झुडपांना बांधून तसेच बसून राहिले. आतां त्यांची पाळी आली होती. त्यांतील एक म्हातारा बिलासपूरच्या राजाचा नोकर असल्यामुळें त्याला फटकारण्यास कोणीच तयार होईना. या सर्व गोष्टींनीं माझ्या रागाचा पारा इतका चढला होता कीं नोकरांच्या हातून एक चांगली मोठी वेताची छडी घेऊन मी त्या म्हाताऱ्यासह सर्व नोकरांच्या अंगावर त्या सपासप ओढल्या. कांहींही कुरकूर न करतां सर्वजण बिनबोभाट पुढें चालू लागले व यानंतर पुढें त्यांनीं कोणत्याही प्रकारची खळखळ केली नाहीं.

आम्ही उभे होतों त्या पुढच्या भागांत हिमालयाच्या बर्फाच्छादित रांगा दिसत होत्या. या रांगांच्या सांखळीला मुरीचे डोंगर असें म्हणतात. हिमालयाच्याच त्या शाखा होत. रस्त्यांनीं जातांना जीं खेडीं लागत त्या खेड्यांमधून किंवा गांवाबाहेर एखाद्या जंगलांत देखील एखादा झरा बांधून काढलेला दिसे. या ठिकाणाचें पाणी अतिशय शुद्ध असून तें प्याल्यानंतर मोठा उत्साह वाटे. बिलासपूरहून निघाल्यापासून मला माझ्या बिगाऱ्यांचा

१ बिगाऱ्याच्या त्रासासंबंधींचे यापुढचे उल्लेख टाळले आहेत. बारोन ह्यूगेलला या सबंध प्रवासांत बिगाऱ्यांचा अनेक दृष्टींनीं त्रास झाला असें त्यांच्या प्रवासवृत्तांवरून दिसतें. --(संपादक)

फार वाईट अनुभव येत होता. रणजितसिंगाचा अधिकारी मिर्झा किंवा इतर कोणाचाही मला या बाबतींत उपयोग होत नव्हता. माझा मुनशी ठाकुरदास देखील या अडचणींना कंटाळलेला दिसला. बिलासपूरच्या बिगाऱ्यांना परत लावण्याच्या दृष्टीनें आम्ही स्थानिक लोकांना काम देण्यास बघत होतों. परंतु ही मंडळी भीतीनें किंवा इतर कोणच्या कारणानें आमचीं कामें करण्यास धजत नसत. रस्त्यानें जात असतांना एके गांवीं ठाकूरदासानें एका झाडाखालीं थांबून बरीच गांवकरी मंडळी जमवली व शेवटीं लोकांना आपलें म्हणणें पटवून देऊन त्यानें पुरेसे बिगारी जमा केले. ही गोष्ट कशी शक्य झाली याचा मला मोठा अचंबा वाटून मी ठाकूरदासाला त्यासंबंधीं विचारलें. ठाकूरदासानें उत्तर दिलें तें हिंदूंच्या मनोवृत्तीवर पुरेसा प्रकाश टाकणारें आहे. तो म्हणाला, 'मी माझे कपडे काढून लोकांना माझें जानवें दाखविलें. मी श्रेष्ठवर्णी ब्राह्मण असून देखील महाराजा रणजितसिंगांचा नोकर आहे. त्यांच्याच आज्ञेनें मी हें काम करीत आहे. आम्हाला या अडचणींत तुम्ही मदत केली पाहिजे. तुम्ही वैश्य वृत्तीचे लोक आहांत आणि मी तुमचा गुरु ब्राह्मण आहे.' ठाकूरदासाच्या ब्राह्मणत्वाचा त्या लोकांवर परिणाम होऊन त्यांनीं माझें काम करण्याचें कबूल करून मला माझ्या संकटांतून सोडिवलें. अशा रीतीनें त्या बिलासपूरच्या नालायक लोकांपासून माझी सुटका झाली.

कुनियारजवळ जेलालिका तिबा (Jelalika Tiba) नांवाची एक टेकडी आहे. त्या टेकडीवर आठ नऊ खेडीं वसलेलीं आहेत. या टेकडीवर तुटक तुटक असलेल्या इमारती व बुरूज पाहून मला सिलोनमधील अनरायपूर येथील दागोबांची आठवण झाली. या ठिकाणीं बौद्धकालांतील कांहीं अवशेष सांपडतील असें मला वाटतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं म्हणजे बुधवार दिनांक २१ ऑक्टोबरला मी बियास नदी ओलांडून बडी दुआबमध्यें प्रवेश केला. या ठिकाणीं ज्वालामुखीचें पवित्र तीर्थ आहे. या तीर्थाजवळ येत असतां देवळाच्या इमारती, तलाव आणि गोसाव्याबैराग्यांची चिक्कार गर्दी दिसून येते व त्यावरून येथें जवळ एक तीर्थ आहे हें कोणी सांगण्याचीसुद्धां जरूरी नाहीं. तीर्थाचा गांव या भागाच्या मानानें बराच मोठा असून पांच सहाशेंपेक्षां जास्त

घरांची वस्ती येथें आहे. मात्र या वस्तींत गोसावी, बैरागी, संन्यासी, योगी व इतर मोक्षाचे यात्रेकरू यांचीच वस्ती मोठी आहे. गांवांतील दुकानांतून फुलांच्या माळा, मंत्राचे ताईत, आणि देवांच्या मूर्ति असंख्य दिसल्या.

ज्वालामुखीचें मुख्य देऊळ सपाटीपासून १०० फूट उंच आहे. मी देऊळ पहाण्यास गेलों असतां दरवाजांत उभ्या असलेल्या दोन ब्राह्मणांनीं प्रथम माझ्या परवान्याची चौकशी केली.[१] मिर्झानें होकारार्थी उत्तर दिल्यानंतर त्या ब्राह्मणांनीं मला बाहेरच्या रस्त्यानें वरच्या बाजूस नेलें. मुख्य प्रवेश-द्वारांतून आंत असंख्य छोटीं मोठीं देवळें डोंगराच्या कमीजास्त उंचीवर बांधलेलीं दिसतात. हीं सर्व देवळें एका देवळाचाच भाग असून तीं उत्कृष्ट दगडी बांधणीचीं आहेत. कांहीं ठिकाणीं तर शिला कोरून त्यांत देऊळ तयार केलें आहे असें दिसलें. मुख्य देवळाच्या घुमटाचें शिखर सोन्यानें मढविलेलें आहे. या देवळाच्या दारांत दोन भयंकर उग्र दिसणारे वाघ भिंतींत, पडलेल्या स्थितींत कोरलेले आहेत. त्या छोटया दरवाजांतून एका वेळेला एकाच माणसास आंत जातां येतें इतकें त्याचें दार अरुंद आहे. याच्या आंत म्हणजे देवळाच्या मुख्य गाभाऱ्यांत जाऊं देण्यास पुजारी तयार नव्हते. देऊळ आंतून दाखविण्याचा महाराजांचा हुकूम आहे असें मिर्झा सांगत होता. मला बाहेरूनच आंतला भाग नीट दिसल्यामुळें मी त्यांच्या भावना न दुखविण्याचें ठरविलें. आंत जाण्याचा माझा आग्रह नाहीं हें पाहून पुजाऱ्यांना आनंद वाटला. शीख लोक आपल्या गुरुद्वारांत युरोपियांना खुशाल जाऊं देतात. मात्र हिंदु लोकांची यवनांना देवळांत जाऊं देण्याची प्रथा नाहीं. रणजितसिंगाच्या आग्रहामुळें ज्वालामुखीसारख्या हिंदूंच्या पवित्र देवळांत देखील ख्रिश्चनांना जाऊं देणें पुजाऱ्यांना भाग पडतें. या मुख्य दरवाजाच्या साधारणतः मध्यावर एक लहानसा खड्डा असलेला दिसला. या खड्ड्याच्या

---

१ बारोन ह्यूगेलनें ' फकीर ' हा शब्द पुजारी किंवा ब्राह्मण अशा अर्थानें अनेक ठिकाणीं वापरला आहे. शीख पुजारी, ब्राह्मण पुजारी व मुसलमान फकीर या सर्वांनाच त्यानें जरी फकीर संबोधलें असलें तरी मराठी कथनांत हा फरक स्पष्ट केला आहे. कांहीं ठिकाणीं ' ब्राह्मण फकीर ' असाहि शब्दप्रयोग ह्यूगेलनें वापरला आहे. —(संपादक)

दोन्ही बाजूला पुजारी बसलेले होते. या खड्डयांतून अथवा आंतल्या खडकांतून दोन ठिकाणांहून ज्वाळा बाहेर येऊन आठ इंचांपर्यंत वर तेवत होत्या व त्या ज्वाला अखंड आहेत त्या स्थितींत मला बराच वेळ दिसल्या. भाविक लोक आंत गेल्यानंतर आपल्या हातांतील फुलें किंवा इतर कांहीं जिनसा पुजाऱ्याच्या हातांत देत असत. पुजारी त्या जिनसा कांहीं वेळ ज्वालेवर धरून नंतर देवावर टाकीत असत.

जवळच असलेल्या गोग्रानाथाच्या देवळांत मी जाऊन आलों. गुरखे लोकांची ती आवडती देवता आहे. या देवळांत जाण्यास मला कोणी बंदी केली नाहीं. यावरून सर्वव्यापी बुद्ध धर्माची ही पूर्वींची जागा असावी असें वाटतें. कदाचित् पूर्वींच्या काळीं हें बुद्ध धर्माचें ठिकाण असतांना हें ग्रोग्रानाथाचें देऊळच या ठिकाणीं सर्वांत मुख्य मानलें गेलेलें असावें असें मला वाटतें.

ज्वालामुखी या गांवाला तीर्थामुळें जें महत्त्व आलें आहे त्यामुळें ईस्ट इंडिया कंपनीला या गांवाचें फार महत्त्व वाटत असेल असें येथील लोक समजतात. येथील पुजाऱ्यांनीं मला १। रुपया दक्षिणा मागितली व त्याच्या मोबदल्यांत 'ईस्ट इंडिया कंपनीची भरभराट होऊन तिचें अधिराज्य या भागावर होवो' अशी देवीची प्रार्थना करण्याचें वचन दिलें. कांहीं पुजारी आपल्याला दिलेली दक्षिणा देवीला पोचते अशा थापा मारून भाविकांकडून पैसे उकळीत होते. ज्वालामुखीवरून आम्ही मुरीच्या डोंगराकडे जात होतों. संध्याकाळीं आम्ही मोंगीर किल्ल्यापासून एक मैलावर असलेल्या कवली गांवाजवळ रात्रीचे मुक्कामास थांबलों. वाटेंत जीं खेडीं लागत असत, तीं झाडांमुळें इतकीं झांकून गेलेलीं असत कीं गांवांत जाईपर्यंत आम्हांला गांव आलें असल्याचें कळत नसे. नकाशा तयार करतांना मला या गोष्टींची फार अडचण वाटत असे. याशिवाय एकाच नांवाचीं अनेक गांवें एका परगण्यांत आल्यामुळें तीही अडचण मला सतावीत असे. हा भाग डोंगराळ आणि जंगलांनीं व्याप्त असा आहे. रस्ता अतिशय अरुंद, केवळ एका माणसालाच जातां येण्यापुरता असला तरी बऱ्यापैकीं होता. ज्वालामुखीच्या तीर्थाच्या बाहेर गेल्यानंतर हरिहरपूरनजीक एक महादेवाचें छोटेसें देऊळ दिसलें. हें छोटेसें देऊळ केवळ १०० चौरस फुटाचें असलें तरी तें फार पुरातन आहे असें दिसलें. साष्टी आणि वेरूळ येथील देवळांवर ज्या तऱ्हेची चित्रकला

आहे, तशीच चित्रकला मला येथें दिसली. विशेषतः प्रवेश दरवाजावर हिंदुधर्मातील 'त्रिमूर्ति' प्रामुख्यानें दिसत होती. बाकी देवळावरील इतर चित्रकला आणि नक्षीकाम बुद्धपंथाला साजेसें वाटलें. आंत असलेल्या एका पुजाऱ्यानें हें देऊळ ३००० वर्षांचें जुनें आहे असें सांगितलें. या देवळावरच खडकांमध्यें हिंदुधर्मातील देवांच्या मोठमोठ्या मूर्ति कोरलेल्या मला दिसल्या. पण त्या तितक्याशा रेखीव नसल्यामुळें शिल्पकार अनभिज्ञ असावेत असें वाटलें.

यथील लोकांचा पोषाख इतर ठिकाणच्या पोषाखापेक्षां निराळा दिसला. येथील पुरुषांचे चोळणे अगदीं पायाच्या टोकापर्यंत असणारे व डोक्यावरची पागोटीं काळीं असलेलीं दिसलीं. पुरुषांची दाढी काळी व लांब वाढलेली अशी बहुतेकांची आहे. स्त्रियांच्या अंगांतील घागरा (झगा) गुढग्यापर्यंत लांब असून त्याची किनार भडक लाल रंगाची शिवलेली असते. प्रत्येकीच्या अंगावर गुलाबी पडदा असून पडद्यांतून तोंड झांकण्याऐवजीं मागून डोकें झाकलेलें असे. येथील घरें व गहेती (धर्मशाळा) अतिशय स्वच्छ दिसल्या. घराभोंवतीं फुलांच्या छोट्या बागा असून त्यांत कमळें, गुलाब, जाई व इतर सुवासिक फुलांचीं झाडें व वेली असत. याच ठिकाणीं मला चिनी गुलाब कुंपणामध्यें अनेक ठिकाणीं दिसला.

प्रवासांत माझ्यासारख्या परदेशी पाहुण्याला पाहण्यास लोकांची गर्दी लोटत असे. अशाच गर्दीमध्यें एकदां कांहीं जादुगार मला भेटले. उन्हाच्या वेळीं शरीराची जी काहिली होत होती त्यांत एकदोन तास गंमतीनें बरे जातील या हेतूनें मी त्यांस जादूचे प्रयोग करण्यास सांगितलें. आंब्याची कोय जमिनींत पुरल्यापासून अर्ध्या तासांत तिचें तीन हात उंच झाड होतें अशी जादू त्यांनीं मला करून दाखविली. पहिल्यादां कोय जमिनींत पुरणें नंतर सहा इंच उंच रोप झाल्याचें दाखविणें, त्याचप्रमाणें झाडाला मुळ्या आल्याचें दाखवणें अशी ही जादू म्हणजे हातचलाखी होती. दोन पुरुष दोन स्त्रिया आणि दोन मुलें यांनीं केलेली ही जादू म्हणजे हातचलाखी खरी वाटेल इतक्या करामतीनें त्यांनीं करून दाखविली यांत शंका नाहीं.

हरिपूर गांवाची वेस ओबडधोबड असून त्यावर हरि आणि हनुमान यांची मोठीं चित्रें कोरलेलीं आहेत. येथील किल्ला फार चांगला व व्यवस्थित

बांधलेला आहे. किल्लेदारानें किल्ला पाहण्यासाठीं मला आमंत्रण दिलें. किल्ला पाहण्यांत स्वारस्य वाटलें नाहीं. गांवांतील व्यापाऱ्यांनीं आपल्या दुकानांतील चिजा विकत घेण्याची मला विनंती केली, पण तीही मला नाकारावी लागली. हरिपूरला माकडांची इतकी भयंकर गर्दी आहे कीं त्यांच्या किंचाळण्यामुळें रात्रीं मला बराच वेळ झोपही आली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी नेहमीप्रमाणें चार वाजतां जागा झालों. गेले दोन दिवस आमची मजल फार सावकाश चालली होती. त्यामुळें आजपासून दुप्पट मजल मारावयाचा मी निश्चय केला. नेमलेलीं कामें वेळेवर करावयाची संवय हिंदुस्थानांत फार उशीरा लागते. माझ्या नोकरांना अशी संवय लागली असल्यामुळें मला आतां माझा वेग वाढविणें शक्य होतें.

हरिपूरपासून ज्वाली १८ मैल असून हें अंतर तोडण्यास मला सहा तास लागले. या भागांत राहणाऱ्या एखाद्या हुषार वाटाड्याकडून चांगली माहिती मिळाल्याशिवाय मला माझा नकाशा करणें शक्य नव्हतें. परंतु आमचा लवाजमा पाहून वाटेवरचे लोक दूर पळून जाऊन झाडाझुडपात लपत असत व माझ्या नोकरानें त्यांना पकडून पुढें आणून उभें केलें तरी मला माहिती मिळत नसे. दुपारच्या वेळेला ज्वालीचा ठाणेदार मला भेटण्यास आला. तो फार वरच्या दर्जाचा नसल्यामुळें म्हातारा असून देखील मी त्याला तंबूत बसण्यास न बोलावतां बाहेर उभ्याउभ्याच त्याची भेट घेतली, ज्वालीसमोरच्या एका टेकडीवर तो माझ्याबरोबर आला. सपाटीपासून सुमारे ५० फूट उंचीवर एक लहानसें देऊळ असून त्या ठिकाणीं दोन माकडें व दोन पुजारी दिसले. येथें जवळ असलेल्या एका तळ्यांत औरंगाबादला मी पाहिल्यासारखे मासे दिसले. येथील लोकांच्या सांगण्यांत या तळ्यांतील एकही मासा कधीं मेलेला आढळत नाहीं व त्यांच्या म्हणण्याप्रमाणें हे मासे फार पुरातन काळापासून या ठिकाणीं असावेत. ते संख्येनें इतके भरपूर होते कीं त्यांना आंत राहण्यास जागा अगदींच अपुरी होती. त्यांना पाहून माझ्यासारख्या प्रवाशाच्या तोंडाला पाणी सुटलें असल्यास कांहींच आश्चर्य नव्हतें. प्रवासाच्या शिणव्यानें भूक लागली असतांना अतिशय सुंदर दिसणारे हे मासे पाहून त्यांच्या संभाव्य चवीची कल्पना मनांत करीत

असतांना हें तळें व हे मासे पवित्र असून यांना कोणी हात लावायचा नाहीं असें सांगितल्यावर काय वाटत असेल ? अशा वेळेला प्रवाशाला एक मार्ग खुला असतो. पालखीचे भोई मासे पकडण्यांत मोठे पटाईत असतात. जवळपासच्या लोकांच्या निषेधाला न जुमानतां मासे पकडण्यास त्यांना सांगितलें असतांना ते हें काम बिनबोभाट सुरूं करतात. जवळपासचे लोक तोंडानें त्यांना नको म्हणत असले तरी त्यांचे अंगावर हात टाकण्यास धजत नाहींत. आपले म्हणणें हे भोई ऐकत नाहींत हें पाहून जवळपासचीं माणसें त्यांच्या मालकाकडे म्हणजे गोऱ्या साहेबाकडे तक्रार गुदरण्यास येतात. एवढ्या वेळांत पुरेसे मासे पकडले जात असल्यामुळें प्रवाशानें आपल्या इतर नोकरांना त्या ठिकाणीं पाठवून यापुढें परवानगीवांचून कांहींही करावयाचें नाहीं असें बजावून भोयांना परत बोलवायचें म्हणजे लोकांचा रागही शांत होतो आणि पकडून आणलेल्या माशांवर ताव मारून आपली इच्छाही पूर्ण होते.

ज्वालीजवळ जंगलांतील प्राणी बरेच दिसले. त्यांतील एक कोल्ह्या-सारखा वाटला म्हणून मी शिकाऱ्याला त्याचा पाठलाग करून त्याला पकडण्यास सांगितलें. बराच वेळ तो येईना म्हणून मी माझ्या डोलींतून उतरून हातांत बंदूक घेऊन तो प्रवासी गेला त्या बाजूला निघालों. वाटेंत बरींच उंच अशीं झुडपें असल्यामुळें पलीकडचें मला दिसत नव्हतें इतक्यांत पलीकडे सळसळ आवाज झाल्यासारखा वाटला म्हणून बंदूक सरसावून मी नेम धरला. आणि नेम मारणार एवढ्यांत मला त्या शिकाऱ्याचें तांबडें पागोटें दिसलें व मी थबकलों. माझी ही क्रिया होत असतांना त्याला मी सावज असल्यासारखें वाटल्यामुळें त्यानें माझ्यावर नेम धरून तो उडवला. नेम बरोबर लागला परंतु त्यांत माझे कपडे फक्त फाटले. आपला नेम साहेबाला लागला आहे असें पाहतांच तो शिकारी थरथर कांपत मूर्च्छित पडण्याच्या बेतांत आला परंतु मीच त्याला त्यांत त्याची चूक नसल्याचें समजावून सांगून शांत केलें. प्रवासांत असे प्राणावर बेतण्याचे प्रसंग अनेक येतात.

आमचा मुक्काम नरपूरला झाला आणि हें इतिहासप्रसिद्ध गांव व किल्ला मला जवळून निरखून पाहतां आले. हें गांव डोंगराच्या अगदीं

माथ्यावर वसलें असून गांवाची लोकसंख्या सुमारें ६००० आहे. येथील लोक रंगानें गोरे, कातडीनें नितळ व त्यांचे चेहऱ्यावरील अवयव ज्यू लोकांप्रमाणें ठसठशीत व थोडे पुढें आलेले दिसले. या ठिकाणच्या ठाणेदारानें श्रीनगरला मला नेण्यासाठीं चोपदार येणार असल्याचें सांगितलें. त्याच्यासाठीं न थांबतां मीं पुढें जाण्याचें ठरविलें. येथून श्रीनगरला दोन रस्ते जातात. जवळचा रस्ता किस्तिवाड ते काश्मीर असा असून हा रस्ता डोंगरांतून व दऱ्यांतून जात असल्यामुळें आम्हांला थोडा धोक्याचा वाटला. त्यापेक्षां जम्मूहून जाणारा रस्ता थोडा लांब असला तरी अधिक चांगला असल्यामुळें मी त्या रस्त्यानें जाण्याचें ठरविलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं १०१ रुपयांची हुंडी घेऊन एक नोकर माझ्याकडे आला. बरोबर रणजितसिंगाचें एक पत्रही त्यानें आणलें होतें. पैसे घेणें मला आवडत नसल्यामुळें मी ती हुंडी तशीच माझ्याजवळ ठेवण्याचें ठरविलें. मी पुढें जाण्याचें ठरविलें तेव्हां त्या नोकरानें चोपदारसाहेब कांहीं तासांतच येत असल्यामुळें पुढें न जाण्यास मला बजावलें. मी थांबल्यावर दुपारचे वेळींही तो आला नाहीं असें पाहून पुन्हा विचारलें असतां कदाचित् त्यांना येण्यास चार पांच दिवस लागतील असें तो म्हणाला. संध्याकाळीं मी त्याला हडसून खडसून विचारलें असतांना आपले मालक मुळींच येणार नसून त्यांनीं ही कामगिरी माझ्यावरच सोपविली असल्याचें त्यानें शेवटीं कबूल केलें. येथील लोकांची माहिती सांगण्याची पद्धत ही अशी फसवेगिरीची आहे. नरपूरजवळ पोलादाचे बरेच छोटे कारखाने असून येथें लोहाराच्या भट्टया आहेत असें कळलें. नरपूर गांवांतून हिंडून अंधार पडला म्हणून मी तंबूकडे परतलों. माझ्या खांद्यावर माझी बंदूक होती. रस्त्यांत एके ठिकाणीं माझ्या डोक्यावरून फडफड करीत एक पक्षी गेला. मी नेम धरून तो उडविला. त्याबरोबर एक वटवाघूळ वरून माझे पायावर येऊन पडलें. बंदुकीचा बार ऐकतांच सभोवतीं बरेच लोक जमले व त्यांनीं तो तडफडणारा वटवाघूळ पाहिला. हे लोक वटवाघुळाला पवित्र मानीत असल्यामुळें त्यांनीं जों जोरांत आक्रोश केला, तों ते सारे लोक गुन्हेगाराप्रमाणें माझ्याकडे पाहूं लागले. नुकत्याच माझ्या दोन युरोपीय मित्रांवर गुदरलेल्या प्रसंगाची या वेळीं मला आठवण झाली. त्यांच्यावर एका म्हाताऱ्या माकडानें चाल केली असतां त्यांनीं बंदुकीच्या गोळीनें तें

माकड मारलें. प्रथम माकडाला न आवरणारे लोक नंतर पुढें होऊन माझ्या युरोपीय मित्रावर दगड मारूं लागले. येवढ्यांत गांवचा न्यायाधीश तेथें आला व त्यानें त्या दोघांना हत्तीचे अंबारींत घालून माहुताला त्यांना दूर नेऊन सोडण्यास सांगितलें. तरीही लोक सारखे दगड मारीत पाठीमागें येतच होते. मुख्य रस्ता चुकवून माहुताला त्यानें यमुनेंतून हत्ती नेण्यास सुचविलें. नदीला पाणी फार आल्यामुळें या दुर्दैवी प्रसंगांत हत्ती व माहूत यांसह माझे दोन्ही मित्र नदींत बुडून मेले. हिंदुस्थानांतील लोकांचा राग ओढवून ठेचून मारल्या गेलेल्या अनेक युरोपीयांचीं नांवें व प्रसंग माझ्या डोळ्यासमोर आले. माझ्या डोळ्यासमोर काजवे चमकून मी लोकांना चुकवीत जवळच्या एका घरांत शिरलों. त्या पक्ष्याला हातांत घेऊन मला शिव्या देत लोक रागरागानें माझ्याकडे येत होते. थोड्याच वेळांत मला माझ्या गंभीर परिस्थितीची जाणीव झाली. आपला मायदेश सोडून परक्या प्रदेशांत साहसानें प्रवासास आलेल्या माणसानें मरणाची फारशी क्षिति करून चालत नाहीं. कोणत्याही प्रसंगांत मरणास कवटाळण्याची त्याच्या मनाची तयारी हवी. युरोपमधून निघतेवेळीं मी निरोप घेतांना सर्वांना बहुतांशीं मला पुन्हा परत येतां येणार नाहीं असें सांगूनच सर्वांचा निरोप घेतला होता. त्यामुळें मला मरणाची भीति वाटली तरी आश्चर्य वाटलें नाहीं. सुमारे पंधरा मिनिटां-नंतर ठाणेदाराचे कांहीं लोक मला सोडवण्यास आले. परंतु या सर्व गोष्टी पाहून, लोकांच्या मोठ्या जमावाला पाहून म्हणा, किंवा निरपराधी पक्ष्याला मारण्याचा गुन्हा मी केला होता म्हणून म्हणा, मला तशा परिस्थितींत टाकून ते निघून गेले. लोक जोरजोरानें ओरडत धमक्या देत माझ्यापुढें उभे होते. बंदुकीच्या दस्त्यानें त्यांना परतवतां परतवतां मी थकून गेलों. थोड्या-वेळांत संपूर्ण काळोख पडला. हिंदी लोकांचा एकंदर स्वभाव लक्षांत घेऊन व अंधारांत मी मारलेल्या पक्ष्याचें दुःख त्यांना दिसत नाहीं असें पाहून मी त्यांना विनवणीच्या स्वरांत पुढील वाक्य बोललों. " माझ्या हातून फार मोठी चूक झाली आहे व झाल्या गोष्टीबद्दल मी दिलगीर आहे. अशी चूक माझ्या हातून पुन्हा होणार नाहीं अशी मी काळजी घेईन असें मी तुम्हांला आश्वासन देतों." सुदैवानें माझें म्हणणें त्यांनीं मान्य करून मला परत जाण्यास मोकळीक दिली व एका प्राणसंकटांतून बचावून काश्मीरचा प्रदेश पाहण्याचें भाग्य मला मिळूं शकलें.

✦ ✦ ✦

प्रकरण तिसरें

पीरपंजालच्या घाटांतील साहसी प्रवास

नरपूरहून आम्ही पुढें चाललों असतांना माझ्या एका नोकरानें एका गरुड पक्ष्याची शिकार केली. आमच्या सर्व नोकरांजवळ भरपूर ओझें असल्यामुळें त्याला कोणी उचलून घ्यावें असा आमच्यापुढें पेंच पडला. जवळच्या शेतांत एक शेतकरी काम करीत होता त्याला थोडेसे पैसे देऊन, त्या पक्ष्याला उचलण्यास आम्ही सांगितलें. गरुड पक्ष्याच्या प्रेताला शिवून, उचलून अंगावर घेणें जातिधर्माला सोडून आहे म्हणून हें काम मी करूं शकत नाहीं असें त्यानें उत्तर दिलें. माझ्या एका भोयानें हें उत्तर ऐकून तो गरुडपक्षी उचलून त्याच्या खांद्यावर ठेवला व तो भोई त्या शेतकऱ्याला म्हणाला, 'तुझ्या जातीला या पक्ष्याला शिवण्याची जरी बंदी असली तरी तुला शिवण्यास या पक्ष्याच्या जातीची त्याला बंदी नाहीं.' रक्तानें थबथबलेला तो पक्षी तसाच खांद्यावर ठेवून तो शेतकरी हें भोयाचें बोलणें ऐकून मुकाट्यानें पुढें चालूं लागला. नदी ओलांडून चार मैल गेल्यानंतर आम्ही पठाणकोटला पोहोंचलों. आजपर्यंत कधींहि न पाहिलेला असा बळकट व मजबूत किल्ला या ठिकाणीं मला दिसला. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं हा किल्ला आतां मोडकळीस आलेला आहे. किल्ला मैदानावर बांधलेला असून त्याचे तट व खंदक आखीव व रेखीव आहेत. किल्ला विटांचा बांधलेला असून बऱ्याच दूरवरचा प्रदेश या किल्ल्यानें सांभाळतां येण्याजोगा आहे किल्ल्याच्या आंत असलेला बाले किल्ला तर कमालीचा मजबूत आहे. हा पठाणकोटचा किल्ला शहाजहाननें नरपूरकरांशीं युद्ध केलें त्या वेळीं बांधला असें म्हणतात. संध्याकाळचे वेळीं ठाणेदाराची परवानगी घेऊन मी त्याच्यासह किल्ला पाहण्यास गेलों. परंतु किल्ल्यांत असलेल्या शीख सरदारानें आंत येऊं देण्यास स्पष्ट नकार दिला. आमच्या दोघांची शब्दाशब्दी होत असतांना ठाणेदारानें तेथून काढता पाय घेतला. किल्ला बांधण्याची मूळची जागा अगदीं पटांगणाची असून

देखील त्यावर इतका मजबूत किल्ला बांधल्याचें आश्चर्य वाटतें. किल्ल्याच्या सर्व तटांना व भिंतीमध्यें झाडेंझुडपें आणि गवत वाढून तो आतां अगदीं पडण्यास आला आहे. हा किल्ला बांधण्याच्या पूर्वी या बाजूला संरक्षणासाठीं कांहींहि अडोसा नसावा असें स्पष्ट दिसतें. ठाणेदारानें पळ काढल्यानें माझी मोठी विचित्र अवस्था झाली. ठाणेदारासारख्या माणसावर युरोपियांनीं विश्वास ठेवणें धोक्याचें आहे. हा धडा शिकून व मोडकळीस आलेला किल्ला पाहण्यास मिळाला नाहीं यांत कांहीं विशेष बिघडलें नाहीं असें मानून मी परत फिरलों.

पठाणकोट ओलांडल्यानंतर वायव्य दिशेला पिरॅमिडप्रमाणें दिसणाऱ्या एकावर एक बांधल्याप्रमाणें वाटणाऱ्या डोंगराच्या रांगा पाहून नवीन देखावा पाहण्यास मिळाल्याचें समाधान मनाला वाटलें. येथून पुढचा प्रदेश सुपीक व दाट लोकवस्तीचा असा आहे. लोक काश्मीरी असून शेती, लोंकरीचें विणकाम, आणि शिलाई हे धंदे प्रामुख्यानें करतात. सकस अन्न खाल्यामुळें ते सशक्त, व अंगावर भरपूर कपडे व दागिने घातले असल्यामुळें ते संपन्न असावेत असें वाटतें. पण इतकें असूनहि बिगारी काम करावयास देखील ते खुषीनें तयार आहेत. पंजाब आणि काश्मीरांतील फकीर म्हणजे भयंकर जातीचीं माणसें आहेत. पहिलवानासारखीं कसलेलीं शरीरें व भिकारी असूनही उद्दामपणा या दोन गोष्टी त्यांच्या विशेष म्हणून सांगतां येतील. कटोवा गांवांत असाच एक फकीर बळजबरीनें माझ्या तंबूंत शिरला व माझ्या नोकरानें त्यास मार देऊन बाहेर काढीपर्यंत तो आंत बसून राहिला. कटोवा येथून प्रचंड व बर्फाच्छादित असा बलदेवाचा डोंगर स्पष्ट दिसतो. तो तेथून किमान तीस मैल दूर असावा. नरपूरहून काश्मीरला जाण्यास हा डोंगर ओलांडून जावें लागतें. जेसराडहून आम्हीं आळें या गांवीं आलों. येथें एक छोटासा किल्ला असून त्याच्याभोंवतीं मातीचे तट आहेत. या तटाच्या भिंती आंतून दगडांनीं बांधून घेतल्या आहेत. रणजितसिंगाचा एक अधिकारी सध्यां या किल्ल्यांत राहतो. या गांवीं संध्याकाळच्या वेळीं एका ब्राह्मणाला घेऊन मी आजूबाजूला हिंडत असतांना, जवळपासच्या गांवांची नांवें विचारलीं. परंतु गांवांचीं नांवें सांगण्यास त्यानें स्पष्ट नकार दिला.

तो म्हणाला, 'तुमच्यासारखे परके प्रवासी पहिल्यांदा गोड बोलून सगळी माहिती काढून घेतात व नंतर सैन्य घेऊन येऊन, बळजबरीनें आमचा प्रदेश जिंकतात." त्या ब्राह्मणाच्या प्रदेशावर माझी नजर नाहीं हें त्याला पटवण्यास मला फार कष्ट पडले.

जम्मूला गुलाबसिंग म्हणून रणजितसिंगाचा एक सुभेदार राहतो. साम्बा गांवापासून अर्ध्या मैलावर गुलाबसिंगाच्या भावाचा राजवाडा आहे. आम्ही जात असलेला रस्ता भयंकर त्रासाचा व खडबडीचा होता. धड डोंगर नाहीं, धड सपाटी नाहीं, धड जंगल नाहीं, धड मोकळें मैदान नाहीं, अशा या रस्त्यावरून दगडांना ठेचाळून जावें लागतें. एका झोपडीकडे, वाकड्या तिकड्या तऱ्हेनें जाणारा हा रस्ता त्रासाचा व कंटाळवाणा होता. इस्माईल-पुराजवळ आल्यावर आम्हांला जम्मू शहर स्पष्टपणें दिसू लागल्यामुळें रस्ता चुकण्याची धास्ती नव्हती.

जम्मूजवळच्या एका टेकडीवर गुलाबसिंगानें नुकताच एक किल्ला बांधलेला आहे. या किल्ल्याच्या भिंती कितीहि सुंदर दिसत असल्या तरी या किल्ल्यावर जवळच्या उंच टेकड्यांवरून सहज मारा करतां येत असल्यामुळें गुलाबसिंगाच्या लष्करी ज्ञानाविषयीं माझें मत कांहीं चांगलें झालें नाहीं. पूर्वी रणजितदेवाच्या ताब्यांत जम्मू असतांना शहराचें वैभव कळसाला पोचलें होतें. इ. स. १७८१ च्या सुमारास रणजितसिंगाच्या वडिलांनीं या प्रांतावर स्वारी करून हा प्रांत आंपल्या ताब्यांत घेतला. परंतु शांतता लाभूनहि शहराचें वैभव गेलें तें परत आलें नाहीं. नदीच्या कांठीं राजाची मोठी बाग असून हिंदी पद्धतीनें या बागेची आंखणी केली आहे. बागेच्या मध्यभागीं बरेच पशुपक्षी ठेवण्यांत आलेले असून त्यांना तेथें काळजीपूर्वक वाढवण्यांत येतें.

जम्मूंत दुसरे दिवशीं दुपारीं गुलाबसिंग राजाचा एक अधिकारी नजर घेऊन माझ्याकडे आला. परंतु ही नजर मी नाकारली. काश्मीरहून लाहोरला जाणारा एक युरोपीय जवळ असल्याचें कळल्यावरून मी पत्र पाठवून त्याला बोलावलें. राजाचा नोकर असलेल्या एका इंग्रज गृहस्थानें त्याचें उत्तर दिलें व तो मला भेटावयास आला. माझ्या तंबूंत आल्यावर जवळपास माझे

नोकर नाहींत असें पाहून तो माझ्या पाया पडला व ढसढसा रडूं लागला. बऱ्याच दिवसानें युरोपीय दिसल्यामुळें मला झालेल्या आनंदावर या त्याच्या दुःखानें विरजण पडलें. त्याचें दुःख काय? त्याला कशाची भीति वाटत आहे व त्याच्या अडचणी कोणत्या आहेत हें जाणून घेण्याची मला तीव्र जिज्ञासा होऊनहि त्याच्या कृत्यामुळें त्यांतील कशाचाहि उलगडा होईना. मी त्याला म्हणालों, "तुला काय सांगावयाचें असेल तें अगदीं निर्भयपणें सांग. तुझ्याविषयीं माझ्या मनांत सहानुभूति निर्माण झाली असून तुला हवी ती मदत देण्याचें मी वचन देतों.' तरीहि तो बोलेना. 'तुला जम्मूंत येऊन किती दिवस झाले आहेत?' या प्रश्नाला 'बरींच वर्षें' असें त्रोटक उत्तर त्यानें दिलें. 'तू गरीब आहेस काय? तुला पैसे हवेत?' या प्रश्नाला 'नाहीं. माझी आर्थिक परिस्थिति उत्तम आहे.' असें त्यानें उत्तर दिलें. 'एवढ्या दूरच्या प्रदेशांत तूं आलास कसा?' हा प्रश्न विचारल्यावर त्यानें माझा हात आवळून धरून, 'मी दुःखी आहे. मी गुन्हेगार आहे. मला क्षमा केली पाहिजे' असें तो पुटपुटूं लागला. शेवटीं चिडून मी त्याला म्हणालों, 'भल्या गृहस्था, अरे! मोकळेपणानें तुला काय हवें तें सांग. तुला माझी मदत कोणत्या रीतीनें हवी आहे हें कळल्याशिवाय शक्य असूनहि मी मदत ती काय करणार?' भीतीनें थरथरत आपले दोन्ही हात चोळीत तो दुःखानें 'मला तें सांगतां येणार नाहीं. मुळींच सांगतां येणार नाहीं' असें बोलून तडक बाहेर निघून गेला, व त्याच्या दुःखाविषयींचें माझें कोडें न सुटतां तसेंच राहिलें. त्याच्याविषयीं अधिक चौकशी केल्यास कदाचित् तो जास्त संकटांत येईल म्हणून अधिक चौकशी करण्याच्या भानगडींत मी पडलों नाहीं.

बिलासपूर ते जम्मू हें १६४ कोसांचें अंतर आम्ही २२ दिवसांत तोडलें. पंजाबमधील कोस हा साधारणतः दीड मैलांचा असतो. ५ नोव्हेंबर १८३५ला मी जम्मूहून सकाळीं सातला पुढें जाण्यास निघालों.आणि दुपारीं दोनचे सुमारास अगनूर येथें पोचलों. अगनूरचा राजा गुलाबसिंगाचा मांडलिक आहे. चिनाब नदीच्या उत्तर तीरावर हें गांव असून येथें एक किल्ला आहे. या किल्ल्याचा प्रत्यक्षांत कितपत उपयोग होतो याची शंकाच आहे. ३३ वर्षांपूर्वी आलमसिंगानें हा किल्ला बांधला. पण अलीकडे रणजितसिंगानें तो उद्ध्वस्त केला आहे.आपल्या राज्यांत किंवा आपल्या मांडलिकानें मजबूत गढ्या करून त्यांत

राहूं नये यावर रणजितसिंगाचा फार कटाक्ष आहे. या गांवापासून त्रिकुट पर्वताच्या चढास सुरुवात होते, पर्वताच्या मध्यावर एक पवित्र व सुंदर असें देवालय तीर्थस्थान आहे. जम्मूपासून त्रिकुटादेवीचें अंतर १८ कोस आहे. जर आणखी सवड असती तर हें देऊळ पहाण्याची मला फार इच्छा होती.

रस्त्यानें जातांना एक करकोचा माझ्या एका बिगाऱ्यानें मारला. परंतु तो उचलून पुढच्या मुक्कामावर नेण्यास आम्हांला कोणी मनुष्य भेटेना. रागारागानें मिर्झानें एका माणसाचें पागोटें काढून घेऊन, तो करकोचा उचलून घेऊन आमच्याबरोबर चलण्यास त्याला फर्माविलें, व पागोटें हातांत घेऊन मिर्झा पुढें चालूं लागला. अशी जुलूम जबरदस्ती केल्याशिवाय येथें कोणी काम करण्यास तयारच होत नाहीं. पण हा गडी इतका वस्ताद कीं त्यानें मिर्झाला ओरडून सांगितलें कीं, " पागोट्यावांचून माझें कांहींच अडणार नाहीं. कारण घरीं माझें आणखी एक पागोटें आहे. "

आम्ही रस्त्यानें जात असतां, वाटेंत एक फकीर एका झऱ्यावर वाटसरूंना पाणी पिण्यास देण्याचें काम करीत असतांना आम्हांला दिसला. बराच म्हातारा असूनहि, शंभराचेवर असणाऱ्या माझ्या सर्व बिगाऱ्यांना त्यानें भरपूर पाणी स्वतःचे हातानें झऱ्यांतून काढून दिलें. नंतर मी त्याचेजवळ जाऊन त्याचे आभार मानले व त्याचें माझें पुढीलप्रमाणें संभाषण झालें.

मी :– फकीरदादा ! तुमचें वय काय ?

फकीर :– माझी उमर ९२ वर्षांची आहे.

मी :– या झऱ्यावर लोकांना पाणी देण्याचें काम किती दिवस करीत आहां?

फकीर : मला कळतें आहे, तेव्हांपासून मी हें काम करीत आहे.

मी :– तुम्ही हें काम कशासाठीं करतां ?

फकीर :– दमल्या भागलेल्या मुशाफिराला ताजेतवाने करण्यासाठीं मी हें काम करतों हें तुम्हांला दिसत नाहीं कीं काय ?

मी :– तुमच्या मदतीवांचूनहि लोकांना या झऱ्याचें पाणी पितां येईल.

फकीर :– या आडरानांत क्वचितच मुशाफीर येत असल्यामुळें झऱ्याच्या तोंडाशीं गाळ अडकून झरा बंद झाल्यास लोकांना येथें झरा आहे हें कळणारहि नाहीं व पाणी पिण्यास मिळणारही नाहीं. मी मुशाफिरांची सेवा करतो याचाच अर्थ मी परमेश्वराची सेवा करतों.

मी :– हे गरीब मुशाफीर तुम्हांला अन्न देतात म्हणूनच तुम्ही जगूं शकतां हें खरे नाहीं काय ?

फकीर :– ज्याच्याजवळ भरपूर आहे तो थोडेसें देतो हें खरें. मी श्रीमंत आहे, कारण हा झरा माझा आहे. आणि तुमच्यासारखे श्रीमंत मुशाफीर दुसरा कोणी येईपर्यंत पुरेल येवढें अन्न मला देतात व मला कधींच अडचण पडत नाहीं.

गरीब बिचारा फकीर ! याला आपल्या विसाव्याचें झाड म्हणजे अरण्य वाटतें. ही टेकडी म्हणजे महापर्वत वाटतो. आणि आपल्या झऱ्याला जणूं काय महासागर समजून येथें तो ऐटीनें राहतो ! एका दरींत राहिल्यामुळें जगाविषयींच्या याच्या कल्पना किती संकुचित झाल्या आहेत !

आम्ही नंतर पोतो गांवाला येऊन पोहोंचलों. हें गांव दिसावयास सुंदर असून, गांवाभोंवतीं मजबूत तट आहेत. येथें एक किल्लाही आहे. वाटेंत एके ठिकाणीं एका शेतकऱ्याला आम्ही रस्ता चुकलों असल्यानें वाट दाखविण्यास सांगितलें. तो तयार झाला परंतु एवढ्यांत आमच्या लोकांनीं बोलण्याची घाई केल्यानें, रागावून त्यानें तें काम करण्यास नकार दिला. नेहमींप्रमाणें त्याच्या डोक्यावरचें पागोटें काढून घेतलें, परंतु त्याबरोबर तो इतका खवळला कीं त्यानें आणि त्याच्या तीन साथीदारांनीं मारामारी करून गोंधळ उडवून दिला. माझे भोई घाबरटपणानें मला या दंगलीच्या मध्यभागीं टाकून पळून गेले. संरक्षणासाठीं कुकरीला हात घालून मी हें सर्व पहात बसलों. नंतर आम्ही मोंगल गांवाला गेलों. हें गांव पोतो गांवापासून पांच कोसांवर आहे.

मोंगलहून निघाल्यापासून धर्मशाळा हें आठ कोसांचें अंतर तोडण्यास आम्हांला सात तास लागले. या ठिकाणीं चांगला बाजार आहे. वंजारी लोकांचे फिरत्या बैलांचे तांडे या ठिकाणीं आम्हांला भेटले. सुमारें दीडशे बैलांवर ओझीं लादून हे वंजारी लोक आपला मार्ग आक्रमीत होते. धर्मशाळेचा मुक्काम सोडून आम्हीं पुढें निघाल्यानंतर आम्हाला पीरपंजाल डोंगराचा देखावा फार सुरेख दिसला. त्याच्यावर चोहीकडे बर्फ पडलेलें असल्यामुळें त्याचा देखावा विशेषच खुलून दिसला. मुरादपूरजवळ आम्ही एका प्राचीन रस्त्याला लागलों. याच रस्त्यानें दिल्लीचे मोगल बादशाहा

लाहोरहून श्रीनगरला जात असत. बर्नियरनें आपल्या प्रवासवृत्तांत या रस्त्याचें मोठें खुमासदार वर्णन केलें आहे. मुरादपूर हें मोंगलांचें थांबण्याचें एक ठिकाण असल्यामुळें येथें एक उत्तम धर्मशाळा (सराई) आहे. परंतु आतां या धर्मशाळेचा बहुतेक नाश झाला आहे. ज्या ठिकाणीं पूर्वी सुकुमार व सुंदर अशा मोगल जनान्यांतील स्त्रिया रहात असत, त्या ठिकाणीं आतां घोडीं बांधतात. धर्मशाळेभोंवतीं असलेली सुंदर व शोभिवंत झाडी मात्र अद्याप धर्मशाळेच्या प्राचीन अवशेषांचें स्मरण टिकवून ठेवते. येथून रजावर पांच मैल आहे. आम्ही त्या दिशेनें जात असतां, रजावरचा राजा भेटण्यास येत असल्यामुळें, आम्ही थांबावें असा निरोप आम्हांला आला, व उन्हांत ताटकळत उभे राहणें आम्हांला भाग पडलें. दरबारी रीतीरिवाजाकरितां आपल्या सुखाचा थोडा त्याग केला पाहिजे हें लक्षांत घेऊन आम्ही उभे राहिलों. मी दुर्बीण हातांत घेऊन रजावरचा राजा व त्याची दरबारी मंडळी येत असतांना त्यांना न्याहाळून पाहिलें.

रजावरचा राजा अतिशय सज्जन व प्रामाणिक गृहस्थ दिसतो. लवाजम्यासह येऊन त्यानें माझें स्वागत केल्यानंतर मी पालखींतून उतरून त्याच्याशीं हस्तांदोलन केलें. त्यानें देऊं केलेल्या हत्तीवर किंवा घोड्यावर न बसतां मी स्वतःच्या पालखींतून व तो त्याच्या घोड्यावरून त्याच्या गांवाकडे जाण्यास निघालों. रजावरचा राजा मला बहुश्रुत वाटला. माझ्या प्रश्नांना त्यानें समर्पक उत्तरें दिलीं. हा राजा मूळचा शीख असून त्यानें अलीकडे मुसलमानी धर्म स्वीकारला आहे. गुलाबसिंगानें रणजितसिंगाच्या वतीनें काश्मीरवर केलेल्या दुसऱ्या स्वारींत (मे १८२० मध्यें) अगुरखानाचा पराभव करून त्याला पकडून आणल्यामुळें, रणजितसिंगानें त्याला जम्मू प्रांताची जहागीर दिली व त्याच वेळेला येथील राजाला रजावरची जहागीर मिळाली. सध्यांचा येथील राजा सुलतानखान हा पूर्वी बिंबरचा राजा होता. इ. स. १८१२ सालीं रणजितसिंगानें केलेल्या पहिल्या स्वारीचे वेळीं इतर मुसलमान नबाबाबरोबर हा रणजितसिंगाविरुद्ध लढला. परंतु त्यांत त्याचा पराभव होऊन, त्याला सात वर्षें लाहोरच्या तुरुंगांत खितपत पडावें लागलें. काश्मीरच्या स्वारीच्या वेळीं याचा आपणांला उपयोग होईल म्हणून रणजितसिंगानें याला मोकळें करून परत पाठवून दिलें व दुसऱ्या स्वारींत

त्यानें मदत केल्यामुळें त्याला त्याची जहागीर परत मिळाली व अशा रीतीनें तेव्हांपासून हा येथें रणजितसिंगाचा मांडलिक म्हणून राहतो.

राजानें मला अतिशय प्रसिद्ध असलेल्या अशा एका बागेंत नेलें. मोगल बादशहा श्रीनगरला जातांना या बागेंत मुक्काम करीत असत. परंतु ही बागहि आतां विनाशपंथाला लागली आहे. येथून पांच कोसांवर अजीमगड म्हणून एक प्रसिद्ध किल्ला आहे. येथील राजानें मला परतभेटीचें निमंत्रण दिलें, परंतु यावेळीं भेटी स्वीकाराव्याच लागतात म्हणून मी हा बेत रहीत केला. माझ्याबरोबर येथील राजा एक दिवस बागेंत राहिला आणि फळें, मासे आणि माझ्या नोकरांकरितां भरपूर कोंबड्या त्यानें आणून दिल्या. काश्मीरहून परत येतांना त्याला परतभेट देण्याचें आश्वासन देऊन मी त्याचा निरोप घेतला. येथील बागेंत हिंदू देव-देवतांच्या मूर्ति इतस्ततः विखरून पडलेल्या मला दिसल्या.

परहंगल येथें रणजितसिंगाच्या सैन्याची एक छोटीशी तुकडी आहे. येथील ठाणेंदारानें मला या घाटांतून जाण्याबद्दल जकातीसाठीं म्हणून कांहीं रक्कम मागितली. अशा निराळ्या नांवाखालीं लांच मागण्याबद्दल मी त्याची कानउघाडणी करून त्याला स्पष्ट नकार दिला. दोब्रान या खेडेगांवांतून जात असतांना, गांवांतील स्त्रियांनीं आपल्या छपरावर उभे राहून व गाणीं गाऊन माझें स्वागत केलें. रतनपंजाल ते पीरपंजाल हा भाग गुलाबसिंगाचे ताब्यांत आहे. या भागांतून जातांना बर्नियरचें पुस्तक हातांत घेऊन व त्यांतील वर्णनें वाचून या दऱ्याखोऱ्यांतून दिल्लीचे मोंगल बादशहा कसे जात असतील याची कल्पना मी करीत होतों. बर्नियरनें आपल्या प्रवासवृत्तांत या रस्त्यानें हत्तीच्या अंबारींतून मोगलांचा झनाना जात असे, असें म्हटलें आहे. परंतु या रस्त्यानें हत्ती जाणें मला तर अशक्यच दिसतें. पीरपंजालला असणाऱ्या एका थडग्यावर माझ्या बिगाऱ्यांनीं व नोकरांनीं कवड्या, शिंपल्या व शंख वाहिले. हें थडगें एका मुसलमान पीराचें असून तो या ठिकाणीं चिरकाल विश्रांति घेत आहे. त्याला संतुष्ट केल्यास पुढचा मार्ग सुखकर होतो म्हणून सर्व मुशाफीर जातांना त्याला कांहींतरी वाहतात. कवडी हें हिंदुस्थानांतील सर्वांत लहान नाणें आहे. माझ्या नोकरांनीं, माझा पुढचा प्रवास सुखकर होण्यासाठीं मीहि या पिराला कांहींतरी वहावें अशी विनंति

केली. रजावर व काश्मीर यांच्या मध्यभागीं हें ठिकाण असून, या ठिकाणच्या विश्रांतीअभावीं हा प्रवास फार कष्टदायक झाला असता. येथून काश्मीरपर्यंत पुढें फारशी वस्ती नाहीं. लष्कराच्या या ठिकाणापासून हरिपूरपर्यंत दहा कोसांचें अंतर आहे. प्रथम दरींत उतार, नंतर टेकडीवर चढ अशा रीतीनें रस्ता आहे. या ठिकाणीं वाटेंत शहाजहानच्या आज्ञेनें एक दगडी तट बांधलेला आहे. हा तट आणि लाहोर ते काश्मीर-पर्यंतच्या धर्मशाळा बांधणाऱ्या अलीमर्दीखान नांवाच्या माणसाविषयीं मीं बऱ्याच दंतकथा प्रवासांत ऐकल्या.

अलीमर्दीखान आपल्या गवंड्यांसह व मजुरांसह येथें आल्यानंतर त्याच्या मजुरांनीं पुढें जाण्यास नकार दिला. येथें एक बुरूज असून त्या बुरुजाजवळून अगदीं अरुंद असा एक रस्ता खालीं जातो. या बुरुजांत लाल गुलाम नांवाचा एक नरमांसभक्षक राक्षस रहात असल्यामुळें लोकांनीं येथून पुढें जाण्याचें नाकारलें. एका वेळेला एकालाच जाण्याचा येथें रस्ता असल्यामुळें असा कोणी वाटसरू रस्त्यानें चालल्यास लाल गुलाम त्याला पकडून खालच्या दरींत फेकून देतो व नंतर निवांतपणें बायकांमुलांसह मेलेल्या माणसाच्या मांसावर ताव मारतो अशी त्याची ख्याति होती. त्याच्या भीतीनें आपले मजूर घाबरले आहेत हें पाहून अलीमर्दीखानानें धाडसीपणानें बुरुजावर चढून उडी मारली. त्या ठिकाणीं लाल गुलामच्या ऐवजीं त्याचा मुलगा त्याला आढळला. त्याला उचलून अलीमर्दीखानानें खालीं दरींत भिरकावून दिलें व त्या दिवसापासून लाल गुलामाविषयीं कांहींहि ऐकूं आलें नाहीं. लाल गुलामाची भीति जरी नष्ट झाली तरी या बुरुजाला त्याचें नांव मिळालें असून, अजूनही अधून मधून एखादा लुटारू यांत वस्ती करून मुशाफिराला सतावतो. पीरपंजालमधील हा घाट अतिशय धोक्याचा आहे. याचे पुरावे येथें अनेक आढळतात. बैल आणि घोड्यांचें सांगाडे येथें असंख्य दिसतात. माणसांचीं पांढरीं हाडें येथें इतस्ततः पसरलीं असून, येथें नर-मांसभक्षक रहात असोत किंवा नसोत, शेकडों माणसांचा या ठिकाणीं संहार झाला हें अगदीं सत्य आहे.

बादशाही सराईपासून चार कोस अंतर तोडल्यावर आम्ही इंगनळी किल्ल्याजवळ आलों. या ठिकाणीं दमदमा नदीचे दोन फाटे एकत्र मिळतात.

वर चढणाऱ्या पर्वताच्या दोन कडयांवर दोन दिशांना मजबूत व जिंकण्यास कठीण असे दोन बुरूज दिसतात. हा किल्ला व हे दोन बुरूज यांमुळें या भागाचें चांगलें रक्षण होत असावें. धर्मशाळा पर्वताच्या पायथ्याशीं, नदीच्या काठीं आहे. ती आतां अगदीं जुनी झाली असून चोहोंकडून पडूं लागलेली आहे. पडकी धर्मशाळा पाहून झाल्यानंतर आम्ही आमचा मोर्चा वरच्या बुरुजाकडे वळवला. हा बुरूज तळापासून सुमारें एक हजार फूट उंच आहे. सभोंवतालीं पाईन व देवदार वृक्षांचीं मोठमोठीं बनें आहेत. एखाद्या बागेंत पद्धतशीरपणें लावलेल्या झाडांच्या रांगा जशा सुंदर दिसतात, तशा रेखीव रांगा येथें चोहोंकडे आढळतात. लोकांची सर्व कल्पनाशक्ति निसर्गानें येथें अमलांत आणलेली आहे.

हरिपूरला आल्यानंतर थंडीचा तडाखा आम्हांला चांगलाच जाणवला. उष्ण प्रदेशांतून थंड प्रदेशांत आल्यामुळें सर्वांना ताप येऊं लागला होता. बाटल्यांमधील व पखालींतील पाणी गोठल्यामुळें आंत दगडासारखा टणक बर्फ तयार झाला होता. नदींतून पाणी आणावें तर तेंही लोखंडासारखें टणक झालेलें होतें. थंडीमुळें आमच्या सर्वांचे ओठ फुटले होते. अशा स्थितींत पुढचा मुक्काम फार लांब न करतां आम्ही तो सात मैलांवर असणाऱ्या चुपायान या गांवीं केला. हिमालयांत सर्वत्र आढळणारा महारोग या ठिकाणीं मला दिसला नाहीं. चुपायाननंतर आम्ही कनकपूर येथें मुक्काम करण्याचें ठरविलें. वाटेंत आम्हांला रमूचा ठाणेदार भेटला. त्यानें मला दोन उत्तम निवडुंगाचीं बोंडें आणि कांहीं रुपये दिले. मी निवडुंगाचीं बोंडें आनंदानें घेऊन रुपये त्याला परत केले. कनकपूरच्या ठाण्यावर पिण्यास पाणीसुद्धां मिळणार नाहीं असें सांगून त्यानें मला रमूच्या ठाण्यावर मुक्काम करण्यास सुचविलें. रमूच्या टेकडीवरून श्रीनगरचा देखावा चांगला दिसतो असेंहि त्यानें सांगितलें.

रमूच्या ठाण्यावर श्रीनगरमधील बरीच मंडळी मला भेटण्यासाठीं आली होती. त्यांत तेथील सुभेदाराच्या वतीनें स्वागत करण्यासाठीं म्हणून एक काजी आला होता. ओंजळ भरून रुपये त्यानें मला भेट म्हणून दिले. ते घेण्यास मी नकार दिल्यामुळें त्यानें ते माझ्या नोकरचाकरांत वाटून टाकले. त्याच्या या वागण्याचा माझ्या मनावर फार चांगला परिणाम झाला. येथील

मुक्काम संपवून आम्ही दुसऱ्या दिवशीं श्रीनगरकडे जात असतांना, आम्हांला कनकपूरची पडकी धर्मशाळा दिसली. एक पर्वत ओलांडल्यावर आम्ही दूधगंगा नदीच्या तीरावर आलों. येथें वस्ती बरीच असून, प्रदेशहि समृद्ध आहे. काश्मीर शहराचें पूर्वीचें नांव श्रीनगर असें होतें. एवढें प्रसिद्ध शहर असूनहि त्याचें वैशिष्टय दाखविणारीं ठिकाणें जवळपास दिसत नाहींत. नाहीं म्हणावयास तख्त-इ-सुलेमान डोंगर व एक किल्ला, या दोन गोष्टी शहर जवळ आल्याचें सुचवितात. दूधगंगा नदीच्या वळणावळणानें हिंडत असतांना आम्ही श्रीनगर शहरांत कधीं शिरलों, तें आमचें आम्हांला कळलें देखील नाहीं.

प्रकरण चौथें

नंदनवनांतील मुशाफिरी

शहराच्या बाहेरच रणजितसिंगाचें सैन्य युरोपीय पद्धतीनें कवायत करीत असतांना आढळतें. या कवायती शिस्तीच्या जोरावर त्यानें हा सुंदर व वैभवशाली प्रदेश घशाखालीं घातला. युरोपीयांच्या शिस्तींत तयार झालेल्या त्याच्या दोन लष्करी तुकड्या (रेजिमेंटस्) सध्यां येथें आहेत. या सैन्यांतील शिपायांचा गणवेश म्हणजे एक पिवळ्या कडा असलेलें तांबडें जाकीट, निळ्या विजारी व निळें पागोटें असा आहे. निळा रंग शिखांना विशेष प्रिय असतो. अधिकारी पांढरें पागोटें वापरतात. जवानांची उंची व शरीर इतकें उत्तम व भव्य आहे कीं, अंगावरचे कपडे जर फाटके नसते तर पहाणारांना या लोकांचा निश्चित दरारा वाटला असता. दारूगोळा इंग्रजी पद्धतीचा असून तो लाहोरच्या दारूगोळ्याच्या कारखान्यांत तयार होतो. श्रीनगरमध्य प्रवास केल्यानंतर रणजितसिंगाच्या सुभेदाराकडून माझें स्वागत झालें व सुभेदाराच्या राजवाड्यासमोरचेंच एक घर मला रहाण्यास दिलें गेलें. हें घर मला अगदीं नापसंत असल्यामुळें पूर्वी इंग्रज राहून गेलेल्या व सध्यां व्हाईन (Vigne) नांवाचा एक इंग्रज गृहस्थ राहात असलेल्या दिलवरखान बागेंतील जागा मी रहावयास मागितली. युरोपियांची इच्छा म्हणजे काश्मीरांत बादशाही फर्मानापेक्षांही अधिक मानली जाते. व त्या अनुरोधानें मला त्या बागेंत रहावयास जागा मिळाली. मी येथें रहावयास आल्यानंतर काश्मिरी स्त्रियांचें एक टोळकें बोटींतून माझ्या खोलीच्या खिडकीपाशीं थांबून स्वागतपर पद्य म्हणून गेलें. येथील पुरुष व स्त्रिया सुंदर आहेत यांत शंकाच नाहीं. मात्र या स्त्रियांचे अवयव रेखीव नाहींत हें मी म्हटल्यास कोणी माझ्यावर रागावूं नये.

येथील सुभेदार मेहनसिंग हा रणजितसिंगाच्या सैन्यांतील एक अधिकारी आहे. त्यानें काजीबरोबर रणजितसिंगाकडून आलेले ५२५ रुपये माझ्याकडे

भेट म्हणून पाठविले. ते मला नाउपायानें घ्यावे लागले. मि. व्हाईन (Vigne) ह्या नांवाचा एक इंग्रज प्रवासी बागेंत माझ्या शेजारींच रहातो. त्याला चित्रें काढण्याचा नाद असून तो तख्त-इ-सुलेमान या डोंगराचें चित्र काढण्यास बाहेर गेला होता. मी संध्याकाळीं त्याला माझ्याकडे जेवण्यास बोलावलें. तो नुकताच तीन आठवड्यांपूर्वी इस्कर्डूहून (Iskurdu) जिवावरचा प्रवास करून आला होता. नकाशावरसुद्धां न आढळणारा प्रदेश पहाण्यांत प्रवाशाच्या मनाला काय आनंद वाटेल हें या प्रवासाशिवाय इतरांस कळणारही नाहीं. आपण कांहींतरी नवीन पहातों व तें जगाला माहिती करून देतों या नादांत तो सर्व संकटें आणि अडचणी दृष्टीआड करतो. मात्र या कार्याबद्दल पुढच्या पिढींत आपलें नांव आदरानें घेतलें जावें अशी त्याची मनापासून इच्छा असते. इस्कर्डूचा राजा अहंमदशहा हा सध्यां मोठ्या अडचणींत आहे. गेल्या चाळीस वर्षांत शिखांची वाढलेली सत्ता रणजितसिगानें इतकी बलवान केलेली आहे कीं पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत आणि काश्मीर येथील सर्व मुसलमान सत्ताधारी त्याला शरण जाऊन त्याचे मांडलिक झाले आहेत. लडाख पडल्यामुळें अहंमदशहाला रणजितसिंगाच्या सैन्याला कसें तोंड द्यावें असा विचार पडला आहे. या भागाचें दारिद्र्य हें संरक्षणाचें एकमेव साधन आहे. ईस्ट इंडिया कंपनीशीं दोस्ती करणें एवढाच एक उपाय आतां या राजाला उरला आहे. मि. व्हाईन यांनीं या प्रदेशाला दिलेली भेट या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. अहंमदशहाचा एक वकील सध्यां व्हाईनबरोबर येथें आला असून गव्हर्नर जनरलला भेटून त्याच्याकडून मदतीबद्दल कांहींतरी उत्तर मिळवावें असा त्याचा हेतु आहे. लडाखप्रमाणें इस्कर्डूचें राज्य मात्र रणजितसिंगाला सहजासहजीं जिंकतां येणार नाहीं. येथील लोक लढवय्ये असून शरीरानें काटक आहेत. शिवाय लोक मुसलमानधर्मीय असल्यामुळें ते रणजितसिंगाचें राज्य टिकूनहि देणार नाहींत.

दिलवरखान बागेंत असतांना पहिल्या दिवशीं माझ्याकडे एक युरोपीय गृहस्थ आल्याची वर्दी आली. मि. व्हाईनला भेटण्यासाठीं आलेले डॉ. हेंडरसन अचानक माझ्यापुढें येऊन उभे राहिले. मि. व्हाईनला भेटण्यासाठीं आलों असून ते कोठें आहेत असा त्यांनीं प्रश्न केला. मी त्यांना म्हटलें,

'महाशय मी तें सांगतों. पण आपलें नांव तरी कळू द्याल कीं नाहीं?' तो माझ्याजवळ येऊन म्हणाला, 'बहुधा तुम्ही डॉ. हेंडरसनविषयीं कांहीं ऐकलेंच असेल.' हें त्यानें म्हणतांच मी त्याचा हात दाबून बसण्यास सांगितलें आणि माझ्या कपड्यापैकीं कांहीं त्यांना वापरावयास दिले. डॉ. हेंडरसनला समोर पहातांच मला त्या गृहस्थाचा पूर्वीचा सर्व इतिहास आठवला.[१]

डॉ. हेंडरसन हिंदुस्थानांत वृत्तपत्र चालवीत असत. या वृत्तपत्रांतून सरकारविरुद्ध अत्यंत कडक टीका करण्यांत त्यांचा हातखंडा होता. कंपनीच्या नोकरींत असतांनाच अशा प्रकारें कंपनीविरुद्ध लिहिणें प्रमुख इंग्रजी सेनापतीला रुचलें नाहीं व त्यानें डॉ. हेंडरसनला वृत्तपत्राचा धंदा सोडून ताबडतोब कलकत्त्यांत हजर रहाण्याचा हुकूम दिला. त्यांना प्रवासाची अतिशय आवड असून गाजावाजा न करतां हा प्रवास चोरून करण्याची त्यांची इच्छा होती. लुधियानापासून कलकत्त्यापर्यंत चालत येतो असें म्हणून

डॉ. हेंडरसनचें सर्व चरित्र रोमांचकारी व अद्‌भूत साहसांनीं भरलेलें आहे. अज्ञात अशा प्रदेशांत एकटे किंवा दुसऱ्यास सोबत घेऊन त्यांनीं बराच प्रवास केला व या प्रवासांत सर्व संपत्ति घालवून ते कफल्लक झाले. कडक थंडीमुळें प्रवासांत त्यांची प्रकृति खालावली व अनेकदां त्यांनीं चोरांकडून मारहि खाल्ला. १८३५ला ई. इं. कंपनीला चुकवून, बेकायदेशीरपणें त्यांनीं रणजितसिंगाच्या राज्यांत प्रवेश केला. त्यांच्या साहसावर खूष होऊन रणजितनें त्यांचा गुन्हा माफ करून त्यांचा गौरव केला. १८३६ सालीं लुधियानाला परत आल्यावर त्यांची कंपनी सरकारकडून चौकशी सुरू झाली. परंतु दुर्दैवानें ताप येऊन फेब्रुवारी १८३६ ला डॉक्टरसाहेब लुधियानाला मरण पावले. त्यांना प्रवासवर्णन लिहिण्यास सवड न सांपडल्यानें, त्यांच्या मृत्यूमुळें भूगोल व शास्त्र या विषयांवरचे त्यांचे मौलिक विचार तसेच नष्ट झाले. आग्रा बँक काढण्यांत व ती भरभराटींत आणण्यांत डॉ. हेंडरसन हेच प्रमुख होते. त्यांना अवेळीं मरण आल्यामुळें, त्या वेळीं हिंदुस्थान व इंग्लंडमधील सर्व सुबुद्ध मित्रमंडळी हळहळली.

जी. टी. व्हाईन यांनीं १८४२ सालीं प्रसिद्ध केलेल्या काश्मीरच्या प्रवासवर्णनांत डॉक्टर हेंरडसनविषयीं अधिक माहिती वाचकांना मिळू शकेल.

पहा Travels in Kashmir, Ladak and Iskardu (in Two volumes) By G. T. Vigne Vol. II; P. 104 to 107

व त्यासाठीं चार महिन्यांची रजाही त्यांनीं मंजूर करून घेतली व मध्यंतरीं कलकत्त्याला जाण्याऐवजीं सिंधु नदीचा उगम पहाण्यासाठीं ते मंडीहून लडाखला गेले व तेथून हा उगम शोधूं लागले. कलकत्त्यास जाण्यास फार उशीर होऊं नये म्हणून ते झपाट्यानें परत आले होते. मध्यंतरीं कोणी तरी एक इंग्रज वेशांतर करून हिमालयांतील स्वतंत्र राज्यांतून प्रवास करतो आहे अशी बातमी हिंदुस्थान सरकारला लागली. डॉ. हेंडरसन संबंधींचा हा सर्व गवगवा मी हिंदुस्थानांत असतांनाच ऐकला होता. या पुढची हकीगत अतिशय मनोरंजक व महत्त्वाची असून ती मला प्रत्यक्ष डॉक्टरसाहेबांकडूनच कळाली. डॉ. हेंडरसन ज्या वेळीं लडाखला गेले त्या वेळीं गुलाबसिंगाकडून झेरावरसिंग या नांवाचा एक सेनापति लडाख जिंकण्यास सैन्य घेऊन आला होता. या वेळीं डॉ. हेंडरसन हे मुसलमानी वेशांत असून इस्माईलखान या टोपण नांवानें तेथें वावरत होते. लडाखच्या राजाला एक इंग्रज गृहस्थ आल्याची बातमी लागली. त्यानें डॉक्टरना ताबडतोब ओळखून त्यांचा सत्कार केला व मूरक्राफ्टनें पूर्वीं केलेल्या तहावर कंपनीतर्फे सही करण्याची विनंति केली. डॉ. हेंडरसनना याची कांहींच माहिती नसल्यानें ते या गैर-समजाबद्दल कांहीं बोलणार तोंच लडाखच्या राजानें त्यांना पूर्वींचा तहनामा दाखविला. हेंडरसनना या तहासंबंधीं कांहींही माहिती नाहीं, याची खात्री पटूनसुद्धां व या तहावर सही करण्याचा त्यांना अधिकार नाहीं याची जाणीव असून देखील एक इंग्रज मनुष्य आपल्या राज्यांत आला असून त्याचा फायदा करून घेण्याचें लडाखच्या राजानें ठरविलें. स्वारी करण्यास आलेल्या झेरावरसिंगाला लडाखच्या राजानें असें फसविलें कीं, ईस्ट इंडिया कंपनीचा वकील मदतीचें आश्वासन देण्यासाठीं आला आहे व यासाठींच लडाखच्या राजानें डॉ. हेंडरसनला लडाखबाहेर जाण्यास बंदी केली. बिचारा गरीब हेंडरसन तीन महिने लडाखमध्यें अडकून पडला व सुटकेसाठीं पलायनाचा मार्ग त्यानें स्वीकारल्याबरोबर पुन्हां त्याला पकडून तुरुंगांत डांबण्यांत आलें. सुटण्याच्या या झटापटींत डॉक्टर जखमीहि झाले होते.

मध्यंतरीं ईस्ट इंडिया कंपनीचा वकील लडाखच्या राजाकडे आला आहे असें कळतांच झेरावरसिंगानें आपली लष्करी मोहीम तहकूब करून गुलाबसिंगाकडे सर्व हकिगत कळवून पुढच्या आज्ञेची वाट पहात राहिला.

गुलाबसिंगानें लुधियानाच्या रेसिडेंटला ईस्ट इंडिया कंपनीच्या या वागण्याचा अर्थ काय असें स्पष्ट विचारलें. रेसिडेंटनें कंपनी सरकारच्या मर्जीविरुद्ध डॉ. हेंडरसन सतलज नदी ओलांडून लडाखमध्यें गेल्याचें व रणजितसिंगाला काश्मीरमध्यें मुलुखगिरी करण्याची इच्छा असल्यास कंपनीला या कामांत ढवळाढवळ करण्याची बिलकूल इच्छा नाहीं असें कळविलें. रणजितसिंगाकडून ही हकिगत गुलाबसिंगाला व गुलाबसिंगाकडून झेरावरसिंगास मिळून झेरावरसिंगानें आपली मोहीम पुन्हां सुरू केली. लडाखच्या राजानें यानंतर हेंडरसनला सोडून दिलें. त्यानंतर तिबेटमधून इस्कर्डू या छोटचा राज्यांतून ते येथें परत आले होते. अशा रीतीनें दोन युरोपीय, काश्मीरमध्यें एकाच वेळीं अगदीं परस्परविरोधी मार्गानें एके ठिकाणीं आले होते व तिसऱ्या युरोपियासह त्यांना एके ठिकाणीं रहाण्याची संधि मिळाली होती.

दिलवरखान बागेंत मी डॉ. हेंडरसन व मि. व्हाईन या दोन पाहुण्यांसह राहूं लागलों. त्या दोघांनाही मी येथील मुक्कामांत माझेकडेच पाहुणे म्हणून रहाण्याचा आग्रह केला. वास्तविक पाहतां डॉ. हेंडरसन, मि. व्हाईन आणि मी एका देशचे नागरिकहि नव्हतों, किंवा आमची मातृभाषाहि एक नव्हती. परंतु काश्मीरसारख्या एका दूरच्या प्रदेशांत एकत्र आल्यामुळें व येथील लोकांपेक्षां आम्हीं एकमेकांना जवळचे असल्यामुळें आम्ही जणूं कांहीं एकमेकांचे लंगोटीयार मित्रच आहोंत इतक्या मोकळेपणानें एकत्र मिसळलों व एकमेकांशीं प्रेमानें वागूं लागलों. गेल्या कित्येक दिवसांत मला युरोपीयांचा सहवास मिळाला नसल्यामुळें माझ्या मनाला जो आनंद झाला तो वर्णन करून सांगतां येत नाहीं.

श्रीनगर शहराविषयीं माझ्या मनांत फारसा अनुकूल ग्रह झाला नाहीं. पडून गेलेले मोठमोठे राजवाडे, मोडकळीस आलेल्या जुन्या घरांच्या रांगा, दलदलीनें भरलेले रस्ते, अशा तऱ्हेची शहराची अवस्था पाहून पहिल्या दिवशीं मी किंचितसा निराशच झालों होतों म्हणाना. स्वप्नवत् वाटणारें पऱ्यांचें राज्य तें हेंच कीं काय अशी शंका व त्यामुळें निराशा माझ्या मनांत आली. जसजसे दिवस जाऊं लागले तसतशी माझी निराशा कमी होऊन काश्मीरच्या सौंदर्याविषयीं माझें मत पालटूं लागलें. तेथील सुभेदाराकडून कोंबडचा, बकरीं आणि इतर शिधा त्याचप्रमाणें उत्तम जातीची भरपूर

ताजीं फळें मला मिळत असत. काश्मीरमध्यें आल्यापासून थंडीचा मला फार त्रास होऊं लागला होता.

माझें येथील एक पहिलें प्रमुख काम म्हणजे नकाशांत श्रीनगर गांवाचें स्थान निश्चित करणें हें होतें. या कामांत मला माझ्या युरोपीय मित्रांची मदत झाली. दुपारच्या वेळीं आम्ही 'दाल' सरोवर पहाण्यास गेलों. झेलम नदीच्या पाण्यांत या सरोवराचें पाणी मिसळूं नये म्हणून मध्येंच बांध घातल्याचें मला दिसलें. तख्त-इ-सुलेमान डोंगराच्या पायथ्याशीं दिलवरखान बागेपासून दोन तीन मैलांवर हें सरोवर आहे. सरोवराचे कांहीं भाग पाडण्यांत आलेले आहेत. दुसऱ्या भागांत 'रुपलँड' नांवाचें छोटेसें बेट असून, त्यावर उतरून, आम्ही या सरोवराची शोभा पाहिली. याजवळच 'कालीसंगम' या नांवाचें हिंदूंचें एक पवित्र ठिकाण आहे. 'रुपलँड' बेटांत जहांगिरांनीं तयार केलेली सुप्रसिद्ध 'निशात' बाग आहे. आंत चहूंकडे पाण्याचे हौद आणि कारंजीं खेळविलेलीं आहेत. या कारंज्यांवर कमानीवजा इमारती बांधल्या असून त्यावरून यांची शोभा विशेष दिसते. या कमानीवरून कारंज्यांची शोभा अशी दिसते कीं, दृष्टीच्या खूप दूरवर तीं पसरलेलीं असावींत; परंतु वस्तुस्थिति तशी नसून हा दृष्टिभ्रम कारंजें आणि कमानी बांधण्याच्या कुशलतेमुळें निर्माण झालेला आहे. बागेंत व्यवस्थित लावलेलीं झाडें अशींच सुंदर शोभा देतात. 'चारचुनार' सरोवरांतील 'शालिमार' बागहि अशीच सुंदर आहे. ही बागहि जहांगिरांनींच तयार केली आहे. ही बाग ३७६ पावलें लांब आणि २२० पावलें रुंद अशी आहे. बागेचें प्रवेशद्वार येथील पूर्वीच्या पठाण सुभेदारानें हल्लीं बिघडवून टाकलें आहे. या प्रवेशद्वारावर हुक्का पिण्यासाठीं बसण्याची एक गलिच्छ जागा त्यानें बांधली आहे. त्यामुळें मूळच्या प्रवेशद्वाराचें सौंदर्य अगदीं विरूप होऊन गेलें आहे. या बागेपासून जवळच 'चारचुनार' बेट लागतें. या ठिकाणीं मोगल बादशहांनीं लावलेल्या चुनार वृक्षांच्या चार झाडांपैकीं दोन अद्याप टिकून आहेत. अकबरानें लावलेलें 'नाझीम' नांवाचें जंगल आहे. अकबरानें या ठिकाणीं उत्तमपैकीं बाराशें झाडें लाविलीं होती. दोनशें वर्षांनंतर देखील हीं झाडें अजून उत्तम स्थितींत आहेत. जहांगिरची बायको नूरजहान या ठिकाणीं उन्हाळयांत नेहमी येत असे. दुसरे दिवशीं म्हणजे शुक्रवारीं वीस

नोव्हेंबरला शिखांचा सण असल्यामुळें सुभेदाराच्या भेटीला न जातां तख्त-इ-सुलेमान पर्वतावर जाण्याचें मीं ठरविलें. या पर्वतावर हिंदूंचें एक सुंदर देवालय आहे. हें शंकराचें आहे असें हिंदू लोक मानतात. देवालयाचें भव्य स्वरूप आणि देवालयाच्या पायाची सुंदर आखणी पाहतां या देवालयाच्या मूळच्या उत्कृष्टपणाची कल्पना येते. देवालयावर असलेला एक अतिप्राचीन शिलालेख जमीनींत गाडला गेला आहे असें लोक म्हणतात. या देवालयाचें मशिदींत रूपांतर केलें गेलें होतें व त्यावर एक फारशी शिलालेख असून तो अलीकडील काळांतील आहे. हा पर्वत तिबेटपासून आलेल्या पर्वतांच्या सांखळींतील एक असून गांवापासून १२०० फूट उंच आहे. यावरून श्रीनगरच्या दरीचा दिसणारा देखावा नयनमनोरम आणि अतिरम्य आहे. पायथ्याशीं असलेलें सरोवर स्वच्छ पाण्यानें भरलेलें असल्यामुळें जणूं कांहीं न हालणारा एक अतिप्रचंड आरसाच परमेश्वरानें खालीं ठेवला असें वाटतें. या आरशांत तिबेटी पर्वतराजींच्या सावल्या प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. कांठावर श्रीनगर शहर वसलें असून त्याच्याहि पडछाया यांत दिसतात. या हिरव्या दरीमधून झेलम नदी एकाद्या नागिणीप्रमाणें वळणें घेते. दुसऱ्या बाजूस प्रचंड पीरपंजाल पर्वतावरील बर्फाच्छादित अशीं असंख्य शिखरें अतीव शोभा निर्माण करून सगळ्या सौन्दर्याला भव्यता आणतात.

पीरपंजाल पर्वताविषयीं मुसलमानांच्यामध्यें एक दंतकथा प्रचलित आहे. पीरपंजाल म्हणजे पांच अवलीये. पांच मुसलमान भाऊ या पर्वतावर राहून त्यांनीं येथें अनेक चमत्कार लोकांना दाखविले, व त्यामुळें मुसलमानांच्यामध्यें या डोंगराचें नांव पीरपंजाल असें पडलें आहे. माझ्या मतें ही उपपत्ति चूक आहे. काश्मीरी भाषेंत 'फन्साल' याचा अर्थ घाट असा होतो. या डोंगराच्या घाटांतून येत असतां, एकअवलीयाचें थडगें मला दिसलें होतें. त्यावरून पीरपंजाल याचा अर्थ पिराचा घाट असलेला डोंगर असा मी करतों. युरोपीय आणि इराणी लोक जरी सबंध डोंगराला पीरपंजाल म्हणत असले तरी स्थानिक काश्मीरी लोक फक्त या घाटालाच पीरपंजाल म्हणतात. यावरून माझ्या म्हणण्याला पुष्टि मिळते.

शनिवारीं २१ तारखेला रणजितसिंगाच्या येथील सुभेदाराला भेट देण्यासाठीं, मी माझ्या दोन इंग्रज मित्रांसह निघालों. बरोबर माझा मुनशी ठाकुरदास आणि दुभाषा मोहन हा होता. शहीदगड येथें सुभेदाराचा एक राजवाडा असून आम्हांला तेथें जाण्यास अर्ध्या तासापेक्षां जास्त वेळ लागला. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला रांगेनें शिपाई उभे होते, गच्चीवरील एका मोकळ्या पटांगणावर आमच्या भेटीची जागा मुक्रर केली होती. मध्यभागीं चौकोनी लाकडी व्यासपीठावर सुभेदार मेहनसिंग एका आरामखुर्चीत बसला होता. त्याच्या सभोवतीं बरेच नोकरचाकर व शरीररक्षक भरजरी पोषाख घालून उभे होते. मला पहातांच मेहनसिंग जागेवरून उठून सामोरा आला. मेहनसिंगाचें शरीर अतिशय स्थूल असून तें त्याचें त्याला आवरण्यास कठीण होतें. ऐन तारुण्यांत तो म्हाताऱ्यासारखा दिसे. त्याचे केस रुप्याप्रमाणें पांढरे स्वच्छ असून चेहऱ्यावरून तो दयाळू आणि शांतवृत्तीचा वाटे. त्याच्या दाढीवरून तो शीख आहे हें लगेच लक्षांत येत असे. या वेळीं त्यानें शरीरावर रेशमाचा लांब पिवळा झगा घातलेला होता व डोक्यावर त्यानें एक साधा पांढरा हातरूमाल बांधलेला होता, त्याच्या उजव्या हाताला जमिनीवर रणजितसिंगाचे मांडलिक, पंजाब आणि काश्मीरमधील अनेक नबाब बसलेले होते. नबाबांच्या प्रत्येक घराण्यांतील एकेक इसम काश्मीर-मध्यें ओलीस म्हणून ठेवलेला आहे. नबाबांनीं आपल्या विरुद्ध बंड करूं नये म्हणून रणजितसिंगानें योजलेली ही एक नामी युक्ति आहे. हे मुसलमान राजे किंवा नबाब पंजाबच्या उष्ण प्रदेशांत राहण्याची संवय असल्यामुळें येथें थंडीनें कुडकुडत होते. याशिवाय आमच्या पायापाशीं जमिनीवर बसवल्यामुळें अपमान वाटून त्यांच्या डोळ्यांतून राग ओसंडत होता. सुभेदार मेहनसिंग मात्र त्यांच्या या दीनवाण्या मुद्रेकडे अभिमानानें पहात मला त्यांचीं नांवें सांगत होता. माझी अनेक तऱ्हेनें स्तुति करून महाराजा रणजितसिंगांनीं तुमचे येथील राहाणें तुम्हांला सुखावह होईल अशी काळजी घेण्याचें मला बजावलें आहे असें तो म्हणाला. मी त्यांना म्हणालों कीं, हिवाळा जवळ आल्यामुळें मला येथें जास्त वेळ रहातां येत नाहीं. येथील तुमची उत्तम राज्यव्यवस्था पाहून माझा फार अनुकूल ग्रह झाला आहे. काश्मीरच्या आग्नेय टोकाकडील इस्लामाबाद या शहराला भेट देण्याची

मला परवानगी असावी. त्याचप्रमाणें काश्मीर दरींत चोहोंकडे फिरण्यास मला मुभा असावी. तुमच्या मनाप्रमाणें तुम्ही कोठेंहि जाऊं शकतां. परवानगी विचारण्याची सुद्धां जरूर नाहीं' असें उत्तर त्यावर सुभेदारानें दिलें. सबंध काश्मीरदरींत शालीचा धंदा करणारे थोडेसे व्यापारी सोडल्यास बाकी सर्व भिकारीच असल्यामुळें या दरबारांत ओलीस असलेलीं नबाबांचीं पोरें सोडल्यास महत्त्वाची अशी कोणीच मंडळी नव्हती. भेटीचा वेळ संपल्यानंतर सुभेदार मेहनसिंग मला पायऱ्यांपर्यंत पोहोचवायला आला.

सुभेदाराची भेट झाल्यानंतर श्रीनगर शहरांतील राहिलेलीं स्थळें पाहण्यास मी पुन्हां निघालों. झेलम नदीवर बांधलेले प्रसिद्ध सात पूल मीं पाहिले. या पुलांचा धक्का प्रचंड देवदार वृक्षाचीं खोडें टाकून बांधलेला आहे. साधारणतः हीं खोडें तीन फूट परिघाचीं व पंधरा-वीस फूट लांब अशीं आहेत. चितेवर एकावर एक लाकडें रचावींत त्याप्रमाणें हे ठोकळे एकावर एक रचलेले आहेत. याच्या मुळापासून लिंबोणीचीं प्रचंड झाडें वाढलेलीं आहेत. मात्र हीं झाडें मुद्दाम कोणी लावलेलीं नसून पक्ष्यांनीं लिंबोणीचें बी आणून येथें टाकल्यामुळें तीं उगवलेलीं आहेत. या पुलावरून नदीचा खालचा देखावा अतिशय सुंदर दिसतो. काश्मीरमध्यें मुसलमान येण्यापूर्वींच हे पूल येथें बांधलेले आहेत. यावरून पांचशें वर्षांपेक्षां हे निश्चित जुने आहेत.

शहा हमीदा मशीद एकाद्या चिनी देवळाप्रमाणें दिसते. नंतर आम्ही बेगम नूरजहाननें बांधलेली नयी मशीद पाहिली. ही मशीद बांधण्यांत थोडी अपुरी राहिलेली आहे. मशिदींत पांढरे संगमरवरी दगड वापरलेले असून हिंदु आणि मुसलमान कलेचा बांधणींत उत्कृष्ट मिलाफ केलेला आहे. सध्यां मात्र या मशिदीचें रूपांतर शस्त्रागारांत झालेलें आहे. याचा देखावा कागदावर काढण्यासाठीं मि. व्हाईनची धडपड चालली असतांना तो नदींत पडला. काश्मीरमधील बहुतेक लोकांना पोहतां येत नसल्यामुळें ते थोडे घाबरले होते. इतर कांहीं न करतां व्हाईन बागेकडे परत गेला.

त्यानंतर मी आणि डॉ. हेंडरसन सैनलुब्दीनाचें थडगें पहाण्यास गेलों. सैनलुब्दीन हा काश्मीरमधील दुसरा मुसलमान राजा असून (अबुल फाजलच्या मतानें आठवा) इतिहासांत फार प्रसिद्ध म्हणून गणला गेला आहे. काश्मीरमध्यें अनेक कलांना उत्तेजन देऊन त्या तेथील लोकांना त्यानें प्रथम शिकविल्या.

काच तयार करणें, लोकर विणणें या गोष्टी त्याच्यापूर्वी अस्तित्वांत नव्हत्या. तुर्कस्थानांतून मोमीन आणून व तिबेटमधून लोकर आणून त्यांच्या शाली येथें बनविण्यास त्यानें उत्तेजन दिलें. येथील लोक आतां या गोष्टी विसरले असून त्याचें महत्त्व केवळ एक बादशहा म्हणूनच मानतात. या थडग्याजवळ बुद्धाचा एक जुना विहार किंवा देऊळ आहे. हें देऊळ अतिप्राचीन असून त्याचा आतां संपूर्ण नाश झालेला आहे. देवळाचे अवशेष व कांहीं नक्षीचे दगड आतां पटांगणांत इतस्ततः पसरलेले आहेत. या दगडावरील नक्षीवरूनच बौद्ध काळांत हें देऊळ किती भव्य व सुंदर असूं शकेल याची कल्पना येऊं शकते. मशिदींतील मौलवीनें पूर्वीचा एक इंग्रज प्रवासी मूरक्रॅफ्ट या ठिकाणीं पुरला आहे म्हणून सांगितलें. परंतु थडग्यावरील फारशी शिलालेख वाचतां त्या दुर्दैवी प्रवाशाचा एक नोकरच येथें पुरलेला आहे असें दिसतें.

येथून जवळच जामा मस्जिद नांवाची एक मशीद आहे. या मशिदीचा इमला देवदार वृक्षाचा बांधलेला असून आंता तो पडक्या स्थितींत आहे ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. पूर्वी ही इमारत अतिशय सुंदर दिसत असे. ही मशीद चौकोनी असून तिची तख्तपोशी प्रचंड खांबावर आधारलेली आहे. हे खांब अखंड आहेत. मुसलमानी पद्धतीप्रमाणें मशीद पूर्वपश्चिम नीट बांधली गेली नसल्याचें मी मौलवीच्या लक्षांत आणून दिल्यावर त्यानें एक पेटी बाहेर आणून मला दाखविली. या पेटींत एक सुई असून ही सुई पश्चिम दिशा म्हणजे मक्का दाखविते, असें मौलवी म्हणाला. काश्मीरच्या पश्चिमेला मक्का येत नाहीं हा भूगोल मौलवीला माहीत नसल्यामुळें त्याची ती सुई कवडी किंमतीची होती असें मला वाटलें.

नंतर आम्ही गचाळ रस्ते, चहूंकडे पसरलेले बाजार आणि कालवे ओलांडून हरणी पर्वतावरील किल्ला पहाण्यास गेलों. पूर्वीच्या मोगल बादशहांनीं व काबूलच्या राजांनीं बांधलेल्या मोठमोठ्या इमारती रस्त्यांत आम्हांला दिसल्या. परंतु त्या आतां पडक्या स्थितींत असून त्यामध्यें बहुतेक कोणी रहात नाहीं. हरणी पर्वताच्या पायथ्याशीं नगरगार नांवाचें एक शहर अकबरानें वसविलें होतें. या शहराभोवतीं मजबूत तट असून त्यामध्यें बुरूज आहेत. शहीदगडपासून हें ठिकाण तीन मैल दूर आहे. पूर्वी या ठिकाणीं दरींतील एक सुंदर देखाव्याचा भाग असून आतां हद्या

पडक्या शहराचे अवशेष चोहोकडे पसरले आहेत. या दगडांमध्यें सुंदर चौथरे व प्रचंड खांब मधून मधून दिसतात. अर्थातच काश्मीरमधील प्राचीन देवालयांतून हे आणले असावेत हें उघड आहे. या शहरांत जाण्याचे दोन मार्ग आहेत. एका बाजूला मोठें प्रवेशद्वार असून तें मजबूत बांधलेलें आहे व दुसऱ्या बाजूला बुटक्या आणि अशक्त माणसालाच जातां येईल असें एक छोटें प्रवेशद्वार आहे. अकबरानें बांधलेल्या या शहरांत सध्यां एकहि जिवंत माणूस रहात नाहीं. पडक्या व स्मशानावस्था असलेल्या या नगरांत देखील कांहीं भागांत अतिशय सुंदर व कलापूर्ण देखावे आढळतील व एकाद्या चित्रकाराला येथें आपल्या कलेचा आविष्कार करण्यास बराच वाव आहे.

हरणी पर्वतावरील किल्ल्याचें नांव 'की गरम' असें असून त्यांत शीख फौजा आहेत. हा किल्ला अलीमर्दनखान नांवाच्या सुभेदारानें काबूलच्या बादशहाविरुद्ध बंड करण्याचे वेळीं बांधलेला आहे. शीख आणि काश्मीरमधील लोक या किल्ल्याला फार महत्त्व देतात व आजहि या किल्ल्यावर हल्ला करणें सोपें नाहीं. आम्हीं किल्ल्यावर जाण्यासाठीं वर चढूं लागलों असतां किल्ल्यावरील पहारेकऱ्यांनीं बंदुका सरसावून आम्हांला रोखलें. परत येतांना शाली विणण्याच्या एका कारखान्याला आम्ही भेट दिली. येथील विणकऱ्यांची परिस्थिति अतिशय हलाखीची असून त्यांच्या राहाण्याच्या जागा आपल्या कल्पनेपेक्षांहि वाईट आहेत. एका खोलींत सोळा माणसें एकमेकांना चिकटून कामें करतांना मी पाहिलीं. सुमारें तीन हजार रुपये किंमतीची दुशाला त्या वेळीं ते तयार करीत होते. त्यांच्या धंद्याविषयीं मी कांहीं प्रश्न विचारले, परंतु काश्मिरी लोकांना आपलें मन दुसऱ्याला कळूं न देण्याची कला लहानपणापासूनच अवगत होते. कारागीर लोकरीचा धागा अशा कुशलतेनें हाताळीत होते कीं, तें पाहून मी थक्कच झालों. त्यानंतर मी एका शस्त्रें बनविण्याच्या कारखान्याला भेट दिली. येथील लोहार सबंध काश्मीरमध्यें आपल्या कामांत नांवाजलेला होता. त्यानें मला अर्धवट बनवलेल्या चापाच्या बंदुका व पिस्तुलें दाखविलीं. एक हिंदी पद्धतीची तोडयाची बंदूक व कांहीं दारूगोळे मी तेथें पाहिले या सर्वांवर सुंदर नक्षी काढलेली होती. मात्र लोहार वापरीत असलेलीं हत्यारें अतिशय टाकाऊ होती. त्याच्या फुटक्या भात्यांतून हवा आंतही जात होती व बाहेरही येत होती.

श्रीनगरमधील शीख सैन्याच्या दोन पायदळी तुकड्या येथें आहेत. साधारणतः १२०० तें १४०० जवान त्यांमध्यें असतील. काश्मिरी लोकांच्या दोन तुकड्या तयार करण्याचें काम रणजितसिंगानें सुभेदारावर सोपविलें होतें, परंतु तें काम त्याला जमलें नाहीं असें त्यानें मला सांगितलें. पूर्वी पठाणांचें राज्य येथें असतांना त्यांचें वीस हजार सैन्य येथें होतें. परंतु त्यांनाही काश्मीरमध्यें सैन्य उभें करतां आलें नाहीं. येथील लोक अतिशय शांत वृत्तीचे असून दुसऱ्यावर आक्रमण करण्याचा त्यांचा स्वभाव नाहीं. त्यामुळें सैन्यामध्यें भरती होण्याचें त्यांना आवडत नाहीं. अकबराच्या ताब्यांत हा सुभा असतांना या सुभ्यांत अफगाणिस्तानचा अंतर्भाव होत असे. त्या वेळीं या सर्व सुभ्यांत अकबरानें पांच हजार घोडदळ व ९२ हजार पायदळ ठेवल्याचें अबुलफजल सांगतो. सध्यां हा प्रांत इतका उजाड झाला आहे कीं, आक्रमकांना येथें कांहीं लभ्यांश सांपडण्याजोगा नाहीं.

रविवारीं २२ नोव्हेंबरला दरीचा पूर्वेकडील भाग पाहण्यासाठीं म्हणून मी सकाळींच सर्व लव्याजम्यासह निघालों. तख्त-इ-सुलेमान पर्वत ओलांडल्यावर आमच्या बोटी एका मोठ्या तळ्यांत आल्या. या तळ्याच्या मध्यभागीं एक छोटें परंतु सुंदर असें बुद्धाचें देऊळ आहे. या देवळांतील बुद्धाच्या मूर्ति फार सुंदर आहेत असें मला कळलें. आम्ही पुढें गेल्यानंतर एका भागांत वरेच झरे असून त्या झऱ्यांच्या पाण्यांत लोह व गंधक भरपूर असल्यामुळें त्यांतील उष्णतामान हवेपेक्षां अधिक असतें असें दिसतें. चोहीकडे बर्फानें पाणी गोठत असल्यामुळें सर्व काश्मीर दरींतील बेडकांची गर्दी येथें झालेली दिसली. गंधकाच्या पाण्यांत हिंडल्यामुळें त्यांचे शरीर सुंदर सोनेरी रंगाचें बनलेलें आहे. छोटे मासे, खेकडे आणि इतर कीटकहि ह्या पाण्यांतून हिंडतांना आढळले. पंपरपासून एका मैलावर एका टेकडीवर जुन्या नाश पावलेल्या देवळाचे प्रचंड दगड इकडे तिकडे पडलेले आढळले. मी बारकाईनें हे दगड पाहिले असतांना या दगडांत लोहाचा बराच भाग असल्याचें मला आढळलें. अशा एका दगडावर मी माझा हातोडा मारला, परंतु पहिल्या फटकाऱ्यासरशींच माझा हातोडा मोडून गेला. शास्त्रीय दृष्टया मी या दगडाची करीत असलेली पहाणी तेथील लोकांना थोडी चमत्कारिक वाटली. आज सकाळींच एक अधिकारी माझ्याकडे येऊन

रणजितसिगानें मला तुमची दिनचर्या लिहिण्यास सांगितलें आहे असें म्हणत होता. माझ्या प्रवासाची दिनचर्या अखबारमध्यें प्रसिद्ध करावयाची होती. या अधिकाऱ्याला लिहितां वाचतां येत नसल्यामुळें त्यानें एका ब्राह्मण पंडिताला माझ्याबरोबर पाठविलें. मी शिकार करीत असतांना, सरोवरांत मासे पकडीत असतांना, बोट वल्हवीत असतांना, किंवा येथील जमिनींचे शास्त्रीय दृष्टीनें परीक्षण करीत असतांना तो बारकाईनें माझ्यावर नजर ठेवी. येणाऱ्या जाणाऱ्या सर्व वाटसरूंना थांबवून व त्यांना अनेक प्रश्न विचारून मी माहिती काढण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं हा पंडित माझ्यावर नजर ठेवून मला काय काय म्हणून विचारीत असे. मी गंभीरपणें त्याला भलभलत्या थापा मारून तो रिपोर्ट रणजितसिगाकडे पाठवण्यास सांगितलें आणि त्यामुळें हा रिपोर्ट निश्चितच वाचण्याजोगा झाला होता. रिपोर्टांत काय घातलें असतां मला आवडेल असें हा पंडित मला नेहमीं विचारीत असे. शेवटीं त्याला बक्षिसी देऊन मी वाटेस लावलें. पंपरच्या या भागांत केशराचे मळे असल्यामुळें या भागाला फार महत्त्व आहे. माझ्याबरोबर मिर्झा अहमद नांवाचा एक इसम होता. मि. जेक्वीमाँटनें केलेल्या प्रवासाच्या वेळीं हा त्याच्याबरोबर होता. या त्याच्या कामगिरीबद्दल रणजितसिगानें त्याला काश्मीरमधील एक गांव इनाम दिलें. रात्रीं मी पंपरमधीलच एका घरांत मुक्काम ठोकला.

पंपरपासून कालव्यानें दहा कोस गेल्यावर वेंतीपूर (अवंतीपूर) नांवाची एक काश्मीरची जुनी राजधानी आहे. या ठिकाणीं अनेक पडके अवशेष असून त्यांत दोन बौद्धांचीं देवालयें विशेष आहेत. येथून जवळच एक टेकडी असून त्या टेकडीवर प्राचीन काळीं अतिशय परिश्रमपूर्वक तयार केलेली शेती आहे. वर जातांना निरनिराळ्या ठिकाणीं प्रचंड बांध घालून शक्य तेवढी जागा शेतीसाठीं तयार करण्यांत आलेली दिसली. वेंतीपूर ज्या वेळेला राजधानी म्हणून प्रसिद्ध होतें, त्या वेळीं काश्मीर दरींत किमान तीस लाख लोकांची वस्ती असावी. या जुन्या शहरांत व जवळपास एखादा खांब, पुतळा किंवा इतर कांहीं ऐतिहासिक अवशेष सांपडतो कीं काय म्हणून मी बारकाईनें पहाणी करीत होतों. येथील लोकांच्या माहितीप्रमाणें वेन नांवाच्या राजानें हें शहर बांधलें. काश्मीर दरींतील हा

शेवटचा हिंदुराजा होय. अजूनही येथील प्रजाजन मुसलमान झाले असून सुद्धां, लोकांत पसरलेल्या दंतकथांमध्यें, लोक एकमेकांना सांगत असलेल्या लोककथांमध्यें व स्त्रियांच्या गाण्यांतून या राजाची महती गायली जाते. हा राजा प्रजेकडून कधींहि वेठीनें काम करून घेत नसे. तो स्वतःच्या चरितार्थाकरितां गाडगीं मडकीं तयार करीत असे आणि त्याच्या बायका तीं गाडगीं मडकीं बाजारांत नेऊन विकीत असत. आपला खजिना तो गरिबांना पैसे वाटण्यासाठीं राखून ठेवीत असे.

या राजाविषयीं आणखीही एक दंतकथा प्रचलित आहे. पण ती अवास्तव वाटते, व त्या दंतकथेला इतिहासांत कांहीं आधारही नाहीं. या दंतकथे-प्रमाणें राजा वेनला मुसलमानी धर्मसंस्थापक महंमद पैगंबर याचें एक पत्र आलें. महंमदानें राजाला मुसलमानी धर्म स्वीकारण्याविषयीं त्यांत सुचविलें होतें. हा राजा शिवभक्त असल्यामुळें त्याला हें पत्र वाचून फार वाईट वाटलें, व तो 'गाग्रीवाल' सरोवराच्या कांठीं तीर्थाटनास निघून गेला. त्या ठिकाणच्या विहिरींत त्यानें तें पत्र फेकून दिलें. मुसलमानांचें राज्य काश्मीर-मध्यें झाल्यानंतर या विहिरीवर एक सुंदर मशीद बांधण्यांत आली, आणि या ठिकाणीं भाविक मुसलमानांची रीघ सुरू झाली. पंधराव्या शतकांत झैनलुब्दीन याच्या नेतृत्वाखालीं मुसलमानांनीं या दरींत पहिल्यांदा स्वारी केली. राजा वेनचा मुलगा राजा रतन याला बगदादहूनआलेल्या बुलबुलशहा नांवाच्या एका अवलियानें मुसलमान धर्माची दीक्षा दिली. यासंबंधीं आणखी सांगितली जाणारी दंतकथा म्हणजे हा अवलीया एका रात्रींत बगदादहून काश्मीरला आला व सर्व लोकांना मुसलमान धर्माची दीक्षा देऊन त्यानें इस्लामी संस्कृति एका दिवसांत या दरींत पसरवली ही होय. इतिहासाचा याला कांहीं आधार नाहीं हें सांगणें नकोच.

काश्मीरची आणखी एक जुनी राजधानी बिजबहार म्हणून होती. या ठिकाणीं पूर्वीं मोठें विद्यापीठ असावें म्हणून या शहराचें नांव 'विद्या-विहार' पडलें असावें, असें मला वाटतें. हें शहर काश्मीरमध्यें अजूनहि प्रसिद्ध आहे, व येथें भरपूर वस्ती आहे. मला या ठिकाणीं जरी कांहीं जुने अवशेष पहावयास सांपडले नाहींत तरी येथील बाजारांत मुसलमान पूर्व कालांतील कांहीं नाणीं मात्र मिळालीं. सर्व हिंदुस्थानांत एक विशेष

गोष्ट जर कोणती असेल तर लोकांना बाजाराविषयीं असणारें आकर्षण हें होय. सरदारांच्या घरीं किंवा दरबारांत जी माहिती मिळणार नाहीं ती बाजारांतील बनियांच्या बरोबर थोड्या गप्पा मारल्या असतांना सहज मिळते. जवळपासच्या बाजूंची समृद्धि किंवा दारिद्र्य, लोकांच्या सवयी व चालचलणूक, उत्पादन होणारीं धान्यें व इतर माल, लोकांचे पोशाख व आचारविचार, आणि समाजाची एकंदर परिस्थिति तेथें अगदीं थोडक्या काळांत उत्तम समजते.

'बिजबहार' पासून अर्ध्या मैलावर 'बादशहा' म्हणून एक बाग आहे. या बागेंत औरंगजेबचा थोरला नि दुर्दैवी भाऊ दारा रहात असे. २५ 'तारखेला आम्ही अनंतनाग हें हिंदूंचें पवित्र तीर्थ पाहण्यास गेलों. 'अनंतनाग' येथील पाण्याचा झरा एका काळ्या फत्तरांतून निघतो. अनंतनागचें आतां नवीन 'इस्लामाबाद' असें नांव ठेवण्यांत आलेलें आहे. 'राजतरंगिणी' या काश्मीरच्या संस्कृत ग्रंथांत अनंतनाग तीर्थाविषयीं एक दंतकथा सांगितली आहे. राजा 'नर' हा झेलम नदींत स्नान करण्यासाठीं जात असतां त्याला या ठिकाणीं कांहीं भुकेले नाग भेटले. त्यांनीं राजाला अन्न मागितलें असतांना राजानें स्नान करून येईपर्यंत थांबण्यास सांगितलें. राजाचा वेळ जाऊं नये म्हणून त्यांनीं आपल्या मंत्रसामर्थ्यानें त्या खडकांतून नदीचा प्रवाह सुरू केला, व त्या पाण्यांत राजाला स्नान करण्यास सांगितलें. हा चमत्कार पाहूनहि राजा पुढेंच निघाला. तेव्हां ब्राह्मणांनीं त्याला शाप दिला व शिवानें त्याचें रूपांतर नागांत केलें. खडकांतून वहाणारा हा अखंड प्रवाह अजूनही असाच चालू आहे. त्यावर आतां एक देऊळ बांधलें असून, आंतील पाणी प्रथम दोन कुंडांत पडून नंतर बाहेर येतें. देऊळ व कुंड यांच्यामध्यें बुद्ध, शिव आणि इतर देवतांच्या मूर्ती इतस्ततः पडलेल्या आहेत. त्यांतील कांहीं कित्येक फूट उंच असून अजूनहि त्या चकाकतात. अनंतनाग शहरांतील प्रशस्त बांधलेलीं घरें आतां ओसाड पडलेलीं आहेत. कोरीव, वेलबुट्टया काढलेलीं मोठमोठीं घरें आतां कोल्हे आणि घुबडें यांचीं आश्रयस्थानें बनलीं आहेत. डोंगराच्या पायथ्याशीं सुंदर व प्रशस्त झाडांच्या राईंत हें ठिकाण असल्यामुळें अतिशय सुंदर दिसतें. या ठिकाणीं असणाऱ्या झऱ्याच्या प्रवाहाचा उगम वीस मैलांवर एके ठिकाणीं आहे. बर्नियर या युरोपीय प्रवाशानें

ही गोष्ट पटवून दिली. मूळ प्रवाहांत गवताच्या कांहीं काड्या टाकून त्या पट्टणजवळ बाहेर निघाल्यामुळें लोकांची खात्री पटली. एका युरोपीय प्रवाशाची दंतकथा अशा दूरच्या प्रदेशांत प्रचलित रहावी हें पाहून मला फार आनंद वाटला. या ठिकाणीं कांहीं लेणीं असून तीं अंधारांत असल्या-मुळें कोणाला स्पष्ट दिसत नाहींत. येथील लोक आंत जाणें धोक्याचें समजतात. आंत जिन नांवाचा एक राक्षस रहात असून तो आंत गेल्यावर कोणाला बाहेर येऊं देत नाहीं असें सर्वजण बोलत होते. मीं बराच आंत गेलों होतों, पण आंतील अंधारामुळें व आंत रस्ता दिसत नसल्यामुळें मी परत फिरलों. या लेण्याच्या टेकडीवर बौद्धांचें एक छोटेसें सुंदर देऊळ अद्याप चांगल्या स्थितींत आहे. टेकडीवरून उतरून दुसऱ्या बाजूनें गुहेंत शिरण्याचा मी प्रयत्न केला. अंधार असल्यामुळें बऱ्याच मशाली पेटवून मी आंत निघालों. आंत छोट्या छोट्या निरनिराळ्या आकाराच्या खोल्या दिसल्या. एका खोलींत एक थडगें होतें, दुसऱ्या खोलींत मृत माणसाच्या शरीराचा सांपळा होता. वरून पाणी गळत असल्यामुळें जसजसें आंत जावें, तसतसा चिखल वाढूं लागला. सुमारें साठ पावलें गेल्यानंतर ही गुहा आंत संपलेली दिसली. माझा दुभाषी मोहन घाबरत घाबरतच आंत आला होता. पण या ठिकाणीं गुहा संपल्याचें पाहून काश्मिरी लोकांच्या अंधश्रद्धाळू स्वभावाचा त्यानें निषेध केला. येथील लोक ज्या गुहेंत कोणीहि जात नाहीं व जाऊं नये असें म्हणतात ती गुहा अशा रीतीनें मीं शेवटपर्यंत जाऊन पाहिली. मला अद्याप कौरव पांडव हें पवित्र ठिकाण पहावयाचें असल्यामुळें मी तिकडे निघालों. कौरव पांडव हें ठिकाण येथील एका जुन्या राज-घराण्याचा नांवावर पडलेलें आहे. पंडु राज घराणें इ. स. पूर्वी २६०० मध्यें होऊन गेलें. तें फार प्रसिद्ध असलें पाहिजे, कारण हिंदुस्थानांत सर्वत्र त्यांचा उल्लेख केला जातो. याहि ठिकाणाविषयीं बऱ्याच दंतकथा प्रचलित आहेत. जवळच्या पर्वतावरची शोभा मात्र फारच चांगली आहे. माझी वनस्पति आणि प्राण्यांविषयींची जिज्ञासा पाहून येथील लोकांनीं एक बारालिंगी किंवा हिमालयांतील सांबर आणून दाखविलें.

काश्मीरमध्यें प्रथमच बटाट्यांची लागवड करण्याकरितां म्हणून मी माझ्या बरोबर बटाट्यांच्या अनेक टोपल्या भरून आणल्या होत्या. इस्क

येथील नबाबाकडे त्याचप्रमाणें तिबेटमध्येंहि त्यांची लागवड व्हावी म्हणून आम्ही पत्रें व बटाटे दोन्हीकडे रवाना केली. या उपयुक्त पदार्थाची लागवड काश्मीरच्या दरींत आणि हिमालयाच्या शिखरावर व्हावी अशा हेतूनेंच मी हा पदार्थ माझ्या बरोबर आणला होता. आपलें नांव या स्थळीं कायम रहावें म्हणून मी माझ्या दोघा इंग्रज मित्रांना आणखीहि एक गोष्ट सुचविली. आपली व आपल्या अगोदर आलेल्या युरोपीय प्रवाशांचीं नांवें येथें एका शिलेवर खोदून ती येथील चारचुनार बेटांत एका लहानशा इमारतींत लावून ठेवावी अशी ती कल्पना होती. लगेच शिलालेखाचा खालील नमुना मी तयार केला.[१]

'काश्मीरमध्यें जम्मूकडून आलेल्या बारोन चार्लस ह्यूगेल, इस्कर्डूहून आलेल्या मि. जी. टी. व्हाईन आणि लडाखकडून आलेल्या डॉ. जॉन हेंडरसन या तीन प्रवाशांनीं १८ नोव्हेंबर १८३५ रोजीं त्यांच्या अगोदर आलेल्या प्रवाशांचीं नांवें व येण्याचा काल या शिलेवर कोरलेला आहे.

बर्नियर १६६३,
फॉर्स्टर १७८६,
मूरक्रॉफ्ट गुथरी आणि ट्रेबेक १८२३,
व्हिक्टर जॅक्वेमाँट १८३१,
जोसेफ वूल्फ १८३२.

या प्रवाशांपैकीं फक्त दोनच प्रवासी, म्हणजे पहिला आणि शेवटचा आपल्या मायदेशाला सुखरूप पोहोचले.'

आम्ही ही गोष्ट काजीच्या कानावर घातली असतां त्यानें सुभेदाराला विचारून मला सांगितलें कीं, महाराजा रणजितसिंगांच्या परवानगीवांचून

---

१ बारोन ह्यूगेलचा सहप्रवासी मि. व्हाईन यांनीं आपल्या प्रवासवृत्तांत या शिलालेखासंबंधीं दिलेल्या नमुन्यांत थोडासा फरक आढळतो. मि. व्हाईनचें संपूर्ण नांव Godfrei Thomas Vigne असें त्यांत दिलें असून शेवटीं तीन प्रवासी जिवंत राहिले असा उल्लेख आहे. या लेखाचा नमुना स्वतः लिहिला असल्यासंबंधीचा दावा दोघाहि प्रवाशांनीं केला आहे.

पहा : व्हाईनचें प्रवासवृत्त : भाग २ रा; पृ. १०८.

अशी गोष्ट करतां येणार नाहीं. मीं त्याला म्हटलें कीं, आम्ही नुसतें शिलेवर नांवें खोदून जातों. महाराजा रणजितसिंगानें परवानगी दिल्यासच ती ठरलेल्या स्थळीं लावली जावी. हें म्हणणें काजीनें कबूल केलें व मि. व्हाईन योग्य शिला मिळविण्याच्या कार्यास लागला.

मी दुर्मिळ वस्तू मिळविण्याच्या खटाटोपांत आहे असें पाहून गणेश पंडित नांवाचा एक काश्मीरी ब्राह्मण कागदाचें भेंडोळें घेऊन माझ्याकडे आला. काश्मीरचा इतिहास फारशीमध्यें यांत लिहिला आहे असें सांगून त्यानें तें भेंडोळें मला दिलें. मात्र कलियुगांतील ३९६६ वर्षांत ६९४० राजांनीं काश्मीरवर राज्य केलें व त्या राजांचीं नांवें त्यांत आहेत. अशा प्रकारच्या थापा तो मारीत होता. मी केवळ जिज्ञासा म्हणून तें भेंडोळें विकत घेतलें.

मि. व्हाईनला सांगितलेली कामगिरी पार पाडण्यासाठीं त्यानें वीस माणसांसह मि. मिचेल याला एका जुन्या मशिदींतून हवा असलेला दगड आणण्यास पाठविलें. या गोष्टीचा लोकांना सुगावा लागतांच त्यांनीं गर्दी करून मशिदींतून दगड बाहेर नेण्यास बंदी केली. इतकेंच नव्हे तर मशिदीचे पहारेकरी त्याला मारण्यास त्यांच्या अंगावर धावून आले. रात्रीच्या वेळीं कोणाला नकळत तो दगड आणण्याची परवानगी आम्ही सुभेदाराकडून घेऊन ठेविली.

निघण्यापूर्वी महाराजा रणजितसिंगाकडून मला देण्यासाठीं आलेला खिलात स्वीकारण्यासाठीं म्हणून सुभेदाराचें बोलावणें आलें. आम्हीं या समारंभाला गेलों व परत जातांना बारामुला घाटानें अटकवरून पंजाबांत मी जाणार असल्याचें सुभेदाराला सुचविलें. युरोपीय लोकांच्या पहाण्यांत तो रस्ता येऊं नये म्हणून शीख अधिकारी त्या बाजूला मुसलमान लुटारूंच्या टोळ्या प्रवाशांवर हल्ले करतात असें सांगत होता. मी सर्व अडचणींना तोंड देण्याची तयारी दर्शविल्यामुळें सुभेदारानें बोलणें बदललें.

डॉ. हेंडरसनचा एक नोकर लडाखहून आला व त्यानें नौबाक घाटांत बर्फवृष्टीमुळें घोडीं आणि सर्व चीजवस्तू खलास झाल्याची बातमी आम्हांला दिली. डॉक्टरांचे मनांत हिंदुकुश पर्वतांतून कोणीहि प्रवास न केलेल्या मार्गानें हिंडण्याची होती. अतिथंडीच्या व बर्फवृष्टीच्या या दिवसांत ही गोष्ट न करण्याचें मी त्यांना सुचविलें, पण डॉक्टरांचा हट्ट कायमच होता.

माझ्याजवळचे कांहीं कपडे, एक घड्याळ व इतर कांहीं जरूरीच्या वस्तू मी त्यांना दिल्या. नंतर कांहीं महिन्यांनीं आम्ही लाहोरमध्यें पुन्हां एकत्र येण्याचें ठरलें.

मशिदींतून दगड उचलल्याची वार्ता कळल्यापासून सर्व श्रीनगर शहर आम्हांस खावयास उठलें होतें. बाजारांतून आमच्या या चौर्यकर्माबद्दल निषेध व्यक्त करण्यांत येत होता. शीख अधिकारी मुसलमानांना दुखविण्यास नाखूष होते. तेव्हां शालीमार बागेंतून एक सुंदरसा काळा दगड आणून ३० नोव्हेंबरला आम्ही आमचें काम पार पाडलें.

दोन डिसेंबरला शालीमार बागेंतून आणलेल्या शिलेवर आम्ही एका शिल्पकाराकडून फारशींत तो शिलालेख खोदला. त्या शिल्पकाराला त्या-बद्दल तीस रुपये देऊन लाहोरहून परवानगी आल्यानंतर चारचुनार बेटांत तो व्यवस्थित ठेवण्याचें ठरलें. गेल्या कांहीं दिवसांत येथील लोकांना शिफारसपत्रें देण्याचें काम मीं करीत होतों. दोन डिसेंबरला डॉ. हेंडरसन आपल्या हिंदुकुश पर्वताच्या प्रवासाला निघून गेले. मी व आमच्या नोकरानें काश्मीरच्या बाजारांत लहान मोठी खरेदी केली. मीं उत्तम शाली खरेदी करण्याचा प्रयत्न करीत असतां येथील लोक किमतीबद्दल किती जिकीर घालतात याचा मला अनुभव आला. लुधियानाहून आणलेली माझी एक हुंडी येथें वटली व मी कलकत्त्याला एका व्यापाऱ्याला दिलेली हुंडी घेऊन एका व्यापाऱ्यानें लुधियानाला माल पाठविण्याचें कबूल केलें. पैशाच्या बाबतींत हिंदुस्थानांत युरोपीय लोकांच्या शब्दांवर व लिहिण्यावर लोक फार विश्वास ठेवतात. गुरुवारीं ३ डिसेंबर १८३५ ला दिलवरखान बागेंतून मी पुढील प्रवासासाठीं बाहेर निघालों. बरेच दिवस राहिल्यानें ती जागा सोडतांना आम्हांला फार दुःख झालें. सात बोटींतून आमचें सामान कालव्यांतून बाहेर निघालें होतें. अशा रीतीनें कांहीं दिवसांचा मुक्काम करून आम्ही पृथ्वीवरील नंदनवन असलेल्या या दरींतील सर्व सौंदर्यस्थळें पाहून शहराला व दरीला रामराम ठोकून परत निघालों. माझ्या बरोबर मि. व्हाईनही निघाले.

✦ ✦ ✦

प्रकरण ५ वें

अटकच्या वाटेवर

श्रीनगर शहरांत आणि जवळपास एक गोष्ट आमच्या विशेष लक्षांत आली. ऐतिहासिक दृष्ट्या एकाद्या शहराची पाहणी करण्यासाठीं म्हणून म्हणा किंवा भौगोलिक दृष्टीनें जमीन आणि फत्तर यांची तपासणी करीत असतांना म्हणा किंवा सौंदर्य दृष्टीनें एकाद्या पडक्या इमारतींतील दगडावर असलेल्या वेलबुट्टीचें परीक्षण करीत असतांना येथील लोक आम्हांला खुळचट किंवा वेडपट समजत असत. धार्मिक दृष्टीनें पुढच्या जीवनाचा विचार करणें किंवा ऐहिक दृष्टीनें असलेल्या संपत्तीचा उपभोग घेणें एवढ्या दोनच गोष्टी येथील लोकांना माहीत आहेत. झेलममधून बोटीनें प्रवास करीत असतांना वाटेवरील बोटीवरूनहि आम्हाला हाच अनुभव आला.

दोन तीन दिवस प्रवास केल्यानंतर आम्ही एका सरोवरांत आलों. येथून जवळच लंख नांवाचें एक बेट आहे. त्या ठिकाणीं बुद्ध कालांतील देऊळ उद्ध्वस्त स्थितींत आढळलें. शिकंदर नांवाच्या एका धर्मवेड्या मुसलमानानें या देवळाचा विध्वंस केल्याचें लोकांनीं सांगितलें. या देवळापासून सरोवरापर्यन्त एक सुंदर घाट बांधलेला आहे. मधल्या रस्त्यानें आम्ही बंदरपूरला जावयास निघालों. येथील ठाणेदार माझें स्वागत करण्यासाठीं आला होता. बंदरपूरच्या मलिकानें–याला काश्मीरचा मलीक अशीहि पदवी आहे–बोनीकर येथें माझें स्वागत केलें. येथील पद्धतीप्रमाणें गांवाबाहेर प्रशस्त झाडाखालीं गालिचे अंथरून सर्व लोकांसमोर हा स्वागत समारंभ झाला. अकबराच्या वेळीं हा मलीक या भागांतील एक प्रमुख अधिकारी व्यक्ति होती आणि दूरच्या दिल्लीस असलेल्या बादशहाचा अधिकार सोडला तर तो जवळ जवळ राजाच होता. त्यामुळें त्या वेळीं या मलिकाला आणि त्याच्या राजधानीस फार मोठें महत्त्व होतें. रणजितसिंगानें जवळपासचें सर्व जमीनदार व नबाब आपल्या पंजाखालीं आणल्यामुळें या मलिकाला व

त्याच्या अधिकाराला कांहींच अर्थ राहिला नाहीं. तरीहि अद्याप हें ठाणें ५०० शिबंदीचें आहे. माझ्या अगोदर डॉ. हेंडरसन नुकताच येथून गेल्याचें कळालें. फकिराच्या वेषांत तो येथून गेला असल्यामुळें त्याचें येथें चांगलेसें स्वागत झालें नाहीं. गांव सोडून आम्ही पुढचा मार्ग आक्रमीत असतां आम्हांला डोंगर चढून जावें लागलें. ननेवर पर्वत ६००० फुटांपेक्षां उंच असून वर सगळीकडे बर्फ पसरलें होतें. पर्वतावरून सकाळच्या वेळीं जातांना एकाद्या सुरीनें शरीर कापावें अशा तऱ्हेचा त्रासदायक थंडीचा मारा होत होता. माझें सर्व शरीर गोठून गेलें. मी उष्णतामापक यंत्रांत पाहिलें असतां उष्णतामान ३१ अंशावर होतें. थंडीमुळें डोकें इतकें भयंकर दुखत होतें कीं विचारण्याची सोय नाहीं. अशाहि परिस्थितींत थोडावेळ थांबून या ठिकाणीं पाणी कोणत्या अंशावर उकळतें हें पाहण्याची मला इच्छा झाली. कटोऱ्यांत बर्फ टाकून खालीं विस्तव टाकला पण भरपूर हवेच्या अभावीं बर्फाचें पाणी होऊन तें उकळण्याचे अभावीं त्याची वाफच होऊं लागली. बऱ्याच कष्टानंतर आम्हांला या ठिकाणीं १८८ अंशांवर पाणी उकळतें असें आढळून आलें. थंडीमुळें पाय फुटण्यापासून डोकें दुखण्यापर्यंत जो भयंकर त्रास माणसाला होतो, त्यामुळेंच काश्मिरी लोक डोंगराच्या वरच्या टोकांवर किंवा घाटांत बहुतेक प्रवाशांना त्रास देतात असें मला वाटतें. दुसरे दिवशीं संध्याकाळीं आम्हीं बारामुल्लाला पोहोचलों. एका मोकळचा धर्मशाळेंत आम्हीं आमचा मुक्काम ठोकला होता. दिल्लीकडील एक ब्राह्मण येथील ठाण्याचा मुख्य अधिकारी आहे. त्यानें माझें स्वागत केलें. या ठिकाणीं मला श्रीनगरकडून सुभेदार मेहनसिंगाचें पत्र मिळालें त्यांत त्यांनीं माझ्या प्रवासाची वास्तपुस्त करून सर्व प्रवास व्यवस्थित होत असल्याचें कळविण्याची विनंती केली होती.

डॉ. हेंडरसनहि याच रस्त्यानें पुढें गेले असून त्यांचेंहि पत्र मला येथेंच मिळालें.

मी ज्या धर्मशाळेंत बारामुल्लाला झोपलों होतों त्या धर्मशाळेंत पहाटें एका विचित्र गाण्यानें जागा झालों आणि उठून पाहतों तर एक म्हातारा शीख पुजारी मोठमोठ्यानें कांहींतरी म्हणत होता. माझ्या लक्षांत येऊन चुकलें कीं आपण झोपलों ती धर्मशाळा नसून शिखांचें गुरुद्वार आहे. या

ठिकाणीं शीख पुजारी वाटसरूंना आसरा देतात आणि त्यांनीं दिलेल्या देणग्यांतून आपला उदरनिर्वाह करतात. मी उठून पाहिलें त्या वेळीं गुरुद्वाराच्या समोर उघड्या जागेंत दगडाचा एक सुंदर ओटा बांधलेला मला दिसला. त्यावर तांबड्या आणि पिवळ्या रंगाचे रेशमी गालीचे पसरले होते. त्याचप्रमाणें कडेचे पडदेहि असेच सुशोभित होते. त्या ओट्यावर बर्फाप्रमाणें शुभ्र दाढी असलेला शीख पुजारी हातांतील पांढरी शुभ्र चौरी इकडून तिकडे फिरवीत होता. ही चौरी तिबेटी गाईच्या शेपटीच्या केसांची केलेली असून चौरीची मूठ चांदीची होती. त्याच्याजवळ एका कोनाड्यांत एक पणती मंदमंद तेवत होती आणि समोर ग्रंथसाहेब ठेवून त्यामधून तो पुजारी कांहीं कांहीं मोठ्यानें म्हणत होता. बाहेर थंडीचा कडाका मी म्हणत असतांना देखील हा म्हातारा गृहस्थ पहाटें चार वाजल्यापासून आपलें धार्मिक कृत्य करण्यांत गुंतला होता. क्षणाक्षणाला त्याच्याकडे इतर शीख येऊन बसत असत व योग्य तो सल्ला घेऊन परत जात असत. हें सारें दृश्य जणूं काय एक छोटा दरबारच भरला आहे असें दिसे. रात्रीं झोपतांना आपण एका धर्मशाळेंत झोपलों आहोंत या भावनेंत मी असल्यामुळें पहाटें हें दृश्य दिसून सुद्धां मला आपण स्वप्नांतच आहोंत असें वाटलें. परंतु त्याच्या गाण्याचा आवाज सतत चालूं राहिल्यामुळें मी उठलों व आपण पाहिली ही वस्तुस्थितीच आहे असें मला आढळून आलें.

बारामुलाजवळच असलेल्या एका हिंदूंच्या देवळांत एका राक्षसाचा दांत फार पुरातन काळापासून जतन करून ठेवलेला आहे, व तो तुम्ही जरूर पाहाच असा आग्रह मिर्झा करीत होता. म्हणून मी त्या देवळाकडे गेलों. तेथील ब्राह्मणानें जमिनीवर बंठक मारून एका पदार्थावर अनेक फडकीं गुंडाळून गांठोडी केलेला पदार्थ माझ्यापुढें ठेविला. प्रथम त्यासंबंधींची दंतकथा त्यांनीं मला सांगितली. " काश्यप नांवाचा एक ऋषि पूर्वी या दरींत रहात होता. देवीची आराधना करून तो येथें तपश्चर्या करी. जिन नांवाच्या एका दैत्यानें त्याला त्रास देण्यासाठीं त्याच्या कुचाळ्या करण्यास सुरुवात केली. काश्यपानें त्याला मुकाट्यानें दूर जाण्यास सांगितलें. परंतु तो जिन राक्षस त्याला त्रास देतच राहिला. रागाऊन काश्यपानें त्याला अशी एक जोराची थप्पड दिली कीं त्याचा एक दांत तेथें निखळून पडला

व तो राक्षस किंचाळत तेथून दूर निघून गेला. पडलेला तो दांत या देवळांत हजारों वर्षें जतन करून ठेविला असून आल्या गेल्या यात्रेकरूला आम्ही तो दाखवितों. " त्याची ती दंतकथा ऐकून माझी तो दांत पहाण्याची उत्कंठा अधिकच वाढली. तोंडानें कांहींतरी पुटपुटत हातानें वरचीं कापडें सोडीत सोडीत त्यानें तो दांत शेवटीं माझ्यापुढें ठेविला. माझ्या डोळ्याला हत्तीचा वरचा दांत तेथें दिसला. मी त्याला म्हणालों तुमची गोष्ट खरी आहे अशी मानली तर हा जिन राक्षस हत्तीच असला पाहिजे. अर्थात्‌च तेथें हजर असणाऱ्या सर्वांनीं एकमुखानें माझा निषेध करून तो दैत्याचाच दांत असल्याचें पुनः पुन्हा प्रतिपादन केलें.

बारामुला ही काश्मीरची सरहद्द आहे. झेलमच्या दक्षिण तीरावर पुलाजवळच म्हणजे पुंचच्या रस्त्यावर एक छोटासा किल्ला आहे. शहराजवळ असलेलें एक फाटक तेथून नवीन सरहद्द सुरू असल्याचें दाखवितें. या ठिकाणीं दोन टेकड्या अगदीं जवळजवळ आल्या असून यामधून जाणारा झेलम नदीचा प्रवाह आतांपर्यंतचा शांत मार्ग सोडून रुंदपणानें परंतु वेगानें धावत जातो.

बारामुलाला माझा एक तिबेटी बैल मरून पडला. आठवण म्हणून व हिमालयांतील प्राण्याचा एक नमुना म्हणून त्याचें डोकें कापून नेण्याचें मी ठरविलें. माझा आवडता नोकर जानकी याला तें काम सांगितलें. जानकी कधींहि उलट बोलणारा नव्हता. परंतु मी हें वाक्य उच्चारतांच तो एकदम म्हणाला, "वाटल्यास तुमच्यासाठीं मला जीव देण्यास सांगा पण ज्यामुळें माझी जात नाहींशी होईल असें मेलेल्या जनावराला हात लावण्याचें काम मला सांगू नका. " शेवटीं मी तें काम एका मुसलमानावर सोपविलें. एक दिवस झाला तरी तो मुसलमानहि आला नाहीं व बैलाच्या डोक्याचाहि पत्ता नाहीं. परंतु वाटेंत दुसरा एक मुसलमान मला अशाच एका मेलेल्या बैलाचें डोकें व कातडें नेत असल्याचें दिसल्यावरून मी त्याला तें एक रुपयास मागितलें. त्यानें स्पष्ट नकार दिला. शेवटीं दोन रुपये दिल्यानंतर तें कातडें व डोकें घेऊन तो आमच्या मुक्कामापर्यंत आला. हें सांगण्याचा माझा उद्देश परक्या देशांत अभ्यासकाला उपयुक्त अशा अनेक गोष्टी

आढळत असल्या तरी त्यांचा संग्रह करणें किती कठीण आहे हे दाखविण्याचा आहे.

माझ्याबरोबर आतांपर्यंत असलेला मिर्झा अहद हा मी वर सांगितलेल्या काश्मीर दरीच्या फाटकापर्यंत आला व मला परत जाण्यास निरोप मागूं लागला. निरोप मागताना इतक्या दिवसांच्या सहवासानें आमच्यांत आपुलकी उत्पन्न झाली असल्यानें त्याला वाईट वाटून तो मोठमोठ्यानें रडूं लागला. माझ्याहि डोळ्यांत अश्रु आले. जर कांहीं चुकलें माकलें असलें तर माफी असावी असें तो म्हणाला. त्यावर मी एवढेंच म्हणालों, "अच्छा है" मात्र या उत्तम माणसाचा सहवास आयुष्यांत आपणाला कधींहि मिळणार नाहीं म्हणून माझ्या मनाला दुःख झालें.


झेलम नदीच्या काठानें मी जात असतां पृथ्वीवरील नंदनवनांतून खालीं उतरून आपण आपल्या घराकडे जात आहोंत अशी जाणीव माझ्या मनांत उत्पन्न झाली. परंतु साता समुद्राच्या पलीकडे हजारो मैल दूर असलेली माझी जन्मभूमि मला कित्येक महिने दिसणें शक्य नव्हतें. घरीं जाण्याची उत्सुकता होती व एकेक पाऊल आपण घराकडे जात आहोंत ही जाणीव निराशेंतून आशेकडे नेत होती. काश्मीरकडे बघून जड अंतःकरणानें मी त्या दरीचा निरोप घेतला. माझ्या मनाला व शरीराला या प्रवासांत जो शिणवटा आला तो माझ्या प्रकृतीला झेपणारा नव्हता. विशेषतः अति थंडीमुळें मला फार त्रास झाला. हिंदुस्थानांत बरेच दिवस राहिल्यामुळें मला उष्णतेची संवय झाल्यामुळें, या थंडीमुळें माझे हातपाय फुटून मला लिहिणें व चालणें अशक्य झालें होतें. माझी रोजची रोजनिशी लिहीत असतांना मला माझ्या बोटांना घट्ट पकडून त्यांचेकडून काम करून घ्यावें लागे. आतां थंडी कमी झाली असल्यामुळें त्या मानानें माझा त्रास बराच कमी झाला होता.

बारामुलापासून दोन मैल गेल्यानंतर मला एक छोटेसें सरोवर व त्याच्या काठावर एक जुनें बुद्ध देवालय आढळलें. हें देवालय आतां उद्ध्वस्त झालेलें आहे. कांहीं मैल पुढें गेल्यानंतर मला तीन किल्ले आढळले. आतळगड, शंकरगड आणि मेसेकूर येथील हे किल्ले होत. लुटारू लोकांपासून या भागांतील लोकांचें संरक्षण करण्याकरितां हे किल्ले बांधलेले असावेत. मुनियारजवळ झेलम नदीच्या दुसऱ्या टोकाला उत्तम स्थितींत

असलेलें एक बुद्धधर्माचें देवालय मला दिसलें. मला तें पहाण्याची फार इच्छा होती. परंतु दुर्दैवानें त्या बाजूस जवळपास पूलही नव्हता. आणि प्रवाह इतक्या जोरांत वहात होता कीं, पुढें जाणें केवळ अशक्य होतें. शेवटीं मी लांबूनच त्याचें शिल्प पाहून समाधान मानून घेतलें. हें ठिकाण बंदरपूरपासून बाराशे फूट खोलीवर आहे.

दियानूनच्या उलट दिशेला एक बौद्धकालीन देवालय चांगल्या स्थितींत असलेलें मला आढळलें. हें देवालय काश्मीरमधील देवालयाच्या धर्तीवरच बांधलेलें आहे. हें इतक्या अडचणीच्या व उत्तम जागीं बांधलेलें आहे कीं यामुळेंच तें मूर्तिभंजकांच्या तावडींतून सुटलें आहे. येथून पुढें झेलम नदी शेंकडो फूट खालीं उडी मारीत असल्यामुळें खडकावर तिच्या प्रवाहाचा आवाज फार मोठ्या प्रमाणावर होतो. मध्यें एके ठिकाणीं नदीनें स्वतःसाठीं खडक फोडून बोगदा तयार करून घेतला आहे. नदी आतां शेंकडो फूट खालीं असल्यामुळें व वरचा खडक कायम असल्यामुळें हा एक नैसर्गिक पूलच तयार झालेला आहे. येथून जवळच उरीची मोठी धर्मशाळा आहे. जवळच एक मोठा दगडी पूल सध्यां पडक्या स्थितींत आहे. ही धर्मशाळा आणि हा पूल सध्यां पडक्या स्थितींत असले तरी पूर्वीं फार वापरांत असावेत असें मला वाटलें. या ठिकाणीं माझ्या मनांत एक असा विचार आला कीं हिंदुस्थानांतून काश्मीरला जाण्याचा पूर्वींचा रस्ता, राजेवर, उडी आणि बारामुला या गांवांवरूनच जात असावा. मला जर वेळ असता तर मी त्याचें जास्त संशोधन केलें असतें. या मार्गाचा एक विशेष असा कीं, पीरपंजाल ओलांडण्याचा त्रास वांचून सबंध वर्षभर प्रवास करण्यास हा रस्ता खुला आहे. आमचा रस्ता डोंगराजवळ पोहोंचला. त्याच्या पायथ्याशीं झेलम नदीनें वळण मारलें आहे.

या ठिकाणीं एका बाजूला घोरीगड आणि दुसऱ्या बाजूला उरीचा किल्ला आहे. मधून झेलम नदी गर्जना करीत वेगानें धावते या ठिकाणीं एक दोऱ्यांचा पूल तयार केला आहे. मी येथें उतरून मुद्दाम त्याचें सूक्ष्म निरीक्षण केलें. हा पूल तयार करणें व या पुलावरून पलीकडे जाणें या दोन्ही गोष्टी अतिशय अवघड व धोक्याच्या अशा मला वाटल्या. घोड्याची कातडी वळून त्याची एक घट्ट दोरी तयार करून, तीनतीन फुटांवर या



घोड्याची कातडी दोरीप्रमाणें वळून त्याच्या साहाय्यानें लोक झेलम नदी ओलांडीत असत. हा पूल सुमारें सहाशे फूट लांब असून तो ओलांडणें म्हणजे एक दिव्यच आहे. लोक ओझीं खांद्यावर टाकून यावरून लीलेनें येत जात असत.

कातड्याच्या दोरीच्या गांठी मारल्या होत्या. या गाठींचा दोरी लांब करण्याकडे तर उपयोग होतोच, शिवाय कातड्यावरून हात घसरल्यास गांठ धरण्यास फार उपयोगी पडते. खालच्या बाजूला चार फुटांवर पाय ठेवण्यास अशीच एक दोरी, असा हा पूल होता. खालची दोरी दूर जाऊं नये म्हणून वरच्या व खालच्या दोरीला मधून मधून बांधलेलें होतें. अनेकदां वापरले गेल्यामुळें व कातड्याचा दोर घट्ट रहाणेंच शक्य नसल्यामुळें आतां तो सैल झाल्यामुळें मध्यभागीं आल्यानंतर माणसाला झोके खावे लागतात. उतरतांना आणि चढतांना हातांत दोर घट्ट धरावा लागतो आणि पाय गांठीवरच पडेल याची काळजी घ्यावी लागते नाहींतर निसटण्याची भीति असते. या दोराचा उपयोग करतांना मन अत्यंत सावध असलें पाहिजे. कांहीं वेळेला उलटसुलट दिशेनें दोन माणसें येतात. त्या वेळीं अशा लोकांच्या अंगावर ओझीं असलीं म्हणजे तर अडचणींची व संकटांची कमाल होते. यावरून प्राणी जाणें अगदींच अशक्य आहे. माझ्या समक्ष एका माणसानें आपल्या पाठीवर बोकड लादून हा पूल ओलांडलेला पाहून सुद्धां मी हें म्हणत आहे. पुलाची लांबी सुमारें पांच सहाशें फूट असेल.

उरी किल्ल्यापासून उरी शहराकडे जातांना प्रवाशाला डोंगराच्या कडेकडेनें जावें लागतें. दर पावसाळ्यांत वरच्या दगडांची दरड खालीं कोसळल्यामुळें पूर्वींचा मार्ग बंद होतो. आणि नवीन मार्ग शोधावा लागतो. एका वेळेला एक मनुष्य किंवा एक घोडा जाईल एवढाच हा रस्ता आहे. कांहीं वेळेला आतां पुढें पाऊल टाकणें अशक्य आहे असेंही वाटतें. एखाद्या वेळेला आपला भार एकाद्या दगडावर पडून तो हलतो आणि आपलें पाऊल पुढें पडण्याचे वेळीं तो आपली जागा सोडून गडगडत खालीं दरींत उडी घेतो. कांहीं वेळेला वाटसरूला ठेंच लागून कित्येक फूट खालीं जावें लागतें. खालच्या दरींतून झेलम नदी घोगावत आपला मार्ग आक्रमीत असते. वरून खालची शोभा पाहिली असतां दरींतील नदीच्या मार्गाचा देखावा मन वेधून घेतो. मात्र बेसावधपणें जर पाऊल वांकडें पडलें तर झेलम नदींत त्याला जलसमाधि निश्चित मिळूं शकेल. रात्रीं मी शहाडेरा येथें मुक्काम केला. हें ठिकाण दियानूनपासून चौदा मैल असून येथें एक सुंदर दरवाजा असलेली मशीद आहे. या दरवाजावरील कोरीव काम काश्मीरला केलें आहे असें सांगतात.

शहाडेऱ्यानंतर मी माझा मुक्काम कथईला केला. माझ्या हातापायाचा त्रास अजून संपूर्ण नाहींसा झाला नव्हता. हाताची व पायाची कातडी फुटल्यामुळें मधूनमधून त्यांतून रक्त येत होतें. थंडीमुळें आतां माझ्या घशाला त्रास होऊं लागला. त्यामुळें माझें जेवणही जवळजवळ बंद झाल्यासारखें झालें. घशांतील हा त्रास कानापर्यंत वाढून शेवटीं मीं पुरा बहिरा झालों असल्याचें लक्षांत आलें. यावर उपाय म्हणून मी कॅलोमेलचे डोसावर डोस घेतले. संध्याकाळीं मला किंचितसें बरें वाटलें. कथईचा किल्ला चौकोनी असून त्याचे तट मातीचे आहेत. सुलतान जबरदस्तखान या नबाबाच्या ताब्यांत हा प्रदेश आहे. किल्ल्यावरील पहारेकऱ्याला सुलतान कोठें आहे म्हणून मीं विचारलें. परंतु सुलतान काश्मीरमध्यें कैदेंत असल्यामुळें त्यांना तो अपमान वाटला; त्यानें दरवाजा बंद करून आमच्यावर तोफा रोखल्या. माझे लोक घाबरले होते पण मीं त्यांना सांगितलें कीं, याला फारसें भिण्याचें कारण नाहीं. सकाळीं आमच्या बरोबर दिलेल्या पहाऱ्यांतील शीख जमादार किल्ल्याजवळून हिंडत असतां पहारेकऱ्यानें त्यास किल्ल्याजवळ पुन्हां न येण्याचें बजावलें. मीं ठाणेदाराला माझ्या भेटीला बोलावलें असतांना किल्ला सोडून येतां येत नाहीं, असें त्यानें उत्तर दिलें. शेवटीं मी किल्ल्याच्या दरवाजाजवळ स्वतः गेलों. ठाणेदार उतरून खालीं आल्यावर मी त्याला सांगितलें कीं, त्याच्या व त्याच्या नोकरांच्या माकडचेष्टा पाहून माझें मन त्याच्याविषयीं वाईट झालें आहे. इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीशीं किंवा रणजितसिंगाशीं माझा कांहींही संबंध नाहीं. चैनीखातर प्रवासाला निघालेला मी एक प्रवासी आहे. माझ्या बरोबरची शिखांची तुकडी माझ्यासारख्या प्रवाशाला संरक्षणाला म्हणून दिलेली आहे. स्वतःचे लोक घेऊन मला पुढच्या ठाण्यापर्यंत पोहोंचविण्याऐवजीं तुम्ही हें भलतेंच काय आरंभिलें आहे? माझ्या बोलण्याचा त्याच्यावर इतका परिणाम झाला कीं त्यानें मला किल्ला पहाण्यास आंत बोलाविलें आणि मीं नकार दिल्यानंतर मला पोहोंचविण्यास तो तंबूपर्यंत आला.

नंतर आम्ही सात कोसांवर असलेल्या हातीया या गांवीं आलों. येथें जवळच दोन किल्ले आहेत. हातीयाजवळ बकऱ्याच्या कातडीचा केलेला एक पूल मला दिसला. तो जवळ जवळ उरीच्या पुलासारखाच होता. तीन

दोरांचे (एकत्र आणून त्यांचें) अंतर कायम ठेवण्याकरतां लाकडांचे तुकडे येथें उपयोगांत आणलेले दिसले.

येथून जवळच पतियारा नांवाचें एक ठिकाण आहे. तेथील जमीनदाराला आम्ही सामानसुमान व धान्य मागितलें असतांना त्यानें अपमानपूर्वक आम्हांला नकार दिला. यावर आमच्या शीख पहारेकऱ्यांनीं त्याच्या घराजवळ जाऊन बंदुका रोखल्या. हें पाहून तो नबाब घर तसेंच उघडें टाकून पळून गेला. या प्रकरणांत माझा आवडता दुभाषी मुलगा मोहन आणि पहारेकऱ्यांचा प्रमुख शीख जमादार यांच्यांत कडाक्याचें भांडण झालें. मोहननें त्या शिखाला सकाळीं किल्ल्यांतील पहारेकऱ्यापुढें शेपटीं घालून निःशस्त्र माणसाच्या घरापुढें शूरपणाचा आव आणल्याबद्दल त्या शिखाचा कडक निषेध केला. या भांडणांत मोहननें त्याला एक चपराकही दिली. शीख पहारेकऱ्यानें माझ्याकडे हा मला भित्रा भागुबाई म्हणतो व यानें माझ्या तोंडांत दिली अशी तक्रार केली. मी त्याबद्दल मोहनला चांगलेंच जामलें. त्यावर तो उसळून म्हणाला कीं, हा जमादार नुसताच भित्रा नाहीं तर बदमाशही नाहीं काय? मी म्हटलें तसा तो असला तरी तुला त्याला तसें म्हणण्याचा अधिकार नाहीं व त्याच्या तोंडांत मारण्याचें तर मुळींच कारण नाहीं. त्यावर मोहन म्हणाला कीं, जर तो भित्रा नसता तर माझ्यासारख्या पोराला ठार मारण्याऐवजीं तुमच्याकडे तक्रार घेऊन कां आला असता?

मुझफराबादला आम्ही सोळा डिसेंबरला पोहोंचलों. या गांवाची लोकवस्ती २१०० असून त्यांतील सुमारें ७०० हिंदु आहेत. येथील नबाब सुलतान जबरदस्तखान मला भेटण्यास आला. सोनेरी वेलबुट्टी असलेला लोकरीचा झगा त्यानें घातलेला होता. त्याचा एकंदर वेश काबुलांतील पठाणासारखा होता. नांवाप्रमाणेंच तो जबरदस्त प्रचंड असूनही त्याचे डोळे अधु असल्यामुळें तो दुसऱ्याच्या आधाराशिवाय कांहींही करूं शकत नव्हता. सुलतानाचे एकूण अवयव, तो म्हातारा असूनही सुरेख व सुंदर होते. कमानीकृती भुवया, विशाल भालप्रदेश, किंचित् बांक आलेलें नाक व करड्या रंगाची लांबलचक दाढी त्याच्या एकंदर रूपाला शोभा आणीत होती. मला त्यानें डोळ्याच्या औषधासंबंधीं विचारलें व त्याच्यावर दारू कमी

घेणें एवढाच उपाय तूर्त मला सांगतां आला. त्याचा मुलगा नुकताच लढाईंत मारला गेला होता व नातू काश्मीरमध्यें ओलीस म्हणून ठेवण्यांत आलेला होता. बिचाऱ्याला आयुष्याच्या शेवटच्या वेळींही आपल्या नातवाला भेटण्याची बंदी होती.

मुझफराबाद शहर श्रीनगरपेक्षां १००० फूट खालीं आहे. काबूलहून काश्मीरला जाणाऱ्या राजरस्त्यावर हें गांव असल्यामुळें या गांवाला व येथील नबाबाला पूर्वीं फार महत्त्व होतें. किशनगंगा नदींतील होडींतून इकडून तिकडे जाणारीं माणसें जो कर देत असत त्याचेंच उत्पन्न पूर्वीं एक लाख रुपयांच्यावर असे. अलीकडे काश्मीरवर रणजितसिंगाचा तावा बसल्यापासून काबूल काश्मीरचें दळणवळण बंद झालें आणि जबरदस्तखानाचें उत्पन्न अगदींच कमी झालें. मुझफराबाद म्हणजे मुसाफिराबाद म्हणजेच प्रवाशांचें ठिकाण होय. या गांवाचें पूर्वींचें नांव शिक्री असें असून दोनशें वर्षांपूर्वीं मुसलमानांनीं गांवाचें नांव बदललें. येथें जी धर्मशाळा आहे ती शहाजहानच्या आज्ञेवरून अलिमर्दखान यानें बांधलेली आहे. ही धर्मशाळा चौकोनी असून अगदीं उत्तम स्थितींत आहे. या धर्मशाळेजवळच्या झाडींतच मी आपला तंबू ठोकला होता. येथें संध्याकाळीं तीन मुसलमान गुप्तपणें मला भेटावयास आल्याचें कळालें. आल्याबरोबर माझ्या पाया पडून ते माझ्यावर मलीक, मीर, हकीम, सरदार इत्यादि पदव्यांचा वर्षाव करूं लागले. मला त्यांचीं नांवें किंवा त्यांचा उद्देश यांपैकीं कांहींच कळेना. अर्धा तास त्यांचें बोलणें ऐकल्यानंतर त्यांच्या बोलण्याचा थोडासा अर्थ कळाला. ते सुलतान जबरदस्तखानाचे लोक असून त्याच्याच सांगण्यावरून त्याची वकिली करण्यासाठीं माझ्याकडे आले होते. मुझफराबाद शहराचें महत्त्व सांगून काबूल, सिंध, काश्मीर, या तीनही भागांवर येथून पहारा ठेवण्यासारखा आहे. जबरदस्तखानाच्या मनांत ईस्ट इंडिया कंपनीशीं मैत्री करावयाची असून त्यांत त्याला माझें साहाय्य हवें होतें. मी त्या लोकांना जबरदस्तखानाचें म्हणणें योग्य असून स्वत:चें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं त्याला इंग्रजांची दोस्ती करावीच लागेल असें म्हटलें, परंतु त्याच वेळीं माझा ईस्ट इंडिया कंपनीशीं कांहींही संबंध नसून रणजितसिंगाविरुद्ध इंग्रजांशीं दोस्ती करणें सध्यां धोक्याचें असल्याचें त्यांना

सुचविलें. जातांना त्यांना काय संशय आला कोणास ठाऊक? 'तुम्ही घेतला तो अर्थ आमच्या म्हणण्याचा नाहीं असें म्हणत ते निघून गेले.

मुझफराबादेहून आम्ही पुढें जात असतांना आम्हांला फत्तेगड नांवाचा एक किल्ला आढळला. हा किल्ला आतां मोडकळीस आलेला आहे. याच्या वरच्या टेकडीवर डूब नांवाचा एक घाट असून येथें पूर्वी लुटारू लोकांची वस्ती होती. रणजितसिंगाचा सरदार हरिसिंग नलवा यानें त्यांच्यावर चाल करून त्यांची ससे होलपट केली. जवळ वाढलेल्या गवतांत बरेच लुटारू लपलेले पाहून त्यानें गवताला आग लावून दिली आणि बाहेर पळून आल्यावर फौजेनें त्यांची कत्तल करून टाकली. तेव्हांपासून या घाटांतील दरोडेखोरी बरीच कमी झालेली आहे. माझ्याबरोबरचे शीख पहारेकरी माझ्या बरोबरचे सर्व बिगारी जाईपर्यंत त्या घाटावर होते. सध्यां या ठिकाणीं मोठ्या लवाजम्यासह जाणारीं श्रीमंत माणसें सुखरूपपणें पुढें जातात आणि एखादा दुसरा गरीब मनुष्य दरोडेखोरांच्या तावडींत सांपडतो.

रस्त्यांतून जातांना बहुतेक सर्व गांवीं आमचा लवाजमा दिसल्याबरोबर लोक शस्त्रासह जमा होत असत. त्यांना वाटे कीं लुटारूंची टोळी आली आहे व आमच्यांतील लोकांना वाटे कीं, हे आमच्यावर हल्ला करण्यास आलेले आहेत. मात्र प्रवाशांना लुटारूंची भीति या भागांत निश्चितच फार मोठी आहे. आम्हाला वाटेंत एक लाकडी पूल लुटारू लोकांनीं जाळल्याचें आढळून आलें. युरोपांत पुलाचें संरक्षण करण्यास जसे शिपाई असतात अशी कांहीं सोय येथें नसल्यामुळें लुटारूंना बिनबोभाट हें काम करतां आलें. रणजितसिंगाची सत्ता एवढी बलवान् असूनही त्याला या लुटारू लोकांवर अजून दरारा बसवितां येत नाहीं असें दिसतें. लुटारू लोकांच्या गोष्टी ऐकून मी एक कुकरी माझ्याजवळ ठेविली होती आणि मी निश्चय केला होता कीं, लुटारूंनीं आपणावर हल्ला करून पकडून नेलें, तर कैदी म्हणून जिवंतपणें त्यांच्याकडे जावयाचें नाहीं. डूब घाटांत माझा इंग्रज सहकारी मित्र व्हाईन घाट उतरतांना पडल्यामुळें पाय मुरगळून बसला. त्यामुळें माझा घोडा त्यास बसण्यासाठीं दिला. रस्त्यानें आम्ही मानसूरच्या किल्ल्याजवळ आल्याबरोबर किल्ल्याचे दरवाजे एकदम उघडून उत्कृष्ट पोषाख केलेल्या सैन्यासह कोठ्याचा ठाणेदार माझें स्वागत

करण्यास आला. पंधरा पंधरा फूट उंच भाले, चमचम करणारे हिंदी रेशमी कपडे, उन्हांत चमकणारी उघडी पातीं घेतलेलीं हत्यारें व ऐटींत घोड्यावर मांड घातलेले असे ते लोक मोठ्या ऐटींत रांग करून होते. त्यांच्याबरोबर मी जात असतांना माझ्या अंगावर काळा सूट असल्यामुळें आणि माझा साधा घोडा असल्यामुळें मी अगदींच फिका दिसूं लागलों. शीख लोक माझ्या त्या तट्टाकडे पाहून कुचेष्टेनें हसत. पण डोंगराचा अवघड चढ असो, कीं घाटाचा घसरता उतार असो, माझें तें तट्टू अशा काळजीनें चालत असे कीं, एकदांही त्याचा पाय निसटला नाहीं कीं मला खालीं पडावें लागलें नाहीं. मोठमोठ्या घोड्यावर बसलेले ते शीख मात्र अवघड उताराच्या वेळेला खालीं उतरत असत किंवा कित्येक वेळेला त्यांची घोडीं पडत असत. माझ्याबरोबर एक दिवस प्रवास केल्यावर मात्र माझ्या या तट्टाचा हा गुण पाहून त्याची चेष्टा करण्याचें त्यांनीं सोडून दिलें. मानसूर किल्ल्याकडून पुढें जात असतांना निम्म्या वाटेंत आम्हांला बुद्धाचा एक दागोबा दिसला. येथील लोक त्याला बुद्धच म्हणतात. या ठिकाणीं व्हाईन त्या दागोबाचें चित्र काढीत असतां शीख शिपाई आणि माझे मुसलमान नोकर यांच्यांत शिवीगाळ सुरू होऊन मारामारीचा प्रसंग उद्भवला होता. रात्रीं आम्ही आमचा मुक्काम नौशेर येथें केला. कल्पना नसतांना रात्रीं पाऊस पडल्यामुळें येथें आमची फार फजिती झाली. आमच्या बिछान्याखालीं पाणीच पाणी झालेलें होतें. पुढें जावें तर ओला तंबू आणि कपडे यामुळें दुप्पट ओझें. येथें रहावें तर सगळीकडे पाणीच पाणी आणि चिखलच चिखल. अशा लव्याजम्यासह पावसाळ्यांत प्रवास करतांना प्रवाशांना जो त्रास होईल त्याची कल्पना इतरांना येणें शक्य नाहीं. येथील हिंदु नोकर-चाकर अशा प्रसंगीं कांहींही तरतूद करून ठेवीत नाहींत, त्यांना वाटतें आपण जसे आपल्या साहेबाच्या अध्यीं वचनांत आहोंत त्याचप्रमाणें निसर्गही साहेबाच्या हुकुमाबाहेर जाणार नाहीं. मला पावसांत भिजल्याचें किंवा हालअपेष्टांचें जेवढें दुःख झालें नाहीं तेवढें दुःख एक दिवस वाया गेल्याचें झालें. मी माझा शेजारी व्हाईन याच्या तंबूंत जाऊन पहातों तर त्याचा बिछाना अशा रीतीनें पाण्यांत होता कीं जणू कांहीं तो पाण्यानें स्नानच करीत आहे. येथें एकाद्या वेळेस पाऊस पडल्यास वाटसरूंना पंधरा दिवस मुक्काम

करावा लागतो असें मला कळल्यावरून मी माझ्या नोकरांना दुसऱ्या दिवशीं तत्काळ पुढें चलण्याची आज्ञा दिली.

वाटेंत आम्हाला सालन नांवाचें एक गांव लागलें. या ठिकाणीं एक पिराचें थडगें असून मेलेल्या लोकांना येथें आणून पुरतात असें आम्हांला आढळून आलें. या थडग्यांतून कांहीं दिवे रात्रंदिवस जळतांना दिसून येत होते. कोटचाकडे जातांना आम्हाला किशनगडचा किल्ला लागला. हा किल्ला सालीक सराईपासून दोन मैलांवर दोर नदीच्या डाव्या तीरावर आहे. किल्ल्यापासून गांव अर्ध्या मैलावर असून हा गांव व किल्ला रणजितसिंगाच्या उत्कृष्ट सेनाधिकाऱ्यांपैकीं हरिसिंग नलवा याच्या ताब्यांत आहे. हा हरिसिंग पूर्वी काश्मीरचा सुभेदार होता तो परगांवीं गेला असला तरी माझ्या स्वागताची तयारी त्यानें चोख करून ठेविली होती. त्याचा दिवाण व मुलगा फाटक उघडून माझ्या सामोरे आले, आणि १०१ रुपयांची थैली मला नजर करून त्यानें मला रहाण्याचें आमंत्रण केलें. मी कोणाचीही भेट घेत नसल्यामुळें मी थैलीला हात लावून पैसे परत केले. हा मुलगा फार चुणचुणीत दिसला म्हणून त्याला त्याचें नांव विचारलें. मुलाचें वय दहा असून त्याचें नांव चत्तरसिंग असें होतें. त्याचें रूप खानदानी असून चेहेऱ्यावरील अवयव रेखीव होते. अंगावरील कपडयावर सोनेरी वेलबुट्टी असून डोकीवरील पागोटयांत त्यानें बगळयाच्या पंखांतील पिसें खोवलीं होतीं. एका मोठया आणि शुभ्र घोडयावर तो बसला असून त्याची बैठक फार ऐटींत होती. घोडयाचा लगाम सोन्याच्या तारेनें आणि कांचमण्यांनीं सुंदर वेलबुट्टी काढलेला होता. घोडयाच्या पाठीवर टाकलेल्या काश्मिरी शाली सुद्धां सोनेरी वेलबुट्टी काढलेल्या होत्या. मी पैसे घ्यावयाचे नाकारलेलें पाहून त्याला फार राग आलेला दिसला. पुन्हां एकदां थैली माझ्यापुढें करून त्यानें ती मला घेण्याची विनंती केली. इतकें करूनही मी ती घेत नाहीं असें पाहून त्यानें एकदम घोडयाचें तोंड वळवून माझा निरोप घेतला आणि 'मी लहान मूल आहे म्हणून साहेब माझ्या हातून नजर घेत नाहींत, मी जर मोठा माणूस असतों तर मी दिलेली नजर नाकारण्याची साहेबाची छाती नव्हती,' असें तो जाताजातां म्हणाला. त्या मुलाचा अपमान झाल्याचें पाहून मला वाईट वाटलें आणि मी

माझ्या मुनशीला त्याच्या पाठोपाठ पाठवून मी कोणाचीच नजर घेत नसल्यानें तूं रागावूं नकोस असा निरोप त्याला दिला.

किशनगडपासून अर्ध्या मैलावर हरिपूर नांवाचें शहर आहे. या शहराभोंवतीं मातीचा तट असून तो आतां ढासळत आहे. बाहेरून गांवाविषयीं विशेष चांगलें मत न होतांहि गांवांत आल्यावर मत बदलतें. रणजितसिंगाच्या राज्यांत प्रवेश केल्यापासून इतकें चांगलें गांव मी प्रथम पाहिलें. रस्ते माणसांनीं गजबजलेले असून गांवांतील दुकानें मालानें ठेचून भरलेलीं होतीं. रस्त्यानें जातांना माझ्या नोकरांपैकीं एकेक बाजारांत निसटूं लागला. कोणी दुकानाच्या कट्यावर चिलीम ओढीत बसला तर कोणी दुपारच्या जेवण्यासाठीं तिखट मसाला घेण्यास थांबला. कोणी हिंदूंच्या देवळांत प्रसाद वाटीत होते तिकडे धावले. पुढें जात असतांना रस्ता बदलण्याचे वेळीं कोणत्या रस्त्यानें जावें असें विचारण्यासाठीं मी इकडे तिकडे पाहून माझे नोकर शोधूं लागलों. पण नंतर माझ्या लक्षांत आलें कीं, माझ्या सर्व नोकरांनीं पोबारा केला असून माझ्याजवळ असलेला जमाव मला पहाण्यासाठीं म्हणून माझ्या मागें येत होता. तेव्हां गांवांतील एका झाडाजवळ मी थांबलों व घोड्याचा लगाम हातांत धरून माझे नोकरांपैकीं कोणीतरी येण्याची वाट पाहूं लागलों. गांवांतील लोकांचा मी एक कुतूहलाचाच विषय होतों. माझे नोकर आल्यानंतर मी पुढचा रस्ता शोधूं शकलों, दऱ्याखोऱ्यांतून आणि डोंगरांतून डोक्यावर ओझ्यांचे भारे घेऊन उन्हांत, पावसांत आणि थंडींत त्यांनीं माझ्यासाठीं वाटेल तेवढे कष्ट घेतले असल्यामुळें मी त्यांच्या या चुकीबद्दल त्यांना कांहीं बोललों नाहीं.

हरिपूरहून अटकला तीन रस्ते जातात. दोन रस्ते डोंगरावरून जातात. आणि तिसरा जरा लांबून पण डोंगर टाळून जाणारा आहे. सोयीसाठीं म्हणून आम्ही कोटा आणि हुसेन अब्दल या मार्गानें जाण्याचें ठरविलें. रस्त्यांत आम्हांला एके ठिकाणीं कांहीं गमतीच्या आणि चमत्कारिक गुहा दिसल्या. येथेंच मला रणजितसिंगाकडून एक पत्र मिळालें.

मी कोटा शहरांतून जात असतांना गांवांत एक उत्तम बांधलेलें घर मला दिसलें, म्हणून मी तें कोणाचें असावें याची चौकशी केली. तेव्हां तें 'फकीर' याचें असल्याचें समजलें. फकीर याचा अर्थ गरीब किंवा भिकारी असा असल्या-

मुळें मला या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. रस्त्यानें जातांना रेशमी भरजरी कपडे अंगावर घातलेला पालखींत बसून येत असलेला एक मनुष्य मी पाहिला. तोच हा फकीर असें मला सांगण्यांत आलें. फकीर या शब्दाचा अर्थ चुकला असेल म्हणून मी पुन्हा पुन्हा चौकशी केली, परंतु त्याचा अर्थ दरिद्री असाच आहे असें मला सांगण्यांत आलें. नांव व वस्तुस्थिति यांत केवढें हें अंतर ! आपल्या गांवीं फकीर असावा म्हणून गांवकऱ्यांची धडपड चाललेली असते व या फकिराला जेवढ्या सुखांत आपण ठेवूं तेवढा आपला नांवलौकिक होईल, मोठेपणा दिसेल या दृष्टीनें तेथील लोक त्याची बरदास्त राखीत असतात.

अकबरानें बांधलेली धर्मशाळा अगदीं पडक्या स्थितींत आहे. त्याचप्रमाणें जहांगीरचा राजवाडा येथून एक मैलावर आहे. परंतु तोही आज पडक्या स्थितींतच आहे. हुसेन अब्दल येथून नऊ कोस आहे, आणि तेथून अटक दोन दिवसांच्या अंतरावर आहे. अटक हें वायव्य सरहद्द प्रांतांतील हिंदी लोकांची वस्ती असलेलें शेवटचें ठिकाण आहे. आणि तें पहाण्याचा माझा निश्चय आहे.

माझ्याबरोबर श्रीनगरपासून आलेले एक प्रवासी महंमदशहा नक्षबंदी यांचें येथें थोडें वर्णन मला करावयाचें आहे. प्रवासांत मला त्यांच्या चांगल्या स्वभावाची व वागणुकीची प्रचीति आली. तो जवळ असल्यामुळें वाटेंतील मुसलमान माहिती सांगत असत. तो मुसलमान असला तरी अति उदार मताचा मुसलमान आहे. गंभीर तळमळीचा, धार्मिक वृत्तीचा, निर्भीड, परोपकारी आणि मर्यादाशील अशा गुणांचा समुच्चय म्हणजे हा महंमहशहा आहे. जरूर लागेल त्यावेळीं दुसऱ्यास मदत करावयाची दुसऱ्याच्या दुःखांत सहभागी व्हावयाचें आणि स्वतःचें दुःख परमेश्वरावर विश्वास ठेवून सोसावयाचें अशी नमुनेदार वागणूक या गृहस्थाची होती. अटकला जाऊन लगेच परत यावयाचें असल्यामुळें त्यांना तीन दिवसांची विश्रांति हवी होती, म्हणून मी पंचवीस तारखेला बरोबर पंधरा लोक घेऊन अटकला जाण्यास निघालों.


✦ ✦ ✦

प्रकरण सहावें

अटक व रावळपिंडी

अटक शहराचें महत्त्व विशेषतः तें सरहद्दीवर असल्यामुळें फार आहे. या ठिकाणीं पूर्वीं अफगाणी मुसलमान आणि हिंदी मुसलमान यांच्या चकमकी झाल्या, आणि अगदीं अलीकडे रणजितसिंग आणि अफगाण यांच्या चकमकी येथेंच घडल्या. रणजितसिंगाच्या फौजांनीं नुकतेंच या टोळी-वाल्यांना सिंधु नदीच्या पलीकडे घालवून दिलें आहे. रणजितसिंगाच्या मनांत खुद्द अफगाणिस्थानांतच जाऊन काबूल शहर जिंकावयाचें आहे. अफगाण लोकांना शिखांच्या विषयीं किती द्वेष वाटतो आणि ते शिखांना किती पाण्यांत पहातात हें अजून रणजितला कोणी सांगितलें नाहीं. नाहीं तर काबूलमध्यें आपणांला राजनिष्ठ कोणीच रहाणार नाहीं हें त्याला कळालें असतें. काबूलकडे जाण्यासाठीं जलालाबादपर्यन्तचा मुलूख शिखांनीं आपल्या ताब्यांत घेतलाही आहे. आणि माझी पक्की खात्री आहे कीं, रणजितसिंगाच्या ताब्यांत काबूल येण्यास दोनच गोष्टींचा प्रतिबंध होऊं शकेल. एक म्हणजे त्याचें मरण किंवा दुसरें म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचें बदललेलें धोरण. अटकला जातांना सुजानपूर येथील मसनवटीजवळ आम्ही मुक्काम केला. जवळ असलेल्या एका मशिदींत माझ्या नोकरांनीं एका फकिराच्या लाकडाच्या मोळीवर हल्ला करून विस्तवं पेटविला. पैसे देऊन लाकडें विकत मिळत नाहींत व थंडी तर सोसवत नाहीं यामुळें त्यांनीं निःसंकोचपणें फकिराच्या लाकडांवर हल्ला केला. फकिराला इतका राग आला कीं, गांवांतील लोकांच्या मदतीनें काठ्या, कुऱ्हाडी, भाले या आयुधां-सह माझ्या लोकांवर हल्ला करून त्यांनीं सर्वांना तेथून दूर पिटाळलें. त्यांनीं माझ्याकडे तक्रार करतांच मी त्याला लाकडाची किंमत देण्याचें कबूल केलें. परंतु तो पैसे घेईना व लाकडें माझीं मला परत द्या म्हणून भांडू लागला. शेवटीं मी लोकांना आपणाला जरूर तेव्हढीं लाकडें येथून घ्या असें सांगितलें व माझी माणसें लाकडें नेत असतांना तो फकीर एक चकार शब्द न काढतां मुकाट्यानें तें पहात राहिला.

सुजानपूर ते अटक हें अंतर सुमारें पांच कोसांचें आहे. शहरापासून सुमारें दीड मैलावर एक टेकडी असून त्या टेकडीच्या पलीकडे एक दरी आहे. या दरींत हिंदू लोक आपलीं प्रेतें जाळतात. अटकच्या पलीकडे फारशी हिंदु वस्ती नाहीं. तरीपण पेशावर व काबूल येथें कांहीं थोडे हिंदु रहातात. अटकच्या पश्चिमेकडे पूर्वी एक मोठें हिंदु साम्राज्य असलेंच पाहिजे यांत मला कसलाहि संशय वाटत नाहीं. अटकजवळ एक किल्ला असून त्या किल्ल्याजवळ अकबरानें बांधलेली एक धर्मशाळा आहे. कन्याकुमारीपासून अटकपर्यंत हिंदुस्थानचें एवढें मोठें साम्राज्य पायीं हिंडून पहाणारा मी पहिलाच युरोपियन आहे. मी जर पक्षी असतों तर माझें जर्मनींतील घर येथून सर्वांत जवळ होतें. रणजितसिंगाकडून आलेल्या कश्मीरसिंगाच्या नोकरानें मला किल्ला पहाण्यास बोलाविलें. कश्मीरसिंग हा रणजितसिंगाचा मुलगा असून त्याचा दिवाण दिल्लीकडील एक ब्राह्मण आहे. किल्ल्याच्या दाराशीं त्याचा दिवाण माझें स्वागत करावयाला आला. हा अतिशय म्हातारा असून इतरांच्या मदतीशिवाय त्यास उभेंहि रहातां येत नव्हतें. त्यामुळें मला 'तुमची प्रकृति ठीक आहे ना ? हा नेहमीचा औपचारिक प्रश्न त्याला विचारावासा वाटेना. त्यानें मला अटकमध्यें वाटेल तें पहाण्याचें व दाखवण्याचें कबूल केलें. किल्ल्याभोवतीचा खंदक चाळीस पन्नास फूट असून नदीच्या बाजूला पाण्याच्या पातळीच्या वर आठ फूट भिंती आहेत. या दिवाणजीला मला येथील सर्व तोफा पहावयाच्या आहेत असें मीं सांगितलें. येथें असलेल्या तोफा पितळी असून त्या लाहोरला ओतलेल्या आहेत. या तोफा आठ शेरी आहेत. त्यावर कांहींही कोरीव काम नसून उन्हांत तापून खालचीं लाकडें फुटूं नयेत म्हणून या तोफा सावलींत ठेवलेल्या आहेत. या तोफांची रचना आणि त्यांचे गाडे फार कुशलतेनें तयार केलेले आहेत. रणजितसिंगानें मला पेशावरपर्यंत जाऊन येण्याचें आमंत्रण दिलें होतें. परंतु मला परत जाण्याची घाई असल्यानें मी तें आमंत्रण नाकारलें. आम्ही बाजारांतून जात असतांना तेथें गर्दी करून उभीं असलेलीं माणसें आणि जनावरें यांच्यांत एकच गोंधळ माजला. गाढवानें लाथा मारावयास सुरुवात केली. घोडीं खिकाळूं लागलीं आणि दिवाणजीचा मोठा हत्ती पाहिल्यावर इतर सर्व जनावरें उधळून



अटक किल्ल्याच्या पायथ्याशीं कश्मीरसिंगाचा म्हातारा दिवाण सर्व साहित्यानिशी बारोन ह्यूगेलच्या स्वागतास येतांना –

दुसरीकडे गेलीं, आणि मालविक्री करणारीं माणसें जागच्या जागींच पण गोंधळलेल्या परिस्थितींत उभीं राहिलीं. येथील बाजारांत इराण काबूल-कडील सर्व पदार्थ मिळतात. त्याचप्रमाणें दिल्लीकडीलहि पदार्थ मिळतात. माझा चिटणीस ठाकूरदास हा या दिवाणजीकडे जेवावयास गेला.

आमचा किल्ला पाहून होतो न होतो तोंच कश्मीरसिंग आल्याची वर्दी मला दिली गेली. रणजितसिंगाचा हा मुलगा पंधरा सोळा वर्षांचा असून चेहऱ्यावरून अति हुषार दिसतो. दागिन्यांनीं मढविलेल्या पांढऱ्या घोड्यावर तो बसला असून रेशमाचें गुलाबी लांब जाकीट त्यानें घातलें होतें. मधल्या पट्टयांत दोन इंग्रजी पिस्तुलें असून एक कटचार होती. त्याची विजार पांढऱ्या व निळ्या रंगांच्या पट्टयांची असून पायाला त्या घट्ट आवळल्या होत्या. जोड्यावर सुंदर नक्षी काढलेली होती. त्यांनीं मला रहाण्याचा आग्रह केला आणि सर्व सोय करण्याचें आश्वासन दिलें. मी त्याचे भरपूर आभार मानून शेवटीं निरोप घेतला. आतांपर्यंत मला भेटलेल्या हिंदी माणसांत कश्मीरसिंग हा मला अतिशय हुषार असा वाटला. लहान वाक्यांत आपला आशय समजावून सांगण्याची त्याची हातोटी वाखाणण्या-जोगी होती.

दोन हजार वर्षांपूर्वी अलेक्झांडर-दि-ग्रेट आपल्या उत्कृष्ट सैन्यासह याच मार्गानें हिंदुस्थानांत आला होता. अलेक्झांडरच्या स्वारीचा हिंदु-स्थानावर काय परिणाम झाला असें माझ्या मनांत येऊं लागलें. आपल्या स्वारीनें या भागाला कांहीं फायदा देण्याऐवजीं त्यानें येथील लोकांची धुळधाण मात्र केली. हजारो लोकांच्या कत्तली झाल्या. असहाय लोकांवर अनेकविध अत्याचार झाले. शांतता व सुबत्ता नांदत असलेल्या प्रदेशांत युद्धामुळें अनन्वित अत्याचार होऊन लोकांचें जीवन उद्‌ध्वस्त झालें. अलेक्झांडरच्या पूर्वीं येथील माल युरोपांत आणून विकणारे साहसी व्यापारी हे अलेक्झांडरपेक्षां आणि विजयी सेनेपेक्षां अधिक चांगले असें माझ्या मनांत आलें. त्यांच्या व्यापारामुळें दोन देशांत दुवे सांधले गेले. युरोपांतील उद्धट-पणा कमी झाला आणि इतरहि अनेक चांगल्या गोष्टी घडून आल्या. दुर्दैवानें या प्रदेशांत गेलीं आठशें वर्षे धर्मवेडे आणि क्रूर, रानटी टोळीवाल्यांचा

नंगा नाच चालू असून धर्माच्या नांवाखालीं त्यांनीं या प्रदेशांतील लोकांना त्राहि भगवन् करून सोडलें आहे. येथें असलेलें शिखांचें राज्य लौकरच इंग्रजांच्या ताब्यांत जाऊन त्यांच्या प्रचंड साम्राज्यांत या भागाची भरती होऊन येथें एकछत्री अंमल लौकरच सुरू होईल.

हुसेनअब्दल येथें असलेली जहांगीरची बाग व त्यानें बांधलेला राजवाडा पहाण्यास मी नंतर गेलों. हा राजवाडा जरी उद्ध्वस्त झाला असला तरी भरपूर लांब व रुंद असा तो असला पाहिजे. येथें जवळच तीन सुंदर झरे असून या झऱ्यांमुळें तेथें राजवाडा बांधला गेला असला पाहिजे. या राजवाड्याला व बागेला येथें 'वा' असें म्हणतात. मी परत आलों असतांना मला हव्या असलेल्या जिनसा ब्रँडी, बिस्किटें लुधियानाहून आल्याचें मला कळालें. चपातीऐवजीं बिस्किटें, चहा, कॉफी ऐवजी दारू, धुरकट चिमण्या ऐवजीं मेणबत्त्या आणि येथें मिळत असलेल्या मांसाऐवजीं जर्मनींत तयार केलेलें सूप व इतर जिनसा मिळाल्या होत्या याचा मला आनंद झाला. शेख हुसेनअब्दल नांवाच्या एका अवलीयावरून या गांवाला हुसेनअब्दल असें नांव पडलें. त्याचें येथें थडगें आहे. हा अफगाण असून कंदाहारला बाबा वली नांवानें प्रसिद्ध असून त्याचा तेथें मोठा उरूस भरतो. तो गेल्यानंतर एका फकिरानें त्याची ही जागा घेतली. डोंगरांतून निघालेल्या एका झऱ्याचे काठीं अवलीयानंतर तो फकीर राहिला. गुरुनानक या रस्त्यानें जात असतांना उन्हामुळें दमला असतां व तहान लागली असतांना या झऱ्यावर येऊन फकिरास पाणी मागूं लागला. तो मुसलमानी धर्माचा नसल्यामुळें फकिरानें त्यास पाणी दिलें नाहीं. नानकानें रागावून ज्या खडकांतून झरा येत होता त्या खडकावर हात ठेविला, आणि झऱ्याचें पाणी बंद झालें, आणि त्या खडकावर नानकाचा हात उमटला. शीख लोक येथील राजे झाल्यानंतर त्यांनीं तो हात उमटलेला खडक उचलून धर्मशाळेंत आणून ठेविला आहे. आणि धर्मशाळेची शोभा वाढविली आहे. या ठिकाणीं शिखांचा गुरु दररोज सकाळीं आपला ग्रंथसाहेब वाचतो. मी या धर्मशाळेंत जाऊन प्रत्यक्ष पाहिलें तेव्हां माणसाचा हात उमटलेला दगड तेथें असल्याचें मला दिसलें. पूर्वींच्या काळीं काबूलहून हिंदुस्थानला येतांना हुसेनअब्दुलवरून लाहोरला येत असत. येथें सहासहा कोसांवर सराया किंवा धर्मशाळा बांधलेल्या आहेत.

रावळपिंडीजवळ स्वान नांवाची एक नदी येते. या ठिकाणच्या ठाणेदारानें मेवामिठाईचे एकवीस पेटारे पाठवून माझें स्वागत केलें. त्यांनीं भेटीदाखल मला रुपयांनीं भरलेली एक थैलीहि दिली. रावळपिंडी हा किल्ला आहे असें लोक समजतात. परंतु मला तर या गांवाला तट किंवा गांवकूसहि दिसलें नाहीं. येथें लोकवस्ती भरपूर असून बाजारहि चांगला आहे.

युरोपीय प्रवासी अशा भागांतून हिंडण्यांत फार फायदा आहे. इतिहासाच्या कित्येक अज्ञात गोष्टी त्यांच्यामुळें जगाला कळून येतील. मी आल्यानंतर अलेक्झांडरच्या हिंदुस्थानांतील स्वारीविषयीं मला विशेष माहिती मिळाली. आतांपर्यंत न कळलेल्या कित्येक गोष्टी मला कळल्या.

युरोपीय प्रवासी हिंदुस्थानांत आल्यानंतर त्यांना सर्वच गोष्टी नवीन वाटतात, व ते त्यांची खूप खोलवर चौकशी करतात. पण साधारणतः त्यांची ती जिज्ञासा लौकरच कमी होते व नंतर ते कांहीं गोष्टींत खोल शिरण्याचा कंटाळा करूं लागतात. एका इंग्रज गृहस्थाला दिल्लीच्या बाजारांत धड हिंदू पद्धतीचे नाहींत, धड मुसलमानी पद्धतीचे नाहींत असे कांहीं पैसे मिळाले. बारकाईनें पहाणी केली असतां तीं नाणीं ग्रीस देशांतील नाण्यांप्रमाणें नक्कल केलेलीं किंवा मुळांत ग्रीस देशाहून आलेलीं असावींत असें वाटलें. यामुळें युरोप आणि आशियाचे संबंध जुळविण्यास व मध्य आशियाचा इतिहास तयार होण्यास केवढें साधन उपलब्ध झालें बरें ! अशा नाण्यांचा संग्रह युरोपीयांनीं मोठ्या प्रमाणावर केलेला आढळतो. जेथें तसा संग्रह झालेला नाहीं तेथें तर हीं नाणीं वितळवलीं जाऊन इतिहासाच्या दृष्टीनें कायमचींच नष्ट होतात. बॅक्ट्रियांतील चांदीसोन्याचीं नाणीं सांपडलीं तो पट्टा स्वान आणि सिंधु नदीच्या मध्यभागीं आहे. मी ग्रीक लेखकांनीं लिहिलेले इतिहास वाचले असून आतां माझें असें मत झालें आहे कीं, पूर्वीच्या तक्षशिलेवर किंवा त्याच्या जवळपासच रावळपिंडी शहराची उभारणी झाली असावी. या पट्ट्यांत अजूनही हीं नाणीं सांपडतात. गंगेच्या काठीं कनोज या ठिकाणींही हीं नाणीं सांपडतात. पंजाबमध्यें अलेक्झांडरच्या सेनापतीचें राज्य कांहीं दिवस टिकलें, किंवा सोनेंनाणें व जडजवाहीर येथें विकत घेण्यासाठीं त्यांनीं तीं दिलीं याविषयीं माझें मत तयार झालें नाहीं. बॅक्ट्रियन नाण्याला येथें 'सीताराम' पैसे असें म्हणतात. अशीं बरींच नाणीं मी येथें खरेदी केलीं.

माझ्या बरोबरच्या बिगाऱ्यांनीं पुढें येण्यास नकार दिल्यामुळें मला पुढें निघण्याची पंचाईत वाटली. ठाणेदारावर दाब आणून मी येथील लोकांकडून वेठीनें काम करूं शकतों. सुभेदारापासून ते वाटेंतील गांव कामगारापर्यंत सर्वांनीं माझी चांगली सोय पहावी अशा तऱ्हेच्या आज्ञा त्यांना रणजितसिंगाकडून आल्या होत्या. त्यांनीं माझ्या सोयी पाहिल्याबद्दलचें प्रशस्तिपत्रक रणजितसिंगानें मागितलें असल्यामुळें मला खूष करण्यासाठीं ते बिगारीच काय, पण मी घेतल्या असत्या तर मोठमोठ्या देणग्याहि देण्यास तयार होते. दुपारीं बारा वाजतां सर्व तयारी होऊन मी पुढें निघालों. मी पुढें जाऊन माझें सामान मागाहून येणार होतें. माझा मुनशी आल्यानंतर मला असें कळालें कीं, रावळपिंडीवरून आलेल्या बिगाऱ्यांनीं माझें सामान वाटेंतच फेकून देऊन पोबारा केला होता. त्याच दिवशीं रात्रीं पाऊस पडत असल्यामुळ आमचे तंबूंतील सर्व सामान भिजलें आणि माझी फार फजिती झाली. लाहोरला लौकर जाण्याचें माझें स्वप्न अनेक अडचणींमुळें सारखें भंगत होतें. ३१ डिसेंबर १८३५ च्या रात्रीं पावसांत भिजत असतांना माझ्या मनांत अनेक विचार येत होते. माझा इंग्रज मित्र व्हाईन हा त्याच्या तंबूंत जवळजवळ पाण्यांत पोहण्याच्या स्थितींतच पडला होता. आणि शहा नक्षबंदी त्याच्या तंबूंत कुडकुडत पडला होता. त्या दोघांनाहि मी माझ्या तंबूंत बोलाविलें; पण शहाला त्याच्या तंबूंतून माझ्या तंबूपर्यंत येण्याचीहि शक्ति नसल्यामुळें तो मात्र तेथेंच पडून राहिला.

या वर्षाच्या शेवटच्या दिवशीं नियोजित सर्व भाग पाहून मुंबईच्या समुद्र कांठावर मुक्काम करण्याचा माझा विचार होता; परंतु प्रवासांतील नानाविध अडचणींमुळें माझा हा बेत ढासळून गेला; बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे ३१ डिसेंबर १८३४ ला मी मॅनिलाहून कँटनला प्रवास करीत होतों. गेल्या वर्षांत मी काय काय पाहिलें याची मी आठवण करूं लागलों, अत्यंत प्राचीन, निसर्गसौंदर्यानें समृद्ध आणि एके काळीं सुधारणेंत अग्रभागीं असलेले चीन आणि हिंदुस्थान हे दोन प्रचंड देश गेल्या वर्षांत माझे पाहून झाले होते. महासागराच्या काठापासून पसरलेल्या, चीनच्या पूर्व भागापासून तों हिमालयाची सरहद्द असलेल्या पश्चिम चीनपर्यंत म्हणजे तिबेटपर्यंतचा प्रवास मी अनेक मार्गांनीं आणि

अनेक तऱ्हांनीं केलेला होता. पाहिलेल्या प्रदेशाचा नकाशा माझ्या डोळ्यांसमोर सरकूं लागला. सुलतानाची सत्ता नामशेष होऊन युरोपीयांच्या ताब्यांत असलेले व वाढती लोकवस्ती होत असलेले सिंगापूर, पेनांगचें समृद्ध बेट युरोपीयांच्या आपापसांतील भांडणांमुळें प्रसिद्ध असलेलें मद्रास शहर, मोठमोठे राजवाडे असलेलें कलकत्ता शहर, प्राचीन काळीं ब्राह्मणांच्या आधिपत्याखालीं असलेलें परंतु ऐश्वर्य जेथें कमी होत आहे तें बनारस शहर, एके काळीं समृद्ध असलेलीं भव्य आणि प्रचंड आणि आतां मोडकळीस येऊनहि मोठेपणा टिकविणारीं, अलाहाबाद, औध, आग्रा, ग्वाल्हेर आणि दिल्ली या सारखीं शहरें,पृथ्वीवरील अत्युच्च शिखरें असलेला हिमालय, अतिशय सुंदर पण आतां उदासीन दिसणारी काश्मीर दरी, प्राचीनकाळीं प्रसिद्ध असलेलें तक्षशिला शहर आणि आतांचें अटक, हीं सर्व शहरें व हा भाग मी माझ्या दृष्टीखालीं घातला. या वर्षाच्या प्रारंभींला मी समुद्रांत वादळाचे तडाखे खात होतों आणि वर्षांच्या शेवटीं मी थडग्यांत पडून आहे. या ऐहिक जगांतील सुरुवात आणि शेवट यांचें हें केवढें वास्तववादी चित्र आहे !


नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशीं मुसळधार पाऊस पडला आणि मी एकट्यानेंच त्याचें स्वागत केलें. मी ज्या पडक्या जागेंत रहात होतों त्या ठिकाणीं कांहीं दिवसांतच कोल्ह्यांचीं भुयारें किंवा तरसांचे निवासस्थान होऊन पूर्वीच्या सर्व खाणाखुणा बुजून जातील. पडक्या भिंती आणि गोल बुरूज यांमध्यें असलेल्या या जागेंत माझ्या लिखाणाचा मागोवा घेऊन जर कोणी येऊं पाहील तर या कोंदट जागेंत दमछाट झाल्यामुळें इतक्या जिगाऱ्यांना घेऊन हा युरोपीय येथें राहिला कसा याचें त्यांना आश्चर्य वाटेल, पण रस्त्यांत टाकून दिलें गेलेलें माझें सामान परत येण्यास एक दोन दिवस लागल्यामुळें मला या सणाच्या दिवशीं सुद्धां येथें रहाणें भागच होतें. पुढचा मुक्काम मणिक्याला येथें करून सर्व सामान आणि कपडे वाळण्यासाठीं तेथें एक दिवस घालविण्याचें मीं ठरविलें. थंडीमुळें शहा नक्षबंदी अगदीं कुडकुडत होता.त्याला पिण्यास आणि अंगाला चोळण्यास मी ब्रँडी दिली. पण सच्चा मुसलमान असल्यानें तो ती घेईना. दिवसभर प्रवास करून प्राचीनकाळीं अगदीं प्रसिद्ध असलेला मणिक्याला तोफ किंवा बुरूज या ठिकाणीं आम्ही पोहोंचलों. येथें असलेला बुद्धांचा दागोबा बहात्तर फूट

उंच आणि साडेचारशें फूट परिघाचा आहे. हे दागोबा फार मजबूत बांधणीचे असून त्यांच्यावर एक घुमट असतो. बुद्धाचा किंवा त्याच्या शिष्यांपैकीं कोणाचा एखादा अवशेष, दांत, किंवा इतर कोणताहि अवशेष जमिनींत पुरून त्यावर हा दागोबा बांधतात. दागोबाजवळच एखादा विहार किंवा देऊळ असतें. या दागोबाजवळही पश्चिमेच्या बाजूस असा विहार बांधलेला असावा. एका चौकोनी इमारतीचा उत्कृष्ट पाया तेथें अजून टिकून आहे. यावरून या ठिकाणीं पूर्वीं विहार असावा. जमिनीपासून सुमारें चौदा फूट जेथून घुमट वर चढविला आहे. तेथें इमारतीला एक कंगोरा आहे. रणजितसिंगाच्या सैन्यांतील जनरल व्हेंतुरा (Ventura) या सैन्याधिकाऱ्यानें या दागोबांत जाण्याचा मार्ग शोधून काढला. अगदीं वरून चौकोनी बारा फूट अशी एक विहीर आंत जाते. ही विहीर मध्यंतरीं दगडानें भरून गेली होती. ही विहीर उकरीत असतां अगदीं खालच्या तळांत भक्कम बांधलेल्या एका कोनाड्यांत एक सुवर्णपात्र आढळलें. या पात्रांत कांहीं द्रव्य आणि कांहीं बौद्धकालीन नाणीं होतीं. या संबधींचें वर्णन एशियाटिक जर्नलमध्यें जेम्स प्रिन्सेप्ट यानें केलेलें आहे. येथील लोकांच्या सांगण्यावरून ही विहीर उकरण्यास पांचशें मजुरांना एक महिना खपावें लागलें. हें ठिकाण रावळपिंडीपासून दहा कोसांवर आहे. मणिक्यालापासून पुढें प्रवास करीत असतां वाटेंत एक धर्मशाळा लागली. मी पूर्वीं म्हटल्याप्रमाणें काबूल ते दिल्ली या रस्त्यावर वाटेंत ठिकठिकाणीं अशा प्रचंड सराया किंवा धर्मशाळा आहेत. सध्यांच्या रस्त्यावरच अशा धर्मशाळा आहेत असें नाहीं. पूर्वींचा कच्चा रस्ता या धर्मशाळांवरूनच जात असावा. पंजाबमध्यें पावसानें रस्ते बुजून जातात आणि नंतर नवीन रस्ते सुरू होतात.

जानेवारीच्या चार तारखेला आम्ही मकरेलीच्या मुक्कामावरून पुढें निघालों. वाटेंत आम्हांला पेशावरकडे निघालेल्या शिखांच्या दोन बटालियन्स भेटल्या. हे शीख जवान उत्कृष्ट प्रकृतीचे आणि सुंदर पोशाख घातलेले असे होते. त्यांच्या अंगावर लांब निळे कोट असून डोक्यावर निळीं पागोटीं होतीं. रस्त्यानें जातांना ते अगदीं शिस्तींत जात होते. त्यांच्या पाठीमागून बाजारबुणगे, तंबू आणि राहुट्या घेऊन व्यवस्थित जातांना दिसले. सैन्यापाठीमागून सुमारें बारा स्त्रिया जात होत्या.

बिसंतुर (Bisentaur) आणि मकरेली यांच्यामधून काहन नदी वळसे घेत जाते. तिच्या कांठावर रोटसचा एक मजबूत किल्ला आहे. या किल्लयाचे तट नदीच्या काठापासून वर उभारले असून मुख्य दरवाजा सुमारें दोनशें फूट उंच आहे. वर पाहिलें असतां या दरवाजाचा वरचा भाग जणूं कांहीं आकाशांतच ओढला आहे असें दिसतें. प्रवेशद्वाराप्रमाणेंच किल्लयाचे इतर भागहि भव्य आणि प्रचंड आहेत. हा किल्ला हुमायुनाचा पराभव करून शेरशहा लोदी या पठाणानें बांधला असें दुसऱ्या दरवाजावर असलेल्या आणि १५४५ सालीं खोदलेल्या अरबी शिलालेखावरून कळतें. किल्लयाच्या आंतील इमारती आतां मोडकळीस आलेल्या आहेत. जनरल व्हेंतुरा यांनीं एका जमादाराला माझ्या स्वागतासाठीं पुढें पाठविलें होतें. त्याच्याकडून मी येथें येण्यापूर्वींच सरपणाची व इतर व्यवस्था उत्तम झाली होती. हें सांगण्याचें कारण म्हणजे वाटेंत आम्हांला सरपण मिळविण्यास अतिशय कष्ट पडत व कित्येक वेळेला थंडींत आणि पावसांत आम्हांला शेकोटीविना कुडकुडत उपाशीं निजावें लागे. हा किल्ला बांधण्यास तीन वर्षें लागलीं व दीड कोट रुपये खर्च झाला असें येथील किल्लेदारानें मला सांगितलें. फेरिस्तानें खिस्ती शकापूर्वी चार शतकें रोटसला एक अजिंक्य असा किल्ला असल्याचें आपल्या इतिहासांत लिहून ठेवलें आहे. यावरून हा किल्ला बराच जुना असावा असें वाटतें.

येथून आम्ही वजिराबादला जाण्यास निघालों. त्या ठिकाणीं जनरल व्हेंतुरानें एक चार घोड्यांचा रथ माझ्यासाठीं तयार ठेविला होता. रणजित-सिंगाकडून आलेले वाटाडे मला रस्ता दाखवीत होते. एकतीस कोसांचा प्रवास पांच दिवसांत करावा असें इतरांचें म्हणणें होतें. वाटेंत आम्हांला मिठाचे डोंगर आढळले. रोटसपासून पांच कोसांवर झेलम नांवाचें एक महत्त्वाचें शहर असून येथील रस्ते अरुंद असले तरी अतिशय स्वच्छ आहेत. या शहरांत पाण्याचा उकळण्याचा बिंदु २११ आहे. शहरांतील लोक मोठ्या संख्येनें मला सामोरे येऊन त्यांनीं मला रात्रीचा मुक्काम आपल्या गांवांत करण्याची विनंती केली. दुकानदारानें आपल्या दुकानांतून हवी ती वस्तू किंमत न देतां न्यावी अशी विनंती केली. अशा गोष्टीचें आकर्षण वाटून पंजाबांत अधिक दिवस रहाण्याची माझी इच्छा नाहीं.



पंजाबांतील या छोट्या नावांतून लोक नदी ओलांडतात. क्वचित् प्रसंगीं या नावांतून हत्तीसुद्धां नदीपार केले जातात.

झेलम नदी 'झेलम' गांवापासून वहात असून नदीवर वीस नावा लोकांची वहातूक फुकट करतात. या नावा मोठया असून उत्कृष्ट बांधणीच्या आहेत. लोकांची नेण्याआणण्याची व्यवस्थाहि उत्तम आहे. आम्ही पुढें नारंगाबादच्या धर्मशाळेंत रात्रींचा मुक्काम केला. धर्मशाळेंतील शीख पुजारी आणि त्याची बायको सुमारें दोनशे वर्षांचीं म्हातारीं असावींत. अंगाला कंप सुटल्यामुळें त्यांना पायावर उभे रहातां येत नव्हतें. मला त्या म्हाताऱ्या पुजाऱ्याचा हेवा वाटला. दीर्घायुष्य सुखी असतेंच असें नाहीं; आणि हा हेवा तो दोनशें वर्षे जगला म्हणून वाटला असें नाहीं. मुसलमानांच्या काळांत शिखांची जी ससेहोलपट झाली, त्याचा सूड घेतलेला पहाण्याचें भाग्य या म्हताऱ्याला लाभलें म्हणून मला त्याचा हेवा वाटला. झेलममधील अधिकाऱ्यांनीं कांहीं पैसे न घेतां माझ्या सर्व बिगाऱ्यांना एक दिवस शिधा दिला. आम्ही उतरलेल्या धर्मशाळेंत पैसा देऊनहि कांहीं मिळण्यासारखें नसल्यानें मी हा शिधा घेण्याचें मान्य केलें. दुसरे दिवशीं आम्ही खवासखान येथील धर्मशाळेंत रात्रीच्या मुक्कामास आलों. या ठिकाणीं रात्रीं अतिशय थंडी पडल्यामुळें मला शेकोटी पेटविण्याची जरूरी वाटली. रात्रभर शेकोटी चालू रहावी म्हणून मी दोन मुसलमानांना एकेक रुपया देऊन रात्रभर त्या शेकोटीजवळ बसून रहाण्यास सांगितलें. हीं माणसें रोजगार घेत असल्यामुळें रात्रभर विस्तव चालूं ठेवून व खोलींत उष्णता निर्माण करून माझ्या दमलेल्या शरीराला विश्रांति घेऊं देतील या भरंवशावर मी झोपलों. परंतु मध्य-रात्रींच्या कडक थंडीमुळें मला जाग आली आणि उठून पहातो तों विस्तवाचा बिलकूल पत्ता नाहीं आणि नेमलेले रोजगारी शेजारींच घोरत पडलेले होते. हे रोजगारी जर हिंदु असते तर अशा निष्काळजीपणें कधींच झोपले नसते. मी त्यांना उठवून कामाला लावलें ही गोष्ट खरी, पण त्याबरोबरच माझी झोप गेली ही गोष्ट विसरतां येत नाहीं.

खवासखान येथील धर्मशाळेंतून आम्ही बारा कोस असलेल्या वजिराबाद या ठिकाणीं जात असतां वाटेंत आम्हांला गुजरात म्हणून एक शहर लागलें. रणजितसिंगाच्या वडिलांनीं पूर्वीं हें शहर जिंकण्यासाठीं फार आटापीटा केला होता, परंतु तें त्यांना साधलें नाहीं. रणजितसिंगानें हें शहर जिंकलें पण वाममार्गानें. रणजितसिंग हा कावेबाज गृहस्थ असून दीनदुबळे,

पोरकीं मुलें, अनाथ विधवा इत्यादि प्रतिकार करण्यास असमर्थ असणाऱ्या लोकांवर तो चाल करून जातो आणि आपला राज्यविस्तार करतो. वजिराबादजवळ जनरल व्हेंतुरा यानें माझ्यासाठीं पाठविलेली चार घोड्यांची गाडी आम्हांला दिसली. कष्टदायक प्रवास संपल्याचें समाधान यामुळें मला लाभलें. प्रवासांत मी इतक्या मेटाकुटीला आलों होतों कीं आणखी एखादा दिवस जरी प्रवास लांबला असता तर मला धरणीवर पडून रहावें लागलें असतें. या चार घोड्यांच्या गाडींत बसून मी वजिराबाद शहरांत प्रवेश केला. या गाडींत बसल्यानंतर मला आपण एखादें स्वप्न तर पहात नाहींना किंवा हें सारें स्वप्नांतच चाललें नाहीं ना असें वाटूं लागलें. वजिराबादला रणजितसिंगाचा दुमजली राजवाडा असून त्याच्याभोवतीं अतिशय सुंदर अशी बाग आहे. या बंगल्यांतील चित्रें शीख धर्मांतील गोष्टींवर आधारलेलीं आहेत. नानकापासून ते गुरुगोविंदसिंगापर्यंत सर्व गुरूंचीं चित्रें मला या ठिकाणीं आढळलीं.

रणजितसिंगाच्या मर्जीतील ॲव्हिताबल नांवाचा युरोपीय अधिकारी वजिराबादला कांहीं दिवस सुभेदार म्हणून काम करीत होता. त्यानें जुनीं घरें पाडून रस्ते रुंद करून या शहराची उभारणी युरोपीय पद्धतीवर केली आहे. त्यामुळेंच चार घोड्यांचा रथ रस्त्यांतून येऊं जाऊं शकतो. या सुभेदारानें जुन्या पद्धतीनें बांधलेली मुख्य बाजारपेठ पाडून ती नवीन तऱ्हेनें बांधून दिली. हा अधिकारी पेशावरला असतो. या शहराच्या सौंदर्याविषयीं विशेषतः नवीन तऱ्हेनें बांधलेल्या बाजारपेठांविषयीं पूर्वीं मी बरेंच ऐकलें होतें.

वजिराबादहून एक रस्ता लाहोरला जातो व दुसरा लुधियानाला जातो. प्रवासांत जरूर असणारे पण आतां निरुपयोगी असणारें बरेंच सामान मी येथून परस्पर लुधियानाला पाठविलें. मात्र ह्या सामानाची बांधाबांध आणि उठाठेव सगळी मलाच करावी लागली. हिंदुस्थानांतील बिगारी अगदींच सांगकामे असून डोक्याचा कांहींही वापर न करतां एकाद्या यंत्राप्रमाणें ते काम करतात. त्यामुळें दुपारपर्यंतचा माझा वेळ फुकट गेला. वजिराबादजवळ फळफळावळीची व इतरही बरीच बागाईत आहे. घरें उत्तम बांधणीचीं आहेत आणि शहरांतूनही घराभोंवतीं उत्तम बागा आहेत. परंतु युरोपांत एकाद्या

नोकरालासुद्धां आपल्या घरांत जी शांतता आणि सुरक्षितता लाभते तशी सुरक्षितता येथें नसल्यामुळें हें सर्व व्यर्थ आहे.

वजिराबादहून आम्ही गुसेरावळी (Guseraoli) येथें बारा कोस अंतर तोडून आलों. हें ठिकाण रणजितसिंगाचे मुख्य सेनापति हरिसिंग नलवा याच्या मालकीचें आहे. हरिसिंगानें येथें एक राजवाडा व बाग बांधली असून येथें एक मातीचा किल्लाहि आहे. शहराजवळ आम्हांला रणजितसिंगाच्या घोडदळाचें एक छोटेसें पथक सामोरें आलें. लाहोरपर्यंत हें पथक माझें संरक्षण करणार होतें. हरिसिंगाची येथील बाग अतिशय सुंदर असून मी हिंदुस्थानांत पाहिलेल्या सर्व बागांपेक्षां तिची उत्कृष्ट निगा राखलेली आहे. निरनिराळ्या तऱ्हेच्या सुवासिक फुलांच्या वेली आणि चंदनाची झाडें यामुळें या बागेंत मन कसें अगदीं हरखून जातें. या राजवाड्यांत हरिसिंगानें माझें स्वागत करून मला पंचवीस ताटें भरून मेवामिठाई दिली. त्यांनीं मला स्वतःचा सर्व राजवाडा हिंडवून दाखविला. राजवाड्यांतील सगळ्या खोल्यांमध्यें काश्मीर आणि काबूल येथील अत्युत्कृष्ट आणि अत्यंत मौल्यवान गालीचे खच्चून भरलेले होते. मी थंडीचा त्रास होण्याची गोष्ट काढतांच त्यांनीं दोन उत्तम स्टोव्ह माझ्या बिऱ्हाडीं पाठवून दिले. मी त्याला त्याच्या घराण्याचा इतिहास सांगतांच तो आश्चर्यचकित झाल्यासारखा दिसला. पूर्वीं रणजितसिंगातर्फे आमंत्रण देण्यास हा सिमल्याला लॉर्ड विल्यम बेंटिंग यांच्याकडे गेला होता. त्या ठिकाणीं त्याला भेटलेलीं बहुतेक माणसें माझ्या परिचयाचीं असल्यानें आमचें संभाषण फार रंगलें. आम्ही एकमेकांचे विचार समजावून घेतले, आणि पूर्वीं घडलेल्या घटनांची उजळणी केली. त्यानें विचारलेले प्रश्न मार्मिक आणि विचारपूर्वक तयार केलेले होते. ईस्ट इंडिया कंपनी आणि युरोपांतील राज्यें यांविषयीं त्याला चांगली माहिती आहे, आणि शिखांच्यामध्यें असलेली अत्यंत दुर्मिळ गोष्ट म्हणजे 'फारशी' भाषा लिहितां वाचतां येणेंही त्याच्याजवळ आहे. रात्रीं मी आणि व्हाईननें त्याच्याकडेच जेवण घेतलें. रात्रीं राजवाड्यांत उबदार खोलींत मला झोप फार चांगली आली. दुसरे दिवशीं मी त्याचा निरोप घेत असतां त्यानें मला अनेक प्रश्न विचारून त्यांचीं उत्तरें कागदावर लिहून घेतलीं. आणि निघण्याच्या वेळेला एक सुंदर खिलात त्यानें मला नजर केला.

गुसेरावळीहून पुढच्या मुक्कामाला पोहोंचण्यापूर्वींच, कॅ. बर्नेसबरोबर हिंडलेला, जुनीलाल नांवाचा एक ब्राह्मण, महाराजांतर्फे सामोरा आला. त्याच्या बरोबर मौल्यवान वस्तूंनीं मढवलेले आणि चांदीचे हौदे पाठीवर चढवलेले दोन हत्ती होते. त्याचप्रमाणें तीस घोडेस्वार त्याच्याभोंवतीं होते. माझ्याजवळ आल्यावर त्यांनीं मला लष्करी पद्धतीची सलामी दिली. आणि तुतारीवाल्यांनीं 'ईश्वर राजाचें रक्षण करो' या गाण्याचे सूर काढले. जुनीलालच्या भेटीपासून माझ्या मुनशीचें म्हणजे ठाकुरदासाचें दुखणें पार बरें झालें. माझा प्रवास चालू असतांना रणजितसिंगाकडून असा निरोप आला कीं, मी शहाडेरा येथें थांबावें. या ठिकाणीं फ्रेंच जनरल खलीफासाहेबाला व दरबारला मी आल्याची वर्दी देऊन माझें स्वागत करणार होता. त्याचप्रमाणें लाहोरमध्यें माझें चांगलें स्वागत व्हावें म्हणून एक दिवस मला येथें मुक्काम करावा लागणार होता. शहाडेरा येथें जहांगीरची सुप्रसिद्ध कबर असून लाहोरपासून तीन मैलांवर रावीच्या उत्तरकाठीं हें शहर आहे. लाहोरला माझा मुक्काम जनरल व्हेंतुरा यांचे घरीं होणार होता. ही सोय रणजितसिंगानें मला देऊं केलेल्या सर्व मानांपेक्षां अधिक होती.

शहाडेऱ्याला माझें शाही स्वागत झालें. लाहोर येथील किल्ला उत्तम स्थितींत असून त्या ठिकाणीं रणजितसिंगाचें घोडदळ आहे. जनरल व्हेंतुरा यांची नी माझी गाठ पडल्यावर महाराजांच्या मनांत मी येथें एक महिनाभर रहावें असें असल्याचें त्यानें सांगितलें. परंतु मला तर जाण्याची फारच घाई होती. कारण मार्च महिन्यांत मुंबईहून निघणारी आगबोट मला पकडावयाची होती. शहाडेरा आणि लाहोर शहर येथें माझ्या केलेल्या स्वागतांत अधिकारी लोकांनीं चांगल्या शब्दांचा आणि काव्यांचा नुसता पाऊस पाडला. जनरल व्हेंतुरा यानें माझी भावलपूर येथील ईस्ट इंडिया कंपनीचे पोलिटिकल एजंट मि. मॅकेसन याचा आणि दुसऱ्या एका फ्रेंच गृहस्थाचा परिचय करून दिला. लाहोरला अशा रीतीनें बऱ्याच युरोपीय लोकांशीं माझी ओळख झाली.

✦ ✦ ✦

प्रकरण ७ वें

रणजितसिंगाच्या राजधानींत

लाहोर शहरांत मी आल्यानंतर रणजितसिंगाविषयीं व त्याच्या दरबाराविषयीं चक्षुर्वै सत्यम् हकीकत पहावयास मिळाली. माझ्या येथील वास्तव्यांत रणजितसिंग आणि इतर दरबारी मंडळी यांच्या विषयींची हकीकत देण्यापूर्वीं मला रणजितसिंगाच्या उदयाचा थोडासा इतिहास नमूद करावासा वाटतो. इब्राहीम लोदीचा पराभव करून बाबरचें मोगल घराणें दिल्लीच्या तख्तावर आलें. या मोगल घराण्यांत कांहीं चांगले व कांहीं धर्मवेडे राजे होऊन गेले. आपली राज्यतृष्णा तृप्त करण्यासाठीं त्यांनीं धर्मप्रेमाचें पांघरूण पांघरलें होतें. शेकडों वर्षें त्यांचें राज्य चालू असतां लोकांवर जे अन्याय झाले तेही आपण धर्मासाठींच करतों अशी समजूत त्यांनीं करून घेतली. निरनिराळ्या राजवटी बदलतांना मुसलमानी धर्म अनेक क्रांत्यांतून गेला आहे. परंतु अनुभवानें असें पटतें कीं, मुसलमानी धर्माचे अनुयायी धर्मवेडे नाहींत असें क्वचितच घडतें. किंबहुना धर्मवेडेपणा हा मुसलमानी धर्मांतील एक भागच असल्यासारखा वाटतो. शिखांचा धर्मसंस्थापक गुरु नानक याच्या धर्मप्रचाराला प्रथम फारसें मोठें स्वरूप नव्हतें. मुसलमानी राजवटीचा शीख धर्माच्या वाढीला जसजसा विरोध होऊं लागला, तसतसे शीख लोक आपल्या धर्माच्या बाबतींत जास्त जास्त कडवे होत चालले. आरंभीं शिखांचें मुसलमानी धर्माशीं वाकडें नव्हतें. परंतु औरंगजेबानें १६७५ त शिखांचा धर्मप्रमुख तेगबहादूर याचा वध केल्यापासून शीख लोक मुसलमानांविरुद्ध खवळले. त्याचा मुलगा गुरु गोविंदसिंग यानें त्या वेळेपासून शिखांचें मुसलमानांशीं वाकडें आल्याचें जाहीर करून शीख धर्माची लष्करी पायावर उभारणी केली. या कडवेपणामुळें आरंभीं शिखांचा फार मोठा संहार झाला. गुरु गोविंदसिंग हा शिखांचा शेवटचा गुरू होता असें समजतात. कारण मुसलमानांनीं त्याची ससेहोलपट करून त्याचा शेवट कुठें व कसा केला

याचा शिखांना पत्ता लागला नाहीं. बंदा नांवाच्या एका हिंदु सरदारानें मुसलमानांविरुद्ध शिखांची एकजूट करून दिल्लीच्या बादशहाविरुद्ध बंड उभारलें. परंतु त्याला पकडून त्याचा दिल्ली येथें शिरच्छेद करण्यांत आला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिल्लीच्या मोंगली राजवटीला उतरती कळा लागली. दक्षिणेंतून मराठ्यांनीं वर येऊन दिल्लीच्या उपनगरांवर जेव्हां धाड घातली, तेव्हां जवळपासचे मुसलमान जागे झाले. १७३९ त नादिर-शहानें दिल्लीला साफ लूटून सर्व संपत्ति आपल्याबरोबर मायदेशास नेली. मुसलमान बादशाहीची लूट काफिरांचे हातांत पडूं नये म्हणून नादिरशहानें दिल्लींत एक सुतळीचा तोडा देखील ठेवला नाहीं. नादिरशहा परत गेल्यानंतर लवकरच त्याचा खून झाला, आणि अहमदशहा अब्दालीनें त्याचें राज्य बळकावलें. मध्यंतरींच्या काळांत दक्षिणेंत मराठ्यांचा व पंजाबांत शिखांचा धुमाकूळ सुरू झाला. अहमदशहानें पंजाबवर आपलें वर्चस्व बसविलें, आणि त्यानें दिल्ली ताब्यांत घेतली. दिल्लीवरील आपलें वर्चस्व जातें म्हणून मराठ्यांनीं अबदालीचा प्रतिकार करण्यासाठीं प्रचंड सैन्य उत्तर हिंदुस्थानांत पाठविलें. १७६१ च्या जानेवारींत मराठे आणि अबदाली यांची पानिपतावर तुंबळ लढाई होऊन मराठ्यांचा संपूर्ण पराभव झाला. या लढाईंत व नंतर मराठ्यांचे दोन लाख लोक मारले गेले. अबदालीचेंहि नुकसान जबर झालें, व तोहि हिंदुस्थानांतून परत गेल्यावर, मराठे, दिल्लीचे बादशहा आणि अबदाली यांचें वजन कमी झाल्यानंतर पंजाबांत शिखांना मोकळें रान सांपडलें. मुसलमानांच्या आजवरच्या अत्या-चारामुळें इतर हिंदूंचा शिखांना पाठिंबा होता.

नंतरच्या काळांत प्रसिद्धीस आलेलें रणजितसिंगाचें घराणें हें मूळचें जाट असून रणजितसिंगाचा पणजा जोधसिंग हा एक साधा शेतकरी होता. त्यानें शीख धर्म स्वीकारून आपलें नशीब उजळण्याचें ठरविलें. १७५०त तो वारल्यानंतर त्याचा मुलगा जरतसिंग यानें शिखांचें एक लढाऊ पथक तयार केलें. त्यानें गुसेरावळी (Guseraoli) येथें एक गढी बांधून आपली लूट ठेवण्यास चांगली जागा निर्माण करून ठेविली. मराठे जसजसे पूर्व पंजाबांत शिरत होते, तसतसे शीख पेशावरच्या बाजूस सरकूं लागले. त्या ठिकाणच्या राजकीय अंदाधुंदीचा भरपूर फायदा शिखांनीं करून घेतला.

अहमदशहा आणि त्याचे वारस हे शिखांशीं झगडत झगडत माघार घेत होते. शिखांनीं आपली निसल किंवा पथकें तयार करून आपला राज्य-विस्तार ते करूं लागले. १७७० च्या सुमारास त्यांचें जवळजवळ ७० हजार सैन्य तयार झालें होतें. रणजितसिंगाचे वडील त्याच्या लहानपणींच वारले, व रणजितसिंग कांहींसा त्याच्या सासऱ्याच्या व कांहींसा त्याच्या स्वतःच्या कर्तबगारीनें पुढें आला. रणजितसिंग वयांत आल्यानंतर त्यानें आपल्या लष्कराची व्यवस्था चोख करून आपलें राज्य वाढविण्यास आरंभ केला. रणजितसिंगाचा पंजाबांत राज्यविस्तार होत असतांनाच इकडे ईस्ट इंडिया कंपनीही आपले हातपाय पसरीत होती. १८१८ त मराठी साम्राज्य नष्ट झाल्यापासून इंग्रज पंजाबांत आणि हिमालयांत आपले पंख पसरूं लागले. रणजितसिंगाची भीति इतर शीख राजांना इतकी वाटली कीं त्यांनीं दिल्लीला जाऊन १८०९ सालीं इंग्रज कंपनीशीं तह केला. या तहाप्रमाणें सतलजच्या पलीकडील सर्व भाग इंग्रजांनीं आपल्या संरक्षणाखालीं घेतला. शिखांचीं कांहीं राज्यें इंग्रजांच्या संरक्षणाखालीं जातात ही गोष्ट रणजित-सिंगाला मुळींच आवडली नाहीं. आणि तो आपल्या सैन्याची जमावजमव करतो तोंच लुधियानाला इंग्रजी तोफा आणि कवायती फौजा तळ देऊन बसल्याचें त्याच्या लक्षांत आलें. इंग्रजांच्या कवायती फौजा आपणांस आटोपणार नाहींत हें पाहून त्यानें ही कडू गोळी गिळली आणि इंग्रजांशीं तह करून टाकला. अशा रीतीनें यमुनेच्या तीरावर दिल्लीला पाय रोवण्याची शिखांची महत्त्वाकांक्षा कायमची धुळीला मिळाली.

इंग्रजांशीं तह झाल्यापासून रणजितसिंग जागा झाला, आणि सतलजच्या पलीकडील सर्व शीख राजे त्यानें एका पाठोपाठ एक शरण आणले. चौथाई घेण्याच्या निमित्तानें ज्याप्रमाणें मराठी फौजांनीं सर्व हिंदुस्थानभर धुमाकूळ घातला त्याचप्रमाणें शिखांनींहि केलें असतें. परंतु इंग्रजांच्या तटबंदीमुळें त्यांची एक बाजू कायमची बंद झाली. पंजाबच्या पलीकडील सर्व भाग, अटक, मुलतान, जम्मु काश्मीर हे सर्व भाग आपल्या ताब्यांत आणून रणजितसिंगानें शिखांची सत्ता चांगलीच वाढविली.

लाहोरला आल्यानंतर माझ्या युरोपीय मित्राच्या घरीं मी पहिली रात्र घालविली. रात्रीं अगदीं गाढ झोप आली. आणि सकाळच्या साखरझोपेंत

असतानांच महाराणा रणजितसिंगाचा एक दूत चौकशी करण्याकरितां आला मी कपडे करून बाहेर आल्यानंतर खलीफासाहेब आणि शहरांतील लष्कराचा प्रमुख या दोघांशीं परिचय करून घेतला. मी आलों त्या दिवशीं शिखांचा मोठा सण असल्यामुळें रणजितसिंग माझी गांठ घेऊं शकला नाहीं इत्यादि गोष्टी त्यांनीं मला सांगितल्या. सर्व बारीकमोठ्या सामानांसह एक उत्कृष्ट बिछाना रणजितसिंगानें मला भेट म्हणून पाठविला होता. त्यामध्यें रेशमी कापड आणि शालीही होत्या.

मी मुक्काम केलेलें जनरल व्हेन्तुरा यांचें घर म्हणजे पौर्वात्य देशांतील भव्यता आणि युरोपीय घरांतील सुखसोयी यांचें सुंदर मिश्रण होतें. प्रवेश-द्वारांतून आंत येतांच एका भिंतीवर रणजितसिंग दोघा फ्रेंच अधिकाऱ्यांचें स्वागत करीत आहे असें एक चित्र लावलेलें होतें. दुसऱ्या एका खोलींत सोन्याचांदीच्या चौकटी असलेले छोटे आरसेहि चोहीकडे अडकविलेले होते. तिसरा हॉल फारच मोठा असून, सबंध घराएवढी त्याची रुंदी होती. घराच्या पाठीमागें थोड्या अंतरावर प्रचंड घुमट असलेलें एक प्राचीन थडगें दिसत होतें. या घुमटांत सध्यां युरोपीय अधिकारी आपल्या बायका-मुलांसह रहातात. याच्या भोंवतीं असलेली सुबक व सुंदर बाग जवळपासच्या खडकाळ माळरानांत उठून दिसत होती.

लाहोरच्याजवळ सोरामीठ असल्यामुळें येथील भिंती फार दिवस टिकूं शकत नाहींत. अशा पडीक घरांचा एक समूह बाजूला काढून जनरल व्हेन्तुरांच्या घरापुढें कवायतीसाठीं एक मोठें मैदान तयार करण्यांत आलें आहे. या पडक्या घरांतील विटा फ्रेंच फौजेसाठीं बराकी बांधण्यास वापरण्यांत आल्या; सध्यां ही फ्रेंच तुकडी पेशावरला असून रणजितसिंगाचा मुलगा शेरसिंग त्या तुकडीचा प्रमुख आहे. अर्थात् शेरसिंगाचें नायकत्व नामधारी असून प्रत्यक्ष काम अॅव्हीतावल हाच पाहतो. पंजाबमध्यें जनरल व्हेंतुरा अॅव्हितावल, अॅलर्ड, कर्नल कोट, मि. फॉक्स इत्यादि युरोपीय अधिकारी मंडळी आहेत. कांहीं थोडे युरोपीय खालच्या जागांवर काम करीत आहेत. रणजितसिंगाच्या सर्व सैन्यांत घोडदळ सोडल्यास लष्करी हुकूम देण्यासाठीं फ्रेंच शब्द वापरले जातात. फ्रेंच सैन्याच्या जवळ तिरंगी निशाणावर गोविंदसिंगाचें नांव आणि गरुडाचें एक चित्र

आहे. सैन्यांतील प्रत्येक जवानाला महिना आठ रुपये पगार असून त्याला तांबडा कोट व दारूगोळा दिला जातो. मात्र कपड्यालत्त्याची व खाण्यापिण्याची सोय त्याची त्यानेंच बघावयाची असते. सैन्याचा पगार मुद्दाम एक वर्षाचा तुंबवून ठेवलेला आहे. रणजितसिंगाच्या मतें पगार थकवून ठेविल्याशिवाय हे लोक आपल्या पक्के ताब्यांत रहाणार नाहींत. सैन्यांतील जमादारांना किंवा लेफ्टनंटला महिना तीस रुपये पगार आहे. फ्रेंच फौज सोडल्यास बाकी सर्व जवानांना हवा तो पोषाख घालण्यास मुभा आहे. यामुळें पंजाबी आणि युरोपीय कपड्यांची गल्लत फौजेच्या पोषाखांत दिसून येते.

संध्याकाळीं मी रहात असलेल्या घरांत चहूकडे दिवे लावून झगझगाट करण्यांत आला. आपल्या सर्वांगसुंदर पोशाखासह पंचवीस नर्तिका आपलें नृत्यकौशल्य दाखविण्यासाठीं आल्या होत्या. घरांत व घराभोंवतीं रात्रीं शोभेची दारू उडविण्यांत आली. मध्यरात्रीनंतर दुसऱ्या एका नर्तिकेचा ताफा आमच्याकडे पाठविण्यांत आला. ही नर्तिका आणि तिचा ताफा माझ्या करमणुकीसाठीं खुद्द महाराजांनीं पाठविला होता. तिच्या नृत्यकौशल्याबद्दल महाराजांनीं प्रशस्तिपत्रहि दिलें होतें. महाराणा रणजितसिंग आणि गव्हर्नर-जनरल यांच्या भेटीच्या वेळीं हीच नर्तिका नाच करण्यासाठीं महाराजांनीं गव्हर्नर-जनरलकडे पाठविली होती. तिच्या नैपुण्याबद्दल गव्हर्नर-जनरलनें प्रशस्तिपत्रहि दिलें होतें. लाहोरमधील ही स्वरूपसुंदरी वीस वर्षांपेक्षांहि लहान असून थोडी कोमेजल्यासारखी वाटते.

तेरा जानेवारीला सकाळीं नऊ वाजतां मला दरबारांत नेण्यासाठीं खलीफासाहेब आले होते. त्यांनीं आपल्याबरोबर ऐसपैस बसण्याजोगे हौदे घातलेले तीन हत्तीहि आणले होते. लाहोरमधील लष्कराच्या प्रमुखांसह बरेचसें सैन्यहि आमच्या बरोबर होतें. आम्ही दक्षिणेकडील दरवाजानें लहोरांत प्रवेश केला. जुन्या राजवाड्यासमोर आल्यानंतर महाराजांचे अधिकारी घोड्यावरून उतरून आमच्याजवळून चालूं लागले. हा राजवाडा महाराणा रणजितसिंगानें बांधला असें जरी सांगण्यांत येत असलें तरी हें काम कोणा तरी मोगल बादशहाचेंच असलें पाहिजे असें माझें मत आहे.

राजवाड्याचा एक छोटासा भाग रणजितसिंगानें बांधल्याचें येथील लोक समजतात. राजवाड्यांतील बागेच्या दक्षिणेकडील बाजूस जहांगिरनें बांधलेली जुम्मा मशीद आहे. या मशिदीवर संगमरवरी दगडाचे बांधलेले तीन घुमट आहेत. रणजितसिंगानें या मशिदीचें रूपांतर लष्करी बराकींत केलें असून मशिदीची एक भक्कम भिंत शहराची तटबंदी म्हणून वापरण्यांत येते. मोठ्या दरवाजांतून आंत गेल्यानंतर आंतल्या मैदानांत असलेल्या छोट्या लष्करी तुकडीनें आम्हांला सलामी दिली. महाराणा रणजितसिंग एका छोट्या तंबूंत लहान आरामखुर्चीवर बसले होते. तंबूच्या भिंती सोनेरी किनखापी कापडाच्या असून जमिनीवर एक मोठा काश्मीरी गालिचा अंथरला होता. मी त्या गालिच्यावर पाऊल टाकलें, तोंच महाराजा उठून मला सामोरे आले आणि माझ्या हाताला धरून त्यांनीं मला स्वतःजवळच्या दुसऱ्या एका आराम खुर्चीवर नेऊन बसविलें. बसण्यापूर्वी मी माझ्या मुनशीच्या हातांतून एक थैली घेऊन साडे-सातशें रुपये असलेली थैली महाराजांवरून ओवाळून त्यांच्या नोकराजवळ दिली. महाराजा आजारी असल्यामुळें त्यांना कांहीं भूत-पिशाच्च बाधा झाली असल्यास ती घालविण्यासाठीं पैसे ओवाळून टाकण्याची पद्धत आहे. इंग्रजी पद्धतीप्रमाणें मुनशीकडून नजराणा देतात. मला हें गैरशिस्त वाटलें. व स्वतः नजर देण्यांत कांहींच कमीपणा नसल्यामुळें मी महाराजांना खूष करण्यासाठीं ही गोष्ट स्वहस्तें केली. माझे बूट आणि गणवेश आला नसल्या-मुळें मी जोडे घालूनच महाराजांकडे गेलों होतों. महाराजांच्या समोर आणि गालिच्यावर जोडे घालून जाणें अयोग्य व अप्रशस्त असल्यामुळें मी ते बाहेर काढून ठेवूनच आंत गेलों.

या औपचारिक गोष्टीनंतर आमचें संभाषण सुरू झालें. दुभाष्याचें काम मुख्यतः मि. मॅकिसन यानें केलें. माझ्याबरोबरचा दुभाषा मोहन यालाहि माझ्याजवळ बसवून महाराजांनीं त्याची चौकशी केली. आपण क्षत्रिय जातीचा गुरखा असून एका सुभेदाराचा मुलगा आहे अशी माहिती मोहन-सिंगानें महाराजांना सांगितली. मी सांगेन तें व्यवस्थित रीतीनें भाषांतर करणें मोहनला जमेल किंवा नाहीं अशी पृच्छा महाराजांनीं केली. प्रथम महाराजांनीं मला लष्कराची कितपत माहिती आहे याची चौकशी करून ऑस्ट्रियन

सैन्य आणि फ्रान्स आणि जर्मनी यांमधील युद्धासंबंधीं कांहीं प्रश्न विचारले. नंतर महाराजांचीं व माझीं प्रश्नोत्तरें खालीलप्रमाणें झालीं.

महाराज रणजितसिग:– तुम्हाला माझ्या लष्कराविषयीं काय वाटतें? युरोपीय फौजेशीं सामना देणें या फौजेस सध्यां जमेल किंवा नाहीं ?

मी:—शौर्याबद्दल शिखांची फार पूर्वीपासून ख्याति आहे. या फौजेंत शिस्त शिकविल्यामुळें असा सामना देणें तुमच्या फौजेला शक्य आहे.

महाराज:– आमच्या फौजेइतकी प्रतिस्पर्ध्याची फौज असूनही आम्ही सामना देऊं शकूं काय ?

मी:–निश्चित.

महाराज:–तुम्ही सर्व जगांत प्रवास केलेला आहे. तुम्हांला जगांत सर्वांत कोणता देश अधिक आवडला ?

मी:–माझा मायदेश.

महाराज:–तुम्ही नुकतीच काश्मीरला भेट दिली आहे. तुमचें आतां त्या भागाविषयीं काय मत झालें आहे ?

मी:–रोगराईमुळें आणि नुकत्याच पडलेल्या दुष्काळामुळें गांवेंच्या गांवें ओस पडलीं आहेत. त्यामुळें तेथील उत्पन्न फार थोडें येईल.

महाराज:– मेहनसिगानें गरिबांना पैसा वाटावा असें मी त्याला फर्मावलें आहे. तो माझ्या पैशाची लूट करतो असें तुम्हांला वाटतें काय ?

मी:–मला नाहीं असें वाटत.

महाराज:– सुभेदार मेहनसिग हा बुद्दू आहे. मी त्याला नोकरीवरून काढून टाकावें असें तुम्हांला वाटतें काय ?

मी:–सुभेदार हा लायक मनुष्य आहे. त्याच्यापेक्षां चांगला मनुष्य तुम्हांला मिळणें कठीण आहे. या भागाची पुनर्व्यवस्था होण्यासाठीं थोडा हात सैल सोडलाच पाहिजे.

आमचीं हीं प्रश्नोत्तरें चालू असतां मि. मॅकीसन त्याचें फारशींत आणि खलिफा त्याचें पंजाबींत भाषांतर करून सांगत असे. महाराजांच्या जवळ रणजितसिगाचा मुख्य प्रधान राजा ध्यानसिग याचा सोळा वर्षांचा मुलगा हिरासिग एका खुर्चीवर बसलेला होता. दरबारांतील बाकीचे सर्व लोक खालीं जमिनीवर बसले होते. महाराजांच्या प्रश्नांना मी उत्तरें कशीं देतों

हें पहाण्यासाठीं महाराजांनीं प्रश्न विचारल्यानंतर सर्वजण माझ्याकडे टक लावून पहात असत. दरबारांतील बहुतेक लोकांचे पोषाख पिवळ्या रंगाचे व काश्मिरी लोकरीचे होते. फक्त हिरासिगानें फिकट हिरवा व पिंगट रंगाचा पोषाख केलेला होता. जम्मूचा सुभेदार गुलाबसिंग आणि मुख्य प्रधान ध्यानसिंग यांचा एक भाऊ सुचेतसिंग तेथेंच बसला होता. स्वयंपाक्याच्या जागेपासून मोठ्या पदावर चढलेला खुशालसिंग नांवाचा एक सरदारहि तेथें होता. हा खुशालसिंग ब्राह्मण असून रणजितसिंगाला खूष करण्यासाठीं त्यानें शीख धर्म स्वीकारला आहे. दरबारांत ध्यानसिंगाच्या मागोमाग त्याचें वजन आहे. महाराजांचा थोरला मुलगा करकसिंग नांवाचा असून तो थोडा वेडसर असल्यामुळें त्याला गादीवर बसण्याची संधि कधींच मिळणार नाहीं. या करकसिंगाचा पंधरा वर्षांचा मुलगा निहालसिंग म्हणून असून तो अतिशय चलाख पोरगा आहे. रणजितसिंग आणखी कांहीं दिवस जिवंत राहिल्यास करकसिंगाच्या ऐवजीं यालाच गादी मिळण्याची शक्यता आहे. रणजितसिंगाच्या राज्याला खरा धक्का जबरदस्त बनलेल्या त्याच्या सरंजामदारांकडून बसणार आहे. ध्यानसिंग आणि सुचेतसिंगाचा भाऊ जम्मूचा सुभेदार गुलाबसिंग याच्या ताब्यांत समृद्ध व विस्तृत प्रदेश असून जम्मूपासून लडाखपर्यंत त्याचा सरंजाम पसरला आहे. हे सर्व भाऊ पैसा, सैन्य, तोफा आणि मजबूत किल्ले जवळ बाळगून असल्यामुळें रणजितसिंगाच्या पाठीमागें गादीवर येणाऱ्या कमजोर वारसदारांना यांना वठणीवर आणणें कठीण जाणार आहे. कंपनीशीं दोस्ती आणि तह केल्यानेंच याच्या घराण्याला राज्य टिकविणें शक्य होणार आहे. परंतु रणजितसिंगाचा अहंकार आणि ईस्ट इंडिया कंपनीचें हिंदुस्थानांतील धोरण यामुळें हें जमून येणें कठीण. महाराजा रणजितसिंगाला सिंहासन नाहीं. मी त्यांना यासंबंधीं विचारलें असतां, तो एव्हढेंच म्हणाला, " मला हवा तो मान माझी तलवार मिळवून देते. जगाला भपका दाखविण्याच्या विरुद्ध मी आहें."

रणजितसिंगाचें सध्यांचें वय चोपन्न वर्षांचें आहे. लहाणपणीं देवी येऊन त्याचा सर्व चेहरा विद्रूप झाला असून त्यांतच लहानपणीं डावा डोळा गेला आहे. पिंगट रंगाची दाढी त्याला असून आंत तुरळक केस आहेत. त्याचे डोळे शरीराच्या मानानें फार मोठे असून चौकोनी आहेत. त्याचें कपाळ

भव्य आणि रुंद आहे. त्याचे खांदे रुंद असून हात मात्र आतां वाळून बारीक झाले आहेत. एकूण त्याच्या चेहऱ्याची ठेवण दुसऱ्यावर छाप पाडणारी आहे. पिंगट रंगाचा मोठा उजवा डोळा सारखा हालचाल करून रणजितसिंग ज्याच्याशीं बातचीत करतो त्याच्या विचारांचाच तो जणूं कांहीं भेद घेत असतो. अर्धांगवायूमुळें त्याच्या वाचेवर परिणाम झाला असून त्याचें बोलणें समजणें कठीण जातें. दरबारच्या बाहेरच्या आवारांत एक कवायती तुकडी आणून ठेविली होती. तिची कवायत पाहण्यासाठीं आम्ही बाहेर आलों. त्यावेळीं माझ्या आणि मोहनच्या खांद्यावर हात टाकून तो उभा राहिला. अधिकारी, सैनिकांना फ्रेंच भाषेंत आज्ञा देत होते. युरोपीय पद्धतीचें शिक्षण घेतल्यामुळें त्याच्या सैन्याची ताकद निश्चितच वाढलेली आहे. आम्ही उभे असतांना रणजितसिंगानें मला आणखी कांहीं प्रश्न विचारले. तुम्ही लॉर्ड विल्यम बेंटिंगला पाहिलें आहे काय ? या त्याच्या प्रश्नाला ' मी येण्यापूर्वींच गव्हर्नर-जनरल हिंदुस्थानांतून निघून गेला असल्याचें ' मी सांगितलें. बर्नेसविषयीं त्यांनीं माहिती विचारली, परंतु मी फक्त मि. बर्नेसचीं प्रवासवृत्तें वाचलीं असल्याचें महाराजांच्या निदर्शनास आणून दिलें.

सैनिकांची कवायत चालूं असतांना ऑस्ट्रिया, फ्रान्स, इंग्लंड आणि युरोपांतील इतर देशांत खडें सैन्य किती असतें, सैन्याचे प्रकार कोणते, आणि त्यांच्याजवळ कशा प्रकारचीं हत्यारें असतात इत्यादि प्रश्नांचा मारा महाराजांकडून माझ्यावर केला जात होता. मी युरोपांत लौकरच जाणार असल्यामुळें माझा दुभाषा मोहनलाल याची पुढें काय सोय करणार असा एक प्रश्न त्यांनीं मला विचारला. मी त्यांना मोहनला माझ्याबरोबर नेणार असल्याचें सांगितलें. त्या वेळेला महाराज म्हणाले, " त्याला इथेंच माझ्याकडे ठेवा; मी त्याची चांगली सोय लावीन. " अशा तऱ्हेची प्रश्नोत्तरें झाल्यानंतर मी निरोप घेऊन परतलों. आम्हांला निरोप देण्यासाठीं महाराज दरवाज्यापर्यंत आले होते.

आम्ही जात असतां थोडा पाऊस पडत होता. त्यावेळीं फकीरसाहेब मला म्हणाला, ज्या वेळीं राजघराण्यांतील दोन लोक एकमेकांना भेटतात, त्या वेळीं चोहींकडे सुवास दरवळण्यासाठीं आकाशांतील थोडें थोडें पाणी

फुलांवर शिपडण्यांत येतें. माझ्या काळ्या सुटांत महाराजांना भेटणें मला बरें वाटलें नाहीं; परंतु लुधियानाहून माझा लष्करी गणवेश आला नव्हता. त्यामुळें निरुपायानें मला या पोशाखांतच महाराजांची भेट घ्यावी लागली. लाहोरांत आणि सर्व हिंदुस्थानांत एक गोष्ट विशेष नजरेंत भरते. ती म्हणजे मोठमोठ्या आणि भव्य इमारतीशेजारीं पडक्या धडक्या इमारती आणि घरें आढळतात ही होय. लाहोरांतील बाजार मात्र भरगच्च भरलेला आणि मोठा असा आहे. पाऊस पडल्यानंतर या बाजारांतून व सर्व रस्त्यांवर चिखलच चिखल होत जातो. रस्त्यानें जाणारे घोडेस्वार आणि इतर वहानें पादचाऱ्यांना पायापासून डोक्यापर्यन्त चिखलानें भरवीत असतात. अजिजुद्दीन, महाराजांचा खाजगी कारभारी खलीफा साहेब आणि अमृतसरचा सुभेदार हे तिघे भाऊ असून येथें नेहमी माझेबरोबर असत. मुसलमान असूनहि महाराजांचा त्यांच्यावर विश्वास आहे.

मी घरीं येण्यापूर्वींच जनरल व्हेंतुराच्या घरीं महाराजांच्याकडून खलीफा-साहेबाचा थोरला भाऊ अजिजुद्दीन मला भेट देण्यासाठीं काबूल आणि काश्मीरमधील सर्वोत्कृष्ट फळांच्या बारा करंड्या घेऊन आला होता. महाराजांच्या बरोबर झालेल्या मुलाखतीमुळें महाराज तुमच्यावर खूष झाले असून तुम्ही लाहोर येथें बरेच दिवस रहावें अशी त्यांनीं इच्छा व्यक्त केल्याचें त्यानें मला सांगितलें. माझ्या नोकरांचा रोजचा खर्च भागविण्यासाठीं म्हणून त्यांनीं मला सव्वादोनशें रुपये पाठवून दिले होते.

दुसरे दिवशीं महाराजांकडून निरोप घेऊन अजीजुद्दीन आल्याचें कळल्या-वरून मला उठविण्यांत आलें होतें. झटपट पोषाख करून मी बैठकीचे खोलींत गेलों, आणि तेथें रीतीप्रमाणें नमस्कार चमत्कार होऊन आमचें बोलणें सुरू झालें. फकीरसाहेब मला म्हणाला 'कालच्या तुमच्या संभाषणामुळें महाराज तुमच्यावर अगदीं खूष झाले असून तुम्ही येथेंच रहावें अशी महाराजांची इच्छा आहे. तुम्हांला जरी पैशाचा लोभ नसला तरी खर्चासाठीं म्हणून महिना सहा हजार रुपये तुम्ही घ्यावे अशी महाराजांची इच्छा आहे.' मी त्यांना म्हटलें, महाराजांनीं व्यक्त केलेली इच्छा म्हणजे माझ्यावर मेहेरबानीच आहे. मी जर वयानें थोडा लहान असतों तर निश्चितच त्यांचें म्हणणें ऐकलें असतें. परंतु घरगुती कांहीं अडचणींमुळें

वेळ न गमावतां मला आतां परत गेलेंच पाहिजे. सहा आठवड्यांच्या आंत मी मुंबईला न गेल्यास बोटी सुटून गेल्यामुळें मला वर्षभर येथेंच रहावें लागेल. माझ्या आयुष्यांतील एक वर्ष घालविण्याची माझी आतां इच्छा नाहीं. नंतरही फकिरानें मला येथें रहाण्याबद्दल बराच आग्रह केला. परंतु माझा निश्चय पाहून नंतर त्यानें बोलणें थांबविलें. महाराजांनीं कांहीं प्रश्न दिले असून त्यांचीं उत्तरें तुम्ही द्यावींत अशी महाराजांची इच्छा आहे असें तो म्हणाला. खिशांतून कागद काढून त्यानें महाराजांचे प्रश्न वाचण्यास सुरवात केली. त्याच्या प्रश्नाला मीं दिलेलीं उत्तरें तो टिपून घेत होता. महाराजांचे प्रश्न व माझीं उत्तरें पुढीलप्रमाणें आहेत :–

प्रश्न १ :— तुम्ही जगभर प्रवास केला आहे असें समजलें आहे. या सर्व देशांत तुम्हांला नमूद करण्यासारखी कोणती गोष्ट आढळली ?

उत्तर :— माझ्या प्रवासाचे हेतु अनेकविध आहेत. निरनिराळ्या देशांतील (माहिती गोळा करून) लोकांचे रीतिरिवाज आणि भूभाग स्वतः पाहून माहिती गोळा करावी व तेथील सर्व विशेष नमूद करावेत हा माझा प्रवासांतील हेतु आहे. माझ्या प्रवासांत आढळलेल्या विशेष नमूद करण्यासारख्या गोष्टी खालीलप्रमाणें आहेत. इजिप्तमधील पिरॅमिड आणि हिंदुस्थानांतील ताजमहाल, सृष्टिसौन्दर्याच्या दृष्टीनें न्यू हॉलंड आणि काश्मीर हे भाग मला विशेष वाटले. लोकांच्या चालीरीतींच्या **दृष्टीनें** मलबारचा किनारा मला वैशिष्ट्यपूर्ण वाटला. ईस्ट इंडिया कंपनीची शक्ति आणि मोठेपणा या प्रवासांत माझ्या डोळ्यांत विशेष भरला. एखाद्या कलाकारानें छोटे छोटे तुकडे गोळा करून डोळ्यांत भरण्याजोगी एखादी इमारत उभारावी त्याप्रमाणें लहान लहान सरंजामदारांवर विजय मिळवून महाराजा रणजितसिंगांनीं हें साम्राज्याचें जें भव्य आणि कौशल्यपूर्ण मंदिर उभारलें आहे तोहि मला प्रवासांत आढळलेला विशेषच होता आणि माझ्या आढळलेल्या इतर विशेष गोष्टींत ही गोष्ट मी अति महत्त्वाची समजतों.

प्रश्न २ :— तुमच्या मायदेशांत तुमचें घराणें बऱ्यापैकीं असून तुम्हांला उत्पन्नहि चांगलें आहे. कोणत्याही रीतीनें पैसा मिळवावा असा तुमच्या प्रवासामागील हेतु नाहीं. तर मग जगभर प्रवास करण्यांत तुमचा हेतु तरी काय आहे ?

उत्तर :–पहिल्या प्रश्नाच्या उत्तरांत मी या प्रश्नाचें थोडेसें उत्तर दिलेलेंच आहे. पौर्वात्य देशांतील माणसाला युरोपीय मनाची घडण समजणें कठीण आहे. हिंदुस्थानांत दोन गोष्टी तुम्ही महत्त्वाच्या मानतां. पैसा आणि अधिकार मिळवून शारीरिक सुखोपभोग घेणें किंवा सर्व सुखांचा त्याग करून पवित्र आचरण करून मोक्षप्राप्ति करून घेणें. तुमच्या रीतीनें बिलकूल महत्त्वाच्या नसलेल्या अशा तिसऱ्या गोष्टींत युरोपीय मनुष्य लक्ष घालतो. ती गोष्ट म्हणजे शास्त्रीय चिकित्सा करून जगाविषयीं अधिक ज्ञान प्राप्त करून घेणें. त्यामुळेंच मोठमोठे शोध युरोपीय लोकांनीं लावले असून आमचे प्रवास जगाची ओळख होण्याच्या दृष्टीनें व जगांतील नवनवीन प्रदेश हुडकून काढण्याच्या दृष्टीनें आम्हांला महत्त्वाचे वाटतात. निरनिराळ्या देशांच्या चालीरीती माहिती करून आमच्या देशांतील चालीरीतींशीं त्यांची तुलना करणें हाही माझ्या प्रवासामागील एक हेतु आहे.

प्रश्न ३ :— कोणती तरी संरक्षक शक्ति तुमच्याजवळ असल्याशिवाय असे धोक्याचे प्रवास करणें तुम्हांला शक्य नाहीं असें महाराजांना वाटलें. कदाचित् एखादी संजीवनी किंवा तत्सम औषध तुम्ही बरोबर घेतलें असेल. ही संजीवनी किंवा हें गूढ काय आहे हें जाणून घेण्याची महाराजांची इच्छा आहे. मात्र हें गूढ प्रकट करण्यामुळें जर ही अद्भुत शक्ति व त्यामुळ तुमचें होणारें संरक्षण याला धोका येणार असेल तर ही गुह्य गोष्ट कळावी असा महाराजांचा आग्रह नाहीं.

उत्तर :- या प्रश्नामुळें मला जरी हंसूं आलें तरी तें बळेंच दाबून मी म्हटलें युरोपांतील आम्ही लोक अशा संजीवनी औषधावर किंवा दैवी शक्तीवर विश्वास ठेवीत नाहीं. चूर्ण आणि गोळ्यांच्या स्वरूपांत असलेले कॅलोमेल हें औषध मी अधूनमधून घेतों व त्याचा मला उपयोग होतो.

प्रश्न ४ :— युरोपीय लोक अनेक तऱ्हेचें अन्न खातात हें महाराजांना माहीत आहे. अशा तऱ्हेचें अन्न तुम्हांला प्रवासांत मिळणें कसें शक्य आहे? विशेषतः गोमांसावर तुमची विशेष भिस्त असते तें तुम्ही प्रवासांत कसें मिळविलें ?

उत्तर :- प्रवासांत मिळेल त्या अन्नावर मी गुजराण करतों. अमूक एकच अन्न असावें असा अट्टाहास मी कधींच करीत नाहीं. हवाबंद डब्यांत

अन्न ठेवून तें बरेच दिवस ताजें रहाण्याची सोय युरोपांत करण्यांत येते. त्यामुळें वर्षानुवर्षें प्रवासांत असून देखील या सीलबंद डब्यांतील ताजें अन्न आम्हांला खाण्यास मिळतें.

प्रश्न :– शत्रूवर विजय मिळविण्याचा हमखास उपाय कोणता ?

उत्तर :– पंजाबमधील परिस्थिति पहातां येथील लष्कर कडक अशा कवायती शिस्तींत ठेवणें उत्तम. यामुळें सेनापतीच्या एका हुकुमासरशीं सर्व शक्ति एकवटून लढतां येईल आणि विजय हमखास मिळवतां येईल.

मी प्रश्नांचीं उत्तरें देत असतां फकीरसाहेब मि. मॅकिसनला ही सर्व कल्पना माझीच आहे काय असें विचारीत होता. प्रश्नांचीं उत्तरें लिहीत असतां फकीरसाहेब मधून मधून वा ! वा ! वा ! आश्चर्य आहे ! कमाल आहे ! अशा तऱ्हेचे उद्‌गार काढून मान डोलवीत असे. माझी भरमसाट स्तुति करून नंतर तो माझी रजा घेऊन निघून गेला. संध्याकाळीं महाराजांनीं आपल्या खास परिवारांतील तीन नर्तिका माझ्याकडे पाठवून दिल्या व रात्रीं त्यांच्या नाचाचा कार्यक्रम झाला.

दुसरे दिवशीं सकाळीं अजिजुद्दीन फकीर महाराजांच्या तर्फें माझ्याकडे आला. प्रश्नाला मी दिलेल्या उत्तरांबद्दल त्यानें माझे तीनदां आभार मानले. तुम्हीं येथें बराच काळ रहावें अशी महाराजांची इच्छा आहे. या कामीं ऑस्ट्रियाच्या बादशहाची परवानगी हवी असल्यास महाराज स्वतः त्या बादशहाला पत्र लिहून ही परवानगी मिळवून देतील असें तो म्हणाला. कांहीं महिने येथें राहून महाराजांच्या सैन्याच्या कांहीं तुकड्या मी शिकवून तयार कराव्या अशी महाराजांची इच्छा असल्याचें त्यानें मला सांगितलें. पगार घेऊन रहाणें तुम्हांला पसंत नसेल तर एखादी जहागीर देऊन किंवा इतर मार्गानें तुमची सोय करतां येईल असें तो म्हणाला.

मी अधिक काळ रहावें हें महाराजांचें म्हणणें केवळ औपचारिक स्वरूपाचें आहे असें मी आत्तांपर्यंत समजत होतों. परंतु मला आतां या म्हणण्याचें गांभीर्य कळून आलें. माझ्या अपेक्षेपेक्षांहि फार मोठें कार्यक्षेत्र माझ्यापुढें चालून आल्याचें मला दिसून आलें. मी मिळविलेल्या माहितीच्या आधारें स्वतः तयार केलेल्या सैन्यानिशीं चाल करून नवीन प्रदेश जिंकणें मला सहज शक्य होतें. भरपूर पैसा आणि महाराजांची इच्छा माझ्या हातांत

होती. केवळ एका माणसाच्या मनावर व कर्तृत्वावर संस्कृतीची वाढ आणि जोपासना होणें शक्य होतें अशी परिस्थिति माझ्यासमोर होती. परंतु याच वेळीं थकल्या भागलेल्या आणि म्हातारपणामुळें माझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या माझ्या मातेची मूर्ति माझ्या डोळ्यापुढें आली. आणि मी तत्काळ महाराजांचे आभार मानून त्यांच्या मागणीस नकार दिला.

फकीरसाहेब मला महाराजांची प्रकृति तपासून त्यांना औषध द्या असें म्हणत होते. महाराजांची प्रकृति विशेषतः त्यांना झालेला अर्धांगवायु व त्यामुळे बोलण्यांत आलेला अडखळपणा याविषयीं मी अधिक चौकशी केली. त्यासंबंधीं फकीरसाहेबांनीं मला जी माहिती सांगितली ती पुढीलप्रमाणें आहे :– एकदां पावसाळा सुरू होण्यापूर्वी महाराज आपल्या घोड्यावर बसून प्रवासास गेले होते. हवेंत अतिशय उष्णता पसरली होती. संबंध दिवस घोड-दौड करून आणि उन्हांत हिंडून महाराज अगदीं थकून गेले होते, जेवण्या-खाण्याची फारशी काळजी न करतां महाराजांनीं त्या दिवशीं दुपारीं नुसतीं कलिंगडेंच भरपूर खाल्लीं. तिसऱ्या प्रहरीं सोसाट्याचीं वादळें झालीं आणि त्याच्या मागोमाग मुसळधार पाऊस पडला. काश्मीरकडील पर्वतांतून वहात आलेल्या गार वाऱ्यामुळें हवेंतील उष्णतामान एकदम उतरून माणसें कुडकुडा-यला लागलीं. अशा परिस्थितींत महाराज बराच वेळ प्रवास करीत असतांना एक झोपडी दिसल्यावर तींत ते शिरले. अंगावरचे कपडे ओले होते व झोपडीला आडोसा चांगला नसल्यामुळें थंड वाऱ्यामुळें शरीर सारखें कांपत होतें. अशा स्थितींत बरीच रात्र होईपर्यंत त्यांना आपल्या तंबूंत पोचतां आलें नाहीं. आणि तेथें गेल्यावरही हट्टानें औषध वगैरे न घेतां ते तसेंच पडून राहिले. थोड्याच वेळांत पोटांत भयंकर कळा निघून त्यांना झोप येईनाशी झाली. मदतीसाठीं कोणाला हांक मारावी तोंच जीभ भयंकर जड होऊन त्यांच्या तोंडांतून शब्द निघेना. त्याच वेळीं डावा हात अगदीं निकामी होऊन वर उचलण्याची देखील ताकद त्यांच्यांत उरली नाहीं. कांहीं वेळानें नोकर जवळून जात असतां त्याला यांची धडपड चालली असल्याचें आढळून आलें आणि त्यानें तत्काळ अजिजुद्दीन फकीरसाहेबाला बोलाविणें पाठविलें. फकीरसाहेब येऊन पहातात तों महाराजांची वाचा बंद झालेली आणि तोंड वाकडें झाल्याचें त्यांना आढळलें. नंतर त्यांना लाहोरला आणून कस्तुरी

वगैरे औषधें पाजून त्यांची प्रकृति थोडी सुधारण्याचा प्रयत्न केला. कंपनीचे लुधियानामधील डॉक्टर मॅग्रीगॉर यांनींहि त्यांना कांहीं औषधें दिलीं. महाराज आतां घोड्यावर बसतात परंतु त्यांत त्यांच्या शरीराला फार वेदना होतात. या आजाराचा डोळ्यावरहि परिणाम होऊन पहाणाऱ्याला त्यांची दृष्टि गेली आहे असेंच वाटतें. एखादी वस्तू पहावयाची असल्यास डोळ्याजवळ अगदीं दोन इंचाइतकीही जवळ आणून ती ते पहातात. मी त्यांच्या खाण्यापिण्याची चौकशी केली तेव्हां महाराज दारू भयंकर पीत असल्याचें मला कळलें. त्यांची दारू एका विशिष्ट पद्धतीनें तयार केलेली असते. त्यामध्यें सर्व तऱ्हेच्या प्राण्यांचें मांस, (गोमांस वगळून), मोती आणि रत्नें, कस्तुरी, अफू, अनेक वनस्पतींचा रस एकत्र मिसळून व त्यांचें द्रव तयार करून महाराजांना देण्यांत येतें. मी हें द्रव स्वत: घेऊन बघितलें. त्याची चव फार उत्तम लागली. परंतु दुसरे दिवशीं मला गळून गेल्यासारखें झालें. या विशिष्ट द्रवाला येथें राजाची दारू असें म्हणण्यांत येतें. या दारूविषयीं माझें मत विचारलें असतांना महाराज ही दारू जेवढी कमी घेतील तेवढें बरें असें मी त्यांना सांगितलें. आमच्याजवळ संजीवनी आहे अशी जी कल्पना महाराजांची व फकीरसाहेबांची झाली होती ती कल्पना कांहीं केल्या ते सोडीनात. दुपारच्या वेळीं तोफांची सलामी आणि नेमबाजी होणार असल्याचें महाराजांकडून मला कळलें आणि मी या सलामीला हजर रहावें असें त्यांनीं मला सुचविलें

दुपारीं बारा वाजण्याचे सुमारास फकीर मला नेण्यासाठीं पालखी, उत्तम शृंगारलेले दोन घोडे, आणि तीन हत्ती घेऊन माझ्याकडे आला. धुळीचा त्रास टाळण्यासाठीं मी हत्तीवर बसून निघालों. आम्हीं मैदानावर आलों त्या वेळीं पायदळाच्या कित्येक तुकड्या ओळींत उभ्या होत्या. त्यांच्या उजव्या बाजूला घोडदळाच्या तोफखान्यांतील दोन तोफा होत्या. आम्ही ज्या वेळेला महाराजांच्या उघड्या तंबूपासून सुमारें तीस कदम अंतरावर आलों त्या वेळीं आमच्या हत्तींनीं गुडघे टेकून महाराजांना सलामी दिली. महाराजांच्या तंबूचे खांब चांदीचे असून तंबूवर पिवळ्या काश्मीरी शाली पसरल्या होत्या. तंबूच्या आंत आणि बाहेर दोन मोठे काश्मीरी गालिचे पसरले होते. महाराजांच्या तंबूच्या पाठीमागें बरेच तंबू उभारले होते.

महाराज उठून मला सामोरे आले आणि त्यांनी माझा हात हातांत घेऊन स्वतःच्या आरामखुर्चीजवळ असलेल्या आरामखुर्चीजवळ नेऊन मला बसविलें. मि. मॅकिसन् आणि व्हाईन माझ्याजवळ बसले होते. आमच्याशिवाय तंबूंत राजा हिरासिंग, खुशालसिंग आणि राजा सुचेतसिंग ही मंडळी होती. आमच्या समोरच्या पायदळी तुकडया खडया फौजेंतील होत्या. त्यांच्या अंगावर तांबडीं कुडतीं असून हातांत चापाच्या बंदुका होत्या. आमच्या समोरून ते शिस्तीनें कवायत करीत गेले. रणजितसिंगाच्या खास आवडीचे पंचवीस तीस घोडे पटांगणांत होते. महाराजांना घोडयांची आवड आहे. ही गोष्ट सर्व आशिया खंडांत पसरल्यामुळें उत्तमोत्तम घोडीं महाराजांकडे नजर म्हणून किंवा विकावयास येत असतात. आमच्या समोरचे घोडे काश्मीरी शाली, चांदी सोन्याच्या रिकबी आणि लगाम, खऱ्या मोत्यांच्या माळा इत्यादींनीं शृंगारलेले होते. या घोडयांवर कोणी बसत नसल्यामुळें लढाईंत त्यांचा किती उपयोग होईल याविषयीं मला जबरदस्त शंका आहे.

थोडया वेळानें महाराजांनीं माझ्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरूं केली. आज माझ्या एक गोष्ट विशेष लक्षांत आली कीं, महाराजांना माझ्या प्रवासाविषयीं शंका आली आहे. मी त्यांची नोकरी धरीत नाहीं यावरून त्यांना असें वाटलें कीं, कोणातर्फें तरी विशिष्ट हेतु मनांत धरून मी या भागांत राहून माहिती जमा केली. थोडया वेळानें मी त्यांना माझ्या प्रवासाचा हेतु सांगून त्यांची समजूत पटविली. हिंदुस्थान किंवा ईस्ट इंडिया कंपनी याविषयीं जरी त्यांनीं प्रत्यक्ष माहिती विचारली नाहीं तरी काश्मीर आणि पंजाब, शीख सैन्य, महाराजांच्या पदरीं असलेले युरोपीय अधिकारी, युरोपांतील राजांचीं धोरणें याविषयीं त्यांनीं मला अनेक प्रश्न विचारले. मी एक क्षणही न थांबतां त्यांच्या प्रश्नाला उत्तरें देत असे. त्यामुळें महाराजांना माझीं उत्तरें पटत असत. थोडया वेळानें महाराजांनीं आपलीं घोडीं अगदीं जवळ आणून मला दाखविलीं. एका खोगीराच्या गोंडयांत एक, दोन इंची चौकोनी माणिक बसविलेलें मला आढळलें. या माणिकावर जहांगिराचें नांव कोरलेलें होतें. ज्या वेळीं जहांगिरानें या माणिकावर आंपलें नांव कोरलें, त्या वेळीं नूरजहान हंसली आणि तिनें जहांगिराची चेष्टा केली. त्या वेळीं जहांगीर म्हणाला, 'हें मोगलांचें राज्य नष्ट होईल, मोगल

घराणें नष्ट होईल, परंतु जोंपर्यन्त या जगांत राजा आहे तोंपर्यंत या माणिकाची किंमत जगांत कायम राहील. लिहिलेले इतिहास कदाचित् माझें नांव राखणार नाहींत, परंतु हा लाल माझें नांव पुढच्या पिढ्यांना माहिती करून देईल.' जहांगिरानें हें माणिक मयूर सिंहासनांत बसविलें होतें. नादिरशहाकडून अहंमदशहाकडे व नंतर फिरत फिरत रणजितसिंगाकडे हें माणिक आतां आलें आहे. अहंमदशहा अब्दालीनें आपलें नांव त्यावर कोरलें आहे. लॉर्ड अम्हर्स्ट यानें महाराजांना दोन पिस्तुलें भेट म्हणून दिलीं होतीं. तीं आणून दाखविण्यास महाराजांनीं नोकरास सांगितलें. नोकरांना तीं सांपडेनात. तेव्हां महाराजांच्या ज्या घोड्यावर तीं पिस्तुलें ठेविलीं होतीं त्या घोड्याचें नांव सांगून आणवून घेतलीं. पिस्तुलावर सोन्याचा मुलामा चढविला असून त्यावर हिरे चिकटविले आहेत. लॉर्ड अॅम्हर्स्टकडून ती देणगी म्हणून आल्याबद्दल महाराजांना फार अभिमान वाटल्यासारखा दिसला. महाराज मला म्हणाले, 'तुम्ही तुमच्या देशाला परत गेल्यावर मला दोन पिस्तुलें पाठवून द्या.' नंतर महाराजांनीं चार तबकें आमच्यापुढें आणविलीं. त्यांमध्यें अनेक तऱ्हेचे हिरे असून जगांतील सर्वांत मोठा आणि उत्तम असा कोहिनूर हिरा त्यांमध्यें होता. या हिऱ्याचा आकार कोंबडीच्या अंड्याप्रमाणें आहे. हिरा पांढरा शुभ्र असून कल्पना करतां येणार नाहीं इतका चमकदार आहे. महाराजांनीं हा हिरा शहासुजाकडून पैदा केला आहे. महाराजांनीं हा हिरा माझ्या हातांत देऊन मला त्याची परीक्षा करण्यास सांगितलें. परंतु त्या हिऱ्याकडे पहात असतां माझ्या मनांत दुसरेच विचार आले. या हिऱ्याच्या किंमतींत धुळीस मिळालेल्या कितीतरी गरीब कुटुंबांचे संसार उजळून निघतील हे व अशाच तऱ्हेचे विचार त्या हिऱ्याकडे पहात असतां माझ्या मनांत घोळत होते. तबकांतील एकेक हिरा घेऊन महाराजांनीं त्याचा इतिहास मला सांगितला. दिल्लीच्या मयूरसिंहासनांतले अनेक नामांकित हिरे आणि रत्नें इराण आणि अफगाणिस्तानांतून महाराजांकडे परत आलेलीं होतीं.

महाराजांजवळ १०१ हत्ती आहेत. महाराजांच्या उपयोगासाठीं त्यांच्या खाजगी पागेंत एक हजार नामांकित जातीचीं घोडीं आहेत. पायदळाच्या उपयोगासाठीं सत्तावीस हजार आणि तोफखान्यासाठीं पंधरा हजार घोडीं

असल्याची माहिती महाराजांनीं मला सांगितली. कडांना मोत्यांनीं विणलेले अनेक तंबूहि महाराजांच्या जवळ आहेत.

यानंतर आम्ही तोफांची नेमबाजी पहाण्यास गेलों. तोफांवरील दारोगे एका मिनिटांत पांच वेळां तोफा भरून त्यास बत्ती देत असत. आम्ही तोफांची सरबत्ती पहात असतां मध्येंच थोडासा गोंधळ झाला. तोफांचे बार झाल्याबरोबर जवळ असलेले हत्ती थरथरा कापूं लागले. या हत्तींच्या हौद्यांत अनेक मोठीं माणसें बसलेलीं होतीं. त्यांच्या डोक्यांवरून तोफांचे गोळे जात असतां हत्ती थरथरा कांपून भीतिदायक चित्कार करूं लागले. त्यांना शांत करण्यासाठीं माहूत त्यांच्या गंडस्थळांत अंकुश खोचूं लागले. अंकुशाच्या मारामुळें रक्त वाहून हत्तींना वेदना असह्य झाल्या आणि ते दशदिशांना पळूं लागले. शेपट्या ताणून नी सोंडी हवेंत वर उचलून मैदानावरून हत्ती पळत असतां चोहींकडे एकच गोंधळ उडाला आणि पळापळ झाली. आजच्या दिवसांत रणजितसिंगाचें खडें सैन्य, त्याच्या जामदारखान्यांतील अप्रतिम रत्नें आणि रात्रीं नदीच्या काठचा अप्रतिम देखावा पाहून माझे डोळे निवले. गेल्या वीस वर्षांत कधींहि न पाहिलेल्या गोष्टी माझ्या डोळ्यांना दिसल्या होत्या. नंतर मी घरीं परतलों.

✦ ✦ ✦

प्रकरण ८ वें

दरबारी मुलाखती आणि प्रात्यक्षिक

शनिवारीं सकाळीं माझेकडे फकीरसाहेब महाराजांचा निरोप घेऊन आला. फेब्रुवारी महिनाअखेर साजरी होणारी होळी व त्या वेळचा दरबारी समारंभ पाहूनच मी लाहोर सोडावें असें महाराजांचें म्हणणें होतें. या होळीच्या सणानिमित्त राज्यांतील ठिकठिकाणचे अधिकारी आणि खास फौज लाहोरला येणार असल्यानें हा समारंभ पहाण्यास मी येथें थांबावें असा त्यांचा आग्रह होता. सर्व हिंदुस्थानांत लाहोरला हा सण मोठ्या उत्साहानें साजरा केला जातो हें मी माझ्या प्रवासांत अनेक ठिकाणीं ऐकलें होतें. परंतु इच्छा असूनहि हा समारंभ पहाणें मला शक्य नव्हतें. शेवटीं या समारंभाचें प्रात्यक्षिक मला दाखविण्यासाठीं महाराजांनीं कांहीं नर्तिका माझ्याकडे पाठविल्या व जनरल अलर्डच्या बागेंत दुपारीं एक वाजतां मला होळीचा सण कसा साजरा करतात हें पहावयास मिळालें.

कांहीं टोपल्यांत शिंगाड्याचें पीठ तयार करून त्याचे निळे, हिरवे, पिवळे, जांभळे, असे गोळे तयार करण्यांत येतात. या गोळ्यांवर सोन्याच्या आणि चांदीच्या बेगडाचे कागद चिकटविण्यांत येतात. जवळपास बरीचशीं भांडीं निरनिराळ्या रंगांनीं भरून ठेवितात आणि त्या भांड्यांजवळ रंग उडविण्यासाठीं पिचकाऱ्या ठेविलेल्या असतात. ह्या समारंभासाठीं सर्वजण पांढरे शुभ्र पोषाख करून येतात. समारंभाची सुरुवात नर्तिकेकडून होते प्रथम त्या स्वागतपर पद्य म्हणून समारंभाचें महत्त्व गाण्यांत सांगतात. हें गाणें झाल्यानंतर शिंगाड्याच्या पिठाचे गोळे जमलेल्या लोकांच्या हातांत देतात. संकेताप्रमाणें गोळाफेक सुरू होऊन मुख्य समारंभाला आरंभ होतो. गोळे पिठाचे केलेले असल्यामुळें लांबून येऊन अंगावर पडतांच वरचे सोन्याचांदीचे कागदी बेगड तुटतात व गोळे फुटून अंगाला रंग लागतो. सुरवातीला हा खेळ अतिशय शांतपणें व शिस्तीनें सुरू होतो. परंतु लोक

एकदां रंगांत आले म्हणजे सर्व शिस्त बिघडते आणि ज्याच्या हातांत जेवढे गोळे सांपडतील तेवढे घेऊन तो आपणास हव्या त्या माणसावर ते फेकतो. त्यानंतर रंगांनीं भरलेले घडे उचलून पिचकाऱ्यांनीं रंग एकमेकांच्या अंगावर उडविण्यांत येतो. आणि कांहीं वेळानें पिचकऱ्यांऐवजीं लोक रंगाच्या घागरीच उचलून एकमेकांच्या अंगावर ओततात, आणि रंगीबेरंगी करतात. होळीच्या दिवसांत हा सण सार्वजनिक ठिकाणींच होतो असें नव्हे तर घराघरांतूनही हा सण साजरा होतो. आणि स्त्रिया त्यांत मोकळेपणानें भाग घेतात. या सणांत लोक मादक द्रव्य पितात आणि आपला आनंद अशा विचित्र तऱ्हेनें व्यक्त करतात.

रविवारीं १७ जानेवारीला आम्ही लाहोरमधील शालिमार बाग पहाण्यास गेलों. हिंदुस्थानांत तीन शालिमार बागा विशेष प्रसिद्ध आहेत. पहिली दिल्ली येथील, दुसरी लाहोरमधील व तिसरी काश्मीरमधील. या बागा कोटयवधि रुपये खर्च करून तयार केल्या होत्या असें सांगतात. लाहोर-मधील शालिमारबाग शहरापासून पांच मैल दूर असून रस्त्यावर भव्य, उत्कृष्ट बांधणीचे राजवाडे आणि धर्मशाळा विपुल आहेत. इतक्या चांगल्या व विपुल प्रमाणावर सराया व राजवाडे असणें शक्य आहे हें पाहिल्यावांचून मनाला पटणारच नाहीं. हीं पडकीं ऐतिहासिक ठिकाणें पहात असतां मनामध्यें या ठिकाणचें पूर्वीचें वैभव, चांगल्या गोष्टी नष्ट करण्याचा काळाचा गुणधर्म, फारच थोडया वेळांत नष्ट होणारी माणसाची कला आणि मनुष्याचा अहंकार याविषयीं मनांत अनेक विचार येतात. या इमारतीं-शेजारींच मधूनच एखादी नवी इमारत दिसते. ही नवीन विद्रूप बांधणी पूर्वींच्या इमारतीची शोभा मनांत अधिक चांगली भरवून देते. बागेच्याजवळ एक मैल अलीकडे नूरजहानचा राजवाडा पडक्या स्थितींत आहे. हा राजवाडा एकाद्या मोठ्या किल्ल्याप्रमाणें बांधलेला आहे. परंतु आज मात्र त्याचा नाश झाला आहे.

शालिमार बाग प्रचंड असून पांच मैल रुंद आणि दीड मैल लांब आहे. ही बाग म्हणजे एखाद्या मोठ्या इमारतींत बसवल्यासारखीच आहे. या बागेचें किंवा बागेभोवतालच्या भिंतीचें प्रवेशद्वार उत्कृष्ट अशा संगमरवरी दगडानें बांधलें असून सर्व बागेंत अतिशय शोभिवंत असें आहे. या

सर्वोत्कृष्ट बागेंत सध्यां एक गरीब माळी राहतो. बागेंत एक मोठें तळें असून त्याचा आकार व पाणी पहातां तें एखाद्या सरोवराप्रमाणें भासतें. या तळ्याचे काठीं अनेक इमारती असून युरोपांतील श्रीमंत व विलासी अशा चौदाव्या लुईला राहण्यास उपयोगी पडल्या असत्या अशा इमारती यामध्यें आहेत. ही बाग चांगल्या स्थितींत ठेविलेली असून आंत सर्व तऱ्हेच्या फळांचीं झाडें आहेत. रणजितसिंग या बागेंत अधूनमधून एखाद दुसरा दिवस येऊन रहातो.

या बागेंत नूरजहान दरवर्षी मीनाबाजार भरवीत असे, व त्या बाजारांत विलासाचे व वेडेपणाचे अनेक चाळे होत असत. पूर्वीच्या मोगल बादशहांनीं बांधलेल्या मोठमोठ्या व विलासी इमारतींशेजारींच रणजितसिंगानें एक गवताची झोपडी बांधली असून तो त्या झोपडींत राहातो. राजवाड्या–इमारती शेजारीं ही गवताची झोपडी कशीशीच दिसते. परत येतांना एक मैलभर आम्ही शहराच्या बाहेरून तटाजवळून आलों. वाटेंत एके ठिकाणीं एक शीख फकीर (भिकारी) हातांत सारंगी घेऊन गुरुगोविंदसिंगाबद्दल गाणीं म्हणत होता. त्याच्या लांबच लांब अशा काळ्या झग्याची किनार तांबडी होती. उजव्या खांद्यावरून डाव्या बाजूला एक काळा पांढरा पट्टा सोडला असून त्या पट्ट्यावर ज्योतिष शास्त्राच्या खुणा आणि चित्रें होतीं. त्याच्या डोक्यावर एक जादूची टोपी होती आणि त्याच्या सभोवतीं स्त्रियांचा गराडा पडला होता. मी जवळ जाऊन पाहिलें तेव्हां त्याचा तो पोषाख, त्याचें तें नृत्य आणि नाचत असतां गाणें म्हणत असतांना ऐकूं येणारा गोड आवाज मला जरा आश्चर्यजनकच वाटला.

मी घरीं परत आलों त्या वेळीं रणजितसिंगाकडून फकीरसाहेब निरोप घेऊन आला असून आमची वाट पहात असलेला मला दिसला. रणजितसिंगानें मला एक प्रशस्तिपत्रक मागितलें होतें. माझ्यासारखा एक यःकश्चित् प्रवासी रणजितसिंगासारख्या बलाढ्य बादशहाला प्रशस्तिपत्रक तें काय देणार असा विचार मनांत येऊन प्रथम मला या म्हणण्याचा अर्थच कळेना. नंतर माझ्या लक्षांत आलें कीं महाराजा रणजितसिंग आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यांतील मैत्रीबद्दल मी चार चांगले शब्द लिहावे, त्याचप्रमाणें कंपनी सरकारकडून आलेल्या माझ्यासारख्या युरोपीय पाहुण्याची रणजितसिंगानें

उत्कृष्ट व्यवस्था ठेविली होती, असेंही मी त्यांत नमूद करावें अशी महाराजांची इच्छा होती. या इच्छेप्रमाणें रात्रीं मी या प्रशस्तिपत्रकाचा नमुना तयार करून सोमवारीं सकाळीं तो फकीरसाहेबाला दाखविला. फकीरसाहेबानें त्यांत कांहीं सुधारणा सुचवून कागदाच्या निम्या बाजूवर मी स्वहस्तें तो नमुना इंग्रजींत लिहावा अशी इच्छा प्रकट केली. त्या इंग्रजी तर्जुम्याशेजारींच कोऱ्या जागेंत त्याचें फारशी भाषांतर लिहिलें जावयाचें होतें. मी लिहिलेला तर्जुमा खालीलप्रमाणें होता. "युरोपांतून प्रवासास निघण्यापूर्वी ज्या विविध देशांस मला भेटी द्यावयाच्या होत्या, तेथील राजे, महाराजे, प्रवाशाच्या संरक्षणासाठीं काय काय व कितपत व्यवस्था करतात, याची मी चौकशी केली होती. पंजाब आणि काश्मीर हे दोन प्रदेश अद्यापपर्यंत अज्ञात असल्यानें व युरोपांतील दोन तीन प्रवाशांनींच ते प्रदेश पाहिले असल्यानें मला या भागांविषयीं विशेष जिज्ञासा आणि कुतूहल होतें. युरोपांत लाहोरचे महाराजा रणजितसिंग आणि कंपनी सरकार यांच्यांतील गाढ मैत्री आणि शांततेचें वातावरण, त्याचप्रमाणें आपल्या राज्यांत प्रवाशांना उत्तम संरक्षण देऊन महाराजा रणजितसिंग दरबारांत प्रवाशांचा सन्मान करतात, याविषयीं मीं ऐकिलें होतें. हिंदुस्थानांत आल्यानंतर मागें प्रवासांत असतांना मी ज्या गोष्टी पाहिल्या त्यावरून या दोन राज्यांतील मैत्री उत्तम आहे, येवढेंच नव्हे तर माझ्या तर कल्पनेपेक्षांहि अधिक चांगल्या प्रकारें अस्तित्वांत आहे असें मला आढळून आलें. महाराजा रणजितसिंगांची परवानगी घेऊन मी काश्मीरला गेलों आणि नंतर त्यांच्या दर्शनास लाहोरला आलों. महाराजांच्या हातून मला उत्तम संरक्षण मिळालें एवढेंच नव्हे तर त्यांच्या थोरपणाला साजेल अशा रीतीनें त्यांनीं माझें स्वागत केलें. महाराजांची वागणूक आणि त्यांचा दयाळूपणा याचा माझ्या मनावर फार खोलपर्यंत परिणाम झालेला आहे. हिंदुस्थानांतील हे प्रदेश पहाणारा पहिला ऑस्ट्रियन प्रवासी म्हणून हें नमूद करतांना मला आनंद आणि अभिमान वाटतो. त्याचप्रमाणें महाराज आणि ब्रिटिश सरकार यांच्यांतील खुली मैत्री पाहून मला फार समाधान वाटलें. ही मैत्री आणि हें प्रेम असेंच कायम राहून त्यामध्यें वाढ होवो, अशी इच्छा मी करतों." फकीरसाहेब आणि रणजितसिंग यांची बालिश इच्छा पूर्ण करण्या-

करितां मी हा नमुना स्वहस्तानें इंग्रजींत लिहिला. वाटेंतील ठाणेदारापासून काश्मीरमधील सुभेदारापर्यंत सर्वांनीं अशींच प्रशस्तिपत्रकें मला मागितलीं होतीं, व मीं तीं त्यांना दिलीं होतीं. हीं सर्व प्रशस्तिपत्रकें मागवून रणजितसिगानें आपल्याजवळ ठेवून दिलीं.

फकीरसाहेबाला मी लौकरच लुधियानाला जाणार असून प्रवासासाठीं वाटेंत हत्ती पुरविण्यास सांगितलें. फकीरसाहेब म्हणाले कीं, वाटेंत जागजागीं हत्तींची व्यवस्था करण्यास किमान चार दिवस लागतील व यासाठीं महाराजांची खास परवानगीही लागेल. पंजाबमध्यें प्रत्येक बारीकसारीक गोष्ट रणजितसिगाच्या आज्ञेनेंच पार पाडली जाते. त्याच्या आज्ञेवांचून इकडची काडी देखील तिकडे फिरली जात नाहीं. मला दुसरी काळजी माझ्या सामानाबद्दल होती. लुधियानाहून आठ तारखेला पाठविलेलें सामान मला अद्याप मिळालें नव्हतें. या सामानांत माझा लष्करी गणवेश, उत्तमोत्तम कपडे आणि औषधांचा पुरवठा होता. वाटेंत चोरट्यांकडून हें सामान लुटलें जाण्याची शक्यता नव्हती. कारण सुरक्षिततेच्या बाबतींत हिंदुस्थानच्या इतर कोणत्याही भागापेक्षां आज पंजाब अधिक चांगला आहे. ज्या गांवाजवळ चोरी होते त्या गांवच्या नागरिकांकडून रणजितसिग चोरीच्या रकमेची वसुली करतो. रणजितसिगाला मला लष्करी गणवेशांत पहाण्याची फार इच्छा होती. हेंही माझ्या आतुरतेचें कारण होतें.

महाराजा रणजितसिगाच्या राज्यांत नोकरींत असलेल्या कांहीं युरोपीयांची येथें माहिती देणें अवश्य वाटतें. जनरल व्हेन्तुरा यांनीं महाराजांच्या सैन्याला कवायत शिकविली असून प्रत्यक्ष लढाईंतही ते महाराजांना फार उपयोगी पडले आहेत. परंतु दरबारला आवश्यक असा लवचिकपणा आणि अदबीची वागणूक याचा थोडासा अभाव त्यांच्या ठिकाणीं आहे असें येथें म्हटलें जातें. चांगल्या माणसापेक्षां क्षुद्र माणसाचा रणजितसिगावर लवकर पगडा बसतो. जनरल साहेबांचा महाराजांवर पगडा नाहीं हें त्यांच्या मोठेपणाचेंच द्योतक आहे. पंजाबांत आणि संबंध हिंदुस्थानांत त्यांना फार मान असून हिंदुस्थानांतून इकडे येत असतां इंग्रजी सेनाधिकाऱ्यांनीं आपला आदर व्यक्त करून त्यांचा ठिकठिकाणीं सत्कार केला होता. महाराजांनीं त्यांना लाहोरचे कोतवाल आणि मुख्य न्यायाधीश नेमलें असून दरबारांत मानाच्या दृष्टीनें

त्यांची जागा तिसरी आहे. दररोज सकाळीं महाराजांना भेटलेंच पाहिजे असा त्यांच्यावर दंडक आहे. दिवसाच्या राहिलेल्या वेळांत जनरल आपलीं कामें करीत असतात.

पंजाबमधील दुसरे युरोपीय म्हणजे जनरल अॅव्हीताबल हे होत. हे फ्रेंच गृहस्थ नेपोलियनच्या सैन्यांत चांगलीं कामें करून मोठमोठ्या हुद्द्यांवर चढले होते. नेपोलियनच्या पाडावानंतर त्यांनीं आपला मायदेश सोडून इकडे आपलें नशीब काढण्याचें ठरविलें. कांहीं दिवस इराणच्या बादशहा-जवळ राहून आतां ते महाराजांच्या नोकरींत आहेत. मध्यंतरीं ते आपल्या मायदेशाला परत गेले होते. परंतु मायदेशापेक्षां बाहेरच अधिक चांगलें कार्यक्षेत्र आहे असें पाहून ते आतां इथें राहिले आहेत. महाराजांनीं प्रथम त्यांना रेखना दुआब आणि वजिराबाद येथील सुभेदार नेमलें होतें. त्या ठिकाणीं त्यांनीं तडफदार रीतीनें काम करून कर्तबगार अधिकारी म्हणून नांव कमावलें. पेशावर येथें अडचणीची परिस्थिति असल्यानें आतां त्यांना तिकडे पाठविण्यांत आलें आहे. जनरल अॅव्हीताबल यांच्या कर्तबगारीविषयीं येथें एक गोष्ट सांगितली जाते. वझिराबाद येथें सुभेदार असतांना शीख धर्मांतील सहा लोकांनीं चोरी केली असल्याचें आढळलें. महाराज रणजितसिंग हे कोणालाही ठार मारण्याच्या विरुद्ध आहेत. महाराजांची इच्छा आणि शीख धर्मांतील आरोपी या दोन गोष्टी एकत्र आल्यानें त्यांना कडक शिक्षा करण्याचें धाडस फारसें कोणी केलें नसतें. महाराजांनीं जनरलना या लोकांना निसटून जाऊं देऊं नका अशी आज्ञा पाठविली. जनरलनें त्या क्षणींच त्या सहाही शिखांना फांशी दिलें. महाराजांनीं रागानें जनरलला दरबारांत बोलाविलें. दरबारांत जनरलचे सर्व मित्र महाराजांचा राग लक्षांत घेऊन पुढील भविष्य जाणून थरथरा कांपत होते. दरबारांत आल्यानंतर जनरल अॅव्हिताबल महाराजांच्या पुढें उभे राहिले. महाराज रागानें उसळून त्यांना म्हणाले, " तुमच्या ताब्यांत दिलेले सहा शीख आरोपी फाशी देण्याचें धाडस करण्याची छाती तुम्हांला कशी झाली ?" जनरल अॅव्हीताबल शांतपणें त्यांना म्हणाले, " महाराज, मी आपलें आज्ञापालनच केलें आहे. हे चोर निसटून जाऊं न देण्याचा खात्रीचा उपाय म्हणजे त्यांना फांशी देणें हें लक्षांत घेऊन मीं त्यांना फांशी दिलें आहे."

त्यांचें हें उत्तर ऐकून महाराजांना हसूं कोसळलें व हें प्रकरण येथेंच मिटलें.

कर्नल कोर्ट हे फ्रेंच गृहस्थ पॅरिसमधील पॉलीटेक्निकल इन्स्टिटयूटमध्यें होते. हे निष्णात अधिकारी असून यांना परिस्थितीची चांगली माहिती आहे. महाराजांच्या नोकरींतील गुरखे लोकांच्या दोन बटालियन्स यांच्या हाताखालीं आहेत. सध्यां हे अटकला फ्रेंच लिजनप्रमाणेंच मुक्काम करून आहेत.

मंगळवारीं दिवसभर मी घरीं बसूनच होतों. बऱ्याच दिवसांचा पत्र-व्यवहार थांबला होता तो आज मी पुरा केला. अधूनमधून मी महाराजांचेकडे वशिला लावावा म्हणून कांहीं लोक माझ्याकडे येत होते. काश्मीरच्या सुभेदाराचा मुलगा सुभेदाराकडून एक पत्र घेऊन माझेकडे आला. महाराजा रणजितसिगांनीं पुढच्या वर्षाकरितां साडेबावीस लाख रुपये खंडणी मागितली होती. सध्यांच्या परिस्थितींत ही खंडणी फारच जबर व अन्यायाची होती. मी महाराजांच्या जवळ पूर्वींच सूतोवाच केल्याचें त्याला सांगितलें. अशी खंडणी देणें अशक्य आहे अशा अर्थाचें पत्र मुनशीकडून सुभेदाराला लिहिलें. सुभेदार मेहनसिगानें वाटल्यास हें पत्र रणजितसिगाला दाखवावें असें मीं सुभेदाराच्या मुलाला सुचविलें.

संध्याकाळचे वेळीं मी नदी किनाऱ्याची शोभा पाहूं लागलों. कबरी आणि समाधि, स्मारकें आणि छत्र्या यांची नुसती गर्दी असून जवळपास पडक्या आणि भग्न इमारती चोहोंकडे पसरल्या होत्या. वाळवंटांत पसरलेल्या इजिप्तमधील स्मारकाप्रमाणें मला हा देखावा वाटला. संध्याकाळचे वेळीं सोसाटयाच्या वाऱ्यानें मध्येंच धूळ उडून एखादी शीख तुकडी ऐटींत इकडून तिकडे जातांना दिसते. रात्रीच्या वेळीं आपलीं जनावरें, कोकरें, चालण्यास अगदीं कठीण अशीं गळलेलीं म्हातारीं जनावरें यांच्यासह हिंदी लोक शहराचा आश्रय घेतात. तरस, लांडगा आणि सर्वांत क्रूर असा मानवी प्राणी यांच्यापासून त्रास न व्हावा म्हणून ही खबरदारी घ्यावी लागते. मध्यरात्रीच्या वेळीं कावळे आणि पाकोळ्या शहराच्या बुरुजाकडे धाव घेतांना दिसतात. क्वचित् प्रसंगीं गुरुगोविंदसिगाचें भजन आपल्या सारंगीच्या नादांत म्हणत शीख फकीर नाचत असतांना दिसतात.

गेले कित्येक महिने प्रवासानें श्रमल्यामुळें मला विश्रांति ही कधीं माहीतच नव्हती. तशी विश्रान्ति आज मिळाल्यामुळें माझ्या मनांत हलकल्लोळ माजला. विचारांची नुसती गर्दी झाली होती.

बुधवारीं सकाळीं महाराजांच्याकडून फकीरसाहेब माझ्याकडे आले होते. लाहोरमधील माझ्या छोटया मुक्कामांत महाराजांना माझी पुरती ओळख झाली नसल्यामुळें मी माझा येथील मुक्काम वाढवावा अशी महाराजांची इच्छा असल्याचें त्यानें सांगितलें. शहरांतील वैभव व ऐतिहासिक गोष्टी ह्या मी येथें अधिक काळ राहिल्यानें मला नीट पहातां येतील असें महाराजांनीं सुचविलें होतें. कमींत कमी आणखी एक पंधरवडा तरी मी रहावें अशी त्यांची इच्छा होती. मी महाराजांचे आभार मानून आज त्यांचा निरोप घेणार असल्याचें फकीरसाहेबाला सांगितलें.

काल मी माझें घडयाळ नीट लावून घेतलें होतें. कोनमापक यंत्रानें माप व पडताळा घेऊन मी बरोबर वेळ ठरविली होती. मी हें करीत असतांना जमींदाराच्या मुलानें मी हें काय करतों आहे यासंबंधीं विचारणा केली. मी त्याला माझा हेतु समजावून सांगितला. आज सकाळीं तो मुलगा एका ज्योतिषाला घेऊन माझ्याकडे आला. ह्या ज्योतिषाच्या हातांत संस्कृत पुस्तकें असून तो गंभीर आणि विचारी दिसत होता. त्या ज्योतिषा-जवळ तारे आणि ग्रह यांची स्थिति ठरविणारें एक यंत्र होतें. मी त्याला त्याचा कसा उपयोग करावा म्हणून विचारलें. पण आपल्या धंद्याची खूण म्हणूनच केवळ तो तें वापरतो हें माझ्या नंतर लक्षांत आलें. त्याच्या हातांतील संस्कृत पुस्तकें उघडून मी त्याला एक परिच्छेद वाचण्यास सांगितलें. परंतु तो परिच्छेद त्याला वाचतां आला नाहीं. कांहीं थोडे परिच्छेद त्यानें पाठ केलेले असून तेवढेच त्याला अवगत आहेत असें माझ्या लक्षांत आलें. त्याच्या हातांतील संस्कृत ग्रंथांत हिंदुस्थानांतील प्राचीन शहरांचे अक्षांक्ष रेखांश दिलेले होते. हे अक्षांक्ष रेखांश कसे काढले आहेत हेंही त्या ज्योतिषाला सांगतां येईना. खगोल व ज्योतिषशास्त्र यांत तज्ज्ञ म्हण-विणारा हा मनुष्य आपलें अज्ञान प्रकट करण्यासाठीं माझ्यापुढें आला होता कीं काय? परंतु नंतर माझ्या लक्षांत आलें कीं त्याला अमृतसर शहराचे ज्योतिष-शास्त्राच्या दृष्टीनें आवश्यक म्हणून अक्षांश व रेखांश पाहिजे होते. अमृतसर हें

अगदीं अलीकडे भरभराटीस आलें असल्यामुळें त्याच्या हातांतील शास्त्रांत या शहराचा उल्लेख नव्हता. म्हणून धंद्याच्या दृष्टीनें त्याला माझी मदत हवी होती.

आजही माझ्याकडे वशिला लावण्यासाठीं लोकांची रीघ लागली होती. ज्यांचा माझा प्रत्यक्ष परिचय आहे आणि ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे असें मला वाटतें अशाच लोकांबद्दल मी बोलण्याचें ठरविलें होतें. मि. फोर्नी नांवाचे एक सद्‌गृहस्थ स्फोटाची दारू तयार करण्यांत निष्णात आहेत. महाराजांचे जवळ आपणांस काम व नोकरी मिळावी म्हणून ते सध्यां येथें मुक्काम करून आहेत. महाराजांनीं त्याला महिना सातशें रुपये देऊं केले होते, व हा गृहस्थ महिना तीन हजार रुपये मागत होता. गेले कित्येक महिने तो येथें नोकरी मिळण्याच्या आशेनें छोटींमोठीं कामें करीत बसला आहे. केलेल्या कामाबद्दल कांहीं हजार रुपये मिळाल्यास त्याची निघून जाण्याची तयारी आहे. परंतु महाराज त्याला कांहीं देत नाहींत अशी त्याची तक्रार आहे. काबूल येथें या गृहस्थाचा एक जर्मन मित्र असून जनरल व्हेंतुराला त्यानें एक पत्र पाठविलें आहे. हा जर्मन गृहस्थ काबुलांत रशियाचा हेर म्हणून काम करतो. चांगला पगार मिळाल्यास लाहोर दरबारचा हेर म्हणून काम करण्याची तयारी त्यानें आपल्या पत्रांत दाखविली होती.

गुरुवारीं दुपारीं (२१ जानेवारीस) फकीरसाहेब जेरबंद केलेलीं घोडीं आणि महाराजांची खास गाडी घेऊन माझ्याकडे आले होते. ही गाडी अगदीं सामान्य असून इंग्लंडच्या राजाकडून महाराजांना भेट म्हणून आली आहे. ही गाडी आणि पांच घोडीं घेऊन लेफ्टनंट बर्नेस कंपनी सरकारतर्फे महाराजांकडे आले होते. इकडे येतांना हें सर्व सामान त्यानें सिंधू नदींतून आणलें. असा विचित्र प्रवास करण्याचा त्याचा उद्देश सिंधू नदीची नाविक दृष्टीनें पहाणी करून त्यांत व्यापारी व लष्करी बोटी कितपत प्रवास करूं शकतील हें पहाण्याचें होतें. तेथील जाडाभरडा आणि कच्चा माल नेऊन त्याच्या मोबदल्यांत उत्तम बनावटीचा आणि स्वस्त असा माल येथील लोकांना देण्याचा उद्देश इंग्रजांच्या मनांत आहे. सिंधच्या अमीरानें जर या नदीचा उपयोग करूं दिला तर या भागांतील लोकांचा

बराच फायदा होणार आहे. सिंधच्या अमिरानें लेफ्टनंट बर्नेसच्या या प्रवासाला विरोध केला. त्याच्या परवानगीवांचूनच हा प्रवास सुरू झाला होता. त्याच्या राज्यांत घोडे आणि गाडी घेऊन लेफ्टनंट बर्नेस आल्यानंतर त्यांनीं त्याला पुढें जाण्यास नकार दिला. हजारों घोडीं पंजाबच्या पठाराकडून लाहोरकडे जात असतां ह्या विचित्र मार्गानें हीं घोडीं नेण्यामागील हेतु अमीराच्या व रणजितसिंगाच्या लक्षांत आल्यावांचून कसा राहील? रणजितसिंगाला घोडीं अत्यंत आवडत असल्यामुळें व इंग्लंडच्या राजाकडून ही भेट येत असल्यामुळें त्यानें या गोष्टीसंबंधीं फारशी वाच्यता किंवा विरोध केला नाही.

अशा प्रकारच्या इतिहासप्रसिद्ध गाडींत बसण्याचें भाग्य मला लाभलें. ही गाडी मूळची जुनी असल्यामुळें तीमधून जातांना ती सारखी लचकत होती. अशा या गाडींतून आम्ही दरबारी तंबूपर्यंत गेल्यानंतर महाराजांनीं माझें स्वागत करून मला आंतमध्यें नेलें. नदीच्या काठीं तोफांची नेमबाजी आम्हांला पहावयाची होती. रणजितसिंगानें माझा हात हातांत घेऊन तोफा व्यवस्थित चालतात कीं नाहीं असें विचारलें. त्या तोफा नीट ठेवल्या नसल्याचें माझें मत होतें पण मी बोललों नाहीं. तोफा नेण्यास सोपें जावें म्हणून लाहोरपासून ते अमृतसरपर्यंत चांगला रस्ता करणार असल्याचें महाराजांनीं मला सांगितलें.मी महाराजांना म्हटलें कीं,उत्तम रस्ते तयार झाल्यास इकडून तिकडे सैन्य नेण्यास सोपें जातें आणि आहे त्या सैन्यांतच जवळजवळ दुप्पट सैन्य असल्यासारखें काम होतें. माझा दुभाषी मोहन याला माझें म्हणणें चट्कन् समजलें परंतु त्याला तें रणजितसिंगाला सांगतां येईना. बराच वेळ मोहननें आपलें म्हणणें समजावून सांगितल्यानंतर महाराजांना तें समजलें आणि ते म्हणाले, "पण या चांगल्या रस्त्यांनीं शत्रूच्या सैन्याला येण्यास सोपा आणि सोईस्कर रस्ताच तयार केल्यासारखा होणार नाहीं काय?" मी त्यांना म्हटलें, "हिंदुस्थानांतील कोणत्याही भागांत अद्याप चांगले रस्ते नव्हते आणि या चांगल्या रस्त्यांच्या अभावीं इंग्रजांचा राज्यविस्तार होण्याचें मुळींच थांबलेलें नाहीं. तेव्हां ही तुमची भीति व्यर्थ आहे. शिक्षण घेतलेल्या खड्या सैन्याला उत्तम रस्त्यांची जरूरी आहेच." त्यावर महाराज म्हणाले "तुम्ही तीन महिने येथें राहिलांत तर फार बरें होईल. येवढे तीन महिने तरी तुम्ही येथें राहिलेंच पाहिजे." महाराजांचा हा आग्रह कितीही

मानाचा असला तरी मला रहातां येत नसल्याचें मी त्यांना सुचविलें. गेल्या सबंध वर्षांत मला माझ्या घरचें पत्र मिळालें नव्हतें आणि याशिवाय तीन महिन्यांत सैन्याची पुनर्घटना करणेंहि शक्य नव्हतें.

रणजितसिंगांनीं माझ्याबरोबर असलेल्या मि. व्हाईनला विचारलें कीं, उजाड पडलेला एखादा प्रदेश पुन्हा पुनर्वसाहत करण्याचा मार्ग कोणता? मोहननें या प्रश्नाचें केलेलें भाषांतर व्हाईनला समजेना. तेव्हां हा प्रश्न मी नीट भाषेंत व्हाईनला विचारून वर माझी स्वत:ची अशी पुस्ती जोडली कीं, महाशय प्रश्नाचें उत्तर थोडें काळजीपूर्वक द्या. कारण महाराज तुम्हांला येथें सुभेदार म्हणून नेमतील. प्रश्नाचें गांभीर्य न कळल्यामुळें व्हाईननें चेष्टेंतच कांहींसें उत्तर दिलें व आमचें संभाषण तेथेंच थांबलें. नंतर आम्ही तोफा चालवीत होते त्या ठिकाणीं गेलों. रावी नदीच्या एका तीरावर दोन साडेचार शेरी तोफा ठेविल्या असून दुसऱ्या टोकाला एका झाडावर निशाणीची पांढरी खूण ठेविली होती. तोफेच्या पाठीमागें पायदळाची एक तुकडी आणि गॉर्चेली पलटण खडी होती. मी तोफा जवळ जाऊन पाहिल्या. तोफा लाहोरांत ओतलेल्या असून उत्तम स्थितींत होत्या. तोफांचे गाडे इंग्रजी पद्धतीनें तयार केलेले होते. मी सूक्ष्मपणें गाड्यांचें निरीक्षण केल्यानंतर रणजितसिंग माझ्याकडे पाहून म्हणाले, "तोफा कशा काय आहेत?" मी म्हणालों, "उत्तम आहेत." नंतर त्यांनीं विचारलें, "नेम मारण्याच्या दृष्टीनें तोफांचा वेध बरोबर आहे काय?" मी तात्काळ 'नाहीं' म्हणून सांगितलें, तोफा बरोबर मांडल्या गेलेल्या नाहींत आणि तोफांवरील दारोग्यांना ही गोष्ट निश्चित माहीत असली पाहिजे. रणजितसिंगानें दारोग्यांना तोफांना बत्ती देण्याची आज्ञा केली. दोन्ही तोफा उडाल्या परंतु नेम लागू पडले नाहींत. आणखी दोन गोळे टाकले पण तरीहि नेम चुकले. त्यावर रणजितसिंग मला म्हणाले, "चूक कशांत आहे तें पाहून मला सांगा?" "तीन गोळ्यांमध्यें मी नेम साधून देईन' असें मी त्यांना म्हणालों. समोरचें झाड सुमारे आठशे यार्डांवर होतें. मी तोफांचे नेम बरोबर जुळविले आणि तोफांना बत्ती दिली. माझा पहिलाच तोफेचा गोळा सरळ झाडावर जाऊन पडला. दुसरा गोळा झाडाच्या फांदींत पण निशाणाच्या किंचित् उजव्या बाजूला पडला. मी पुन्हा तोफ जुळवली आणि तिसरा गोळा मारला त्याचा नेम बरोबर लागून झाड दुभंगून पडलें. रणजितसिंगानें माझी पाठ थोपटली,

आणि ते म्हणाले, तुम्हांला ही कला चांगली अवगत आहे असा माझा अंदाज होताच. गॉर्चेली पलटणीतील लोक "वा नूर उनल्ला नूर" असे ओरडले.

कांहीं दिवसांपूर्वी एक फ्रेंच दारोगा लाहोरला महाराजांकडे नोकरीसाठीं आला होता. महाराजांनीं त्याला याच झाडावर नेम मारण्याची आज्ञा केली. यामध्यें जर नैपुण्य दाखविलें तर नोकरी मिळेल असें आश्वासन त्याला दिलें होतें. त्यावेळीं जनरल व्हेंतुरानें या गोष्टीला विरोध केला. कारण नेम साधण्याची गोष्ट बऱ्याच वेळीं नशिबावर अवलंबून असते. जर नेम साधला गेला तर मनुष्य उगीच तज्ञ ठरतो आणि चुकला तर कौशल्य असूनहि नालायक ठरतो, असें त्याचें म्हणणें होतें. परंतु महाराजांनीं त्या गोष्टीबद्दल आग्रह धरला आणि नेम न साधल्यामुळें शेवटीं त्या फ्रेंच गृहस्थाला नोकरी न मिळतां परत जावें लागलें. माझ्या बाबतींत परीक्षा घेण्याचाच महाराजांचा भाग होता व या परीक्षेंत मी उतरेन असा त्यांचा अंदाज होता. त्यामुळेंच माझा नेम साधल्यानंतर त्यांनीं मला शाबासकी दिली.

रणजितसिंगाचा तोफखाना अनेक दारोग्यांमध्यें विभागला होता. परंतु तोफांचे गाडे आणि तोफांना बत्ती देणारे लोक यांचें काम निश्चित ठरलेलें नसतें. ज्या वेळेला या तोफांची जरूर लागते त्यावेळीं तोफांवरील अधिकाऱ्यांची धावपळ सुरू होते. या तोफांचा जेवढा उपयोग व्हावयास हवा तेवढा त्यामुळें होत नाहीं. तोफांत दारू भरणें आणि त्यांना बत्ती देणें येवढेंच काम मात्र कांहींजण करतात. फ्रेंच लिजनमधल्या अधिकाऱ्यांनीं तोफांसंबंधींची ही अडचण महाराजांच्या ध्यानीं आणून त्यामध्यें सुधारणा करण्याची आणि या कामीं कांहीं लोकांना शिकवून तयार करण्याची आग्रहपूर्वक मागणी केली. सध्यां फ्रेंच तुकड्या मात्र लायक लोकांच्या हातांत आहेत. त्याचप्रमाणें सहा तोफांचे दोन ताफेही उत्तम रीतीनें तयार झालेले आहेत.

लॉर्ड विल्यम बेंटिंग आणि महाराजा रणजितसिंग यांची रूपार येथें भेट झाली. त्या वेळीं प्रथमच तोफांवरून गोल गोळे उडविण्यांत येत होते. उडलेल्या तोफेच्या गोळ्यांमुळें आणि तोफांचे गोळे फुटून बाहेर पडलेल्या छऱ्यांमुळें निशाणीसाठीं ठेवलेल्या पदार्थांचे कसे तुकडे तुकडे होतात हें रणजितसिंगानें बारकाव्यानें पाहिलें. अशा अस्त्रामुळें साध्या सैन्याचा कसा धुव्वा उडून

जाईल, याची महाराजांना त्या वेळीं चांगलीच कल्पना आली. परत आल्यानंतर त्यांनीं आपल्या युरोपीय अधिकाऱ्यांना दारूऐवजीं अशा प्रकारचे तोफांचे गोळे वापरण्याची आज्ञा केली. कर्नल कोर्ट यानें ज्या वेळीं तोफेंमधून असा गोळा उडवून दाखविला त्या वेळीं त्याबद्दल त्याला महाराजांनीं ३०,००० रुपये इनाम दिले. हे तोफांचे गोळे एकाच वेळीं आणि एकाच तऱ्हेनें कां उडत नाहींत असें महाराजांनीं मला विचारलें. मी त्यांना सांगितलें कीं, दारू करतांना ती एकाच जातीची झाली नाहीं किंवा तोफांच्या वाती सारख्याच लांबीच्या नसल्या म्हणजे असें होतें. या वेळीं नियमित व भरपूर अशा दारूचा पुरवठा होण्यासाठीं एक कारखाना उघडण्याची मी महाराजांना सूचना केली आणि लाहोरमध्यें सध्यां असलेला मि. फॉर्नी हा यूरोपीय या कामांत वाकबगार असल्याचें त्यांना सांगितलें. त्यानंतर महाराज मला म्हणाले, "तुम्ही अजून तरुण आहांत. आणखी कांहीं वर्षें इथें राहिलांत तरी फारसें बिघडणार नाहीं. तुम्ही अमृतसरला जाऊन गोविंदगड किल्ल्यांतील माझी प्रयोगशाळा जरूर पहा." आणखी दोन दिवस लाहोरमध्यें रहाण्याचा त्यांनीं आग्रह केला व तो मी मान्य केला.

नंतर महाराजांनीं मला चार हजार सैनिकांचें गॉर्चेली पथक दाखविलें. हे गॉर्चेली लोक पंजाबमधील पूर्वीचे जमीनदार असून महाराजांनीं त्यांना आपल्या पंजाखालीं आणल्यावर त्यांना आपल्या लष्करांत घेतलें. या लोकांचे कपडे, घोडीं, हत्यारें आणि गणवेश सर्व स्वतःचें असूनहि हें लष्करी पथक जणूं कांहीं लष्करी गणवेश घातल्यारखें दिसत होतें. नंतर महाराजांनीं या गॉर्चेलींची नेमबाजी पहाण्यासाठीं शंभर फुटांवर एक पितळी भांडें ठेवून त्यांना नेम मारण्यास सांगितलें. गॉर्चेलीच्या नंतर कवायती फौजेच्या खड्या तुकडीला बोलावून त्यांनाही त्याच ठिकाणीं नेम मारण्यास सांगितलें. गॉर्चेली तुकड्यांपेक्षां या कवायती फौजेचे नेम तिप्पट बरोबर साधले. नंतर महाराज हंसून मला म्हणाले "या नेमबाजीवरून पूर्वींच्या लढवय्या शिपायांना लष्करी कवायत शिकविणें किती जरुरीचें आहे याचा हा पुरावाच आहे." त्यानंतर महाराज आणि मी यांच्यांत पुढील प्रश्नोत्तरें झालीं :—

महाराज :— तुम्ही माझ्या सैन्याच्या बहुतेक तुकड्या आतां पाहिल्या. या तुकड्यांविषयीं तुमचें आतां काय मत झालें तें सांगा.

मी :— तुमच्या सैन्याविषयीं माझी जी कल्पना होती त्यापेक्षां कितीतरी अधिक चांगलें हें सैन्य आहे.

महाराज :— तुमचें उत्तर जरा अधिक स्पष्ट करा.

मी :— तुमच्या नेतृत्वाखालीं या सैन्यानें किती कामगिरी बजावली हें सर्वत्र महशूर आहे. लडाक ते मुलतान आणि सतलज ते अफगाणिस्तान या मुलखांत तुमच्या तोफांनीं जी कामगिरी बजावली आहे त्यांतच तुमच्या या प्रश्नाचें उत्तर आहे.

महाराज :— तुम्ही माझ्या प्रश्नाला बगल देतां आहांत.

मी :—महाराज, माझ्यापेक्षां आपणच आपल्या शिपायांची कामगिरी जाणण्यास समर्थ आहांत.

महाराज :— ईस्ट इंडिया कंपनीशीं तुलना करताना माझ्या सैन्याविषयीं तुम्हांला काय वाटतें?

मी : — मी याबद्दल मत द्यावेंच असा तुमचा आग्रह आहे ?

महाराज :— होय. मला या प्रश्नाचें उत्तर हवें आहे.

मोहनच्या अंगावर काश्मिरी शालीची नक्कल असणारी एक शाल होती आणि त्याच्या अंगावरील कपडा उत्कृष्ट काश्मिरी लोकरीचा असून दिसावयास फार सुंदर होता. त्या दोन्ही कपड्यांकडे आळीपाळीनें बोट दाखवून मी म्हणालों हा नग अस्सल आहे आणि ही नक्कल आहे. या दोहोंत अधिक चांगलें कोणतें?

महाराजांनीं माझ्याकडे अर्थपूर्ण बघितलें आणि थोडा वेळ थांबून ते म्हणाले, "तुम्ही माझ्या मनांतील गोष्ट बोललात. माझ्या सैन्याची तुकडी कंपनीच्या एकाद्या तुकडीशीं लढू शकेल किंवा नाहीं?

मी :— मी उत्तर अगोदरच दिलें आहे. तुमचें सैन्य इंग्रजांबरोबर लढू शकेल असें मला वाटत नाहीं.

तुम्ही वसंतोत्सव पहाण्यास रहाल असें मी गृहीत धरतों असें म्हणून महाराजांनीं माझा निरोप घेतला आणि मी घरीं परतलों.

शुक्रवारीं बावीस जानेवारीला सकाळीं फकीरसाहेबांनीं रणजितसिंगाच्या तबेल्यांतील सर्वोत्कृष्ट घोडा लैली आणि एक प्रचंड हत्ती व्हाईनकडून चित्र काढण्यासाठीं आणला होता. हा घोडा ताब्यांत घेण्यास महाराजांना बारा हजार शिपायांचा बळी देऊन साठ लाख रुपये खर्च करावे लागले होते.

कारण या घोड्यासाठीं कित्येक लढाया झाल्या होत्या. पेशावरचा यार महंमदखान याच्या मालकीचा हा घोडा असून रणजितसिंगानें त्याच्यावर स्वारी करून घोड्याचे मोबदल्यांत युद्ध थांबविण्याचें कबूल केलें. यार महंमदखानानें लैली ऐवजीं दुसरेच पुष्कळ घोडे लैली म्हणून महाराजांकडे पाठविले. त्याबरोबर जनरल व्हेन्तुरा कवायती फौजेची तुकडी घेऊन पेशावरवर चालून गेला. खान आजारी पडून एकदम मेला. तेव्हा व्हेंतुरानें त्याचा भाऊ सुलतान महंमदखान याला ती जागा दिली. आणि 'लैली'ची मागणी केली. या सुलतानानें देखील लैलीऐवजीं दुसरे घोडे पाठवून फसवाफसवी करण्यास सुरुवात केली. त्याबरोबर लष्करी तुकडी त्याच्या राजवाड्यांत नेऊन जनरल व्हेन्तुरानें त्याला कैद केलें असल्याचें जाहीर केलें. लैली दिल्याशिवाय सुटका होत नाहीं हें जाणून खानानें लैली व्हेन्तुराच्या ताब्यांत दिला आणि लुटीचा हा अमोल ठेवा घेऊन व्हेंतुरा लाहोरला परतला. घोड्याचा लगाम व रिकबी अतिशय सुंदर आणि मौल्यवान होत्या. त्याच्या पायांत सोन्याची कडी होती. गडद करड्या रंगाचा हा घोडा असून त्याचे पाय काळे आहेत. घोड्याचें वय तेरा वर्षांचे असून घोडा १६ हात उंच आहे. लॉर्ड विल्यम बेंटिंगच्या भेटीच्या वेळीं महाराजांनीं हा घोडा तेथें नेला होता.

कलकत्त्याच्या आणि हिंदुस्थानांतील इतर वृत्तपत्रांतून इंग्रजांची सरहद्द सतलजऐवजीं सिंधु नदी असावी अशा तऱ्हेचें लिखाण येत होतें. या लिखाणामुळें महाराजा रणजितसिंग थोडेसें अस्वस्थ झाले होते. महाराज आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्या मैत्रीविषयीं त्याचप्रमाणें महाराजांनीं मला दाखविलेल्या स्नेहाविषयीं पहिल्या प्रशस्तिपत्रांत कांहीं उल्लेख नसल्यामुळें मी आणखी एक प्रशस्तिपत्र तयार करावें अशी सूचना फकीर-साहेबानें केल्यामुळें मी नवीन प्रशस्तिपत्र तयार केलें. या प्रशस्तिपत्रकाच्या पहिल्या परिच्छेदांत महाराजांचें सैन्य, त्यांचा तोफखाना, त्यांच्या शिपायांचें युद्धकौशल्य इत्यादींविषयीं मी प्रशंसा केली होती. दुसऱ्या परिच्छेदांत महाराजांनीं केलेल्या सोयीबद्दल आभार मानून ऑस्ट्रियाच्या बादशहाला महाराजांच्या मैत्रीविषयीं मी माहिती देईन असें म्हटलें होतें. तिसऱ्या परिच्छेदांत अमृतसरसारखें पवित्र स्थळ पहाण्यास परवानगी दिल्याबद्दल मी महाराजांचे आभार मानले होते. चौथ्या परिच्छेदांत महाराज आणि ईस्ट

इंडिया कंपनी यांच्यामधील मैत्री, ती मैत्री कायम रहाण्याची जरूरी, याविषयीं लिहिलें होतें. आणि शेवटच्या परिच्छेदांत मी महाराजांच्या व माझ्या वैयक्तिक मैत्रीबद्दल उल्लेख केला होता. नंतर हें प्रशस्तिपत्र लखोटयांत घालून सीलबंद करून महाराजांकडे पोहोंचविलें.

येथील साधु संन्यासी व बैरागी किती निर्भीड असतात याचें एक उदाहरण माझ्या पहाण्यांत आलें. मी पूर्वीं वर्णन केलेला शीख फकीर किंवा धर्मगुरु आम्ही बोलाविल्यावरून आमच्याकडे आला होता. मि. व्हाईनच्या मनांत या धर्मगुरूचें चित्र काढावयाचें होतें. आमच्याजवळ फकीरसाहेबाला पाहून शीख महाराजांच्या दरबारांतील मुसलमान मुत्सद्द्याबद्दल त्याला द्वेष वाटत असल्याचें त्याच्या दृष्टीवरून दिसून आलें. फकीरसाहेबानें त्याला या युरोपीय गृहस्थाला तुझें चित्र काढूं दे; कारण महाराजा रणजितसिंगांची तशी इच्छा आहे असें म्हटलें. त्याबरोबर तो शीख खवळून कोण हा महाराजा मला माहीत नाहीं असें म्हणाला. फकीरसाहेब शांतपणें पुन्हा म्हणाला, मी ज्यांची आज्ञा म्हणालों ती श्रीमहाराजा रणजितसिंगांची आज्ञा होय. त्यावर तो शीख पुन्हा म्हणाला, '' मी या महाराजाला ओळखत नाहीं आणि जरी मला हें माहीत असलें तरी मला हुकूम करण्याचा त्यांना अधिकार काय ? मला महाराजांच्या बरोबर कांहीं कर्तव्य नाहीं, आणि मला त्यांची आज्ञा ऐकण्याची जरूरीही वाटत नाहीं." हें बोलणें ऐकून फकीरसाहेब थक्क झाला. राग येऊनही तो शांतपणें त्या शिखाला पुन्हा म्हणाला "हे युरोपीय गृहस्थ महाराजांचे मित्र आहेत. यांना महाराजांनीं फार सन्मानानें वागविलें आहे. त्यांच्या नागरिकांपैकीं एकानें असें वागणें बरोबर ठरणार नाहीं." त्यावर तो शीख ओरडून म्हणाला " मी साधू आहे. मी परमेश्वराचा नागरिक आहे. रणजितसिंगाचा नाहीं. तुमच्या बोलण्याचा मला भयंकर राग आलेला आहे. तुमच्या सांगण्यावरून मी कांहींही करणार नाहीं. मला वाटल्यास मी केव्हांतरी माझें चित्र या गृहस्थाला काढूं देईन. पण महाराजांची इच्छा आहे म्हणून नव्हें, तर ती गोष्ट मला आवडते म्हणून. नंतर त्या साधूनें आपलें चित्र काढूं देण्यास मि. व्हाईनला परवानगी दिली.

✦ ✦ ✦

प्रकरण ९ वें

पंजाबांतील वसंतोत्सव

उत्तर हिंदुस्थानांत वसंतोत्सवाला फार महत्त्व आहे. पंजाबमधील लोक विशेषतः शीख, मौज करण्यास नेहमी उत्सुक असल्यामुळें लाहोरला हा उत्सव फार थाटांत साजरा होतो. वसंतोत्सवाच्या दिवशीं महाराजा रणजितसिंग शालीमार बागेजवळील झोपडींत रहावयास जातात. त्या दिवशीं लाहोरच्या नागरिकांनीं रस्त्यांत दुतर्फा उभे राहून महाराजांचें स्वागत करावें अशी त्यांची इच्छा असते. बारा वाजतां मी, खलीफासाहेब आणि मि. व्हाईन यांच्या समवेत महाराजांच्याकडे वसंतोत्सव पहाण्यास निघालों. रस्त्यानें जातांना आम्हांला लोक गटागटानें रस्त्यांत उभे दिसले. कांहीं लोक पडक्या जागेंत फेऱ्या मारीत होते. कांहीं लोक बैल, घोडीं, हत्ती, उंट इत्यादि प्राण्यांपैकीं मिळेल त्या प्राण्यावर बसून रस्त्यानें जात होते. उंटावर तीनचार आणि हत्तीच्या हौद्यावर बारापर्यन्त लोक बसलेले असत. निरनिराळ्या आकारांच्या व रंगांच्या पालख्यांमधूनही माणसें जात होतीं. रस्त्यांतून जात असतां खेळणीं विकणारे फेरीवाले, मेवामिठाई विकणारे, जादूगार, ज्योतिषी, व साधुसंन्यासी यांच्याभोंवतीं लोक घोळके करून उभे होते. मोकळ्या रानामध्यें मोठीं माणसेंसुद्धां पतंग हातांत घेऊन किंवा पतंगाच्या पाठीमागून धांवत होतीं. रस्त्यांत कांहीं ठिकाणीं शिंग फुंकीत बसणारे कांहीं लोक आणि टम् टम् वाजविणारे वाजंत्रीवाले यांच्या पाठीमागून गर्दी करून मिरवणुकीनें लोक जात असलेले दिसले. रस्त्यांत एके ठिकाणीं एका देवडीवर एक शीख धर्मगुरु बसला होता. बारामुला येथील वर्णन केलेल्या शीख गुरूप्रमाणेंच त्याची बैठक होती. त्याला नमस्कार केल्याशिवाय एकही शीख पुढें जात नव्हता आणि कांहीं लोक त्याला कांहीं रुपये दक्षिणा देत असत. सगळ्या गोंधळांत आणि गडबडींत 'वा गुरुजीके फत्ते ' अशा गर्जना करीत शीख लोक एकमेकांची भेट घेत असत.

आम्हांला न्यावयास आलेले घोडेस्वार पिवळया रंगाच्या गणवेशांत होते. त्याचप्रमाणें दरबारमधील सर्व लोकांच्या कपडयांचा रंगही पिवळाच होता. जातांना आमचा रस्ता चुकल्यामुळें महाराजांना आमच्यासाठीं वाट पहात बसावें लागलें. शेवटच्या मैलावर पिवळे गणवेश घातलेल्या लष्कराच्या तीन तुकडया आम्हांला दिसल्या. युरोपांत नवीन गणवेश करावयाचा म्हणजे अमाप पैसा खर्च करावा लागतो. येथें लष्कराचे पांढरे कपडे केशरी रंगांत भिजवून दिवस साजरा करतात. आणि दुसरे दिवशीं ते कपडे धुवून पुन्हा पांढरे शुभ्र करतात. ज्या ठिकाणीं वसंतोत्सव साजरा करतात तें ठिकाण एका आळीच्या शेवटीं आहे. महाराजांनीं असें ठिकाण कां निवडलें हें समजत नाहीं. महाराजांकडे जातांना दोन्ही बाजूंनीं रांगेनें हत्ती जवळजवळ उभे होते. त्यांच्यांतील अंतर इतकें थोडें होतें कीं आम्हांला त्यांच्या सोंडांखालून किंवा सोंडांजवळून जावें लागे. माणसाळलेला हा प्राणी इतका चांगला वागतो कीं असे जात असतांनाही भीति वाटत नाहीं. रणजितसिंग एका तंबूंत आरामखुर्चीत बसले होते. वसंतोत्सवांत मुबलक मिळणारीं शिरीष आणि इतर फुलें यांचा जणूं कांहीं सडाच चहूकडे पडला होता. मि. व्हाईन आणि मी दोघेच जण काळया कपडयांत होतों.

महाराजांचा सर्वांत मोठा मुलगा करकसिंग आज येथें मला दिसला. त्याच्या हातून पुढें कांहीं चांगली कामगिरी होईल असें मला वाटत नाहीं. माझी आजच्या प्रसंगानें ओळख करून दिल्यावर मी बोलणार तोंच उत्सव सुरू झाला. आजच्या प्रसंगानें प्रत्येकानें कांहीं तरी महाराजांना नजर दिली पाहिजे असा येथें नियम दिसतो. हा एक कांच आहे म्हणावयाचा. महाराजांच्या दरबारांत नेहमी असणारी मंडळी आजही तेथें जवळपास दिसली. डावे हात जमिनीवर टेकलेले आणि उजवे हात शस्त्राला घातलेले मुसलमान सरदारही जमिनीवर बसलेले दिसले. शिखांना या उत्सवांत किती का आनंद वाटेना, पण मुसलमान सरदारांचे डोळे रागानें लाल झाले असून ते दांतओठ खात आहेत असें मला वाटलें. सरदारांच्या अंगावरील कपडे अतिशय भरजरी आणि भारी किंमतीचे होते. थोडया वेळानें नाचणाऱ्या मुली पुढें आल्या. त्यांच्या अंगावरही पिवळीं रेशमी वस्त्रें

होतीं. महाराजांना नजर मिळालेल्या पैशांतील चांदीचे सर्व रुपये महाराजांनीं या नर्तिकांना देऊन टाकले. नंतर लष्करी साहसाच्या व शौर्याच्या गोष्टी सांगण्यास आरंभ झाला. महाराजांनीं मला आपले अनुभव सांगण्यास सांगितलें. परंतु मोहनसारख्या नवशिक्या दुभाष्यामार्फत हे अनुभव सांगणें कठीण आहे असें मी महाराजांना सुचविलें. थोडचा वेळानें उत्सव संपला आणि आम्ही पांगलों. रस्त्यानें परत येतांना गर्दी बेसुमार वाढल्याचें मला आढळून आलें. बैल, घोडीं, हत्ती, उंट, गाडचा आणि हजारों माणसें यांच्या गजबजाटांत भरून गेलेल्या रस्त्यांनीं जाणें देखील कठीण होतें. एकमेकांच्या पायाखालीं लोक सांपडून शेवटीं हत्तीच्या पायाखालीं मरतील अशी भीति माझ्या मनाला सारखी वाटली. परंतु कोणताहि अपघात झाल्याचें मला दिसलें नाहीं.

संध्याकाळीं डॉ. हेंडरसन् मला भेटले. मी अति उत्साहानें आणि आनंदानें त्यांचें स्वागत करून जनरल व्हेंतुराचा आणि त्यांचा परिचय करून दिला. ते श्रीनगरला मला भेटले त्याप्रमाणेंच येथेंहि विचित्र पोशाखांत आले होते. अटकवरून नदी ओलांडून हिंदुकुश पर्वताच्या अत्युच्च जाणाऱ्या घाटांतून त्यांना पलीकडे जावयाचें असल्यामुळें त्यांनीं हा विचित्र पोशाख केला होता. पेशावरला जातांना वाटेंत चोरटचांनीं त्यांना गांठून सर्व चीजवस्त पळवली. मी दिलेलें घडचाळ आणि इतर चीजवस्त चोरटचांनीं नेलेली पाहून त्यांना अतिशय वाईट वाटत होतें. आपल्या हाताला बांधलेल्या एका कापडाचे चिंधींत त्यांनीं कांहीं सोन्याचे तुकडे शिवले होते. त्यांतील कांहीं सोनें विकून नंतर त्यांनीं पांघरण्यासाठीं व अंगावर घालण्यासाठीं कांहीं लोकरीचे कपडे विकत घेतले. पेशावरला मि. ॲव्हीताबल यांनीं त्यांचें स्वागत करून आणि त्यांना चांगला पाहुणचार देऊन त्यांनीं त्यांना आपला एक चांगला सूट दिला. मि. ॲव्हीताबल बुटके आणि स्थूल असल्यामुळें त्यांचा सूट डॉ. हेंडरसन्‌ना मुळींच उपयोगी नव्हता. डॉक्टरसाहेब उंचेपुरे आणि लांबटांगे असल्यामुळें त्यांचा गळचाचा आणि हाताचा बराच भाग मोकळा राहिला होता. आणि बाकीचा भाग इतका सैल होता कीं, डॉ. हेंडरसनसारखीं दोन माणसें त्यांत मावलीं असतीं. महाराजां-

च्याकडून फकीरसाहेब आल्यावर मी डॉक्टरसाहेबांची आणि फकीर-साहेबांची ओळख करून दिली. महाराजांच्या परवानगीवांचून डॉक्टर-साहेबांनीं पंजाबांत फकिराच्या वेषांत प्रवास केला असल्यामुळें तेथील लोकांचा त्यांच्यावर रोष होता. या गृहस्थानें कोणत्या उद्देशानें प्रवास केला हें महाराजांना कळू तर द्या असें फकीरसाहेब म्हणाले. यावर मी म्हणालों, यांच्या प्रवासाचें कारण ऐकून तुम्हांला आश्चर्य वाटेल. सिंधु नदीचें उगम-स्थान शोधण्याचा यांचा विचार असल्यामुळें त्यांनीं हा प्रवास केला. माझ्या या उत्तरावर फकीरसाहेबांनीं मला विचारलें, " जरी उगमाचा त्यांना शोध लागला तरी त्याचा फायदा काय ?" मी त्यांना म्हटलें, " पहिल्या प्रथम शोध आपण लावला असें जगांत जाहीर व्हावें यासाठीं त्यांची ही धडपड आहे." माझ्या या म्हणण्याचा फकीरसाहेबांवर कांहीं परिणाम झाला नाहीं. नंतर त्यांनीं विचारलें, " महाराजांनीं डॉ. हेंडरसनचें स्वागत कसें करावें ?" यावर मीं म्हटलें, " महाराजांची परवानगी घेऊनच त्यांनीं पंजाबांत प्रवास केला आहे असें गृहीत धरून महाराजांनीं त्यांचें स्वागत करावें." त्यावर फकीरसाहेब म्हणाले "महाराजांचे दोस्त सरकार म्हणजे कंपनीसरकार यांची परवानगी त्यांनीं घेतलेली नाहीं." यावर मी म्हटलें " महाराजांना राग येईल म्हणूनच कंपनी सरकारनें आपल्या नोकरांना सतलज ओलांडण्यास बंदी केली आहे. इंग्लिश लोकांशीं महाराजांची जानी दोस्ती आहे या भरंवशावर डॉ. हेंडरसन येथें आले आहेत. यांचें स्वागत न केल्यास महाराजांची इंग्रजांशीं असणारी दोस्ती औपचारिक स्वरूपाची आणि केवळ राजकीय आहे असा याचा अर्थ होईल. परत गेल्यावर सतलज ओलांडल्याबद्दल डॉक्टरसाहेबांवर कंपनीसरकार खटला भरणारच आहे. परंतु महाराजांनीं मात्र यांच्यावर राग धरूं नये असें मला वाटतें" नंतर फकिरांनीं मला विचारलें, "सतलज नदीच्या दक्षिण तीराला आल्यानंतर डॉक्टरांना तत्काळ अटक करावी असा कंपनीनें हुकूम काढल्याचें महाराजांना कळलें आहे. त्यामुळें कंपनीचा मित्र या नात्यानें अशा माणसाचें स्वागत करण्यामुळें कंपनीचा महाराजांवर रोष होईल. त्याशिवाय ज्याला पकडण्याचें कंपनी सरकारनें ठरविलें आहे त्याला मोकळें राहूं देणें मैत्रीच्या दृष्टीनें अयोग्य नाहीं काय?" यावर मी फकीरसाहेबाला म्हटलें "डॉ. हेंडरसनच्या प्रवासामुळें

कंपनीला आनंद झालेला आहे. कंपनीसरकारला डॉक्टरांना पकडावयाचें आहे तें समजून महाराजांनीं त्यांना अटक केल्यास महाराजांचे हेर कंपनीच्या दरबारांत आहेत असा याचा अर्थ लावला जाईल." नंतर फकीरसाहेबांनीं माझी रजा घेतली. आणि माझें म्हणणें महाराजांना सांगण्यास ते निघून गेले. थोड्याच वेळांत महाराजांकडून फकीरसाहेबानें डॉक्टरांसाठीं औपचारिक भेटी आणल्या. महाराज आपलें स्वागत करतील कीं नाहीं या शंकेचा डॉक्टरांच्या मनावरील ताणही कमी झाला. दऱ्याखोऱ्यांतून आणि डोंगरावरून, चिखलांतून आणि काट्याकुट्यांतून उपाशी तापाशी हिंडणाऱ्या डॉ. हेंडरसनना लाहोरमधील आमची रहाण्याची जागा म्हणजे स्वर्गच वाटला. आरसे आणि झुंबर यांनीं नटवलेल्या सुंदर खोल्या, स्वागतास सज्ज असलेली मित्रमंडळी, उत्तमोत्तम खाद्यपदार्थांनीं सजविलेलीं टेबलें, आणि जवळपास दहाबारा सुंदर नर्तिका या सर्वांच्या सहवासाचा आस्वाद घेत डॉक्टरांनीं या मुक्कामांत खूपच मौज लुटली.

आज महाराजांना भेटून त्यांचा शेवटचा निरोप घ्यावा असें मीं ठरविलें. माझ्याबरोबर डॉ. हेंडरसन यांनाहि घेण्याचें मीं ठरविलें. आतां लौकरच येथून जावयाचें असल्यामुळें बरोबरच्या मंडळींचा निरोप मला घ्यावयाचा होता. माझा दुभाषी मोहन याची इच्छा मी त्याला युरोपांत न्यावें अशी होती. हा मुलगा कोवळा आणि अननुभवी असला तरी मला त्याच्याबद्दल आतां फारच आपुलकी वाटूं लागली होती. मी त्याला युरोपांत न्यावयाचें म्हणजे त्याला प्रथम त्याची जात सोडावी लागली असती. युरोपांतून परत येथें पाठवून मी जरी त्याला एखादी हुद्द्याची जागा मिळवून देऊं शकलों असतों, तरीही त्याला त्याच्या समाजांत किंवा युरोपीय समाजांत कोठेंच मिसळतां येणें शक्य नव्हतें. तेव्हां त्याला येथील एखाद्या शाळेंत दोन तीन वर्षे शिकून व महाराजा रणजितसिंगांना सांगून पुढें पाठीमागें एखादी चांगली नोकरी देण्यास सुचवावें असें मीं ठरविलें. त्या छोकऱ्यानें प्रवासांत मला इतकी मदत केली कीं, सांगण्याची सोय नाहीं. मला कंटाळा येऊन जेव्हां एकलकोंडेपणाची जाणीव होत असे तेव्हां थट्टा विनोद करून तो माझें मन रिझवी. नोकरचाकरांतील व आमच्यांतील होणारे तंटे तो मोठ्या कुशलतेनें सोडवी. त्याला प्रवासाचा अतिशय नाद असून दूर

दूर विशेषत: युरोपांत प्रवास करण्याची फार इच्छा होती. कोवळया वयांत पुढच्या सुखी जीवनाचीं स्वप्नें रंगवीत मायदेशापासून अगदीं दूर जाण्याची त्याला फार इच्छा होती. त्याचा निरोप घेणें म्हणजे माझ्यावर एक मोठी दु:खदायक घटनाच होती.

महाराजांची शेवटची भेट घेण्यासाठीं मी रविवार दिनांक २४ जानेवारीला डॉ. हेंडरसनसह महाराजांकडे निघालों. माझा घोडदळावरील अधिकाऱ्याचा लष्करी गणवेष लुधियानाहून आला असल्यामुळें मी तो अंगावर चढविला होता. आम्हांला नेण्यास पाठविलेली गाडी रस्त्यांत मोडल्यामुळें आमची फार फजिती झाली. आणि तशाही स्थितींत गाडीचे आख कसेबसे बांधून आम्ही तीच गाडी पुढें नेली. दोन दिवसांपूर्वी कवायतीच्या मैदानावरील तंबूंत माझी व महाराजांची भेट झाली होती, त्याच ठिकाणीं आज आम्ही गेलों. मला पहातांच महाराज रणजितसिंग बाहेर आले. माझ्या लष्करी गणवेषाविषयीं त्यांना इतकें आकर्षण वाटलें कीं, त्याचा प्रत्येक भाग आपल्या डोळ्यापासून तीन इंचापेक्षांहि अधिक जवळ आणून त्यांनी पाहिला. माझ्या गणवेषाच्या कपड्यांतील लोकरी जाकिटाविषयीं त्यांना विशेष आकर्षण वाटल्याचें दिसलें. (माझा तो लांबरुंद व जाडजूड गणवेष पाहून महाराजा मला म्हणाले कीं, इतकें ओझें जवळ बाळगण्यापेक्षां तुम्ही तें एखाद्या नोकराजवळ देऊन आपले श्रम कां वांचवीत नाहीं?) नंतर महाराजांनीं मला विचारलें कीं हा वेष घालूनच तुम्ही तुमच्या बादशहाला भेटला काय? मीं त्यांना उत्तर दिलें कीं, या कपड्यावांचून भेटणें म्हणजे गुन्हा करण्यासारखेंच आहे.

युरोपीय लोकांचे कपडे घोट्यापर्यंतच असतात आणि कमरेपासून खालीं दुसरे कपडे असतात. याचा अर्थ येथील लोकांना कळत नाहीं. एरवी दारिद्र्यामुळें चांगले कपडे शिवतां येत नसावेत अशी कल्पना करतां आली तरी माझ्या बाबतींत ती खरी ठरण्यासारखी नव्हती. माझा गणवेष निरखून पहाण्यासाठीं त्यांनीं पुन:पुन्हा मला इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरविलें. आणि शेवटीं माझ्या गणवेषावर महाराजा खूष असल्यासारखें मला दिसलें. नंतर मी डॉ. हेंडरसनचा महाराजांशीं परिचय करून दिला. डॉ. हेंडरसनच्या कपड्यांकडे पाहून महाराजा रणजितसिंग

विनोदानें म्हणाले कीं, तुम्ही तर ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी आहांत असें मीं ऐकिलें आहे. आणि तुमच्या अंगावर तर चांगला गणवेषहि नाहीं हें कसें काय? मी मध्येंच म्हणालों, 'कपड्यालत्त्यांसुद्धां डॉ. हेंडरसनची सर्व चीजवस्त लुटली गेल्याचें महाराजांना माहीतच असेल." त्यावर महाराज म्हणाले, "फकिराच्या वेषांत प्रवास केल्यानंतर हें असेंच व्हावयाचें." "तुम्ही येथें आतां आठ दिवस रहा. लुधियानाहून तुमचा गणवेष आणवा. तुमच्या लष्करी गणवेषांत मला तुम्हांला पाहूं द्या, आणि नंतर सतलज ओलांडून कंपनीकडे तुम्ही परत जा असें महाराजा डॉ. हेंडरसनकडे पाहून म्हणाले. नंतर महाराज मला म्हणाले "मला सोडून येथून निघून जावयाचेंच शेवटीं तुम्ही ठरविलें का" त्यावर मी म्हणालों, "महाराज, याबद्दल मला अतिशय वाईट वाटतें. परंतु परिस्थितीपुढें माझा नाउपाय आहे. महाराज पुन्हा म्हणाले, "तुम्ही न पाहिलेल्या अशा अनेक गोष्टी लाहोरमध्यें आहेत. त्यासाठीं निदान अजून एक आठवडाभर तरी थांबा. लवकरच येथें फ्रेंच लिजन येणार आहे, तेव्हां जाण्याची अशी घाई करूं नका." त्यावर मी म्हणालों कीं "महाराज, माफ करा, पण मला आतां गेलेंच पाहिजे."महाराज म्हणाले, "गेलीं पांच वर्षें तुम्ही प्रवास करीत आहांत तेव्हां एखादा आठवडा इकडे तिकडे झाल्यानें फारसें बिघडणार नाहीं." मी म्हणालों, "महाराज, प्रश्न एक आठवड्याचा नसून एक वर्षाचा आहे. सहा आठवड्यांच्या आंत मी मुंबईला न गेल्यास आगबोटीला उशीर केल्यासारखें होईल आणि मला तेथेंच एक वर्षभर रहावें लागेल. त्यावर महाराजा म्हणाले, "सहा आठवड्यांच्या आंत तुम्हांला मुंबईला जाणें शक्य होणार नाहीं. तेव्हां मुंबईला एक वर्ष रहाण्यापेक्षां माझ्याजवळ एक वर्ष कां रहात नाहीं?' आमचें हें बोलणें ऐकून फकीर साहेबांनीं पुढील अर्थाची एक फारशी म्हण सांगितली. "एखाद्या माणसाच्या मर्जीविरुद्ध त्याला ठेवून घेण्यांत कांहींही स्वारस्य नाहीं" अशी ती म्हण होती. तें ऐकून रणजितसिंग म्हणाले, "तेंही खरें आहे" आणि नंतर त्यांनीं खूण करून मला भेट देण्याच्या वस्तू दोन ताटांतून आणविल्या. एक चापाची बंदूक उचलून महाराजांनीं माझ्या हातांत दिली आणि ते म्हणाले "गॉर्चेली पलटणीविषयीं तुम्ही बरीच उत्सुकता दाखविली तेव्हां

त्या पलटणीची आठवण म्हणून ही वस्तु तुमच्याजवळ असू द्या. म्हशीच्या शिंगापासून बनविलेला एक सुंदर प्याला नंतर त्यांनीं मला दिला. त्या प्याल्यावर सोन्याची नक्षी काढली होती. बंदुकीचीं काडतुसें आणि गोळ्या ठेवण्यासाठीं एक पेटी, कांहीं बंदुका आणि इतरही बरेच लष्करी साहित्य त्यांनीं मला भेट म्हणून दिलें. यापूर्वीही मी हिंदुस्थानांतील बरेच लष्करी साहित्य माझ्याजवळ गोळा केलें होतें. एका पाठीमागून एक वस्तु माझ्या हातांत देत नंतर महाराजांनीं माझ्या हातांत एक पोषाख नजर केला. एक सुंदर मोत्यांची माळ, रत्नजडित अशीं दोन सोन्याचीं कडीं; उंची भरजरी कापड आणि तेराशे रुपये रोख महाराजांनीं मला दिले. या सर्व वस्तु दिल्यानंतर महाराजांनीं एक पर्शियन तलवार हातांत घेतली आणि ती माझ्या हातांत देत ते म्हणाले, "आतांपर्यंत ज्या वस्तु मी तुम्हांला भेट म्हणून दिल्या त्या दर्जाला शोभाव्यात अशा महाराजांनीं म्हणून दिलेल्या आहेत. मी आतां तुम्हाला ही वस्तू मित्र म्हणून देत आहें. मी तुम्हांला देतो आहे ती तलवार स्वतः वापरलेली व बरेच दिवस जवळ बाळगलेली आहे. इतर रत्नजडित वस्तूंपेक्षां या तलवारीची भेट तुम्हांला कमी वाटणार नाहीं म्हणून मी तुम्हांला ती देत आहे. तेव्हां ही तलवार तुम्ही घ्या. भेटेल त्याला दाखवा पण केव्हांहि ती दुसऱ्यास देऊन टाकूं नका. कारण ही मित्राची भेट आहे." हीं वाक्यें बोलत महाराज माझ्या हातांत तलवार देत असतांना मला गहिंवर येऊन व भावना अनावर होऊन मी त्यांना म्हणालों, "इतर कोणत्याहि भेटीपेक्षां ही भेट मला अधिक मौल्यवान वाटते."

माझ्याप्रमाणेंच महाराजांनीं भेटी देऊन मि. व्हाईनचा यावेळीं निरोप घेतला. नंतर महाराजांनीं मोहनला जवळ बोलाविलें आणि ते त्याला म्हणाले, " ज्या वेळीं हे साहेब तुला सोडून निघून जातील त्या वेळीं तूं माझ्याकडे येऊन नोकरीला रहा. मोहनविषयीं शिफारस करण्यास ही वेळ बरी आहे, म्हणून मी महाराजांना म्हटलें कीं, मोहनला अजून थोडी शिक्षणाची आवश्यकता असल्यामुळें मी मोहनला लुधियानाच्या कॅ. वेडच्या शाळेंत घालणार आहे. त्यानंतर महाराज, आपण त्याची काळजी घ्यावी. या मुलानें माझें काम अतिशय उत्तम रीतीनें बजावलें असून याच्या कामाचें चीज, महाराज, आपणाकडूनच होईल, आणि याच्या हुशारीचा महाराजांना

उपयोगही होईल. महाराज म्हणाले, 'तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे. ज्या वेळीं याचा अभ्यास संपेल त्या वेळीं त्यानें मला भेटावें. मी त्याल विसरणार नाहीं.'' असें म्हणून महाराजांनीं त्याला एक रुमाल, दोन शाली आणि शंभर रुपये दिले. याच वेळीं मुनशीला द्यावयाच्या वस्तू त्यांनीं मोहनजवळ दिल्या. नंतर महाराजांनीं अत्यंत कुरूप दिसणारा व एका डोळ्यानें आंधळा असलेल्या माणसाला जवळ बोलावून त्याला एक शालजोडी दिली. आणि माझ्याकडे पाहून ते म्हणाले, 'हा मनुष्य कंपनीसरकारचा येथील हेर आहे. तो दरबारांतील अखबार लिहितो, आणि त्यानें तुमची माहिती कंपनी सरकारला कळवली आहे. तुमच्यासारखे पाहुणे निरोप घेत असतांना अशा हेरांना भेटी देण्याची येथें पद्धत असल्यामुळें मी याला भेट देत आहे.' मला ही सर्वच गोष्ट इतकी विचित्र वाटली कीं, मी महाराजांना म्हणालों कीं, हा हेर असल्यास याला पगार कंपनीसरकारनें दिला पाहिजे व याला महाराजांनीं भेटी देणें गैरवाजवी दिसतें. यावर महाराज म्हणाले, ''लुधियानालाहि कंपनीसरकारच्या दरबारांत असेंच करतात. परस्परांचे हेर दरबारांत ठेवून घेतांना आम्हांला संकोच वाटत नाहीं याचा हा पुरावाच आहे. नंतर महाराजांनीं मला आणखी एखाद्या माणसाविषयीं शिफारस करून कोणाला मी कांहीं द्यावें अशी आपली इच्छा आहे काय असें विचारलें. तेव्हां मी काश्मीरांतून लाहोरला माझ्या बरोबर आलेले महंमदशहा नक्षबंदी यांना जहागीर देण्यास सुचविलें. माझ्या सांगण्यावरून महाराजांनीं मिर्झाला बढती दिली आणि महंमदशहा नक्षबंदीला माझ्या नांवानें जहागीर दिली.

महाराजांचे थोरले युवराज करकसिंग यांची भेट घेऊन दुसऱ्या दिवशीं निघणार असल्याचें मी महाराजांना सुचविलें. करकसिंगाला मी भेट द्यावी हें महाराजांना फारसें रुचलें नाहीं. परंतु शेवटीं त्यांनीं मला भेट घेण्याची परवानगी दिली. आम्ही निरोप घेऊन निघालों असतांना महाराज आमच्याकडे पाहून म्हणाले, ''पंजाबांत तुमचा अगदीं निकटचा आणि कायम स्नेह ठेवणारा एक मित्र आहे याची आठवण ठेवा. महाराजांचें हें वाक्य ऐकल्यावर मला इतकें भडभडून आलें कीं, मला उत्तर देण्याचेंहि सुचलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सात वाजतां आम्ही करकसिंगाची भेट घेण्यास निघालों.

करकसिंगाचा राजवाडा शहराच्या मध्यभागीं आहे. मी त्यांना भेट देणार असल्यामुळें आज तेथें जवळजवळ दरबार भरल्यासारखाच होता. करकसिंगानें माझें स्वागत करून मला आपल्या जवळ बसविलें. करकसिंग हा अर्धवट असल्यामुळें आमचें बोलणें म्हणजे मूर्खपणाचा एक नमुनाच होता. मी अंथरलेल्या गालिच्याची स्तुति करीत होतों. करकसिंगाचे आणि जनरल व्हेंतुराचें वाकडें आहे असा समज सर्व हिंदुस्थानांत पसरला आहे; पण मला मात्र हा समज चुकीचा वाटतो. करकसिंग हा मूर्ख आहे अशी जनरलची समजूत असल्यामुळें जनरलला त्याच्याविषयीं आदर वाटत नाहीं एवढें मात्र खरें. पूर्वी मी दारूगोळा बनविण्यांत तज्ज्ञ असलेल्या मि. फॉर्नीविषयीं महाराजांजवळ शिफारस केली होती. त्याला महाराजांनीं साठ हजार रुपये दिल्याचें आज कळलें.

सर्वांचा निरोप घेऊन आतां आम्हांला निघावयाचें होतें. जनरल व्हेंतुराच्या घरीं आम्हांला जो पाहुणचार मिळाला होता त्याची परतफेड करणें कसें शक्य होतें? जनरल व्हेंतुरा हे फार वरच्या दर्जाचे गृहस्थ आहेत. त्यांना स्वतःच्या देशांत स्थान न मिळाल्यामुळें नशीब काढण्यासाठीं अनेक देश हिंडून शेवटीं ते येथें राहिले आहेत. फकीरसाहेबांचा निरोप घेतांना मला वाईट वाटलें. फकीरसाहेब तर ढसढसा रडूंच लागले.

✦ ✦ ✦

प्रकरण १० वें

काश्मीर व पंजाबचा निरोप

२५ जानेवारी १८३६ ला, सोमवारीं दुपारीं बारा वाजतां मी लाहोरहून लुधियानाला जाण्यास निघालों. महाराज रणजितसिंगांची कांहीं मंडळी आमच्या स्वागताची तयारी करण्यास अमृतसरला पुढें गेली होती. माझा युरोपीय मित्र जनरल व्हेंतुरा यांनीं आपल्या घरांतील कांहीं मंडळी माझ्या अमृतसरच्या जेवण्याखाण्याची व्यवस्था करण्यास पुढें पाठविलीं होतीं. लाहोर व अमृतसर यांतील अंतर सुमारें ३२ मैलांचें असेल. आमचा वेळ वाया जाऊं नये म्हणून गाडीस जोडण्यासाठीं ताज्या दमाचे चार चार घोड्यांचे ताफे वाटेंत दोन ठिकाणीं ठेवण्यांत आले होते. लाहोरपासून सात मैलांपर्यंत जुन्या लाहोरचे अवशेष विखुरलेले आहेत. त्यानंतर मात्र रेताड जमिनीला सुरुवात होते. अमृतसर शहराच्या जवळ जमीन बरी असून, त्या ठिकाणीं बागाही चांगल्या आहेत. लाहोरहून दुपारीं निघाल्यापासून आम्हांला अमृतसरला येण्यास रात्र झाली. आम्ही महाराजांच्या एका बागेंत मुक्काम केला. दिवसभर उपवास केल्यामुळें मला भूक कडाडून लागली होती. म्हणून मी जवळच्या वस्तूंवर ताव मारला. नंतर माझी अमृतसरच्या ठाणेदारानें भेट घेऊन मेवा, फळफळावळ इत्यादि वस्तू देऊन त्यांनीं मला सातशें रुपये नजर केले. दुसऱ्या दिवशीं अमृतसरचें पवित्र तळें बघण्याची व्यवस्था करा असें सांगून मी त्याला निरोप दिला. नंतर मी रात्रीं निवांत झोंप घेतली.

मंगळवारीं सकाळीं मी सातलाच उठलों. खानसिंग इत्यादि लाहोरची मंडळी परत जाणार असल्यामुळें मी त्या सर्वांना चिरीमिरी देऊन निरोप दिला. बागेंतून शहराकडे जातांना आम्ही येथील सुप्रसिद्ध गोविंदगडकिल्ला बाहेरून पाहिला. हा किल्ला उघड्या मैदानावर बांधला असून अतिशय बळकट आहे. अमृतसरचें सुप्रसिद्ध सरोवर आणि सुवर्णमंदिर यांना भेट

देण्यासाठीं येथें येणाऱ्या यात्रेकरूंना संरक्षण देण्यास व मुसलमानांच्या छळापासून त्यांना आश्रय देण्यास अशा किल्लयाची जरुरी होती. रणजितसिंगानें हा किल्ला बांधावयास १८०७ सालीं आरंभ केला. किल्ल्याच्या तटाची उंची भरपूर असून तोफा ठेवण्यास एका पेक्षां एक उंच अशा जागा तयार करून किल्ल्याला मजबुती आणली आहे. महाराजांनीं अमाप खजिना या किल्ल्यांत ठेवला आहे असें सर्व लोक म्हणतात. या किल्ल्याच्या मजबुतीमुळें अमृतसर शहरांत व्यापाऱ्यांनीं गर्दी केली आहे. सर्व हिंदुस्थानांत आज अमृतसरसारखें वैभवसंपन्न व समृद्ध शहर नाहीं हें निश्चित. किल्ल्यावर हल्ला झाल्यास आपल्या संपत्तीला धोका पोचेल म्हणून युरोपांतील व्यापारी किल्ला असलेल्या शहरांत आपल्या वखारी उघडीत नाहींत. हिंदुस्थानांतील व्यापारी मात्र याच्या अगदीं उलट करतात. राज्यक्रान्तीच्या वेळीं कोठेंही असलें तरी सर्वस्व हरण होणारच हें माहीत असल्यामुळें ते त्याची पर्वा करीत नाहींत. छोटचा गांवीं किंवा लष्करी ठाणीं नसलेल्या ठिकाणीं दरोडेखोरांचा आणि पेंढाऱ्यांचा जो उपद्रव होतो तसा उपद्रव किल्ला असलेल्या ठिकाणीं होत नाहीं म्हणून येथील लोक व्यापारासाठीं किल्ला असलेलें गांव पसंत करतात. ठाणेदारांनीं व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळासह माझें स्वागत प्रवेशद्वारांतच केलें. माझ्या मनांत मात्र या वेळीं या ठिकाणीं आतांपर्यन्त किती रक्त सांडलें गेलें असेल असे विचार येत होते.

अमृतसर शहर लाहोरपेक्षां मोठें आहे. मुसलमानी अमदानींत चाक नांवाचें हें एक खेडेगांव होतें. परंतु अलीकडे या शहराची भरभराट झाली असून पंजाबमधील सर्व संपत्ति जणूं या शहरांतच सांठवलेली आहे असें वाटतें. इ. स. १५८१ त शिखांचा चौथा धर्मगुरु गुरु रामदास यानें येथें एक तलाव खोदला. आणि या तळ्याला त्यानें अमृतसर म्हणजे अमृताचा झरा असें नांव दिलें, म्हणून या गांवाला नंतर तीर्थाचें स्वरूप आलें आणि हिंदू लोक या गांवाला रामदासपूर किंवा अमृतसर म्हणूं लागले. शिखांचें हें पवित्र ठिकाण आहे, हें लक्षांत आल्यापासून मुसलमानांनीं या शहराकडे आपला मोर्चा वळवला.

शिखांची पहिली धर्मपरिषद इ. स. १७६२ ला येथें भरली होती.

पानिपतची लढाई मारून अहमदशहा अबदाली परत गेल्यानंतर सर्वांनीं
आनंदोत्सवानें या परिषदेंत भाग घेतला. मुसलमान लोकांनीं शिखांची
ससेहोलपट चालविल्यापासून धर्मरक्षणासाठीं शिखांनीं ही पहिली धर्म-
परिषद मोठ्या प्रमाणावर भरवली होती. अशा प्रकारची परिषद शिखांनीं
भरवली आहे ही बातमी कळल्यानंतर सूड घेण्यासाठीं म्हणून अहमदशहा
परत आला. अहमदशहाचें सैन्य परत आलेलें पाहून शीख दशदिशांना
पळून गेले. दिसेल त्या शिखांची कत्तल करीत अहमदशहा अमृतसरला
आला. येथील पवित्र हरिमंदिर सुरूंग पेरून उडवून देण्यांत आलें. सरो-
वराच्या कांठीं असलेले सुंदर दगड फोडून सरोवरांत टाकण्यांत आले
सरोवराचे झरे दगडधोंडयांनीं आणि घाण पदार्थांनीं बुजवून टाकण्यांत
आले आणि यावरही संतुष्ट न राहतां त्या ठिकाणीं गाई आणून
मोडतोड झालेल्या त्या भागांत, त्यांच्या कत्तली करून, तेथें पडलेले
दगड गाईच्या रक्तानें माखून आणि जवळपास गोमांस पसरून ते
निघून गेले. या सर्व गोष्टी करून अबदाली परत गेला मात्र; तो
अटकला पोहोंचण्यापूर्वींच शिखांनीं आपली दुसरी धर्मपरिषद तेथें भरवून
आपल्या धर्माच्या रक्षणासंबंधीं विचार केला. तळ्यांतील सर्व पाणी उपसून
आणि घाण बाहेर काढून टाकून देऊन तें पुन्हां स्वच्छ करण्यांत आलें.
पूर्वीपेक्षांहि अधिक भव्य आणि सुंदर हरिमंदिर त्या ठिकाणीं उभारण्यांत
आलें. मुसलमान लोकांनीं नाश केलेल्या देवळाचा हिंदु लोक क्वचित्‌च
जीर्णोद्धार करतात. तेव्हां शिखांनीं केलेली ही गोष्ट अपवादात्मक समजा-
वयाची. या धार्मिक तीर्थाचा उच्छेद करण्याचा प्रयत्न करून मुसलमानांनीं
आपल्या राजसत्तेचा अन्त जवळ ओढवून आणला.


अमृतसर शहरांतील बाजार माणसांनीं नुसते गजबजून गेलेले असतात.
हिंदुस्थानांतील सर्वोत्कृष्ट कलाकृति येथील बाजारांत विकावयास मांडलेल्या
आहेत. येथील मंदिराजवळ आल्यानंतर मी माझे जोडे काढून ठेवले.
देवळांत वाटण्यासाठीं म्हणून सव्वाशे रुपये मी माझ्या एका नोकराजवळ
दिले. येथील तळें पाहून मी अगदीं थक्क झालों. हा तलाव दीडशे कदम
चौकोनी असून त्यांत पाणी भरपूर आहे. सरोवराच्या काठीं वीसपंचवीस
पावलें रुंदीची फरशी बांधून काढली आहे. तलावाच्या आंत झरा कोठेंहि

दिसत नसल्यामुळें येथील पाणी विहिरीसारख्या नैसर्गिक झऱ्याचें असावें असें वाटतें. किंवा झरे कृत्रिम रीत्या आंतूनच बांधून आणलेले असावेत. तलावांत जाण्यासाठीं दगडाचे घाट वांधलेले आहेत. तळ्यांतील पाणी आरशासारखें पांढरें शुभ्र व स्वच्छ आहे. तळ्याच्या अगदीं मध्यभागीं बेटावर हरिमंदिर बांधलेलें असून तेथें जाण्यास पश्चिमेकडून एक पूल आहे. तलावाच्या सभोंवतीं बांधलेल्या इमारतींत शीख गुरु आणि संन्यासी राहतात. एका इमारतींत कोणीच रहात नव्हतें. त्या ठिकाणीं अमृतसरचें पवित्र क्षेत्र निर्माण करणारा गुरु रामदास रहात होता असें कळतें.

नंतर मी मंदिरांत प्रवेश केला. माझ्या नोकरानें गुरूला रुपये दिल्या-नंतर तो तोंडानें आशीर्वाद पुटपुटला. देवळाच्या आंत निरनिराळ्या भक्तांनीं आणलेलीं फळें, फुलें, यांचा साठा पडला होता. मोठमोठ्या भांड्यांत तूप भरलेलें आढळलें. येथील धर्मगुरूनें मला तीन पानें खावयास दिलीं. या मंदिराचें छत सोनेरी असून तें अतिशय सुंदर आणि कौशल्यपूर्ण आहे. मंदिराचा दरवाजाहि सोनेरी आहे. मंदिराच्या आंतील खांब खडबडीत आहेत. आंतील शीख गुरु ग्रंथसाहेब वाचीत होता. मध्यभागीं असलेल्या एका गुरूनें नंतर माझी चौकशी केली. त्या वेळीं आतांपर्यंत मी न पाहिलेल्या रणजितसिंगाच्या एका हेरानें अस्खलित भाषेंत हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासापासून कंपनी सरकारपर्यंतची सर्व माहिती दिली. माझें वर्णन 'लॉर्ड महाराजा' असें करून महाराजा रणजितसिंगाचा मी दोस्त असल्याचें त्यानें सांगितलें. आतांपर्यंत स्तब्ध बसलेला तो मुख्य गुरु मी निघणार असल्याचें पाहून मोठ्या आवाजांत खालील वाक्य बोलला : " ज्यांची कंपनी सरकारशीं मैत्री सूर्याप्रमाणें अमर आहे, ज्यांच्यामुळें चंद्राला लाज वाटून तोंड लपवावेंसें वाटतें अशा श्रीमहाराजा रणजित-सिंगाचे मित्र महाराजा लॉर्ड बारोन ह्यूगेल साहेबबहादुर आज पवित्र गुरूच्या दरबारांत दर्शनासाठीं आले असून येथें त्यांना गुरूंचा आशीर्वाद आणि त्यांच्यातर्फे अनेक भेटी देण्यांत येत आहेत. सर्वजण इकडे लक्ष द्या हो!" असें म्हणत होता. पागोटें आणि इतर वस्तु भेट म्हणून दिल्या होत्या. त्यांची किंमत पांच रुपयेहि नसेल. नंतर मी सर्वांचा निरोप घेऊन मंदिरांतून बाहेर आलों.

अमृतसरचा किल्ला महाराज रणजितसिंगांच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा असल्यानें कोणाही युरोपीयाला तो दाखवूं देत नाहींत. किल्याच्या आंतील दारू तयार करण्याचा कारखाना युरोपीयांच्या पाहण्यांत येऊं नये हा या बंदीमागील हेतु आहे. छोटचा मोठचा तोफा दारूनें कशा भराव्यात, व त्यांना बत्ती कशी द्यावी याची माहिती मी येथील अधिकाऱ्याला समजावून सांगितली. गुप्त जागा दाखविल्यामुळें मला कदाचित या ठिकाणीं कायमचें बंदिवासांत ठेवतील या भीतीनें मी आंत जास्त वेळ न घालवितां बाहेर आलों. अमृतसरच्या इतक्याजवळ हा किल्ला बांधणें मला चुकीचेंच वाटलें. अमृतसरमधील सर्व गोष्टी पाहून नंतर मी प्रवासाला निघालों. येथील ठाणेदार लेनासिंग हा मला निरोप देण्यास शहराबाहेर आला. त्याच्या नोकराच्या हातांत एक दोन तोटचांची बंदूक असून ती त्यानें मला नजर केली. अर्थात् मी ती घेण्याचें नाकारलें. गांवच्या वेशीबाहेर लोखंडाच्या सळया वितळवून तयार केलेली एक प्रचंड तोफ मला दिसली. ही तोफ येथें नुकतीच तयार करण्यांत आली असून, लाहोरहून तोफेचा गाडा येणार असल्यामुळें ती येथें पडून होती. महाराजा रणजितसिंगाचा तोफा तयार करण्याचा कारखाना अमृतसर येथें आहे. येथेंच महाराजांची टाकसाळहि आहे. रणजितसिंगाच्या राज्यांत कंपनीसरकारचे रुपये चालत नसून एका मोहरेला त्यांची किंमत सोळा रुपये आहे.

अमृतसर ते कपूरथळा अंतर चाळीस मैलांचें असून आम्ही वाटेंत तीन ठिकाणीं हत्ती बदलून हें अंतर काटलें. हत्ती भरधाव वेगानें जात होते. परंतु त्यामुळें पाठीवर बसलेल्या आम्हां प्रवाशांना सारखे हबके बसत होते. वाटेंतील प्रत्येक ठाण्यावर ठाणेदार आम्हांला भेटत असत व आपल्या ठाण्यापासून पुढच्या ठाण्यापर्यंत घोडदळासह येत असत. कपूरथळचाजवळ आम्ही बियास नदी ओलांडली. या नदींतील बोटी अगदीं लहान असून त्यांमधून हत्ती देखील पुढें नेले जात असत. या शहरांतील रस्ते वजिराबाद प्रमाणें रुंद आहेत. हा भाग फत्तेसिंग आसवाला याच्या मालकीचा असून तो रणजितसिंगाचा पगडभाई आहे. त्याचा निम्मा मुलूख सतलजच्या अलीकडे व निम्मा मुलूख सतलजच्या पलीकडे आहे. रणजितसिंगाला घाबरून त्यानें सतलज नदी ओलांडून इंग्रजांचा आश्रय घेतला तेव्हांपासून रणजितसिंग त्याच्या वाटेला जात नाहीं.



कातडी घेऊन त्यावरून नदी ओलांडणारे लोक

बुधवार दि. २७ जानेवारी १८३६ ला मी काश्मीर व पंजाबच्या प्रवासाचा शेवट करणार होतों. त्यासाठीं आज अगदीं सकाळींच राजा फत्तेसिंगाची मुलाखत घेतली. सकाळचीं कामें आटोपून आम्ही लुधियानाच्या मार्गाला लागलों. वाटेंत आम्हांला जालंदर शहर लागलें. त्या ठिकाणीं आंब्याचीं झाडें बरींच दिसलीं. या शहरामध्यें मुसलमानी थडगीं बरींच दिसलीं. त्यामुळें चौकशी केली असतां, लोदी घराण्याचें राज्य या ठिकाणीं होतें असें आढळून आलें. आजहि या शहराची लोकसंख्या चाळीस हजार आहे. शहराच्या बाजारांत फेरफटका मारून आम्ही पुढचा प्रवास आरंभला. नंतर आम्हांला बागवरा नांवाचें एक शहर लागलें. या शहराची लोकसंख्या पंधरा हजार आहे. नांवाप्रमाणें या शहरांत चोहीकडे बागा आहेत. नंतर आम्हांला फेलोरचा किल्ला आणि बुरूज दिसले. हा किल्ला १८०९ सालीं रणजितसिंगानें बांधला असून किल्ल्यांत दीडशें शिपायांची शिबंदी आहे. फेलोरला सतलज नदी ओलांडून मी इंग्रज कंपनीच्या राज्यांत पुन्हा प्रवेश केला. लुधियानाहून इंग्रज रेसिडेंट कॅ. वेड् यांच्याकडून आलेली शरीर-रक्षकांची तुकडी माझ्या स्वागतास सिद्ध होती.

सतलज नदीचें वाळवंट ओलांडीत असतां मी रणजितसिंगाच्या राज्याचा निरोप घेत होतों. गेल्या तीन महिन्यांत कितीतरी जातींच्या व किती तरी तऱ्हेच्या लोकांशीं माझा संबंध आला होता. या दयाळू लोकांनीं माझें फार चांगलें स्वागत केलें. ज्या काश्मीर आणि पंजाब या भागांविषयीं गेले तीन महिने अहोरात्र मी विचार करीत होतों, त्या भागाचा मी निरोप घेतला. पंजाबमधील मला दिसणाऱ्या वस्तु आणि प्रदेश, मी पुढें जात असतांना जसजसे पुसट होत होते, त्याचप्रमाणें जसजसे दिवस जातील तसतशी या भागा-विषयींची माझी स्मृतीहि कमी कमी होत जाईल. फेलोर ते लुधियाना अंतर तीन कोसांचें असून, हें अंतर काटीत असतांना माझ्या मनांत या प्रवासाविषयींच विचार येत होते. बिलासपूर ते जेलकटेला हें अंतर बोटींतून काटीत असतांना ज्या लाटा आम्हांला पुढें ढकलीत होत्या त्या लाटा आज कोठें आहेत? माझ्या प्रवासांतले दिवस ज्याप्रमाणें शाश्वत कालसागराच्या उदरांत गडप झाले, त्याप्रमाणें या लाटा महासागरांत मिळून त्यांत विलीन झाल्या. या लाटांच्या पाण्याच्या

शिडकाव्यानें नदीच्या कांठच्या झाडांना जें जीवन मिळालें, त्यामुळें या झाडांना फळें, फुलें लागलीं, आणि त्यांचें जीवन संपन्न झालें. मध्यंतरींच्या या काळांत, माझ्या ज्ञानांत या प्रवासजीवनामुळें जो बहर आला त्याची प्रतिक्रिया वाचकांना या प्रवासवृत्ताच्या पानापानांतून दिसून येईल. सृष्टि-नियमाप्रमाणें या नदीचा जलप्रवाह अखंडपणें वाहत महासागराच्या खोल उदरांत गडप होतो. त्याचप्रमाणें सृष्टींतील एक अद्‌भूत शक्ति माणसाच्या मनावर अखंड ताबा चालवून त्याच्या मनःप्रवाहाला चालना देते; आणि शेवटीं ही कार्यशक्ति अनंतांत विलीन होऊन नामशेष होते. माझ्या आयुष्यां-तील महत्त्वाचा काळ मी चांगल्या रीतीनें उपयोगांत आणून या कालशक्तीचा मान राखला कां नसत्या ध्येयाच्या मागें लागून मी माझ्या आयुष्याचा अपव्यय केला, याचा निर्णय परमेश्वरानेंच द्यावा. माझी मनोदेवता मात्र मी या कालाचा चांगला उपयोग केला असें सांगते. पृथ्वीच्या अंधाऱ्या पोटांतून झरे बाहेर पडतात आणि बाहेर येऊन, प्रकाशांत आनंदानें नाचत वाट चालतात. कांहीं झरे कोणताहि अडथळा न येतां सुपीक प्रदेशांतून वहात असतात तर कांहीं झरे आपल्या जीवनांत अखंड झगडा करीत असतात. या झगडणाऱ्या झऱ्यांपैकीं कांहीं खडकावरून आपटत आपटत कठीण परिस्थितीं-तून मार्ग काढीत असतात; कांहीं डोंगरावरून हिंडतांना सूर्यप्रकाशामुळें आटून जातात; किंवा न आटल्यास खोल दरींतून उडी घेऊन आत्मक्लेश सोसतात. कांहीं झरे एकांड्या शिलेदाराप्रमाणें उष्णतेनें जळणाऱ्या वाळवंटांत प्रवेश करतात. आणि कोणतीहि खूण पाठी-मागें न ठेवतां अदृश्य होतात. कांहीं झऱ्यांचें पाणी नगरानगरांतून हिंडून लोकांचें जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांचें चांगलें पाणी काढून घेऊन, गलिच्छ पाण्याचे प्रवाह त्यांत सोडून त्यांची परतफेड केली जाते. फारच थोड्यांच्या नशिबीं प्रवास करीत असतांना एखाद्या शांत सरोवरांत प्रवेश करून तेथें भरपूर विश्रांति घेऊन पुढचा मार्ग आक्रमावयास संधि मिळते. हाताच्या बोटावर मोजतां येण्याएवढयाच प्रवाहांना मार्गावरील प्रदेश सुपीक, समृद्ध आणि सुंदर करण्याचें भाग्य लाभतें. पृथ्वीच्या पोटांत जन्मून महासागरांत विलीन होणाऱ्या जलप्रवाहांच्या आयुष्यांत ज्याप्रमाणें हे असे अनेक प्रकार आढळतात, त्याचप्रमाणें माणसाच्या

आयुष्यांत कोणाला चांगली, कोणाला वाईट स्थिति येऊन कोणाच्या हातून चांगल्या गोष्टी होतात, इतरांच्या हातून होत नाहींत. व्यक्तिशः पंजाबमध्यें लष्करी अधिकारी होण्याची मला आलेली संधि नाकारून मी चूक केली किंवा नाहीं याचा निर्णय मी घेऊं शकत नाहीं. अहंकार गर्व, भेकडपणा, आळस किंवा दुसऱ्या एखाद्या स्वार्थी हेतूच्या आहारीं जाऊन मी ही संधि दवडली नसल्यामुळें माझ्या मनाला वाईट वाटत नाहीं. संध्याकाळीं आठ वाजण्याचे सुमारास मी लुधियानाला पोहोंचून कॅ. वेडचा पाहुणचार घेण्यास त्याच्या घरांत प्रवेश केला. आणि त्याच-बरोबर पंजाब व काश्मीरविषयीं मी केलेले विचार आणि या भागांत मी केलेला प्रवास इतिहासांत जमा झाला.

सूची

व्यक्तिसूची

(नावापुढील आंकडे पृष्ठांकांचे आहेत.)

स्थलसूची

(स्थलांच्या नांवापुढील आंकडे पृष्ठांकांचें आहेत.)

ऐतिहासिक प्रवासवृत्त माला : पुष्प दुसरें

‘उत्तर पेशवाईंतील पश्चिम भारत’

(जेम्स फोर्बसचें प्रवासवृत्त)

जेम्स फोर्बस हा ई. इं. कंपनीचा मुंबई इलाख्यांतील एक अधिकारी १७६५ ते १७८४ पर्यंत हिंदुस्थानांत होता. या प्रदीर्घ १९ वर्षांच्या काळांत त्यानें मलबार किनाऱ्यापासून, कच्छच्या आखातापर्यंत सर्व पश्चिम किनाऱ्याचा प्रवास करून लोकांचे रीतिरिवाज, राहणी राज्यव्यवस्था इत्यादींची माहिती जमा केली. या माहितीचा ५२ हजार पृष्ठें मजकूर त्यांनीं लिहून ठेविला. त्यापैकीं कांहीं मजकूर निवडून १८१३ सालीं त्यांनीं "पूर्वेकडील आठवणी" म्हणून चार खंडांत प्रसिद्ध केल्या. या चार खंडांतील मजकुराच्या आधारें हें प्रवासवृत्त मराठींत तयार केलें आहे.

१७७३ सालीं नारायणराव पेशव्याचा खून झाल्यानंतर बारभाईंच्या कारस्थानाची झालेली उभारणी, राघोबाचें इंग्रजांशीं संगनमत, त्याच्या सुरतेच्या मुक्कामांतील कारवाया व खासगी वागणूक या संबंधींची नवीन व इतिहासाच्या दृष्टीनें उपयुक्त माहिती प्रथमच या ग्रंथांत प्रसिद्ध होत आहे. मराठी कागदपत्रांत राघोबादादाविषयीं जी माहिती मिळूं शकत नाहीं ती त्याच्या छावणींत असलेल्या या लेखकानें लिहिली असल्यामुळें राघोबादादाच्या चरित्रावर या ग्रंथामुळें नवीन प्रकाश पडणार आहे.

हा ग्रंथ लौकरच प्रसिद्ध होईल.